स्थापना १९७१

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित

# सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू
# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड



स्मरणिका विशेषांक



# सोनकेशर

सुवर्ण महोत्सवी वर्ष : २०२१–२०२२

21001:2018 नॅक पनर्मानंकन A




नोव्हेंबर २०१८ मध्ये तिसऱ्या फेरीसाठी झालेल्या नॅकच्या पुनर्मूल्यांकनाचा अहवाल
प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांना सुपूर्द करताना नॅक पिअर टिमचे सदस्य समवेत इतर मान्यवर

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the
Navgan Shikshan Sanstha Rajuri (N)
Mrs. Kesharbai Sonajirao Kshirsagar Alias
Kaku Arts, Science and Commerce College
Shivaji Nagar, Dist. Beed, affiliated to
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Maharashtra as
Accredited
with CGPA of 3.18 on seven point scale
at A grade
valid up to November 01, 2023

Date : November 02, 2018

Director

EC(SC)/33/RAR/MHCOGN10809

# ASSURE QUALITY

## MANAGEMENT CERTIFICATION SERVICES PVT. LTD.

### COMPLIANCE VERIFICATION

This is to certify that
Navgan Shikshan Sanstha Rajuri (N.)

## MRS. KESHARBAI SONAJIRAO KSHIRSAGAR ALIAS KAKU ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE

Beed - 431122 - Maharashtra

India

Has been assessed and found to be in accordance with the requirements of detailed below

# Green Audit

Reference A064 latest revision

**To Evolve and Impart Comprehensive Higher Education to the Students of Under Graduation, Post-Graduation, Diploma Courses, Certificate Courses & Doctoral Degrees in Arts, Commerce & Science**

Certificate Number:AB00AA/00AB:0222

Originally Registered:02 Feb.2022 Latest Issue: 02 Feb.2022 Originally Expiry Date:01 Feb.2025

Validity of this certificate is subject to annual surveillance audit to be done successfully on or before of 22 Jan.2023 &22 Jan.2024 respectively. In case if surveillance audit is not allowed to be conducted; this certificate shall be suspended/withdrawn.

AQMCS

For AQMCS PVT LTD

Validity of this certificate can be checked at www.aqmcs.com at registration status. The validity of certificate is subject to continuous compliance the requirement of concerned standard & relevant provision of AQMCS customer contract & scheme of registration A004(latest version) available at www.aqmcs.com This certificate remains the property of AQMCS & shall be returned immediately at the request to AQMCS headquarters.
#1172, Sector-11, Panchkula-134109, Tricity Chandigarh- India

© All copy right reserved

ISO 14001:2015 Environmental Management System

# *ISO 14001:2015 Certificate Of Registration*

## Geotek Global Certification Pvt. Ltd.

hereby certify that the organization

Navgan Shikshan Sanstha, Rajuri (N.)

### Mrs. Kesharbai Sonajirao Kshirsagar
### Alias Kaku Arts, Science & Commerce College, Beed

Address : Beed 431122, Maharashtra, India

has implemented and maintains an **Environmental Management System** for

**Scope :**

**To Evolve and Impart Comprehensive Higher Education to the Students of Under Graduation, Post-Graduation, Diploma Courses, Certificate Courses & Doctoral Degrees in Arts, Commerce & Science.**

An audit was performed and proof has been furnished that the management system fulfils the requirements of international standard detailed below ...

| | |
|---|---|
| **Standard** | : ISO 14001:2015 |
| **Certificate No.** | : 21.GGCS.IN.140182 |
| **Certification Date** | : 31st January 2022 |
| **Cert. Expiry Date** | : 30th January 2025 |

Geotek Global
Certification Pvt. Ltd.

imab
International Management Accreditation Board

Reg. No. IN/EMS20/0512

*Chief Executive Officer*
Geotek Global Certification Pvt. Ltd.
102, Raj Legacy, Near Bramhand Phase 5, Off. GB Road,
Thane (West), Pin 400607, Maharashtra, India

Geotek Global Certification Pvt. Ltd. is accredited by International Management Accreditation Board (Singapore)
51, Goldhill Plaza, #07-10/11, Singapore 308900

The continual validity of the certificate is conditional to compliance with the terms and the conditions of Geotek Global Certification Pvt. Ltd. - Certification Scheme Regulation. Validity of the certificate may be verified on following websites : *www.geotek.co.in* and accreditation body's website : *www.imacb.com*

# ASSURE QUALITY

## MANAGEMENT CERTIFICATION SERVICES PVT. LTD.

### COMPLIANCE VERIFICATION

This is to certify that

**Navgan Shikshan Sanstha Rajuri (N.)**

**MRS. KESHARBAI SONAJIRAO KSHIRSAGAR ALIAS KAKU ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE**

Beed - 431122 - Maharashtra

India

Has been assessed and found to be in accordance with the requirements of detailed below

# GENDER EQUALITY

**To Evolve and Impart Comprehensive Higher Education to the Students of Under Graduation, Post-Graduation, Diploma Courses, Certificate Courses & Doctoral Degrees in Arts, Commerce & Science**

Certificate Number:AB00AB/00AC:0222

Originally Registered:02 Feb.2022 Latest Issue: 02 Feb.2022 Originally Expiry Date:01 Feb.2025

Validity of this certificate is subject to annual surveillance audit to be done successfully on or before of 22 Jan.2023 & 22 Jan.2024 respectively. In case if surveillance audit is not allowed to be conducted; this certificate shall be suspended/withdrawn.

AQMCS

ACCREDITATION COUNCIL OF INDIA

GENDER EQUALITY

For AQMCS PVT LTD

Validity of this certificate can be checked at www.aqmcs.com at registration status. The validity of certificate is subject to continuous compliance the requirement of concerned standard & relevant provision of AQMCS customer contract & scheme of registration A004(latest version) available at www.aqmcs.com. This certificate remains the property of AQMCS & shall be returned immediately at the request to AQMCS headquarters:
#1172, Sector-11, Panchkula-134109, Tricity Chandigarh- India

© All copy right reserved

ISO 50001:2018 Energy Management System

# ISO 50001:2018 Certificate Of Registration

## Geotek Global Certification Pvt. Ltd.

hereby certify that the organization

Navgan Shikshan Sanstha, Rajuri (N.)

### Mrs. Kesharbai Sonajirao Kshirsagar Alias Kaku Arts, Science & Commerce College, Beed

Address : Beed 431122, Maharashtra, India

has implemented and maintains an **Energy Management System** for

**Scope :**

**To Evolve and Impart Comprehensive Higher Education to the Students of Under Graduation, Post-Graduation, Diploma Courses, Certificate Courses & Doctoral Degrees in Arts, Commerce & Science.**

An audit was performed and proof has been furnished that the management system fulfils the requirements of international standard detailed below ...

| | |
|---|---|
| **Standard** | **: ISO 50001:2018** |
| **Certificate No.** | **: 21.GGCS.IN.500135** |
| **Certification Date** | **: 31st January 2022** |
| **Cert. Expiry Date** | **: 30th January 2025** |

Geotek Global Certification Pvt. Ltd.

imab International Management Accreditation Board

Reg. No. IN/EnMS10/0523

*Chief Executive Officer*
Geotek Global Certification Pvt. Ltd.
102, Raj Legacy, Near Bramhand Phase 5, Off. GB Road, Thane (West), Pin 400607, Maharashtra, India

Geotek Global Certification Pvt. Ltd. is accredited by International Management Accreditation Board (Singapore) 51, Goldhill Plaza, #07-10/11, Singapore 308900

The continual validity of the certificate is conditional to compliance with the terms and the conditions of Geotek Global Certification Pvt. Ltd. - Certification Scheme Regulation. Validity of the certificate may be verified on following websites : *www.geotek.co.in* and accreditation body's website : *www.imacb.com*

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड



## कै.सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू

जन्म : ३० मार्च १९२७ मृत्यू : ०४ ऑक्टोबर २००६

# सोनकेशर

सुवर्ण महोत्सवी वर्ष – स्मरणिका विशेषांक २०२१–२०२२

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## आमचे प्रेरणास्थान



**कै.सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ नाना**

जन्म : १५ फेब्रुवारी १९०१ मृत्यू : ३० जुलै २००७

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## आमचे आधारस्तंभ



**मा.जयदत्तजी क्षीरसागर (अण्णा)**

माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## आमचे मार्गदर्शक



**मा.डॉ.भारतभूषणजी क्षीरसागर**

सचिव, नवगण शिक्षण संस्था तथा नगराध्यक्ष, बीड

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड




## प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड



डॉ.दीपा क्षीरसागर
(प्राचार्य)



डॉ.शिवानंद क्षीरसागर
(उप-प्राचार्य, वरिष्ठ महाविद्यालय)



डॉ.सतीश माऊलगे
(संचालक, पदव्युत्तर पदवी विभाग)



प्रा.सय्यद लाल
(उप-प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)



प्रा.जालिंदर कोळेकर
(पर्यवेक्षक, कनिष्ठ महाविद्यालय)

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड



डॉ.दीपा क्षीरसागर

(प्राचार्य)



डॉ.नवनाथ काळे

(सहसंपादक)



प्रा.बालासाहेब कटारे

(संपादक)



डॉ.शिवाजी शिंदे

(सहसंपादक)

## शुभसंदेश

**जयदत्त क्षिरसागर**
बी. ई.( मेकॅ.)
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

- अध्यक्ष - अखिल भारतीय तैलीक साहु महासभा, दिल्ली
- अध्यक्ष - श्री गजानन सहकारी सुत गिरणी, बीड
- अध्यक्ष - श्री गजानन नागरी सहकारी बँक, बीड
- सचिव - आदर्श शिक्षण संस्था, बीड

### शुभ संदेश

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांनी सुरु केलेल्या महाविद्यालयास पन्नास वर्ष पूर्ण झाली याचा मनस्वी आनंद होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकला पाहिजे या तळमळीने शिक्षणाचे जाळे जिल्हाभर काकुंनी उभे केले. काकुंना दूरदृष्टी होती. पन्नास वर्षापूर्वी भविष्यात काय पाहिजे हा विचार करुन शाळा-महाविद्यालये सुरु केली गेली. त्याचा सकारात्मक परिणाम आज दिसून येत आहे. हजारो, लाखो विद्यार्थी शिक्षित झाले यापुढे देखील होतील. एखादे महाविद्यालय पन्नास वर्ष पूर्ण करते त्यावेळेस त्याचा चढता आलेख बघितला जातो. महाविद्यालयास नॅकचे A नामांकन आहे, ही अभिमानाची बाब आहे. प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदींचे अभिनंदन व भविष्यातील प्रगतीसाठी शुभेच्छा..!

आपला

जयदत्त क्षीरसागर

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## शुभसंदेश

सोसायटी रजि.नं.बीएचआर-२/६३ पब्लीक ट्रस्ट रजि.नं. एफ-३३ (बीड)

**नवगण शिक्षण संस्था, राजुरी(न.),**

**ता.जि. बीड.**

डॉ. भारतभूषण क्षीरसागर
सचिव

Email- adarshbeed@gmail.com

जा.क्र.:- २०२१-२२/ 524
दि. 30 MAR 2022

द्वारा:एस.के.एच.मेडिकल कॉलेज, बीड-४३११२२. फोन : (०२४४२) २२७२९३

ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांकरिता सुरु केलेल्या नवगण महाविद्यालयाची स्थापना काकूंनी मागील पन्नास वर्षापूर्वी केली. अतिशय छोटया जागेमध्ये सुरु केलेले हे महाविद्यालय आज भव्य चार मजली इमारतीमध्ये , चार मजली ग्रंथालयामध्ये, चार मजली मुलींच्या वस्तीगृहामध्ये, सुसज्ज अशा क्रीडा संकुलासह विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर या नावाने उभे आहे. ज्या उद्देशाने काकूंनी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण बीड जिल्हयामध्ये शिक्षणचं जाळं विणलं, शाळा-महाविद्यालयाची स्थापणा केली, तो उद्देश पूर्ण झाल्याच आज दिसून येतं. महाविद्यालयाला पन्नास वर्षे पूर्ण झाली! सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत अहात, अशीच शतकपूर्ती होवो ही सदिच्छा !

डॉ. भारतभूषण क्षीरसागर
सचिव
नवगण शिक्षण संस्था तथा नगराध्यक्ष, बीड

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## शुभसंदेश

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद-४३१००४ महाराष्ट्र (भारत)**
नॅक 'अ' श्रेणी प्राप्त

प्रा.(डॉ.) प्रमोद येवले
एम. फार्म., पीएच.डी., डी.बी.एम.
कुलगुरु

दूरध्वनी : ०२४०-२४०३३९९, २४०३४००
कार्यालय : ०२४०-२४०३१११२
E-mail : vc@bamu.ac.in
Website : www.bamu.ac.in

जा.क्र. कुलगुरुंचे कार्यालय/२०२१/ 169 दिनांक: ७/०१/२०२२

### शुभेच्छा संदेश

प्राचार्य डॉ. सौ. डी. बी. क्षीरसागर,

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकु कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्याल, बीड संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ सुवर्ण महोत्सव वर्ष म्हणुन साजरा करत अहात. त्या निमित्ताने तुम्ही वेगवेगळे अभ्यासक्रम, पुरक उपक्रम आणि कार्यक्रमही राबवत अहात तसेच महाविद्यालयाच्या एकुण प्रागतिक वाटचालीवर प्रकाश टाकणारी स्मरणिका काढयाचा तुमचा मानस आहे.

करीता सुवर्ण महोत्सव या निमित्ताने संस्थेला सदिच्छा ...!!!

प्रो. डॉ. प्रमोद येवले
कुलगुरु

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## शुभसंदेश


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद-४३१००४ महाराष्ट्र (भारत)
नॅक 'अ' श्रेणी प्राप्त

प्राध्यापक श्याम शिरसाठ
एम.ए.(लोकप्रशासन) पी.एच.डी.
प्र-कुलगुरु

दुरध्वनी : ०२४०-२४०३३९९, २४०३४००
कार्यालय : ०२४०-२४०३२२३, २४०३२२४
E-mail : provc@bamu.ac.in
Website : www.bamu.ac.in


दिनांक:२९-०३-२०२२

**शुभेच्छा**

आपल्या नवगण शिक्षण संस्था, राजुरी नवगण संचलित सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड चे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ हे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणुन साजरे होत आहे. महाविद्यालयाने एक महत्वाचा टप्पा गाठला आहे, करीता मनस्वी अभिनंदन..!

शैक्षणिक दृष्टया मागास समजल्या जाणाऱ्या मराठवाडयातील बीड जिल्हयासाठी आपल्या महाविद्यालयाचे मागील पन्नास वर्षातील योगदान निश्चितच सुवर्ण अक्षराने लिहीले जाईल. सामाजिक जाणीव आणि सामाजिक बांधिलकी या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयाने केलेले कार्य इतर संस्थांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

शिक्षण, कला, क्रीडा आणि सामाजिक प्रबोधनात आपल्या महाविद्यालयाचे नाव अगत्याने घेतले जाते, हाच वारसा आपण कायम जोपासावा ही सदिच्छा आणि सुवर्ण महोत्सवी वर्षानिमीत्य घेतले जाणारे उपक्रम आणि भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा..!

प्रोफेसर श्याम शिरसाठ,
प्र-कुलगुरू
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद-४३१००४ महाराष्ट्र (भारत)

नॅक समितीद्वारे 'अ' दर्जा प्राप्त


**प्रा. जयश्री राजेश सूर्यवंशी**
पीएच.डी.,एम.फिल.,एम.बी.ए.,एम.कॉम.

**कुलसचिव**

ईपीएबीएक्स : 0240-2403399, 2403400
कार्यालय : 0240-2403291,334,336
ई-मेल : registrar@bamu.ac.in
वेबसाईट : www.bamu.ac.in


संदर्भ :- कुसका/२७/२७१/

दिनांक: ३१-०३-२०२२

**शुभ संदेश**

स्व.काकूंनी स्थापन केलेल्या सौ.के.एस.के. महाविद्यालयाचा बघता बघता सुवर्ण महोत्सव साजरा होतो आहे, ही बाब आनंददायी आहे. शिवाय मागील पाच दशकांत या महाविद्यालयाने केलेला सर्वांगिण विकास खरोखरच वाखाणण्याजोगा आहे. अध्ययन-अध्यापना पासून सुरु झालेला या महाविद्यालयाचा प्रवास नाट्य, संगित, क्रीडा, आरोग्य आणि सामाजिक बांधिलकीपर्यंत कधी येऊन पोहोचला हे लक्षातही आले नाही. या सर्व प्रगतीच्या वाटा आहेत. या अशाच सुरु राहोत आणि लवकरच या महाविद्यालयाचा अमृत महोत्सव मोठया उत्साहात साजरा होवो, ही शुभेच्छा.

RSuryawanshi

प्रो.डॉ.जयश्री सुर्यवंशी
कुलसचिव

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## विद्यार्थी संसद २०२१-२२



**श्रेया सरकटे**

(सचिव-विद्यार्थी संसद)

| | | |
|---|---|---|
| १) | श्रेया सरकटे | सचिव |
| २) | बाबासाहेब राऊत | सहसचिव |
| ३) | प्रतिक्षा रुपनर | विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| ४) | किरण पटेकर | एन.एस.एस.प्रतिनिधी |
| ५) | अविनाश गोंडे | एन.सी.सी.प्रतिनिधी |
| ६) | सय्यद मुशरफ | क्रीडा प्रतिनिधी |
| ७) | नितीन गुळवणे | सांस्कृतिक प्रतिनिधी |

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,


# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## अभिनंदन



### प्रा.डॉ.रेखा गुळवे

सूक्ष्म जीवशास्त्र विषयामध्ये
पेट्रीडीशच्या संरचनेसंदर्भात केलेल्या
महत्वपूर्ण संशोधनाला पेटंट ऑफिस
गव्हर्नमेंट ऑफ इंडियाकडून
पेटंट मंजूर



### प्रा.डॉ.संजय पाटील देवळाणकर

अध्यक्ष–B.voc. board ,
डॉ.बा.आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद,
अध्यक्ष–नाट्यशास्त्र सल्लागार मंडळ,
सदस्य–आंतरविद्याशाखीय विद्यापीठ विकास मंडळ,
सदस्य–महाराष्ट्र शासन रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ,
सदस्य–नाट्यनिर्मिती अनुदान मंडळ,
सदस्य–अभ्यास मंडळ लोककला
अकादमी मुंबई विद्यापीठ मुंबई.



### डॉ.सुरेखा जोशी

सहयोगी फाऊंडेशन, पुणे
यांच्यातर्फे दिला जाणारा
महात्मा ज्योतिबा फुले
आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान



### डॉ.संध्या जोगदंड

२०२१ चा भारतरत्न
डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम
अंतरराष्ट्रीय
सन्मान पुरस्कार प्रदान

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## अभिनंदन





**डॉ.अनिता शिंदे**

आधार फाऊंडेशन, सोलापूर
यांच्याकडून दिला जाणारा
डॉ.बा.आं.साहित्यसेवा
राष्ट्रीय पुरस्कार



**डॉ.आसाराम चव्हाण**

२०२१ चा महात्मा ज्योतिराव फुले
राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार
तसेच डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद
अंतर्गत भूगोल विषयातील
पीएच.डी. पदवी प्रदान





**डॉ.पंडित खाकरे**

राजे यशवंतराव होळकर
राज्यस्तरीय
आदर्श शिक्षक
पुरस्कार प्रदान

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## अभिनंदन





### डॉ.दुष्यंता रामटेके

दै.लोकमत वृत्तपत्र समुहाकडून सांस्कृतिक कार्याकरीता दिला जाणारा वुमन अँचीव्हर्स पुरस्कार प्रदान तसेच डॉ.बा.आं.म.विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत नाट्यशास्त्र विषयातील संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता



### कॅ.प्रा.बालासाहेब पोटे

कॅप्टनपदी पदोन्नती





### डॉ.मंजु जाधव

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत गृहशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## अभिनंदन





**डॉ. अनिल शेळके**

डॉ. बा. आं. म. विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत प्राणीशास्त्र विषयातील संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता



**डॉ. श्रीमंत तोंडे**

डॉ. बा. आं. म. विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत इंग्रजी विषयातील संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता





**डॉ. सतीश माऊलगे**

डॉ. बा. आं. म. विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत रसायनशास्त्र विषयातील संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## अभिनंदन



**प्रा.शिवाजी राऊत**

भौतिकशास्त्र विषयात

सेट परीक्षा उत्तीर्ण





**प्रा.अमोल घुमरे**

मराठी विषयात

सेट परीक्षा उत्तीर्ण

नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## गुणवंत विद्यार्थी



**सय्यद सनान सय्यद लाल**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
(एम.बी.बी.एस.)
नंदुरबार येथे प्रवेशित



**सईदा फातेमा तुझोरा**
वैद्यकीय महाविद्यालय
बदनापूर येथे प्रवेशित

## अभिनंदन



**अथर्व बिरंगल**
आय.आय.टी. अलाहाबाद
येथे प्रवेशित



**संज्योत भुरे**
आय.आय.टी. मुंबई
येथे प्रवेशित



**विश्वजीत फाटे**
व्ही.आय.टी. भोपाळ
येथे प्रवेशित





नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित,

# सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड



प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वजास मानवंदना देताना नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा नगराध्यक्ष मा.डॉ.भारतभूषणजी क्षीरसागर, समवेत महाविद्यालयाच्या प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर



वरिष्ठ महाविद्यालयातील
कला शाखेतील प्राध्यापकवृंद,
समवेत प्राचार्य डॉ.दीपा
क्षीरसागर व इतर पदाधिकारी

वरिष्ठ महाविद्यालयातील
विज्ञान शाखेतील प्राध्यापकवृंद,
समवेत प्राचार्य डॉ.दीपा
क्षीरसागर व इतर पदाधिकारी





वरिष्ठ महाविद्यालयातील
वाणिज्य शाखेतील
प्राध्यापकवृंद, समवेत प्राचार्य
डॉ.दीपा क्षीरसागर व इतर
पदाधिकारी



कनिष्ठ महाविद्यालयातील
कला शाखेतील प्राध्यापकवृंद,
समवेत प्राचार्य डॉ.दीपा
क्षीरसागर व इतर पदाधिकारी

कनिष्ठ महाविद्यालयातील
विज्ञान शाखेतील प्राध्यापकवृंद,
समवेत प्राचार्य डॉ.दीपा
क्षीरसागर व इतर पदाधिकारी





महाविद्यालयातील
व्यावसायिक अभ्यासक्रम
विभागातील प्राध्यापकवृंद,
समवेत प्राचार्य डॉ.दीपा
क्षीरसागर व इतर पदाधिकारी



महाविद्यालयातील
महिला कक्ष विभागासमवेत
प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व
इतर पदाधिकारी

महाविद्यालयातील
शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद समवेत
प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व
इतर पदाधिकारी





महाविद्यालयातील
सेवकवृंद समवेत प्राचार्य
डॉ.दीपा क्षीरसागर व इतर
पदाधिकारी

सुवर्ण महोत्सवी वर्ष - सन २०२१-२०२२

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय... | संपादक | ०१ |
| २) | प्राचार्यांचे मनोगत | प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर | ०२ |
| ३) | १८ वर्षांपूर्वीच्या आठवणींचे सिंहावलोकन करताना | डॉ. विक्रम सारुक | १९ |
| ४) | आठवणींची शिदोरी | महेश अहिल्याराम लगड | २१ |
| ५) | नवगणाचे नभांगणात | डॉ.मन्मथअप्पा हेरकर | २४ |
| ६) | सौ.के.एस.के. कॉलेजचा सुवर्णवेध : अनुभव शिदोरी | डॉ. मोहन गुळवे | २६ |
| ७) | प्रेरणा आणि प्रवास | डॉ. एस.डी.नाईकवाडे | २९ |
| ८) | आदरणीय सौ.काकू : एक अष्टपैलू व्यक्तिमत्व | प्रा. एस.जी. केंद्रे | ३१ |
| ९) | नवगण ऊर्फ सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर | प्रा. एल.के. तुरूकमाने | ३५ |
| | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या आठवणी | | |
| १०) | पिंपळपान | डॉ. पार्वती देशमाने | ३७ |
| ११) | सुवर्ण महोत्सवी वर्षातील सौ.के.एस.के. महाविद्यालय... | प्रा. अनंत नखाते | ४० |
| १२) | आठवणींना उजाळा | डॉ. गणेश चंदनशिवे, मुंबई | ४१ |
| १३) | आत्मनिर्भर व आदर्श नागरीक घडविणारे ज्ञानकेंद्रः सौ.के.एस.के. महाविद्यालय... | डॉ.सय्यद हुसैनी स.शौकतुल्ला | ४३ |
| १४) | नाट्यशास्त्राच्या कोपऱ्यातून | महेंद्र खिल्लारे, मुंबई | ४५ |
| १५) | सौ.के.एस.के. महाविद्यालयाने मला कवी, सामाजिक कार्यकर्ता व राजकीय नेता बनवले ! | प्रा. ज्ञानदेव राऊत | ४७ |
| १६) | माझे महाविद्यालय | प्रा. शंकर राऊत | ४८ |
| १७) | माझ्या आठवणीतील महाविद्यालय... | मिनल क्षीरसागर | ४९ |
| १) | आयुष्याच्या पुस्तकातील अविस्मरणीय पान 'कॉलेज' | निशिगंधा शेटे | ५१ |
| १९) | महाविद्यालयीन आठवणी | अतुल चव्हाण | ५२ |
| २०) | माझ्या यशस्वी जडणघडणीचा पायाःके.एस.के.महाविद्यालय | गितांजली आंधळे | ५३ |
| २१) | सौ.के.एस.के. एक कुटूंबच... | राजनंदिनी कसबे | ५३ |
| २२) | माझे महाविद्यालयीन जीवन | निमिता गवळी | ५४ |
| २३) | जीवनाला आकार देणारे महाविद्यालय... | हर्षदा भुंबे | ५५ |
| २४) | एक अविस्मरणीय प्रवास | अरूणा नावेकर | ५६ |
| २५) | माझे महाविद्यालय जणू 'ज्ञानाचा सागरच सारा' | सय्यद शाहीन शफी | ५७ |
| २६) | एक जिवंत अनुभव | विकास ढगे | ५८ |
| २७) | योग्यतेला दिशा मिळाली | लेफ्टनंट जे.डी. चव्हाण | ६० |

# सुवर्ण महोत्सवी वर्ष - सन २०२१-२०२२


| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| २८) | महाविद्यालय नव्हे ! विद्यार्थी विकास केंद्र !! | दिलीप खिस्ती | ६१ |
| २९) | स्व. काकूंचा उद्देश सफल झाला...<br>के.एस.के.महाविद्यालय नव्हे तर एक विद्यापीठच | उदय जोशी | ६३ |
| ३०) | यशोगाथा | प्रशांत सुलाखे | ६४ |
| ३१) | बीडच्या सांस्कृतिक चळवळीचे केंद्र के.एस.के.कॉलेज | महेश वाघमारे | ६५ |
| ३२) | 'आदर्श' महाविद्यालय | चंदन पठाण | ६७ |
| ३३) | विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशले...<br>के.एस.के.मधील पंडित ऱ्हदयनाथ मंगेशकरांची मैफील | डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर | ६८ |
| ३४) | काकूंची ज्ञानोत्री : नवगण एक अध्याय | भागवत तावरे | ६९ |
| ३५) | महाविद्यालयीन जीवन | नितीन गायकवाड | ७० |
| ३६) | मोबाईल आणि माणूस | कविता गोले | ७१ |
| ३७) | माझ्या आठवणीतील के.एस.के.कॉलेज | अंबादास जाधव | ७२ |
| ३८) | भरभरून देणारे के.एस.के. महाविद्यालय... | रजनी बडे | ७३ |
| ३९) | प्रगतीच्या प्रवासातील टप्पा म्हणजे के.एस.के.कॉलेज | मयुरा जाधव | ७४ |
| ४०) | डॉ. दीपाताई भारतभूषण क्षीरसागर<br>सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या आयडीयल प्राचार्या | शेख ए. ए. | ७५ |
| ४१) | माझ्या आयुष्याला आकार देणारे सौ.के.एस.के. कॉलेज | सय्यद अफरोज अहेमद | ७७ |
| ४२) | सहल | पंजाबराव येडे | ७८ |
| ४३) | आजचे के.एस.के. महाविद्यालय | सिद्धेश्वरी कोकाटे | ८१ |
| ४४) | माझं कॉलेज, माझ्या आठवणी | प्रियंका जाधव | ८२ |
| ४५) | स्नेहिल आदर्शो का प्रेरक-सौ.के.एस.के. महाविद्यालय | डॉ. ललिता राठोड | ८५ |
| ४६) | Memoirs of Service in K.S.K. College | Butte D. G. | ८६ |
| ४७) | College Days | Sushma Pawar | ८७ |


## कविता


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | प्रिय केशरकाकू | सिद्धेश्वरी कोकाटे | ९) | साथ | राहूल अंभूरे |
| २) | प्राचार्य दीपा मॅम | सिद्धेश्वरी कोकाटे | १०) | मी | कोमल वीर |
| ३) | या म्हणावं तुफानांना | अनिलकुमार होळकर | ११) | स्पेस | अंकिता अहिरे |
| ४) | ओढ... | कविता गोले | १२) | गाठताना किर्तीचे शिखर | बुशरा शेख |
| ५) | आयुष्याच्या वाटेवर | कविता गोले | १३) | मौन | आकांक्षा सोनवणे |
| ६) | वेदना | पल्लवी आमटे | १४) | नारी | गीता चव्हाण |
| ७) | आयुष्य | अंजली गायकवाड | १५) | नवीन वर्षाचे गीत | जगमित्र |
| ८) | मैत्रिण | यश दुनघव | १६) | तू कोण ठरवणारा | जगमित्र |

# १. संपादकीय...

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित होत असलेल्या स्मरणिकेचे संपादक म्हणून काम करताना खरोखर समाधान वाटत आहे, आनंद होत आहे. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी बीड जिल्ह्याच्या लोकनेत्या तथा खासदार स्व. केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकू यांनी या महाविद्यालयाची स्थापना केली. वस्तूतः पाहू जाता बीड जिल्हा तसा मागास जिल्हा म्हणूनच सबंध महाराष्ट्राला परिचित आहे. या जिल्ह्यातील सामान्य जनतेचे जीवनमान उंचवावे, त्यांच्या जगण्याचा स्तर अधिक उन्नत व्हावा, त्यांच्या पाल्यांना अधिक दर्जेदार आणि इतरत्र धावपळ न करता गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या उदात्त आणि कल्याणकारी हेतूने स्व. काकूंनी या महाविद्यालयाची उभारणी केली आणि विकास केला. तसे पाहता काकूंनी अनेक शाळा महाविद्यालयांची उभारणी केली, मात्र सौ. के. एस. के. महाविद्यालय सर्व शाखांमध्ये मातृशाखा तथा मुख्यशाखा म्हणून ओळखले जाते.

महाविद्यालय स्थापनेच्या आणि नंतरच्या काळांमध्ये महाविद्यालयाच्या प्रवासामध्ये कितीतरी अडचणी आल्या. स्थापनेच्या काळी तर अगदी शे-सव्वाशे विद्यार्थी संख्या आणि पत्र्यांच्या वर्गखोल्या एवढीच सामुग्री महाविद्यालयाकडे होती, असे जुनी मंडळी सांगताना आढळतात. मात्र काकूंच्या दुर्दम्य इच्छाशक्तीपुढे आणि चिवट प्रयत्नांपुढे सर्व अडचणी दूर झाल्या आणि महाविद्यालय यशाचे शिखर सर करत गेले. असे म्हणतात, कुठलेही काम केवळ एकट्या-दुकट्याने करणे अशक्य असते. पुढे काकूंचे सुपूत्र माजी मंत्री मा. जयदत्तजी (अण्णा) क्षीरसागर, संस्थेचे सचिव तथा विद्यमान नगराध्यक्ष मा.डॉ. भारतभूषणजी क्षीरसागर या दोन्ही बंधुंनी बंधूप्रेम जपत काकूंच्या या महाविद्यालयाला ऐतिहासिक ठेव्याप्रमाणे जपले, वाढवले. आणि महाविद्यालयाला खऱ्या अर्थाने चार चाँद लावण्याचे काम केले ते काकूंच्या स्नुषा असणाऱ्या आणि व्यक्तित्वाला खऱ्या अर्थाने अष्टपैलू असणाऱ्या कुशल प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर ह्यांनी.

डॉ. दीपा क्षीरसागर ह्यांनी प्राचार्यपदाची सुत्रे हाती घेतल्यापासून महाविद्यालय तिळातिळाने प्रगती करत आले आहे. नवनवीन विषय, नवनवीन ज्ञानशाखा, प्रशस्त इमारत, सुसज्ज ग्रंथालय, मुलींचे वसतीगृह, भव्यदिव्य असे सांस्कृतिक आणि क्रीडा सभागृह, भव्य असे क्रीडांगण, पूर्ण पात्रताधारक आणि विद्वान असा प्राध्यापकवर्ग, वेगवेगळे उपक्रम आणि कार्यक्रम यांचे नियमितपणे केले जाणारे आयोजन यामुळे हे महाविद्यालय सबंध जिल्ह्यातील एक नामांकित आणि अग्रेसर महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. याचे सर्व श्रेय प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या परिश्रमाला आणि त्यांनी खाल्लेल्या खस्तांना जाते.

महाविद्यालयाच्या मागील वर्षांच्या काळात महाविद्यालयातून शिक्षण घेवून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या हजारोंच्या घरात आहे. अनेकजण समाजामध्ये वेगवेगळ्या उच्च पदावर अधिकारी म्हणून कार्य करत आहेत. अनेकांनी क्रीडा, नाट्य, संगीत, पत्रकारिता अशा नानाविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. अनेकजण उद्योग, व्यवसाय करत समाजामध्ये आनंदी जीवन जगत आहेत.ह्यांच्याकडे पाहिले म्हणजे काकूंचे प्रयत्न, काकुंची तळमळ सार्थकी लागल्याचे समाधान मिळते.

आज पन्नास वर्षाच्या टप्प्यावरून मागे वळून पाहताना मनामध्ये कितीतरी कडू-गोड, भले-बुरे, संघर्षाचे आणि आनंदाचे क्षण दाटून येणे स्वाभाविक आहे. म्हणून मागील पन्नास वर्षातील अनुभव आणि आठवणींना उजाळा देणारा स्मरणिकेचा अंक प्रकाशित करण्याचे आमच्या आदरणीय प्रा.डॉ. दीपा क्षीरसागर यांनी निश्चित केले. आम्ही त्यादिशेने प्रयत्न सुरू केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, पदाधिकारी, समाजातील सुसंगत आणि कर्तृत्ववान व्यक्ती, पत्रकार, सध्याचे विद्यार्थी त्यांच्याकडून महाविद्यालयाच्या प्रागतिक प्रवासावर प्रकाश टाकणारे लेख आम्ही मागवून घेतले. त्यातून नानाविध अनुभव आणि विषयवैविध्य असलेले लेख समितीकडे जमा झाले. अनेक दुर्मिळ छायाचित्रांचेही संकलन करून स्मरणिकेमध्ये छायाचित्रांचे एक स्वतंत्र दालनच आम्ही तयार केले. ह्या सर्व कामामध्ये मागील सहा महिने कसे गेले हे समजले नाही. मात्र आपण एक महत्वाचे, आगळेवेगळे आणि सर्जनात्मक काम करत आहोत याचा आनंद मनात कायम राहीला.

महाविद्यालयाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांना, शहरातील पत्रकार बांधवांना, वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पदाधिकाऱ्यांना आणि कर्तृत्ववान व्यक्तिंना महाविद्यालयाविषयी काय वाटते, याघडीला त्यांच्या या महाविद्यालयांकडून काय आशा आणि अपेक्षा आहेत असे या स्मरणिकेचे साधारणतः स्थूल स्वरूप आहे. स्व. काकुंनी कुठल्यातरी अनिवार इच्छेने आणि दुर्दम्य आशावादी दृष्टीने या महाविद्यालयाचे रोपटे लावले होते. त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. ही खरोखर अभिमानास्पद बाब आहे. संत ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगावयाचे झाले तर

"इवलेसे रोप लावियेले द्वारी ।
त्याचा वेलू गेला गगनावरी ।।"

असेच म्हणावे लागेल. शेवटी आज जसा या महाविद्यलयाचा सुवर्ण महोत्सव साजरा होतो आहे, तसा पुढे कधीतरी अमृत महोत्सवही मोठ्या हर्षोल्लासामध्ये साजरा होईल, अशी आशा व्यक्त करतो. हा स्मरणिकेचा अंक आपल्याला नक्की आवडेल असे मला वाटते. पुन्हा एकदा सर्वांना सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो आणि थांबतो. धन्यवाद...

संपादक

# २. प्राचार्यांचे मनोगत

ग्रामीण आणि नागरी भागातील गरजु, होतकरू आणि सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी, त्यांचा सर्वांगिण विकास साधावा, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे हा उदात्त आणि कल्याणकारी दृष्टिकोन समोर ठेवून १९७१ साली बीड जिल्ह्याच्या लोकनेत्या स्व. केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकू ह्यांनी केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. सद्यःस्थितीमध्ये हे महाविद्यालय बीड जिल्ह्यातील एक अग्रेसर महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. केवळ शे.सव्वासे विद्यार्थी संख्येवर सुरु झालेल्या या महाविद्यालयामध्ये आजमितीला साडेतीन ते चार हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

स्व. काकूंच्या प्रयत्नातुन सुरू झालेल्या या महाविद्यालयाने अनेक मानाचे तुरे आपल्या शिरपेचात खोवून आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. आजवर महाविद्यालयाचे तीन वेळेस नॅक समितीकडून मूल्यांकन झाले असून प्रत्येक वेळेस महाविद्यालयाचा ग्रेड उंचावत गेलेला आहे. महाविद्यालयाला नॅक समिती अंतर्गत झालेल्या तिसऱ्या पुनर्मूल्यांकनामध्ये मिळालेला A Grade (CGPA 3.18) हे याचेच उदाहरण आहे. याच बरोबर ISO, Green Audit, Gender Equality, Environment Management System यासारखी मूल्यांकनही महाविद्यालयाने पूर्ण करून घेतली आहेत. या महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांबरोबरच पीकशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, संगीत, नाट्यशास्त्र, भूगोल, असे नवनवीन विषयही शिकवले जातात. मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, संगीत, गृहशास्त्र, संगणकशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र आणि वाणिज्य विषयांमध्ये पदव्यूत्तर पदवीचे शिक्षण घेण्याची सोयही या महाविद्यालयात उपलब्ध आहे. तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी सूक्ष्मजीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, गृहशास्त्र आणि वाणिज्य आदी विषयांमध्ये संशोधन करण्यासाठी डॉ. बा.आं.म.विद्यापीठ औरंगाबाद यांची मान्यता असलेले संशोधनही केंद्रेही कार्यरत आहेत.

केवळ अध्ययन-अध्यापनच नव्हे तर संशोधन, विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक विकास, सामाजिक विकास, क्रीडाविषयक उपक्रम, आरोग्यविषयक उपक्रम, राष्ट्रप्रेम जागृती अशा विविध अंगांनी हे महाविद्यालय कार्य करते. या महाविद्यालयामध्ये सद्यःस्थितीत एकूण ४१ वरिष्ठ प्राध्यापक, ३६ कनिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रम प्राध्यापक, ४२ शिक्षकेत्तर कर्मचारी, ३४ पी.एच.डी. धारक प्राध्यापक, ६ एमफिल धारक प्राध्यापक, २१ संशोधन मार्गदर्शक, ०२ विद्यापीठ अभ्यासक्रम मंडळ अध्यक्ष तसेच ०९ विद्यापीठ अभ्यासक्रम मंडळ सदस्य म्हणून कार्यरत आहेत. सद्यःस्थितीमध्ये एकूण ७८ विद्यार्थी वेगवेगळया विषयांमध्ये पीएच.डी.चे संशोधन कार्य करत आहेत. दुर्वांकूर हा महाविद्यालयाच्या सर्वांगिण प्रगतीवर प्रकाशझोत टाकणारा वार्षिकांक प्रतिवर्षी नियमितपणे प्रकाशित केला जातो. शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ हे महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जाते. त्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये विभागनिहाय वेगवेगळया महत्वपूर्ण कार्यक्रमांचे आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचा संक्षिप्त गोषवारा पुढीलप्रमाणे :

**मराठी विभाग :**

सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून मराठी विभागाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत मान्यताप्राप्त मराठी संशोधन केंद्र सुरू केले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना मराठी विषया-मध्ये पीएच.डी.चे संशोधन करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दि. ६ डिसेंबर २०२१ रोजी जिल्हास्तरीय महाविद्यालयीन निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दि. २९ डिसेंबर २०२१ रोजी प्रा.डॉ. नामदेव शिनगारे यांच्या अभ्यागत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. १ ते १५ जानेवारी २०२२ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला. याअंतर्गत अनेक उपक्रम राबविण्यात आले.

दि. ९ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठी विभागाच्या प्रमुख तथा प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या 'झुंज तिची पाचटाशी' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. याअंतर्गत 'मराठी भाषेचे भवितव्य' या विषयावर डॉ. नामदेव शिनगारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**हिंदी विभाग :**

सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये हिंदी विभागाच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये दि. ३१ जुलै रोजी हिंदीतील सुप्रसिद्ध लेखक प्रेमचंद यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ४८२ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. दि. १४ ते २१ सप्टेंबर २०२१ दरम्यान 'हिंदी भाषा सप्ताह' घेण्यात आला. यामध्ये हस्ताक्षर स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा, भाषण स्पर्धा, कविता लेखन स्पर्धा, ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी 'भारतवाणी' या ई-भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. दि. २७ सप्टेंबर २०२१ रोजी 'हिंदी मे रोजगार की संभवना हैं' या विषयावरील राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले. दि. जानेवारी २०२२ रोजी प्रा.डॉ. ललिता राठोड यांच्या अभ्यागत व्याख्यानाचे आयोजन करण्यत आले.

**इंग्रजी विभाग :**

सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून दि. १५ ऑस्ट २०२१ रोजी इंग्रजी विभागाच्या वतीने The Rays of Wisdom या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. दि. ४ सप्टेंबर २०२१ रोजी Changing perspective of Education या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून इंग्रजी विभागांतर्गत इंग्रजी भाषेचे संशोधन करण्यासाठी नवे संशोधन केंद्र सुरु करण्यात आले. विभागातर्फे प्रा. माणिक भताने यांचे Communication Skills या अभ्यागत व्याख्यानाचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते.

**अर्थशास्त्र विभाग :**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये १० ऑक्टोबर २०२१ रोजी 'ऑनलाईन मनी ट्रान्सफर' या विषयावर ऑनलाईन वेबिनार घेण्यात आला. १५ ऑगस्ट रोजी 'भित्तीपत्रकाचे' प्रकाशन करण्यात आले. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राची माहिती मिळावी या उद्देशाने नोव्हेंबर महिन्यात 'औद्योगिक सहलीचे आयोजन' करून एम.आय.डी.सी. मध्ये भेट देण्यात आली. बीड तालुक्यातील आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांचा सर्व्हे करण्यात आला.

९ फेब्रुवारी रोजी प्रा. नागरगोजे यांचे 'कोरोनामुळे होणारा अर्थव्यवस्थेवरील परिणाम' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले.फेब्रुवारीमध्ये घाटसावळी येथील 'वृद्धाश्रमास' भेट देवून त्यांना आर्थिक मदत करण्यात आली.

**समाजशास्त्र विभाग :**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून समाजशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'समुपदेशन केंद्र' सुरू करण्यात आले. ५ जानेवारी २०२२ रोजी सामाजिक बांधीलकीची जोपासना म्हणून भिल्ल,गोंड या आदिवासी जमातीच्या समस्या जाणून घेवून त्यांच्या पाल्यास शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

**भूगोल विभाग :**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून भूगोल विषयाच्या वतीने २८ जानेवारी २०२१ रोजी 'भूजल साक्षरता' या विषयावर वरिष्ठ भूवैज्ञानिक राजेंद्र पवार

यांच्या एक दिवशीय ऑनलाईन प्रशिणाचे आयोजन करण्यात आले. १५ ऑगस्ट २०२१ रोजी 'कॉसमॉस' भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. २८ डिसेंबर २०२१ रोजी डॉ.जे.डी.चव्हाण यांचे 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. ३ जानेवारी २०२२ रोजी विभागाचा माजी विद्यार्थी प्रा. सुसेन आघाव यांचे 'भूगोल व स्पर्धा परीक्षा' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले.

१४ जानेवारी २०२२ रोजी 'भूगोल दिन' साजरा करून विद्यार्थ्यांसाठी नकाशावाचन व नकाशा भरण्याची स्पर्धा आयोजित केली गेली.

## इतिहास विभाग :

इतिहास विभागाच्या वतीने राजर्षि शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉ. सतीश कदम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त डॉ. विश्वास कंधारे यांचे 'क्रांतिकारकांचे योगदान' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. अनिता शिंदे यांच्या 'मन्वंतर' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ.बा.आं.म.विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या हस्ते झाले. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त सत्यशोधक न्यूज पोर्टल, पुरोगामी विचारमंच नाशिक यांच्याकडून आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन चर्चासत्रात डॉ. अनिता शिंदे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभाग नोंदवला. तसेच डॉ. अनिता शिंदे यांना आधार फाऊंडेशन सोलापूर या संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

## वाणिज्य विभाग :

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वाणिज्य विभागांतर्गत काही महत्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये वाणिज्य विभागात 'ई-कॉमर्स लॅबोरेटरी' ची स्थापना करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत वाणिज्य विभागास संशोधन केंद्र म्हणून मान्यता मिळाली. तसेच या विभागांतर्गत दोन ऑनलाईन वेबीनारचे आयोजन करण्यात आले.

## गृहशास्त्र विभाग :

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्यानिमित्ताने गृहशास्त्र विभागांतर्गत यावर्षी विशेष अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. ४ सप्टेंबर २०२१ रोजी कालिकादेवी महाविद्यालय व गृहशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवशीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. प्रा. माया खांदाट यांना ३० ऑक्टोबर २०२१ रोजी Education Icon Award ने सन्मानीत करण्यात आले. तसेच त्यांना Best Professor of the year हा पुरस्कारही मिळाला. डॉ. नुजहत सुलताना यांना ए.पी.जे. अब्दुल कलाम आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला. कनिष्ठ विभागाच्या प्रा. मंजु बळवंतराव जाधव यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथून डॉ. सुरेखा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. प्राप्त झाली. तसेच विभागांतर्गत विद्यार्थ्यांची ई-लायब्ररी भेट, ऑनलाईन रांगोळी प्रशिक्षण, भेटकार्ड प्रशिक्षण कार्यशाळा, पर्यावरणपूरक पुष्पगुच्छ बनवणे कार्यशाळा, कपड्यांची वीण तयार करणे, बांधणी व ब्लॉक प्रिंटीग कार्यशाळा इ.चे आयोजन करण्यात आले.

**नाट्यशास्त्र विभाग :**

प्राचार्यपदाची सुत्रे हाती घेताच १९९८ मध्ये डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी नाट्यशास्त्र व संगीत विभाग सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि बी.ए.ला ऐच्छिक विषय म्हणून नाट्यशास्त्र हा विषय सुरु केला. या विभागाचे उद्घाटन २ डिसेंबर १९९८ रोजी प्रा.डॉ. लक्ष्मण देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर होते. त्यावेळी नव्याने सुरू झालेल्या नाट्य विभागातील नवोदित कलावंतांनी **'मानसापुढे वाचली गीता'** या यशवंतराव देशमुख लिखीत एकांकिकेचा प्रयोग केला आणि विभागाची वाटचाल सुरू झाली.

महाराष्ट्रातील महाविद्यालयीन व खुल्या पातळीवरील एकांकिका स्पर्धेत नाट्यशास्त्र विभाग सहभाग घेवू लागला. युवक महोत्सवात घवघवीत यश मिळत गेले. एकांकिका स्पर्धांमध्ये सलग तीन वर्ष प्रथम पारितोषिकासह वैयक्तिक पारितोषिक विद्यार्थ्यांना मिळू लागली. डॉ. सुधीर निकम हा सक्षम लेखक विभागाला मिळाला. **उचल, धुमस, वायदा, मनवा,** लिंपन सारख्या एकांकिकांनी अख्खा महाराष्ट्र ढवळून काढला. औरंगाबाद, मुंबईत दबदबा निर्माण झाला. सकाळ **करंडक, ढिसले करंडक, महापौर चषक, इथोपिया** सारख्या स्पर्धेत के.एस.के. बीड अशी गर्जना होत राहिली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नीत नाट्यशास्त्र प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम विभागामध्ये सुरू करण्यात आला. विभागाच्या पहिल्या तीन चार वर्षात रिंगवा, **मानसापुढे वाचली गीता, इथे नाव ठेवायला जागा नाही, ग्रॅज्युएट, वाटा, हेल्पलेस, सिंगल जिंदगी** यासारख्या एकांकिका केल्या. तर **गाढवाचे लग्न, वरचा मजला रिकामा, इच्छा माझी पुरी करा, तीन चोक तेरा** अशी चार नाटके महोत्सव सुरू होण्याआधी केली.

पहिल्या नाट्यमहोत्सवात एका प्रेमभंगाचा अभंग रिक्षावाला, नाटकाराच्या घरात पाच पात्रे, द रिंग अगेन सायलेन्स खटला चालू आहे या नाटकांचे सादरीकरण विभागाने केले. दुसऱ्या नाट्यमहोत्सवात उचल, कवी प्रेम आणि पाऊस, टॅक्स फ्री, अमुक्ता, पार्टनर्स, सातच्या आत घरात, गीता रहस्य या नाटकांचे सादरीकरण केले. चौथ्या नाट्यमहोत्सवामध्ये वायदा, सलाम करे सलाम, चोरीचा मामला, भजन, सुरकुत्या, परीक्षक या एकांकिकांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधले. पाचव्या नाट्यमहोत्सवात पडदा, स्कंध पुराणे, बिघडत घडलंय, बाधीत, पासून-पर्यंत, फिक्स मॅचिंग ही नाटके सादर झाली तर सहाव्या नाट्यमहोत्सवामध्ये मनवा, आम्ही लेकी कष्टकऱ्यांच्या आणि एक एप्रिल या नाटकांनी विभागाचा डंका वाजवला.

पुढे विभागांतर्गत लहान मुलांसाठी अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या सहकार्याने आम्ही बालनाट्य प्रशिक्षण शिबीर उन्हाळयात घेणे सुरू केले. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या उद्घाटनाला विजय तेंडूलकर लिखीत बालनाट्य **राजा राणीला घाम हवा** हे सादर केले. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे उद्घाटन बालनाट्यांनी व्हावे आणि तेही स्थानिक कलावंताच्या हातून व्हावे याचा विभागाला अभिमान आहे. बीडचे भुमीपुत्र पद्मश्री वामन केंद्रे यांच्या **झुलवा** नाटकाचा प्रयोग हा याच रंगमंचावर २२ एप्रिल २००६ रोजी संपन्न झाला. त्यानंतरचे सर्व नाट्यमहोत्सव हे यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होऊ लागले.२००८ साली नाट्यशास्त्र विभागाचा **दशकपुर्ती सोहळा** संपन्न झाला. यावेळी माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. तर नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.शशीकांत बऱ्हाणपुरकर, एस.बी.कॉलेजचे नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिलीप घारे व स्वामी रामानंद तीर्थ अंबाजोगाईचे विभागप्रमुख प्रा. केशव देशपांडे हे उपस्थित होते. या सर्वांच्या साक्षीने **दशकपुर्ती सोहळा** संपन्न झाला. या महोत्सवात **अ-पपेट शो, ओपुनशिया** आणि पारंपारिक लोकनाट्य सादर करण्यात आले.नवव्या नाट्य महोत्सवात **सांगावं, शिल्पकोष्टक, द लास्ट ट्रुथ** या एकांकिका सादर झाल्या. **शिल्पकोष्टक** या

एकांकिकेने पुन्हा संपूर्ण महाराष्ट्र गाजवला. **सकाळ महाकरंडक** मध्ये प्रथम येत वैयक्तिक पाच पारितोषिके मिळवली. पुण्याला बालगंधर्वला अतिशय दर्जेदार प्रयोग झाला. के.एस.के. चा नाट्यशास्त्र विभाग, नाट्य परिषदेची बीड शाखा आणि औरंगाबाद येथील सरस्वती भुवन महाविद्यालय नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विजय तेंडूलकर नाट्य महोत्सवाचे आयोजन बीड व औरंगाबाद येथे करण्यात आले. यात के.एस.के. विभागातर्फे पाहिजे जातीचे व अशी पाखरे येती या दोन नाटकांचे सादरीकरण करण्यात आले.२४ डिसेंबर २००९ रोजी **आनंदाचा डोह, संत तुकाराम महाराज** यांची जीवनगाथा हे एकपात्री नाटक योगेश सोमन पुणे, यांनी सादर केले. हा प्रयोग नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थी व निमंत्रितांसाठी ठेवण्यात आला होता. २०११ साली विभागाने तपपूर्ती महोत्सवात **द डम डान्सर, आम्ही नाटक करित आहोत बालनाटय, बी ऑन द डिझायर**, या एकांकिका सादर झाल्या. द डम डान्सरचा एक प्रयोग सांस्कृतिक संचालनालयामार्फत एन.सी.पी.ए.ला झाला. यात आताची व्यावसायिक नाटकात काम करणारी अभिनेत्री पुजा ठोंबरे होती. सोबत आघाडीचे नृत्य दिग्दर्शक शारदापुत्र डॉ. विनोद निकम आणि चित्रपट अभिनेता लक्ष्मीकांत दोडके हेही होते.

अकराव्या नाट्य महोत्सवात **द फेअर फॅक्टर, जय हो फॅन्टसी (बालनाट्य), लव्ह ब्रेक**, २०१३ या वर्षी विभागाने बीड नाट्य परिषदेच्या संयुक्त विद्यमाने सुरेश चिखले लिखीत **जांभूळ अख्यान**, या नाटकाची निर्मिती केली. या नाटकाचा प्रयोग बीडला आणि दुसरा प्रयोग पु. ल. देशपांडे राज्यस्तरीय नाट्य महोत्सव अमित देशमुख फाऊंडेशनच्या वतीने लातूर येथे करण्यात आला. तर तिसरा प्रयोग राज्यनाट्य स्पर्धेत अहमदनगर येथे करण्यात आला. शिवाय **चोर** या बालनाट्याची निर्मिती करण्यात आली. राज्यनाट्य स्पर्धेत विभागीय पातळीवर हे बालनाट्य प्रथम आले होते. बाराव्या नाट्य महोत्सवात **चोर, हिस्ट्री ऑफ दि लिजण्ड** या नाटकाचे प्रयोग झाले. तेराव्या नाट्यमहोत्सवात नाट्य सिनेअभिनेता मा. सचिन खेडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. जयदत्त अण्णा क्षीरसागर, मा. डॉ. भारतभूषण क्षीरसागर आणि राज पाटोदेकर यांच्या साक्षीने संपन्न झाला. या महोत्सवात **साठा उत्तराची कहाणी, भेट, चकवा** आणि **लोकनाटच** सादर झाली. चौदाव्या नाट्यमहोत्सवात **भोग आणि ब्रेन** ही नाटके करण्यात आली. पंधराव्या नाट्य महोत्सवात **जंगलातील दूरचा प्रवास, बाजार, घनदाट (मुकनाट्य)** सादर करण्यात आले. या एकांकिकेत प्रयोग करण्यात आले. सोळाव्या नाट्य महोत्सवात **व माय, अभिवाचन, सेकंड चान्स, अनामत, अर्टिशियन इंटेलिजन्स** आणि **सावी** तर सतराव्या नाट्या महोत्सवात **अभिवाचन, अजूनही चांदरात आहे, मॅट्रीक थोडं ओळखीचं थोडं अनोळखी, सेकंड हॅण्ड, एव्हरी डे इन संडे, ऑप्शन, आण्णांच्या शेवटच्या इच्छा** या एकांकिकेचे सादरीकरण झाले.

२०१८ साली **चल रे भोपळ्या** या बालनाटकाची निर्मिती केली. शासनाच्या बालनाट्य स्पर्धेत या सात नाटकांना पारितोषिके मिळाले तर राज्यनाट्य स्पर्धेत **व-माय** या नाटकास तीन पारितोषिके मिळाले. आठराव्या नाट्य महोत्सवात **मॅन व्हर्सेसे वाईल्ड, एक होता बांबू काका, देवी प्रसाद सोहणी** यांचे एकपात्री **आता कशाला उद्याची वाट, सालाबादप्रमाणे** ही नाटके सादर करण्यात आली. याचबरोबर नाट्यशास्त्र विभागाने अनेक उपक्रमात भाग घेतला आहे दरवर्षी सामाजिक बांधीलकी म्हणून जनजागृतीसाठी विविध विषयांवर जवळपास दोनशे ते अडीचसे नथनाट्याचे सादरीकरण केले. ८९ व्या नाट्य संमेलनाची नियोजनाची जबाबदारी विभागाने समर्थपणे पार पाडली.वातावरण निर्मितीच्या कार्यक्रमासाठी परिसरातील कलावंतांशी संपर्क करून तब्बल १० दिवस कार्यक्रम घेतले. नाट्य वाचन, काव्यवाचन, संध्या, बाल अभिनय व गायन संध्या, वैयक्तिक नृत्य संध्या, प्रहसन संध्या, ज्येष्ठ कलावंत

संध्या, पारंपारिक लोककला, संध्या शिवराज्यभिषेक सोहळा, व पूर्व संध्येला बीड जिल्ह्यातील कलावंताची संध्या असे ५ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २००९ दरम्यानच्या कार्यक्रमाचे नियोजन विभागाने केले.

नाट्यशास्त्र विभागात सध्या कार्यरत असलेले प्रा.डॉ. संजय पाटील यांची प्राध्यापक (प्रोफेसर) म्हणून पदोन्नती झाली आहे. त्यांचे अनेक संशोधन पेपर विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहे. नाट्यनिर्मिती आणि रंगसंगती ही त्यांची पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. त्यांच्याकडे आठ विद्यार्थी पीएच.डी. संशोधन करीत आहेत. तर दोन विद्यार्थ्यांचे संशोधन पुर्ण झाले आहे. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील सेमिनार, कॉन्फरन्स, चर्चासत्रात त्यांनी सहभाग घेवून संशोधन पेपर वाचले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक कल्याण, विद्यार्थी विकास समितीचे ते सदस्य आहेत. सल्लागार मंडळाचे ते सदस्य आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या नाट्य परिनिरीक्षण मंडळाचे सेन्सार बोर्ड ते सदस्य होते.महाराष्ट्र शासनाच्या नाट्य अनुदान आयोगाचे ते सदस्य आहेत. नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे ते सदस्य आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ॲडव्होक बोर्डाचे ते सदस्य आहेत. मुंबई विद्यापीठ लोककला विभाग अभ्यास मंडळ सदस्य, अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर अभ्यास मंडळ सदस्य, महाराष्ट्र शासनाच्या लोककला सर्वेक्षण, जतन, आणि संवर्धन प्रकल्पाचेही ते सदस्य आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि एस.आर.टी. विद्यापीठ नांदेड येथे ते संशोधक मार्गदर्शक आहेत. प्रा.डॉ.दुष्यंता रामटेके या विभागात सन २००६ पासून कार्यरत आहेत. त्यांचे अनेक शोधनिबंध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नलमधून प्रकाशित झाले आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, सेमिनारमधून त्यांनी शोधनिबंध वाचले आहेत. सहभाग घेतला आहे. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांचा सहभाग असतो.

विभागात आजवर अनेक मान्यवरांनी आणि कलावंतानी भेटी दिल्या आहेत. यात लक्ष्मण देशपांडे, सतीश आळेकर, चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, संजय पवार, वि.भा. देशपांडे, प्रा.रा. रं. बोराडे, प्रकाश मेदककर, डॉ. रूस्तुम आचलखांब, डॉ. दिलीप घारे, प्रा. यशवंत देशमुख, कुमार देशमुख, केशव देशपांडे, शशीकांत बऱ्हाणपुरकर, त्र्यंबक महाजन, सुर्यकांत सराफ, अजित दळवी, दासू वैद्य, नंदू माधव, डॉ. सुहासिनी इर्लेकर, शफी नाईकवाडी,ॲड. मधुकर गोडसे, अविनाश खेरडे, किर्ती शिलेदार, मोहन जोशी, डॉ. सुधीर निकम, जयश्री गोडसे, अनुया दळवी, वर्षा माळवदे, शरण बिराजदार, जयंत शेवतेकर, विजय देशमुख, किशोर सिरसाठ, संपदा कुलकर्णी, रमाकांत मुळे, धनंजय सरदेशपांडे, किशोर कदम, सलील कुलकर्णी, मकरंद अनासपुरे, अरविंद जगताप, कुलदीप धुमाळे, विलास सोनवणे, संभाजी भोसले, नाथा चितळे, राजकुमार तांगडे, मीना सासणे, ज्ञानेश्वर गायकवाड, योगेश सोमन, इंद्रजित भालेराव, आशा जोंधळे, अशोक जोंधळी, श्री धुतेकर, किशोरसिंह बुंदेले, भरत लोळगे, डॉ. संजय मोहोड, वैशाली सामंत, मिलींद इंगळे, अर्चना पंडीत, प्रा. शिवदास देलुरकर,शिवराम गोसावी,डॉ. विजयालक्ष्मी बेर्डे, चित्रलेखा देशमुख, प्रा. विजय देशमुख, शैलेश दातार, संदिप खरे, सतीश लोटके, पी.डी. कुलकर्णी, प्रसाद कांबळी, सुनिल ढगे, नरेंद्र आम्ले, देवेंद्र यादवसह अनेक मान्यवरांनी विभागास भेटी दिल्या आहेत.

**बालनाट्य प्रशिक्षण शिबीर :**

२००३ पासून बालनाट्य प्रशिक्षण शिबीराचे आयोजन उन्हाळयात केले जाते. यात निवडक ३० बालकांना प्रवेश दिला जातो. सात दिवस चालणाऱ्या या शिबीरात अभिनय, लेखन, दिग्दर्शन, नाटक, रंगभूमी, स्टेज, वेशभूषा, रंगभूषा, नेपथ्य, संगीत, प्रकाश, आवाज, शरीर या सर्वच रंगतंत्रावर भर दिला जातो. त्यांची तोंडओळख केली जाते. डॉ.बा.आं.म.विद्यापीठ अंतर्गत अनेक नाट्य प्रशिक्षण शिबीरे, परिसंवादाचे,

चर्चासत्राचे,सेमिनारचे आयोजन केले जाते. यात मान्यवरांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जातात. विद्यापीठाच्या युवक महोत्सवात नाट्य विभागाकडे एकांकिका, प्रहसन, मुकाभिनय, लोकनाट्य आणि लावणीची तयारी करून घेतली जाते. दरवर्षी बक्षीसांची परंपरा कायम राखत आले आहे. एकांकिका दरवर्षी पारितोषिकांच्या कुठल्यानं कुठल्या क्रमांकावर असतेच. लोकनाट्य हमखास पारितोषिक पटकावतच तर लावणी सतत पहिल्या क्रमांकावरच राहिली आहे. स्किट, माईम, देखील नंबरात असतेच आतापर्यंत फक्त युवक महोत्सवात १५० च्या वर पारितोषिके पटकावली आहेत. खुल्या स्पर्धेत नाट्य विभागाचा दबदबा असून जवळपास २५० पारितोषिके मिळवली आहेत.

**विभागातून बाहेर पडलेले यशस्वी रंगकर्मी :**

सुहास सिरसाठ, पुजा ठोंबरे, प्रियंका जाधव, राहूल चाटे, प्रमोद रामदासी, सचिन हुलजुते, मिलींद शिवणीकर, महेंद्र खिल्लारे, बळीराम गरड, अमित गाडे, अमोल सावंत, रणजीत वाघमारे, उज्वला वनवे, शफी नाईकवाडी, पी.डी. कुलकर्णी, वैशाली पाटील, सुयश झुंजुर्गे, देवेंद्र यादव, नरेंद्र आम्ले, अशोक केंद्रे, बाबा केंद्रे, विक्रम पवार, विमल वाघमारे, दिपक नायर, रूक्मिणीकांत पांडव, लक्ष्मीकांत दोडके, विलास सोनवणे नितीन प्रधान, हंसराज जगताप, विजय राख, अक्षय फुलझळके, ज्ञानेश्वर देशपांडे, संतोष पैठणे, पल्लवी कुलकर्णी.

**आजवर नाट्यशास्त्र विभागात कार्यरत असलेले प्राध्यापक :**

डॉ. संजय पाटील, प्रा. संतोष पैठणे, प्रा. दिलीप शिराळे, प्रा. संजय फुलारी, प्रा. प्रकाश देशपांडे, प्रा. गणेश चंदनशिवे, डॉ. दुष्यंता रामटेके, प्रा. राकेश सोनार, प्रा. सय्यद अमजद, प्रा. मनोज उज्जेनकर, प्रा. सचिन हुलजुते, प्रा. विजय राख इत्यादी प्राध्यापकांनी विभागात आजवर प्राध्यापक म्हणून काम केले आहे.

थोडक्यात,

१८ नाट्य महोत्सव, १६ बालनाट्य शिबीरं, राजाराणीला घाम हवा, होत्या काही चिमण्या, चोर, कस्तुरी, आम्ही नाटक करीत आहोत, भेट, जंगलातील दुरचा प्रवास, चल रे भोपळ्या, जय हो फॅन्टसी, सावी इ.बालनाट्य निर्मिती, गाढवाच लग्न, विच्छा माझी पुरी करा, तिन चोक तेरा, वरचा मजला रिकामा, पाहिजे जातीचे, व-माय, जांभूळ अख्यान, एक होता बांबूकाका इ. नाट्यनिर्मिती, विद्यापीठ स्तरावरील ३ नाट्य शिबीरे, विद्यापीठ स्तरावरील ३ सेमिनार, ८७ एकांकिकांची निर्मिती, २०० च्या वर पथनाट्य, ४० च्या वर सांस्कृतिक कार्यक्रम, ५ ज्येष्ठ नागरिक कार्यक्रम, १० नाट्यसंमेलने, २५ विद्यार्थ्यांचा झोन/नॅशनल युवक महोत्सवात सहभाग, २० विद्यार्थ्यांचा युवक महोत्सवात सहभाग, खुल्या स्पर्धेतील जवळपास २५० पारितोषिके, युवक महोत्सव १५० पारितोषिके आणि प्रशिक्षित झालेले १५०० च्या आसपास विद्यार्थी असे नाट्यशास्त्र विभागाचे कार्य आहे.

**संगीत विभाग :**

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त संगीत विभागांतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले. विभागाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी मिळून गुरूपौर्णिमा हा गुरुगौरवपर गीतांचा कार्यक्रम ऑनलाईन सादर केला. स्वरकोकिळा लता मंगेशकर यांच्या गीतांवर आधारित महाविद्यालयीन स्तरावर गीत गायन स्पर्धा घेण्यात आल्या. श्रावणघन, अजादी के रंग, Old is Gold इ. गीताच्या कार्यक्रमाचे आयोजनही विभागांतर्गत करण्यात आले. लता मंगेशकर यांना श्रद्धांजली म्हणून त्यांच्या निवडक गीतांचा कार्यक्रम घेण्यात आला.तसेच धृपद गायन, लोकसंगीत, संगीताचे सादरीकरणया विषयावर विविध व्याख्याने आयोजित करण्यात आली.सहयोगी फाऊंडेशन पुणे तर्फे शिक्षक दिनानिमित्त प्रा.डॉ.सुरेखा जोशी यांना महात्मा जोतिबा फुले आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

**क्रीडा विभाग :**

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये क्रीडा विभागाच्या वतीने अनेक महत्वपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये जलतरण स्पर्धेत वैभव सानप याने १०० मीटर व ५० मीटरमध्ये सहभाग नोंदवून विद्यापीठाच्या संघातून भुवनेश्वर येथे आंतरविद्यापीठ स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. व्हॉलीबॉलमध्ये सय्यद मुशरफ व फुलारे अभिषेक यांची विद्यापीठाच्या संघात निवड होवून आंतरविद्यापीठ स्पर्धेत जयपुर येथे संघातर्फे खेळले.

कबड्डीच्या विद्यापीठ संघामध्ये महाविद्यालयाचा खेळाडू निखिल अडागळे यांची निवड झाली. चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सोमनाथ आघाव याने विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. विभागाने आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये पारस गुरखुदे, रणजित काकडे, ऋत्विक तांदळे, विद्यासागर बागडे या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवून आंतर विद्यापीठ केरळ येथे होणाऱ्या स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. क्रीडा विभागाच्या एकूण २८ खेळाडुंनी जलतरण, व्हॉलीबॉल बॉक्सींग, कबड्डी, कुस्ती, धनुर्विद्या, बॅडमिंटन, मैदानी स्पर्धा, वेटलिफ्टींग, पॉवर लिफ्टींग, शरीरसौष्ठव, तायक्वांदो, हॅण्डबॉल, क्रिकेट, खो-खो, क्रॉसकंट्री, इ. क्रीडा प्रकारात आपला सहभाग नोंदवला. यातील १० खेळाडुंनी विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधीत्व केले. क्रीडा विभागाच्या वतीने ई-सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात बुद्धीबळ व रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**लोकप्रशासन विभाग :**

विभागाच्या वतीने डॉ. गौरव जेवळीकर यांचे 'ध्येयाविन जीवन व्यर्थ असे' या विषयावर ऑनलाईन पद्धतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. बापुराव बनसोडे यांचे 'माहितीचा अधिकार संकल्पना व वास्तव' संशोधनही केंद्रेही कार्यरत आहेत. या विषयावर ऑनलाईन पद्धतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले.

माजी खासदार स्व. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार या विषयावर निबंध लेखन स्पर्धा (जिल्हास्तरीय) घेण्यात आली.

संविधान दिनाच्यानिमित्ताने डॉ. विठ्ठल जाधव यांचे 'भारतीय संविधान संस्कृती व भारतीय समाज' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. विभागाच्या वतीने मतदार जागृती कार्यक्रमांतर्गत मा.श्री. अरविंदजी बोळंगे तहसिलदार, वसमत यांचे 'भारतीय लोकशाही व तरूण मतदार' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. स्पर्धा परीक्षा समितीच्या सहकार्याने विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भारतीय लोकप्रशासन संस्था शाखा औरंगाबाद यांच्यासोबत सामंजस्य करारनामा (MOU) स्थापित करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

**आजीवन शिक्षण व विस्तार सेवा योजना :**

आजीवन शिक्षण व विस्तार सेवा समिती मार्फत बालग्राम गेवराई येथील अनाथालयाला भेट देवून त्यांना एक वेळेसचे अन्नदान करण्यात आले. तसेच तेथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दि. १३.०२.२०२१ रोजी ढेकणमोहा येथील वृद्धाश्रमाला भेट देवून तेथील वृद्धांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांना एक वेळेसचे अन्नदान देण्यात आले.

**ग्रंथालय विभाग :**

महाविद्यालयातील ग्रंथालयाची स्वतंत्र सुसज्ञ अशी इमारत असून ग्रंथालयात विविध विषयावरच्या ग्रंथांचा समावेश करण्यात आला आहे. कथा, कादंबरी, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी विविध विषयावरील संदर्भ ग्रंथ, ज्ञानकोश, विश्वकोश आणि स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असलेली पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने शै.वर्ष २०२१-२२ साली ७८९ नवीन पुस्तकांची खरेदी केली आहे. इन्फ्लीबनेट एन.लिस्ट अंतर्गत ३१,३५,000 ई-बुक्स व ६000 ई जर्नल्सची वर्गणी भरण्यात आली आहे.

ग्रंथालयात मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी भाषेतील एकूण ग्रंथांची संख्या ९६,३५३ असून सिनिअर कॉलेजची ग्रंथसंख्या ७३,३२६ इतकी तर ज्युनिअर कॉलेजची ग्रंथसंख्या २३,०२७ एवढी आहे. ग्रंथालयात विविध भाषेतील १७ वर्तमानपत्रे विद्यार्थी वाचन कक्षासाठी खरेदी केली जातात. ग्रंथालय विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त दि. ५ जानेवारी २०२२ रोजी ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तसेच डॉ. एस.आर. रंगनाथन (भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक) यांची जयंती प्राचार्य डॉ. हेरकर सर यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. ग्रंथालय विभागातर्फे सर्व वाचकांना Mobile OPAC ची सुविधा देण्यात आली आहे. तसेच महाविद्यालयातील सुसज्ञ ई-लायब्ररीमध्ये National Digital Library चे ट्रेनिंग देण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्याकडून या शैक्षणिक वर्षात २०२१-२२ मध्ये ८८ पुस्तके ग्रंथालयास देणगी स्वरूपात प्राप्त झाली आहेत.

**सूक्ष्मजीवशास्त्र विभाग :**

दि. १.१०.२०२१ रोजी सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे 'Covid-19 causes & past covid Treatment' या विषयावर एक दिवशीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा.डॉ. राजेश ढाकणे जयंतराव सावंत कॉलेज, हडपसर, पुणे यांनी या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. 'मिशन युवा स्वास्थ' संस्थेतर्फे कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी दि. २६.१०.२०२१ रोजी कोव्हीड लसीकरणाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांतर्गत २७८ जणांचे लसीकरण करण्यात आले. सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील एम.एस्सी. प्रथम वर्ष वर्गाची विद्यार्थीनी कु. प्रियांका तांबे हिला वसंतदादा पाटील पाटोदा बीड येथे सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ई-परिषदेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. मा.डॉ. भारतभूषणजी क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे रक्तदान शिबीर, रक्त तपासणी, कोव्हीड लसीकरणाचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला.

**प्राणीशास्त्र विभाग :**

प्राणीशास्त्र विभागाला संशोधन केंद्राची मान्यता असून, विभागातील सर्व प्राध्यापक संशोधन मार्गदर्शक आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्राणीशास्त्र विभागातर्फे दि. १५ ऑगस्ट रोजी Animal World या भित्तीपत्रकाचे प्रकाशन झाले. दि. १५.९.२०२१ रोजी प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल शेळके यांना डॉ.बा.आं.म. विद्यापीठाकडून संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्यात आली. दि. २७ सप्टेंबर २०२१ रोजी प्राणीशास्त्र विषयाचे राष्ट्रीय वेबीनार आयोजित करण्यात आले होते. Environment Crisis and Impact on Biodiversity and Pearl Culture या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रासाठी उद्घाटक म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर या होत्या व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सतीश पाटील (पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) व डॉ. अरविंद कुलकर्णी (निवृत्त प्राचार्य, ग्रामीण सायन्स कॉलेज विष्णुपुरी, नांदेड) यांनी मार्गदर्शन केले. एकूण ६८ प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी

यामध्ये सहभाग नोंदवला.दि. २.१०.२०२१ ते ८.१०.२०२१ या कालावधीत प्राणीशास्त्र विभागात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये दि. ३.१०.२०२१ रोजी श्री. अमोल मुंडे, (RFO बीड) यांनी मानवी वन्यजीव संघर्ष या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच दि.६.१०.२०२१ रोजी डॉ. सिताराम इंगोले (प्राणीशास्त्र विभाग, सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव) यांनी जैवविविधता व संवर्धन या विषयावर सखोल असे

मार्गदर्शन केले. दि. ७.१०.२०२१ रोजी श्री सिद्धार्थ सोनवणे (सर्पमित्र, तागडगाव) यांनी वन्यजीव आणि मानवी जात या विषयावर मार्गदर्शन केले. दि. ८.१०.२०२१ रोजी डॉ. फिरोज शेख प्राणीशास्त्र विभाग, मिल्लीया महाविद्यालय, बीड यांनी Environment and Sanctuary या विषयावर मार्गदर्शन केले. या वन्यजीव सप्ताहासाठी बी.एस्सी. प्रथम. द्वितीय व तृतीय वर्गाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दि. १२.११.२०२१ रोजी प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने पक्षीमित्र डॉ. सलीम अली यांची जयंती साजरी करण्यात आली. दि. ९.१२.२०२१ रोजी प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने Guest Lecture चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये डॉ. रोकडे प्रमोद प्राणीशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड यांनी Count and Infertility in Males या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यासाठी ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दि. २.३.२०२२ रोजी प्राणीशास्त्र विभागाच्या शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने नवनाथ गाडे यांच्या तळवट बोरगाव ता. गेवराई जि. बीड येथील रेशिम उद्योगास भेट देण्यात आली. त्यामध्ये एम.एस्सी. प्रथम व द्वितीय वर्गाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. २८.२.२०२२ रोजी School Interaction च्या वतीने यशवंत विद्यालय, बीड येथील इयत्ता ९ वी १० वी च्या एकूण ६० विद्यार्थ्यांनी विभागास भेट दिली. त्यांना Models, Specimen Microscope ची माहिती देण्यात आली. प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील E-Library ची सुविधा उपलब्ध करण्यात येते. विद्यार्थ्यांचे सेमिनार, सामुहिक संवाद, इत्यादी उपक्रम घेण्यात येतात.

**वनस्पतीशास्त्र विभाग :**

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने अनेक उपक्रम राबविण्यात आले त्यामध्ये दि. २१.१२.२०२१ रोजी डॉ. स्मिता बसीले यांचे वनस्पतीशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित केले होते. दि. १०.१२.२०२१ रोजी राष्ट्रीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते. या विभागाला संशोधन केंद्राची मान्यताही २०२१-२२ याच वर्षात मिळाली. त्यानुसार दि. २५.२.२०२२ या दिवशी Departmental research Committee आयोजित केली होती.

**भौतिकशास्त्र विभाग :**

सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य लक्षात घेवून विभागामार्फत अनेक उपक्रम व कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये विभागप्रमुख तथा उपप्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर व डॉ. प्रज्ञा महेशमाळकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले. विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी दि.२८ डिसेंबर २०२१ रोजी एक दिवशीय मोबाईल रिपेअरिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान Om Mobile Shoppee चे श्री. अशोक बहिरवाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. डॉ. प्रज्ञा महेशमाळकर यांना ५ सप्टेंबर २०२१ रोजी शिक्षक दिनानिमित्त सहयोग सोशल फाऊंडेशन पुणे तर्फेमहात्मा जोतिबा फुले आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. विभागाची एक दिवशीय शैक्षणिक सहल, सौरऊर्जा प्रकल्प रोहतवाडी व पवनऊर्जा प्रकल्प, सौताडा, ता. पाटोदा जि. बीड येथे आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दि. २७.२.२०२२ रोजी विभागातर्फे ऑनलाईन प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय विज्ञानदिनी २८ फेब्रुवारी २०२२ रोजी School-College Interaction या संकल्पनेतून यशवंत माध्यमिक विद्यालय, बीड च्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे, माहिति सांगण्यात आली. तसेच ऑनलाईन व ऑफ लाईन Guest Lecture चे आयोजनही करण्यात आले होते.

## रसायनशास्त्र विभाग :

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ हे महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यामुळे विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विभागाची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये विभागाचे वार्षिक नियोजन व वर्षभरामध्ये रसायनशास्त्र विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करून ध्येयधोरण निश्चित करण्यात आले. विभागामार्फत डॉ. गोपाळ काकडे रसायनशास्त्र विभाग प्रमुख धारूर महाविद्यालय यांच्या गेस्ट लेक्चरचे आयोजन करण्यात आले. यामध्ये बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या एकूण ८८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तसेच डॉ. महादेव साखरे बलभीम महाविद्यालय बीड, प्रा.डॉ. किशोर भगत, रसायनशास्त्र विभागप्रमुख, आर. बी. अट्टल महाविद्यालय, गेवराई यांच्या गेस्ट लेक्चरचे आयोजन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व विभागामार्फत पोस्टर प्रेझेंटेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध महाविद्यालयातील एकूण १८ विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये सहभाग नोंदवला. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीसे देण्यात आली. तसेच रसायनशास्त्र विभागामार्फत नॅशनल लेव्हल केमिस्ट्री क्विजचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब हरियाणा, मध्यप्रदेश, ओरिसा, महाराष्ट्र इत्यादी राज्यांमधून एकूण १७६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

रसायनशास्त्र विभागामार्फत नॅशनल ई-सेमिनारचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रसायनशास्त्र विभागातील जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञ म्हणून निवड झालेले डॉ. भास्कर साठे तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ. गजानन राशिनकर यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये लखनऊ, दिल्ली, नागपुर, अमरावती येथील विषयतज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच पेपर प्रेझेंटेशनमध्ये एकूण ३८ प्राध्यापकांनी आपले रिसर्च पेपर पाठवले. इंटरनॅशनल जनरल ऑफ सायंटिक रिसर्च इन सायन्स अँड टेक्नॉलॉजी या जनरलमध्ये पेपर पब्लिकेशन करण्यात आले. तसेच विभागांतर्गत घेण्यात आलेल्या स्कूल कॉलेज इंटरॅक्शनमध्ये यशवंत विद्यालयाच्या इयत्ता दहावीमधील विद्यार्थ्यांनी विभागास भेट दिली. त्यावेळी त्यांना विविध उपकरणाची व प्रयोगाची माहिती सांगण्यात आली. रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ. सतीश माऊलगे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादकडून संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्यात आली. विभागामार्फत ग्रंथालयातील ई-लायब्ररी फॅसिलिटी, स्टुडन्स-सेमिनार, ग्रुप डिस्कशन यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## गणित विभाग :

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गणित विभागामार्फत खालील कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये दि. २३.९.२०२१ रोजी "मोबाईल अॅप्स फॉर टिचींग-लर्नींग मॅथेमॅटीक्स" या विषयावर एक दिवशीय "राष्ट्रीय वेबीनार" चे आयोजन करण्यात आले. यामध्ये देशाच्या विविध भागातील २०० च्या वर शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गणित विभागामार्फत "रामानूजन व्याख्यानमाला" सुरू करण्यात आली. त्यामध्ये दि. ९.१२.२०२१ रोजी डॉ.

अनिल चिंधे गणित विभाग प्रमुख बलभीम महा. बीड यांचे "करिअर इल मॅथेमॅटीक्स" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. १३ डिसेंबर २०२१ रोजी जिल्हास्तरीय "फॉरमुले रायटिंग कॉम्पीटिशन" घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. थोर गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करण्यात आला. त्यामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. ३०.१२.२०२१ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प सौताडा व सौर ऊर्जा प्रकल्प रोहतवाडी येथे एक दिवशीय शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. दि. ३१ जुलै २०२१ रोजी गणित विभागाचे प्रा. गजानन वामनराव श्रीमंगले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली.

**संगणकशास्त्र विभाग :**

दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी विंडोज टेन वर्सेस विडोंज इलेव्हन या विषयावरील भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन केले. दि. २१.१२.२०२१ रोजी बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सेमिनार कॉम्पिटिशन आयोजित करण्यात आले. दि. ३०.१२.२०२१ रोजी बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांना सौताडा ता. पाटोदा येथील सौर ऊर्जा, पवन ऊर्जा प्रकल्पास एक दिवशीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करून भेट देण्यात आली. दि. ६.१.२०२२ रोजी बी.एस्सी. व एम.एस्सी. च्या विद्यार्थ्यांसाठी सावरकर कॉलेज बीड येथील सहाय्यक प्राध्यापक श्री संजय काळे यांचे सायबर क्राईम अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट २०२० या विषयाकरिता गेस्ट लेक्चर घेण्यात आले.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग :**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०२१ – २२ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन केले त्यामध्ये दि. ५ जुन २०२१ रोजी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला व बॉटनीकल गार्डनमध्ये वृक्षारोपन करण्यात आले. दि. ६ जुन २०२१ रोजी महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन शिवराज्य दिन साजरा करण्यात आला. दि. २१.६.२०२१ रोजी जागतिक योग दिन, ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. दि. २६.६.२०२१ रोजी छत्रपती शाहु महाराज जयंती निमित्त डॉ. सतीश कदम यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापुर यांचे दुपारी १२.३० वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले. दि. १२.७.२०२१ रोजी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) भूजल साक्षरता अभियान वेबिनारचे आयोजन भूवैज्ञानिक श्री आर. व्ही. पवार व प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. दि. २६.७.२०२१ रोजी ताण-तणाव व्यवस्थापन या विषयावर प्रा.डॉ. मोरे ज्ञानोबा भीमराव यांचे ऑनलाईन व्याख्यान स. ११.३० वाजता प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर
यांच्या उपस्थितीत घेण्यात आले. यावेळी प्रा.डॉ.टी.आर. पाटील सरांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.दि. ९.८.२०२१ रोजी क्रांतीदिनानिमित्त डॉ. विश्वास कंधारे यांचे भारतीय चळवळीत "क्रांतीकारकांचे योगदान" या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले. दि. १.८.२०२१ ते १५.८.२०२१ दरम्यान स्वच्छता पंधरवाडा साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील परिसर स्वच्छ करण्यात आला.
दि. १३.८.२०२१ रोजी मा.आ. उदयजी सामंत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री. महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते कोरोना योध्यांचा सत्कार समारंभ घेण्यात आला.याप्रसंगी जिल्हाधिकारी राधा बिनोद शर्मा यांच्या हस्ते श्री. आटोळे यांना पुरस्कार दिला. दि.२८.८.२०२१ रोजी Fit India Freedom 2.0 Run दौड रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ.आबासाहेब हांगे, नेहरू युवा केंद्र बीडचे श्री. खरात साहेब, नाना पाटील कार्यक्रमाधिकारी खान सर, नेटकेसर, शिंदे सर आदि

सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थिती नोंदवली.दि. २८.८.२०२१ रोजी रहा निरोगी, आनंदी आयुष्यभर या विषयावर डॉ. ऋतुराज देशपांडे एम. डी. कोकिळाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई यांचे सकाळी ११.३० वाजता ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले.दि. ५.९.२०२१ रोजी महाविद्यालयात शिक्षण दिन साजरा करण्यात आला. दि. ७.९.२०२१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे कुलगुरू डॉ. प्रमोदजी येवले, मा. जयदत्तजी क्षीरसागर, संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या हस्ते SRD मुंबई प्रणव गाडे SRD (Pre) हैद्राबादची कु.चौरे ऐश्वर्या व डॉ. खाकरे पंडित बीड जिल्हा समन्वयक यांचा सत्कार संपन्न झाला.

दि. २.१०.२०२१ रोजी महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी केली. या निमित्ताने महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित एक प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली. सहभागी स्वयंसेवकांना प्रमाणपत्र देण्यात आले. एकूण २१६ स्वयंसेवकांनी परीक्षेला उपस्थिती लावली. दि.७.१०.२०२१ रोजी माझी वसुंधरा अभियान उपक्रमांतर्गत बागेमधील लावलेल्या झाडांमधील गवत काढण्यात आले. बागेची स्वच्छता करण्यात आली. दि. ८ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. बंकटस्वामी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिरगणे विवेक यांनी "महात्मा गांधी एक प्रेरणा स्थान" या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले त्या कार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, रासेयोचे समन्वयक डॉ.टी.आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास एकूण ८६ स्वयंसेवकांनी ऑनलाईन व्याख्यानमाला जॉईन केली. दि. १६.११.२०२१ रोजी एच.आय.व्ही./एड्स जनजागृती India@75 अंतर्गत Quiz Computation घेण्यात आली. दि. १६ नोव्हेंबर २०२१ रोजी माझी वसुंधरा अभियान उपक्रम घेण्यात आला. यावेळी युवा नेते मा. अंकित प्रभु व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे समन्वयक डॉ. पाटील टी.आर. व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, उपप्राचार्य व कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. शिंदे अनिता यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.खाकरे पंडित यांनी तर आभार प्रा. नेटके सर यांनी व्यक्त केले. दि. २५ नोव्हेंबर २०२१ रोजी युनिसेफअंतर्गत महिला सक्षम युवा शक्ती अभियान, उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाला महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प समन्वयक मा. सोनिया हांगे तर अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर तसेच उपप्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते. दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात प्रा.डॉ. विठ्ठल जाधव लोकप्रशासन विभाग कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर का. यांचे संविधान संस्कृती व भारतीय समाज या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, उपप्राचार्य कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी संविधान पत्रिकेचे वाचन कर्ण्यात आले. व २६/११ रोजी मुंबई हल्ल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दि. ३.१२.२०२१ रोजी युवा बिरादरी निमित्त एक दिवशीय कार्यशाळा एस. के.एच. मेडिकल कॉलेज, बीड येथे संपन्न झाली. त्यामध्ये एकूण ७ स्वयंसेवकांना कार्यशाळेसाठी पाठविले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. राम कुलकर्णी उपस्थित होते. दि.६.१२.२०२१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, डॉ. आबासाहेब हांगे, डॉ. शिवानंद क्षीरसागर तसेच कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

**एन.सी.सी.विभाग :**

आंतरराष्ट्रीय योग दिन ऑनलाईन झूम प्लॅटफॉर्म द्वारे साजरा करण्यात आला. योग गुरू सौ. अनया चेसवाल यांनी यावेळी विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली व त्यांचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले.

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ९ ऑगस्ट २०२१ रोजी क्रांतीदिनाच्या दिवशी मल्टीपर्पज ग्राऊंड बीड येथे महापुरूषांच्या पुतळयांची स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सोबतच संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. १५ ऑगस्ट २०२१ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. पालसिंगणकर यांना एन.सी.सी. विभागाकडून मानवंदना देण्यात आली. विद्यापीठ वर्धापन दिन २३ ऑगस्ट २०२१ रोजी साजरा करण्यात आला. आजादी का अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत "फिट इंडिया फ्रीडम रन २.0" या कार्यक्रमाचे आयोजन दि. २८ ऑगस्ट २०२१ रोजी सैनिकी विद्यालय बीड येथे करण्यात आले. यासोबतच अन्य विविध कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी एनसीसी विभागातर्फे सक्षम युवा शक्ती अभियान बीड २०२१ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सोनिया हांगे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या होत्या. २६ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयामध्ये एनसीसी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर या होत्या. या कार्यक्रमात संपूर्ण एनसीसी विभागाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. १४ डिसेंबर २०२१ रोजी भारतीय सैन्य दल प्रमुख जनरल बिपिन रावत व त्यांचे सहकारी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. १५ डिसेंबर रोजी आमच्या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आदित्य क्षीरसागर यांची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट या पदी निवड झाल्याबद्दल एनसीसी विभागाच्या वतीने त्यांचा सत्कार व मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. जयदत्तजी आण्णा क्षीरसागर, हे उपस्थित होते. २६ जानेवारी २०२२ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. २ फेब्रुवारी २०२२ रोजी एनसीसी विद्यार्थ्यांची पूर्व लेखी परीक्षा महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आली. एनसीसी विभागाच्या वतीने दि. ८ फेब्रुवारी २०२२ रोजी गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा.डॉ. भारतभूषण क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त १७ फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

**महिला कक्ष विभाग :**

'विद्यार्थीनींचा व्यक्तीमत्व विकास व ताण तणाव' या विषयावर दि. २६.७.२०२१ रोजी ऑनलाईन वेबिनारचे आयोजन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर या होत्या. भारतातील लैंगिक समतोल या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील चाचणी परीक्षा घेण्यात आली. या ऑनलाईन उपक्रमात एकूण १६३ जणांनी सहभाग नोंदवला. यात महिला आणि मुली ५९.०५ टक्के तर विद्यार्थी ४०.०५ टक्के सहभागी होते. 'बेटी बचाव' या विषयावर १५ ऑगस्ट २०२१ रोजी भित्तीपत्रकाचे विमोचन केले गेले. प्रमुख पाहुणे म्हणून मा. भारतभूषणजी क्षीरसागर व प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. भित्तीपत्रक मस्के स्नेहल या विद्यार्थीनींने तयार केले होते.

राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या डॉ. मंजुषा मोळवणे यांचे दि. २५.८.२०२१ रोजी 'महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणास प्रतिबंध, मनाई व इलाज' या विषयांवर प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. त्यानंतर प्रश्नोत्तरांचे सत्र संपन्न झाले.

कोकीळाबेन धिरूभाई अंबानी हॉस्पिटल मुंबई येथे कॅन्सर युनिटमध्ये कार्यरत असणाऱ्या डॉ. ऋतुजा देशपांडे यांचे 'कॅन्सर एक भेडसावणारा आजार' या विषयावर डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८.८.२०२१ रोजी ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. अतिशय अभ्यासपुर्ण अशा या व्याख्यानानंतर उपस्थितांच्या प्रश्नांवर प्रमुख पाहुण्यांनी उत्तरे देवून शंकांचे निरसन केले.

दि. २२.१०.२०२१ रोजी श्री. ढवळे यांचे आरोग्यासाठी पाण्याची भूमिका या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. हांगे ए.एस. हे होते. दि. २५.११.२०२१ रोजी युनिसेस महाराष्ट्र शासन व महिला बालविकास विभाग यांच्या अंतर्गत 'बालविवाह निर्मूलन' या विषयावर सोनिया विक्रम हांगे प्रकल्प समन्वयक यांनी महाविद्यालयातील वद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली सक्षम युवा अभियानांतर्गत मार्गदर्शन केले.

आझादी का अमृत महोत्सव साजरा करतांना रांगोळी स्पर्धेचे आयोजन दि. १५.१२.२०२१ रोजी केले होते. एकूण १४ विद्यार्थी विद्यार्थीनींनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. त्यात धुताडमल सोनम राजु या विद्यार्थीनीला प्रथम क्रमांक, मस्के स्नेहल उद्धव, द्वितीय क्रमांक व बांगर स्वाती बबन ही तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. तर विर कोमल व कातळे अंजली यांनी उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले. स्पर्धेचे परिक्षण प्रा. मेघा मचाले व प्रा. जयश्री नागूरे यांनी केले. दि. ३ जानेवारी २०२२ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. दीपाताई क्षीरसागर या होत्या. याप्रसंगी शहरातील विविध व्यवसाय करणाऱ्या महिलांचे त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीचे स्टॉल महाविद्यालयात लावण्यात आले होते. महाविद्यालयातर्फे त्यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

दि. ६.१.२०२२ रोजी स्त्रियांना आणि अठरा वर्ष पुर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले हाते. त्यात धुताडमल सोनम राजु प्रथम, विर कोमल अशोक द्वितीय व जय अशोक पवार तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. तर कु.धुताडमल सोनम राजु या विद्यार्थीनींच्या चित्रास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे दोन हजार रूपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले. महाविद्यालयाचे जेन्डर ऑडिट समिती प्रमुख प्रा. माया खांदाट यांनी प्राचार्य व उपप्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले व ते प्रमाणित होवून महाविद्यालयास प्रमाणपत्र मिळाले.

महिला कक्षाच्या सर्व कार्यक्रमांसाठी समिती प्रमुख म्हणून डॉ. माया खांदाट तर सदस्य डॉ. सुरेखा जोशी, डॉ. संध्या जोगदंड, प्रा. ज्योती राडकर, डॉ. अनिता वैद्य, प्रा. सय्यद आफरीन, श्रीमती देशमुख या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, पदव्यूत्तर विभाग प्रमुख डॉ. सतीश माऊलगे यांच्या मार्गदर्शनाखाली काम पाहतात.

**विज्ञान मंडळ विभाग :**

शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीलाच दि. ५.६.२०२१ रोजी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये विज्ञान मंडळाच्या वतीने वृक्षारोपन करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विविध विभागाच्या वतीने प्रमुख अतिथींच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे विज्ञान मंडळ व प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर दरम्यान वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रम हा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला.

ज्येष्ठ पक्षीतज्ञ डॉ. सलीम अली यांची जयंती १२.११.२०२१ रोजी महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या

वतीने साजरी करण्यात आली. दि. ९ डिसेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात डॉ. प्रमोद रोकडे यांनी पुरूषातील वंध्यत्व या विषयावर व्याख्यान देवून विद्यार्थ्यास सखोल मार्गदर्शन केले. दि. १७.९.२०२१ रोजी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्या साठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतली. तसेच राष्ट्रीय विज्ञान दिवसानिमित्त दि. २८.२.२०२१ रोजी अवकाशातील तंत्रज्ञान या विषयावर वेंकटस्वामी महाविद्यालयातील भूगोल विषयाचे प्रा. प्रकाश कोंका यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

## संशोधन समिती :

संशोधन समिती व IQAC यांच्यातर्फे दि.२४ जानेवारी २०२२ रोजी पेटंट ऑफीस गर्व्हमेंट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, मुंबई यांच्यातर्फे के.एस.के. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त "बौद्धीक संपदा" या विषयावरील राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते डॉ. अजय ठाकुर असिस्टंट कंट्रोलर ऑफ पेटंट ऑफीस मुंबई हे होते. त्यांनी पेटंट कॉपी राईट, ट्रेडमार्क, डिझाईन याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नॅशनल इंटिलेक्युचयल प्रॉपर्टी अवेरनेस मिशन अंतर्गत पार पडला.

## पर्यावरण समिती :

पर्यावरण संवर्धन समिती अंतर्गत Green Audit and Environment Audit प्रमाणपत्र महाविद्यालयाने प्राप्त केलेले आहे. सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त माफक दरात चारचाकी व दोनचाकी वाहनांसाठी प्रदूषण नियंत्रण शिबीराचे आयोजन दि. ४.१०.२०२१ रोजी करण्यात आले होते. महिन्याच्या प्रत्येक दुसऱ्या व तिसऱ्या शनिवारी No 'No Vehicle day' आयोजित करण्यात येतो.

"माझी वसुंधरा" अभियानांतर्गत वृक्षारोपन उपक्रमाचे महाविद्यालयात आयोजन करण्यात आले. यावेळी मा. अंकित प्रभु यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

"गच्चीवरील बाग" या अभिनव स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या प्रेरणेने केले गेले.

## वसतीगृह सल्लागार समिती :

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील सौ. केशरबाई क्षीरसागर मुलींच्या वसतीगृहात दि. २०.११.२०२१ रोजी कोविड-१९ लॉकडाऊन नंतर काही विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आला. तेव्हा कोरोनाचे गांभीर्य लक्षात घेता विद्यार्थीनींना स्वच्छतेच्या बाबतीत सुचना देण्यात आल्या. तसेच मास्क सॅनिटायझर आणि फिजीकल डिस्टन्सचे पालन करण्यासाठी सुचना देण्यात आल्या. सफाई कर्मचाऱ्यांनाही वसतीगृह आणि स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता करण्याच्या सुचना देण्यात आल्या. दि. १०.१२.२०२१ रोजी वसतीगृहाची पाहणी करण्यात आली. पाण्याचे फिल्टर, सौरतापक, व्हेंडीग मशिन व्यवस्थीत सुरू आहे की नाही, याचीही पाहणी करण्यात आली. दि. ३.१०.२०२२ ला वसतीगृहाची पाहणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थीनींना आणि सफाई कामगारांना स्वच्छते संबधी सुचना देण्यात आली.

## प्लेसमेंट समिती :

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी सौ. रजनी बडे यांचे दि. १७ जुलै २०१९ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या कर सल्लागार परीक्षेत एनटीडी प्रवर्गातून महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक त्यांनी पटकावला होता. आपल्या व्याख्यानातून त्यांनी आपले अनुभव विद्यार्थ्यासोबत शेअर केले. त्याचबरोबर आयुष्यामध्ये जे ध्येय तुम्ही निश्चित केलेले आहे ते पूर्ण होईपर्यंत आपण प्रयत्न करत राहणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. महाविद्यालयातील नियमित तासिका बरोबरच ग्रंथालयातील ग्रंथ संपदेचा आपण यथायोग्य वापर करून घेतला पाहिजे. स्पर्धा परीक्षेची तयारी आपण जेवढया लवकर करू तेवढ्या लवकर आपल्याला यश हाती

लागत असते. असे प्रतिपादन त्यांनी केले. या आभासी व्याख्यानाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे उपस्थित होते. या आभासी व्याख्यानाचा महाविद्यालयातील ४० मुलांनी लाभ घेतला.

दि. १० जूलै २०२१ रोजी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी तथा नायब तहसीलदार श्री संदीप पाटील यांचे विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शपर व्याख्यान आयोजित केले होते. आपल्या व्याख्यानातून त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी, स्पर्धा परीक्षेचे संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप याविषयी विद्यार्थ्यासोबत माहिती शेअर केली. विद्यार्थी ते अधिकारी हा आपला प्रवास त्यांनी मनोगतातून उपस्थितांच्या समोर ठेवला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर या उपस्थित होत्या. महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यासाठी दिल्या जाणाऱ्या सेवासुविधांचा त्यांनी गोषवारा ठेवला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे, डॉ. शिवानंद क्षीरसागर, डॉ. रेखा गुळवे, डॉ अनिल शेळके, प्रा. पवार शरद आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचा लाभ महाविद्यालयातील ५५ विद्यार्थ्यांनी घेतला.

दि. २३ डिसेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयएएस आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला, भारतीय संविधानाचे पारायण, स्पर्धा परीक्षेसाठी फाऊंडेशन कोर्स इत्यादी उपक्रम राबवले गेले. या अनुषंगाने विद्यार्थ्यांशी हितगुज कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र तंत्रज्ञान सहायता केंद्र मुंबईचे प्रमुख श्री यशवंत शितोळे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे, करिअर कट्टा विभागीय समन्वयक डॉ. राजेंद्र उधाण, जिल्हा समन्वयक डॉ. तळेकर सर,महाविद्यालयीन समन्वयक श्री. पवार एस.एस. हे हजर होते. सदरील कार्यक्रमाचा लाभ महाविद्यालयातील ६५ विद्यार्थ्यांनी घेतला.महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने दि. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी जस्ट डायल या कंपनीकरिता प्लेसमेंट कॅम्पचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले होते.या प्लेसमेंट कॅम्पमध्ये महाविद्यालयातील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कॅम्पसाठी कंपनीच्या वतीने श्री. रोहित ललवाणी जनरल मॅनेजर श्री. वासिमजी तेली रिजनल मॅनेजर श्री. चेतन कुणाल टीम मॅनेजर हे उपस्थित होते. दि. ३१ डिसेंबर २०२१ रोजी लोकप्रशासन विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती. बीड जिल्ह्यातून या परीक्षेत १५३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दि. ३१ डिसेंबर रोजी लोकप्रशासन विभागाच्या सहकार्याने जिल्हस्तरीय निबंधलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार हे या स्पर्धेचे विषय होते. जिल्हाभरातून ५१ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. दि. २ फेब्रुवारी २०२२ रोजी करिअर गायडन्स समिती सौ.के.एस.के. महाविद्यालय बीड, आर.बी.अट्टल महाविद्यालय, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने श्री निलेश सरवटे यांचे आभासी अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचा १०६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## हेल्थ केअर कमिटी :

१५ ऑगस्ट २०२१ रोजी संपन्न झालेल्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात कोरोना जनजागृती या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. २६ ऑक्टोबर २०२१ रोजी कोविड लसीकरण कॅम्पचे आयोजन करण्यात आले.

## सोशल सायन्स फोरम :

१५ ऑगस्ट २०२१ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सोशल सायन्स फोरमच्या वतीने संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर आधारित भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून बीड शहरातील लघुउद्योजक महिलांच्या हस्तकला वस्तुंचे प्रदर्शन लावण्यात आले. भटक्या आणि विमुक्त जमातीच्या लोकांचा सामाजिक व आर्थिक सर्व्हे करण्यात आला. तसेच तेथील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.




हैद्राबाद मुक्तीसंग्राम सुवर्णमहोत्सव वर्षानिमित्त महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात उपस्थित स्व.केशरबाई क्षीरसागर समवेत ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व मा.खासदार तुकारामजी जाधव, मा.बाळासाहेब भारदे व अन्य मान्यवर

हैद्राबाद मुक्तीसंग्राम सुवर्णमहोत्सव वर्षानिमित्त महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात उपस्थित स्व.केशरबाई क्षीरसागर समवेत ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व मा.खासदार तुकारामजी जाधव, मा.बाळासाहेब भारदे, मा.जयदत्त क्षीरसागर व अन्य मान्यवर





महाविद्यालयात ध्वजारोहणासाठी मा. खासदार केशरबाई क्षीरसागर उर्फ काकूंचे आगमन, समवेत न.शि.संस्थेचे सचिव मा. डॉ.भारतभूषण क्षीरसागर, मा.सय्यद सलीम, डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



ध्वजारोहणाप्रसंगी मा.खासदार केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू समवेत, डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




मराठी विभागाच्या विचार शलाका या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना मा.खासदार केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकू समवेत, न.शि.संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर व इतर मान्यवर




भूगोल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्राच्या समारोप सोहळ्याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.मोहन गुळवे समवेत, विचार मंचावर डॉ.दीपा क्षीरसागर व अन्य मान्यवर



सन १९८९ साली महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबीरादरम्यान प्राचार्य मा.डॉ.बेग, उपप्राचार्य मा.डॉ.जोगदंड, मा.प्रा.हेरकर, मा.डॉ.मोहन गुळवे व विद्यार्थी

सन १९९३ सालची महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना





सन १९९३ साली महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करताना पदाधिकारी



मा.मुख्य निवडणूक आयुक्त मा.जी.व्ही.जी.कृष्णमुर्ती यांच्या हस्ते दिल्लीहून दिला जाणारा राष्ट्रीय महिलारत्न गोल्ड मेडल पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर समवेत, इतर मान्यवर




मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेत मार्गदर्शन करताना न.शि.संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर समवेत, मंचावर ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनाजी मा.श्री.गोविंदभाई श्रॉफ, मा.ओमप्रकाश देवडा, मा.श्री.भुजंगराव कुलकर्णी व इतर मान्यवर



महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाप्रसंगी भूगोल विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाला भेट देताना सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेता प्रसाद ओक समवेत, प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




**शैक्षणिक वर्ष २००१-२००२ मधील विविध भाषा वाङ्मय मंडळ उद्घाटन कार्यक्रमा प्रसंगी मार्गदर्शन करताना सुप्रसिद्ध कथाकार मा.द.मा.मिरासदार समवेत, मंचावर डॉ.हेमलता पाटील, डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर**




**डॉ.दीपा क्षीरसागर लिखीत संत ज्ञानेश्वर आणि संत मीराबाई यांची मधुराभक्ती या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी संत साहित्याचे अभ्यासक डॉ.यु.म.पठाण समवेत, न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर, मा.डॉ.सुहासिनी इर्लेकर व इतर मान्यवर**



**प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर लिखीत आई मराठी कवितेतील ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी राष्ट्रपती मा.प्रतिभाताई पाटील, राज्यपाल श्री.के.शंकरनारायणन, मा.जयंत पाटील, मा.जयदत्त क्षीरसागर, न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर व इतर मान्यवर**



बीड येथे संपन्न झालेल्या अ.भा.मराठी नाट्यसंमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी स्मरणिकेचे प्रकाशन करताना मा.मुख्यमंत्री अशोक चव्हाण, संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा.जयदत्त क्षीरसागर, ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, न.शि.संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, अभिनेते मा.मकरंद अनासपुरे, प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




मराठी व महिला कक्ष विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या विशेष व्याख्यान कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना ज्येष्ठ समाजसेविका पद्मश्री मा.सिंधुताई सपकाळ समवेत, प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर लिखीत झाले मोकळे आकाश या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी ज्येष्ठ कवयित्री मा.प्रभा गणोरकर समावेत, न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर व इतर मान्यवर.



विविध भाषा वाङ्मय मंडळ उद्‌घाटन प्रसंगी सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर समवेत, प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांच्याशी साहित्यिक चर्चा करताना प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर



मराठी विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी मराठी संत साहित्याचे अभ्यासक मा.डॉ.यु.म.पठाण, कुलगुरु मा.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण लेखक मा.भास्कर चंदनशीव, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर




महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाच्याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना माजी मंत्री मा.जयदत्तजी (अण्णा) क्षीरसागर समवेत, मंचावर डॉ.आं.म.वि.औरंगाबाद चे कुलकगुरु मा.डॉ.प्रमोद येवले व प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर



मराठी विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या एका लेखकाची भेट या उपक्रमादरम्यान सुप्रसिद्ध कवी मा.संदीप खरे यांच्या समवेत प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




पहिल्या जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर, मा.विठ्ठल जाधव व इतर मान्यवर



मराठी विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या एका लेखकाची भेट या उपक्रमादरम्यान सुप्रसिद्ध लेखक मा.उत्तम कांबळे यांचे स्वागत करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर



सुप्रसिद्ध हास्यकवी मा.नारायण सुमंत यांच्याशी साहित्यिक चर्चा करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर



सुप्रसिद्ध हास्यकवी मा.नारायण सुमंत यांच्याशी संवाद साधताना युवा नेते मा.डॉ.योगेश क्षीरसागर समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर



मराठी विभागाच्या नवांकूर या भित्तीपत्रकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी सुप्रसिद्ध कवी मा.इंद्रजीत भालेराव समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर, संस्थेचे प्रशासक मा.डॉ.राजा मचाले व इतर मान्यवर

विविध भाषा वाङ्मय मंडळ उद्घाटनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा.प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर समवेत, मंचावर सुप्रसिद्ध मराठी गझलकार मा.मुकुंद राजपंखे, प्रा.हरिदास जोगदंड, उपप्राचार्य डॉ.मोहन गुळवे व इतर मान्यवर





सौ.के.एस.के.महाविद्यालय व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विशेष व्याख्यानमालेदरम्यान भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, मुंबई येथील सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ मा.डॉ.अजित पाटणकर समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



सूक्ष्मजीवशास्त्र विषयाच्या राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ मा.डॉ.एम.ए.देशमुख, मा.डॉ.रंजन गर्गे, शिक्षण सहसंचालक मा.डॉ.डी.आर.माने, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



शैक्षणिक वर्ष २००७–०८ च्या महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री मा.निलम शिर्के समवेत, मंचावर प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



हिंदी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन करताना मा.डॉ.चंद्रदेव कवडे, मा.डॉ.मधु खराटे, मा.डॉ.श्रीराम परिहार, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर, मा.डॉ.ओमप्रकाश नायर आदी



व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान देण्यासाठी महाविद्यालयात आलेले मा.डॉ.मिर्झा बेग यांचे स्वागत करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर

हिंदी विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर समवेत, मंचावर मा.डॉ.हनुमंतराव पाटील व इतर मान्यवर






हिंदी विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रादरम्यान मार्गदर्शनासाठी उपस्थित असलेले मा.डॉ.सुधाकर शेंडगे यांचे स्वागत करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर

# ८. आदरणीय सौ.काकू : एक अष्टपैलू व्यक्तीमत्व

२५ ऑगस्ट २०२१ संकष्टी चतुर्थीचा शुभ दिवस. श्री गणपतीची घरी आरती केली. दर्शन घेऊन खुर्चीत विसावलो. दूरचित्रवाणीवरील बातम्या पाहत असताना ग्रंथपाल श्री शेख दूरध्वनीवरून म्हणाले, "सर, आपल्या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून स्मरणिका प्रकाशित करावयाची आहे. त्यासाठी संस्थेतील माजी प्राध्यापक म्हणून आपला एक लेख हवा आहे." मी त्यांना पटकन हो म्हणालो.

काय बरं लिहावे ? सुरुवात कोठून करावी ? मी विचार करीत होतो.. आज मी आनंदात आहे विशेष म्हणजे फार समाधानी आहे, पण अठ्ठेचाळीस वर्षापूर्वी मी कसा होतो ? त्यावेळेस आयुष्याच्या विशिष्ट वळणावर मी उभा होतो. परिस्थितीशी झगडत होतो, मला अजुनही आठवतो तो दिवस.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले परळीचे वैद्यनाथ देवस्थान. वैद्यनाथांचे दर्शन घेण्यासाठी मी परळीला आलो होतो. एम.एस्सी. (भौतिकशास्त्र) द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतरचे वैद्यनाथाचे पहिलेच दर्शन. चांगल्या महाविद्यालयात सेवा करण्याची संधी मिळू द्या देवा, असे वैद्यनाथाला मनोमन साकडे घातले. मला शंभर टक्के आत्मविश्वास होता की, आजोबापासून चालू असलेली वैद्यनाथाची वारी चांगले फळ देणारच, आणि घडलेही अगदी तसेच, परळीच्या बसस्टॉपवर भगवान गुट्टे (सध्या सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी) या पाहुण्यांची भेट झाली. त्यांनी सांगितले, "नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) ता.जि.बीड या संस्थेच्या नवगण महाविद्यालयात भौतिकशास्त्र या विषयाची प्राध्यापकाची जागा भरावयाची आहे. (त्यावेळेस सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू महाविद्यालय असे नामकरण झाले नव्हते). आमदार सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू यांची ती संस्था आहे. परळी नगरपालिकेच्या वाचनालयात जाऊन पाच सहा दिवसापूर्वीची वर्तमानपत्रे पाहून खात्री करून घ्या."

पाहुण्यांना निरोप देऊन मी लगेच वाचनालयाच्या दिशेने निघालो. पण काकू या शब्दांमुळे भूतकाळातली एक आठवण जागी झाली. सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकूंसंबंधीची एक बातमी मी नांदेडला सायन्स कॉलेजमध्ये शिकत असताना गोदातीर समाचार या दैनिकात वाचली होती, ती बातमी अशी होती. "बीडमध्ये एका पदवीधराने हातगाड्यावर जांभळे विकण्याचा व्यवसाय सुरू केला आहे". सध्याच्या परिस्थितीत अशा बातमीला काहीही महत्व नाही. पण त्याकाळी म्हणजे १९६९ च्या जून महिन्यात या बातमीची सगळीकडे चर्चा सुरू होती. वाचक हो, तुमच्या मनात नक्कीच विचार आला असेल की या बातमीचा व सौ. काकूंचा काय संबंध. पण संबंध आहे बरं का मित्रांनो, कारण दुसऱ्याच दिवशी त्याच दैनिकात अशी बातमी होती की, सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू यांनी जांभळे विकणाऱ्या त्या तरुणाची भेट घेऊन त्याला आंपल्या संस्थेत नोकरी दिली. सुशिक्षीत बेकाराच्या समस्येची इतक्या तत्परतेने दखल घेणाऱ्या सौ. काकूंच्या संस्थेत सेवा करण्याची मला संधी मिळाली तर किती चांगले होईल, असा विचार त्यावेळी माझ्या मनात सहज येऊन गेला होता. माझे ते स्वप्न नक्कीच साकार होईल, असे मला वाचनालयाकडे जाताना सारखे वाटत होते. मी माझ्या तंद्रीतच चालत होतो. जसे काय मला प्राध्यापक या पदाची नोकरीच मिळाली होती.

चालता-चालता एका सायकल रिक्षाला मी धडकलो, थोडेसे खरचटले. "वाचनालय कोठे आहे" असे रिक्षावाल्यास विचारल्यावर त्याने सांगितले की, तुम्ही बरेच पुढे आला, त्याच रिक्षात बसलो आणि वाचनालयापर्यंत पोहोचलो, आग्रह करून सुद्धा रिक्षा चालकाने पैसे घेतले नाहीत. माझ्या गावातील व्याजाने पैसे देणाऱ्या खडूस सावकारापेक्षा तो रिक्षाचालक मला नक्कीच चांगला वाटला, असे येथे नमूद केल्याशिवाय राहवत नाही.

वाचनालयातून पाच-सहा दिवसापूर्वीचा झुंजारनेता चा अंक शोधला. जाहिरातीचा पूर्ण तपशील घेतला. दोन-तीन दिवसांनी अहमदपूरला जाऊन रजिस्टर्ड टपालाने अर्ज पाठवून दिला. काही दिवसांनी मुलाखतीसाठी बीडला येण्यासाठीचे पत्र मिळाले. नेमके त्याचवेळेस मुंबईच्या एका

सरकारी कॉलेजमध्ये मुलाखतीसाठी येण्यासंबंधी पत्र मिळाले होते. मला प्रश्न पडला आता जावे कोठे ? मुंबईला की बीडला ? सरकारी महाविद्यालयातील नोकरीसाठी की खाजगी महाविद्यालयातील नोकरीसाठी. पूर्ण विचार करून मी शेवटी बीडला जाण्याचा निर्णय घेतला. खरं सांगायचं म्हणजे माझ्याकडे त्यावेळेस बीडला जाऊन परत गावी येण्यापुरतेच पैसे होते. म्हणूनच मी बीडला मुलाखतीसाठी जाण्याचा निर्णय घेतला होता.

मी बीडला आलो होतो दिनांक आठवत नाही १९७३ चा मे महिना होता. मुलाखतीच्या अगोदरच्या दिवशी सौ. काकूंची भेट घ्यावी असे वाटले. सौ. काकू त्यावेळी पंचायत समितीच्या शासकीय निवासस्थानी राहत होत्या, असे मला समजले. मी तेथे पोहोचलो. बाजूला काही मुले क्रिकेट खेळत होती. त्यातील एका मुलाने मला सौ. काकूंचे घर दाखविले नंतर काही महिन्यांनी मला माहित झाले की, ज्या मुलाने काकूंचे घर दाखविले त्याचे नाव भारतभूषण असे होते. म्हणजेच ते सौ. काकूंचे तृतीय चिरंजीव होते.

सौ. काकूंच्या घरापर्यंत पोहोचलो आणि तेथेच घुटमळलो. कदाचित तेथील सेवकाला माझी अवस्था समजली असावी. त्याने मला "कोणाला भेटायचे आहे?" असे विचारले. तेंव्हा मी म्हणालो "मला सौ. काकूंची भेट घ्यायची आहे मला परवानगी मिळेल का". "आमच्या सौ. काकूंना भेटण्यासाठी अगोदर परवानगी घ्यावी लागत नाही. केव्हाही भेटू शकता. सौ. काकू आत आहेत तुम्ही भेटा" असे एका दमात तो सेवक मला म्हणाला. का कुणास ठाऊक, पण तो सेवक मला माझ्या जवळचाच कोणीतरी वाटला आणि माझ्या डोक्यावरचा ताण पन्नास टक्के कमी झाला.

सौ. काकूंची भेट झाली. "माझे गाव केंद्रेवाडी ता. अहमदपूर जि. उस्मानाबाद" असे मी म्हणालो. (त्या वेळेस उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन झाले नव्हते. लातूर जिल्हा अस्तित्वात नव्हता) तसेच S.S.C., BSc. व M.Sc.चे गुणपत्रक त्यांना दाखविले. "माझा विषय भौतिकशास्त्र असून मुलाखतीसाठी आलो आहे," असे मी त्यांना नम्रपणे म्हणालो. माझे सर्व गुणपत्रक पाहून त्या म्हणाल्या, "माझ्या संस्थेत प्रामाणिकपणे काम करावे लागेल. कामात चुकारपणा चालणार नाही. कसल्याही प्रकारच्या उचापती खपवून घेतल्या जाणार नाहीत. ठीक आहे. उद्या मुलाखतीला या, मुलाखत कशी देता यावर बरेच अवलंबून आहे. जाताना चहा घेऊन जा. आनंदाने बाहेर आलो एका महिला सेविकेने चहा आणून दिला, सेवकाने हस्तांदोलन केले. त्यावेळी बलभीम चौकात असलेल्या स्वस्तिक लॉजमध्ये मुकामाला थांबलो.

मित्रांनो, मला येथे नम्रपणे दोन गोष्टींचा उल्लेख करावसा वाटतो. पहिली गोष्ट म्हणजे नोकरी मागण्यासाठी आलेल्या व्यक्तीला आपुलकीची वागणूक देणारं सौ. काकूंसारखं राजकीय व्यक्तीमत्व आजकाल संपूर्ण महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे सौ. काकूंना भेटण्यासाठी पूर्व परवानगीची गरज नव्हती. कोणीही काकूंना भेटू शकत होते. काकू तळागाळातील लोकांच्या नेत्या होत्या. त्यांना बीड जिल्ह्यातील प्रत्येक शहराची, गावाची खडान्खडा माहिती होती.

दुसऱ्या दिवशी मुलाखत दिली. विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरे मी बरोबर दिली. काही दिवसांनी माझ्या घरच्या पत्यावर भौतिकशास्त्र या विषयात अधिव्याख्याता म्हणून नवगण महाविद्यालय बीड येथे नेमणूक झाल्याचे पत्र मला मिळाले. मला एवढा आनंद झाला की, क्षणभर काही सुचलेच नाही. १९७२ च्या दुष्काळाला जेमतेम एक वर्ष पूर्ण झाले होते. तरी दुष्काळाच्या झळा जाणवतच होत्या अशा परिस्थितीत माझी झालेली नेमणूक म्हणजे, "सौ. काकूंच्यां रूपाने वैद्यनाथच पावला". असा विचार मनाला स्पर्शून गेला, परळीच्या वैद्यनाथाच्या वारीचं फळ मिळालं दोन जुलै १९७३ रोज सोमवार, या दिवशी मी भौतिकशास्त्रचा अधिव्याख्याता म्हणून नवगण महाविद्यालय बीड येथे रूजू झालो. त्यावेळी सौ.के.एस.के. महाविद्यालय असे नामकरण झाले नव्हते. हा दिवस माझ्या आयुष्यात मैलाचा दगड ठरला. या दिवशी माझ्या आयुष्याला योग्य दिशा मिळाली. हा दिवस मी मरेपर्यंत विसरणार नाही.

३१ मार्च २०११ पर्यंत मी सौ.के.एस.के. महाविद्यालय बीड येथे सेवेत होतो. खरोखरच ३७ वर्षे ९ महिने हा माझ्या आयुष्यातील सोनेरी काळ होता. सौ.काकूंच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्यासह आम्ही सर्व सहकारी (Teaching and non-teaching) महाविद्यालयाचा रथ व्यवस्थितपणे आणि योग्य मार्गाने हाकत होतो.

मित्रांनो सौ. काकूंचे व्यक्तीमत्व अजात शत्रुसारखे होते. कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसताना त्यांनी शून्यातुन विश्व निर्माण केले. त्यांनी निर्माण केलेले साम्राज्य त्यांच्या कामाची पावती देते. दुर्दम्य इच्छाशक्ती, प्रचंड आत्मविश्वास आणि अपयश पचविण्याची ताकद हे सौ. काकूंच्या यशाचं गमक आहे. संपूर्ण आशिया खंडात सहकारी तत्त्वावर साखर कारखाना उभारणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. त्यांना कामाचा कधीही कंटाळा आला नाही. सदैव काम करीत राहणे हा त्यांचा धर्म होता. अपयशाने त्या कधीच खचून गेल्या नाहीत. उलट फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेऊन यशोशिखरावर पोहोचल्या त्यांची जनतेशी नाळ जुळली होती. माणसे ओळखण्याचे त्यांचे कसब अद्वितीय होते. माणसांचे चेहरे वाचण्याची कला त्यांना अवगत होती. त्यांची भूमिका नेहमी सकारात्मक असायची. आपल्या आयुष्यात नकारात्मक भूमिका त्यांनी कधीच घेतली नाही. 'नाही' किंवा 'होत नाही' असे शब्द त्यांच्या शब्दकोषात शोधूनही सापडत नव्हते, किंबहुना असे शब्द त्यांना मान्यच नव्हते, असे आम्हा सर्व सहकाऱ्यांना वेळोवेळी जाणवत असायचे. जेव्हा त्या महाविद्यालयास भेट देत असत, तेव्हा बारीक सारीक गोष्टींवर त्यांचे कटाक्षाने लक्ष असे. 'जालनेकर त्या ठिकाणी बराच कचरा दिसतो आहे. शिपायांना सांगून जागा स्वच्छ करा' असे प्रा. मालोदेना त्यांनी सांगितलेले मी स्वतः ऐकले आहे.

कामात चुकारपणा केलेला त्यांना कधीच आवडत नसे. सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्याकडून समान वागणूक मिळत असे. चूक दिसताक्षणीच स्वतःच्या मुलीलासुद्धा सर्वासमोर झापतांना त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. एखाद्याने चहाडी केलेली सौ. काकूंना आवडत नसे. कोणाचेतरी ऐकून एखाद्यावर अन्याय झाला, असा प्रकार सौ. काकूंच्या कारकिर्दीत कधीही घडलेला नाही. प्रत्यक्ष स्वतः माहिती घेऊन सौ. काकू निर्णय घेत असत. मी या संदर्भात प्रत्यक्ष साक्षीदार आहे. हाच वारसा पुढे सौ. काकूंच्या सूनबाई आदरणीय सौ. दीपाताई भारतभूषण क्षीरसागर चालवत आहेत. याचा आम्हा सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अभिमान वाटतो. आदरणीय सौ. काकू रसिकपण होत्या. महाविद्याल यातील स्नेहसंमेलनात त्या पूर्णवेळ उपस्थित राहून सर्व कार्यक्रम आवडीने पाहत होत्या. जेव्हा त्या बीडमध्ये असत, तेव्हा कमीत कमी एक-दोन वेळेस महाविद्यालयास भेट देत होत्या. सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेवून त्यांना योग्य मार्गदर्शन करीत असत.

व्यावसायिक अभ्यासक्रमावर सौ. काकूंचा विशेष भर असे. म्हणून त्यांनी होमिओपॅथीक अभ्यासक्रमाची बीडमध्ये मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला त्यांनी D.H.M.S. हा कोर्स सुरु केला. पुढे B.H.M.S.महाविद्यालय सुरू केले. सध्या B.H.M.S. महाविद्यालयाची टोलेजंग इमारत उभी आहे. आता श्री सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक महाविद्यालय असे नामकरण झालेले आहे. सौ. काकूंच्या मार्गदर्शनाखाली B.H.M.S.महाविद्यालयाचा कारभार प्राचार्य डॉ. अरुण भस्मे सेवानिवृत्त होईपर्यंत पाहत होते. तेथे आता M.D.होमिओपॅथीक हा अभ्यासक्रमही सुरु केला आहे. या महाविद्यालयातून डॉक्टर पदवी मिळवून अनेक विद्यार्थी वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत. सौ. काकूंच्या दूरदर्शी दृष्टिकोनाला सलाम !

अहमदनगर-बीड-परळी या रेल्वेमार्गाचे काम मार्गी लावण्यात सौ. काकूंचा सिंहाचा वाटा आहे. तत्कालीन रेल्वेमंत्र्याकडे शिष्टमंडळ नेऊन त्यांनी पाठपुरावा केला होता. बीड जिल्ह्याचे सुपूत्र सुभाष आश्रुबा सानप कारगील युद्धात शहीद झाले. सौ. काकू तेव्हा शहीद सुभाष सानप यांच्या गावी वडझरी ता. पाटोदा येथे ताबडतोब पोहोचल्या.सानप कुटूंबियांचे सांत्वन करून त्यांना आर्थिक मदत केली.

बीडला दूरदर्शन केंद्र हवे, अशी येथील जनतेची मागणी होती. सौ. काकू त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांना भेटल्या. तत्कालीन माहिती व प्रसारण मंत्र्याचीही भेट घेतली. पण,दूरदर्शन केंद्र मंजूर झाले नव्हते. लोकसंख्या (प्रेषक) कमी हे कारण सांगितले जात होते. तेव्हा सौ. काकू संबंधितांना म्हणाल्या "माझा बीड जिल्हा कुटूंब नियोजनात नंबर एक आहे. आम्हाला परवानगी दिली तर प्रेक्षकांची संख्या वाढवून दाखवू" सौ. काकूंचे हे बोल ऐकताच शांतता पसरली. अखेर बीडच्या दूरदर्शन केंद्राला मंजूरी मिळाली.

मित्रांनो, अशा होत्या आपल्या सौ. काकू. एखादे काम हाती घेतले की, ते पूर्ण करून दाखवित असत...सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला संस्थेतर्फे सत्कार करून निरोप दिला जातो. सौ. काकू अशा कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित राहत असत. त्यांच्या असे लक्षात आले की, फक्त संबंधित कर्मचाऱ्यांचाच सत्कार केला जातो. तेव्हा सौ. काकूंनी प्राचार्या डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर यांना सांगितले की, सहकुटूंब सत्कार करून निरोप देण्याची प्रथा

सुरू करा तेव्हापासून सहकुटूंब (जोडीदारासह) सत्कार करून निरोप देण्याची पद्धत आमच्या महाविद्यालयात सुरू आहे. प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांनी यात आणखी भर टाकली. निरोपाच्या वेळी सत्काराबरोबरच सेवानिवृत्ती सन्मानपत्र देऊन गौरव करण्यास सुरुवात केली. मला सांगायला विशेष आनंद वाटतो की, सर्वप्रथम मला सेवानिवृत्ती सन्मानपत्र देऊन सत्कारीत करण्यात आले. मी मानकरी ठरलो.

नोकरीच्या काळात मला प्राचार्य एम.पी. मिसाळ प्राचार्य एम.आर. बेग व प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर या तिघांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली. माझे H.O.D.प्रा.एस.डी. चिडगोपकर यांचे मला नेहमी सहकार्य मिळत असे. दिनांक चार ऑक्टोबर दोन हजार सहा हा दिवस संस्थेच्या इतिहासातील काळाकुट दिवस. याच दिवशी सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ सौ. काकू यांचे दुःखद निधन झाले. अंत्ययात्रेच्या वेळी उपस्थित असलेला प्रचंड जनसमुदाय सौ. काकूंच्या महतेची जाणीव करून देत होत. महाविद्यालयाच्या आवारातच सौ. काकूंवर अंत्यसंस्कार करण्यात आले. सौ. काकू अमर रहे, या घोषणांनी सर्व परिसर निनादत होता.

कै.सौ. काकूंनी आखून दिलेल्या मार्गावर त्यांचे चारही चिरंजीव आपापली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडीत आहेत. आदरणीय माजी मंत्री श्री. जयदत्त अण्णा क्षीरसागर इंजिनिअर आहेत. एक समंजस व सुसंस्कृत राजकारणी म्हणून ते महाराष्ट्राला परिचित आहेत. महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री असताना त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात त्यांचे कार्यकर्ते आहेत.

आदरणीय रविंद्र क्षीरसागर हे गजानन सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. त्यांचे चिरंजीव संदीपभैय्या क्षीरसागर आमदार आहेत. आदरणीय भारतभूषण क्षीरसागर बीड नगर परिषदेचे अध्यक्ष आहेत. 'एकच ध्यास, बीड शहराचा विकास' हे त्यांचे ध्येय आहे. त्यांचे चिरंजीव डॉ. योगेशभैय्या क्षीरसागर हेही राजकारणात सक्रीय आहेत. डॉ. विठ्ठल क्षीरसागर हे नामांकित डॉक्टर आहेत. सौ. प्रतिभा जयदत्त क्षीरसागर, सौ. रेखा रविंद्र क्षीरसागर, प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर, डॉ.सौ. सारिका योगेश क्षीरसागर या सर्व मिळून महिला आघाडी यशस्वीपणे सांभाळत आहेत.

आदरणीय प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई भारतभूषण क्षीरसागर या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा बीडच्या अध्यक्ष आहेत. नाट्य परिषदेच्या बीड शाखेतर्फे दरवर्षी ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केला जातो. नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील देवळाण-कर हे अशा कार्यक्रमासाठी विशेष कष्ट घेतात. मी स्वतः जेष्ठ नागरिकांच्या कार्यक्रमात भाग घेत असतो. काही वर्षापूर्वी बीड येथे लेखिका साहित्य संमेलन आयेजित केले होते. प्राचार्या डॉ.सौ.दीपाताई भारतभूषण क्षीरसागर या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष होत्या. त्या उत्तम लेखिका आहेत. प्रसिद्ध कवयित्री कै.डॉ.सुहासिनी इर्लेकर यांच्या त्या कन्या आहेत. आईचा आणि सासूबाईंचा वारसा डॉ.सौ. दीपाताई व्यवस्थितपणे व प्रामाणिकपणे चालवत आहेत.डॉ.सौ. दीपाताईंच्या प्रोत्साहानामुळे मी तीन कवितासंग्रह व दोन सुविचारसंग्रह प्रकाशित करू शकलो. माझ्या 'वास्तव' या पहिल्या कवितासंग्रहाला त्यांनी प्रस्तावना लिहिली आहे. क्षीरसागर कुटूंबियांकडून सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक उपक्रम वर्षभर राबविले जातात काकू-नाना प्रतिष्ठाणच्या वतीने वेळोवेळी आरोग्य शिबीरे भरवली जातात गरजुंना मोफत उपचार केले जातात. डोळे तपासून ऑपरेशन केले जातात तसेच ऱ्हदयरोग तज्ञांकडूनही रूग्णांची तपासणीही केली जाते. मित्रांनो, सेवानिवृत्तीनंतर काहीच प्रॉब्लेम नसणे हाच एक प्रॉब्लेम होऊन बसतो. हा जवळ-जवळ प्रत्येकाचा अनुभव आहे. पण यातून मी लवकर सावरलो. अधूनमधून मी सौ.के.एस.के. महाविद्यालयात जात असतो. प्राचार्या डॉ. सौ.दीपाताई क्षीरसागर,प्रशासक,प्रा.डॉ. राजु मचाले, उपप्राचार्य डॉ. हांगे,प्रा.डॉ.एस.व्ही.क्षीरसागर,प्रा.डॉ.महेशमाळकर, सेवक चौरे, सेवक गणगे यांची भेट घेत असतो. विचारांची देवाण-घेवाण होते. आपल्याच कुटूंबात आल्यासारखे वाटते. थोडासा विरंगुळा वाटतो. प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांनी मला सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेत लेख लिहिण्याची संधी दिली, मी त्यांचा आभारी आहे.

प्रा. एस. जी. केंद्रे

# १. नवगण ऊर्फ सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या आठवणी

मराठी शब्दकोषामध्ये, ज्ञानकोषामध्ये नवगणचा अर्थ डोंगराचा उंच सुळका, आकाशात उंच झेपावणे, प्रगतीच्या दिशेने जाणे असा दिला आहे. ऑक्टोबर १९७१ मध्ये या महाविद्यालयाची स्थापना काकूंनी केली. आज या महाविद्यालयाला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने आपण महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव साजरा करत आहोत. एखाद्या विशाल वटवृक्षाप्रमाणे हे महाविद्यालय उभे आहे. ज्ञानाच्या, विषयांच्या Facauality च्या विविध शाखा कार्यरत आहेत. दरवर्षी हजारो विद्यार्थी ज्ञान घेवून महाविद्यालयातून बाहेर पडत आहेत.

ऑक्टोबर १९८५ मध्ये मी मराठी विषयाचा, भाषा विषयाचा प्राध्यापक म्हणून महाविद्यालयात रूजू झालो. १९८० ते १९९० ही दोन दशके महाराष्ट्रात चळवळींनी भारावलेली होती. मराठवाड्यात अग्रेसर असलेली दलित युवक आघाडीची चळवळ, कै.प्रा. माधवराव मोरे, प्रा. अविनाश डोळस, प्रा.एस.के. जोगदंड आणि मिलिंद महाविद्यालयातील प्राध्यापकांनी ही चळवळ उभी केली होती. युवक क्रांती दल, बाबा आढाव यांची एक गांव एक पाणवठा तसेच हुंडाविरोधी चळवळीही गतीमान होत होत्या.

१९८७ ला अखिल भारतीय दलित नाट्य संमेलन अंबाजोगाईला आयोजित करण्यात आले होते. प्रा. माधवराव मोरे, प्रा. एस.के. जोगदंड यांनी हे संमेलन आयोजित केले होते. या संमेलनाचे अध्यक्ष होते, प्रसिद्ध नाटककार प्रा. दत्ता भगत. स्वागताध्यक्षा होत्या संसद सदस्य खासदार केशरबाई क्षीरसागर. प्रमुख पाहुणे म्हणून राजेंद्रकुमार वाजपेयी समाजकल्याण केंद्रीय मंत्री, भारत सरकार, मा. विलासराव देशमुख सांस्कृतिक मंत्री महाराष्ट्र, राज्य सरकार ह्या विभूती कार्यक्रमास हजर होत्या. स्वागताध्यक्षपर भाषण लिहून देण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली होती. ती मी जबाबदारी समर्थपणे पेलली. यातून मला काकूंच्या गुणांची ओळख झाली. तीन दिवसाच्या संमेलनाची आम्ही स्मरणिका काढली होती. संपादक मंडळावर मी, विवेकसिंधूचे वार्ताहर अमर हबीब, नामदेवराव जोगदंड, उपजिल्हाधिकारी औरंगाबाद इत्यादी होते. आम्ही ही स्मरणिका लक्षात राहील अशी काढली होती. या संमेलनाची प्रमुख वर्तमानपत्रांनी नोंद घेतली होती.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य होते डॉ. एम.आर. बेग. ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. ते हिंदी विषय शिकवत असत. मराठी आणि हिंदी विषयाची तासिका बरोबरच होती. मी शंकरराव खरातांचे तराळ अंतराळ शिकवत असे. ते मन लावून माझ्या शिकवण्याकडे बघत असत. मराठी–इंग्रजी विभाग आणि हिंदी विभागाचे भाषा विषयाचे अतूट नाते होते. आमच्याकडून चूका झाल्यावर ते प्रेमाने समजून सांगत असत. साहेब रागावलेले मी कधीच पाहिले नाही. मला ते म्हणायचे, सर तुम्ही मिलिंद परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून शिक्षण घेवून आलात, मी देखील मौलाना आझाद महाविद्यालयातून आलोय हे चळवळीच अतूट नातं होतं. वेळ मिळाला की, आम्ही चळवळीविषयी बोलत असत.

महाविद्यालयात शिकवत असताना मी विद्यार्थ्यांसाठी असंख्य आंदोलनात भाग घेत असे. कधी भारत सरकार GOI च्या शिष्यवृत्तीसाठी आंदोलन करावे लागले. प्रसंगी विद्यार्थ्यांना एकत्र करत असताना सौ.के.एस.के. महाविद्यालय, बलभीम महाविद्यालय, बंकटस्वामी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या बैठका घ्याव्या लागल्या, विद्यार्थ्यांबरोबर राहून मोर्चे काढावे लागले. सरकारकडे दाद मागावी लागली. हजारो विद्यार्थी मोर्चात जमत असत. संस्था चालकांना प्राचार्य बेग साहेब समजून सांगत असत. हा चळवळीतला प्राध्यापक आहे. सरकारला, शासनाला भांडतो आहे. यामध्ये आपल्या संस्थेचे नुकसान नाही. तोटा नाही. दुसऱ्या दिवशी महाविद्यालयात आल्यावर प्राचार्य बेग साहेब म्हणत असत. "खूप मोठा मोर्चा काढलात" माझ्यावर शाबासकीची थाप प्राचार्य मारत असत.

प्रत्येक महाविद्यालयाला विद्यार्थी वसतीगृह असावे हा शासनाचा नियम होता. प्रसंगी समाज

कल्याण अधिकारी महाविद्यालयाला भेट देणार म्हटल्यावर मी रूमवर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या पेटया, सतरंजी, चादर घेवून या म्हणत असे. सध्याचे जे सोनाजीराव क्षीरसागार मेडिकल कॉलेज आहे. त्या महाविद्यालयाच्या खालच्या मजल्यावर मी वसतीगृह निर्माण करत असे. प्रसंगानं वसतीगृहाची पाटी यायची. वसतीगृहाचा रेक्टर म्हणून माझी नियुक्ती झाली. आज महाविद्यालयात विद्यार्थ्यांची वसतीगृहाची टोलेजंग इमारत उभी आहे हे पाहून समाधान वाटते.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे GOI शिष्यवृत्तीचे फॉर्म घेवून मी त्यावर सह्या घेण्यासाठी जि.प. कार्यालयात समाजकल्याण सभापतीकडे जात असे. त्यावेळी समाजकल्याण सभापती लालासाहेब साबळे हे होते. प्राचार्यांनी आदरणीय लालासाहेब साबळे यांची ओळख करून दिली होती. ते आमच्या संस्थेचे सचिवही होते. त्यांच्या सोबत गप्पा मारण्यासाठी लालासाहेबांकडे येत असत. त्यावेळी नानांची म्हणजे आदरणीय सोनाजीराव क्षीरसागर यांच्याशी माझी ओळख झाली. नाना आपले मित्र, सवंगडी, त्यांनी गाजविलेले कुस्त्यांचे फड त्यातील गमती जमती सांगत असत. त्यांचे ते गडगडून जाणारे हास्य पाहून मी थक्क होत असे. त्यामध्ये कुणाचा द्वेष नसे, मत्सर नसे, कुणाविषयी वाईट भावना नसे. त्यांचा तो मोकळा स्वभाव मला आवडत असे.

महाविद्यालयाच्या मराठी विभागात प्रा. वसंतराव कुलकर्णी, डॉ. हेमलता पाटील, प्रा. आगळे आणि मी हे मोजकेच प्राध्यापक होतो. प्रा. वसंतराव कुलकर्णी संतसाहित्य आणि व्याकरण शिकवत असत. त्यांची शिकवण्याची शैली वाखाणण्यासारखी होती. डॉ.हेमलता पाटील स्त्रीमुक्ती चळवळीत काम करतात म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांनी पुरोगामी चळवळीला वाहून घेतले होते. प्रा. दीपाताई क्षीरसागर प्रसिद्ध संत कवयित्री सुहासिनीताई इर्लेकर यांच्या कन्या म्हणून सर्वांना माहित होत्या. पुढे डॉ. दीपाताई क्षीरसागर पंचायत समिती बीडच्या सभापती झाल्या. त्या राजकारणाचा व्याप सांभाळून महाविद्यालयात अध्यापन करण्यासाठी येत असत. त्यांच्याविषयी आदरयुक्त भिती वाटत होती.

काही वर्षांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून दीपाताई क्षीरसागर रुजू झाल्या. मराठी विभागाकडे प्राचार्याचे पद आले म्हणून मला आनंद झाला. त्यावेळी मराठी विभागातील डॉ. हेमलता पाटील म्हणाल्या होत्या." "दीपाताई क्षीरसागर प्राचार्य झाल्यात म्हणून आनंद वाटतो. तर दुसरीकडे संस्थेच्या संस्थापिका आदरणीय काकूंची सून म्हणून भितीही वाटते. त्या कर्मचाऱ्यांना सांभाळून घेतील काय ?" असे एक ना एक असंख्य प्रश्न त्यांच्याविषयी निर्माण होवू लागले. हळूहळू त्यांच्या विषयीची भिती नाहीसी होवू लागली. आम्ही मन लावून, जीव तोडून विद्यार्थ्यांना अध्यापन करू लागलो. त्यांनी आम्हा कर्मचाऱ्यांना सांभाळून घेतले.

प्रौढ शिक्षण विभागाचे युनिट आमच्या महाविद्यालयाला जोडले गेले होते. त्यावेळी प्रौढ शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी राठोडसाहेब हे होते. त्यांच्या सोबत आम्ही डॉ. एम.एस. हेरकर, प्रा. भालके, प्रा. कांबळे. प्रा. आडसूळ आष्टी, पाटोदा तालुक्यात प्रौढांच्या परीक्षा घेण्यासाठी रात्रीला जात असत. बीड शहराजवळ असलेल्या आयोध्या नगरीत रात्रीला प्रौढ शिक्षणाचे वर्ग सुरू केले होते. त्यां वर्गाला शिकविण्यासाठी आम्ही रात्रीला जात होतो. त्यावेळेसचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. घुगे साहेब यांनी आयोध्यानगरीला प्रौढ शिक्षण विभागाला भेट दिली होती. समाधान व्यक्त केले होते. त्या आठवणी आज ताज्या होत आहेत.

दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ होत असे त्यावेळी जड अंतःकरणाने म्हणावेसे वाटते.

"अशी पाखरे येती । आणिक स्मृति ठेवूनी जाती ।
दोन घडीची रंगतसंगत । दोन घडीची नाती ।"

त्यावेळी आमच्या प्राध्यापकवर्गाची अवस्था...

"कन्या सासुरासी जाये । मागे परतूनी पाहे ।"

अशी व्हायची. निरोप समारंभाप्रसंगी मी विद्यार्थ्यांना म्हणायचो, "उंच उंच वृक्ष व्हा । खुरटी झाडे होवू नका ।" कोठेही जा, जगाच्या कानाकोपऱ्यात जा, नावलौकिक मिळवा. पण प्रत्येकाला आई असते हे विसरू नका. थकल्या भागल्यास महाविद्यालयात क्षणभर विश्रांतीसाठी या...

प्रा. एल. के. तुरुकमाने, बीड

# १०. पिंपळपान

संध्याकाळची वेळ. आता सेवानिवृत्तीमुळे वेळच वेळ शिल्लक असे. पुस्तकांच्या कपाटातील काही जुनी पुस्तके मी आवरायला घेतली व १९७८ चा के.एस.के. महाविद्यालयाचा दूर्वांकुर हा वार्षिक अंक हाती लागला. ते पुस्तक हातात घेऊन व त्यावरील धूळ साफ करत अंक चाळायला सुरूवात केली. जणू आठवणीचा खजिनाच माझ्या हाती लागला. पिंपळपान अलगद पुस्तकात ठेवलेलं. ४४ वर्षापासूनचा काळ डोळ्यासमोरून सरकू लागला.

प्रसंग होता १९७८ च्या जून मध्ये के.एस.के. कॉलेजमध्ये हिंदी व्याख्याता पदासाठी दिलेल्या मुलाखतीचा. १९७८ मध्ये मी बलभीम महाविद्यालयात एम.ए. हिंदी विषयाची परीक्षा उत्तीर्ण झाले. मराठवाडा विद्यापीठात सर्वतृतीय येण्याचा सन्मान मला मिळाला होता. माझे पती व नातेवाईक आदरणीय सौ. काकूंना भेटण्यासाठी गेले होते. नोकरीसाठी विषय निघाला तेंव्हा मुलीला मुलाखतीसाठी पाठवून द्या, असे काकू म्हणाल्या काकूंच्या सांगण्याप्रमाणे आम्ही मुलाखतीस हजर राहिलो. बार्शी रोडवर शिवाजी पुतळ्याच्या पुढे थोडेसे मध्ये जाऊन महाविद्यालयाची इमारत लागली. सकाळी १०.०० वाजता आम्ही मुलाखतीसाठी हजर झालो. सौ. काकू जीपमधून आल्या व महाविद्यालयातील प्राचार्यांच्या केबीनमध्ये बसल्या. त्यावेळी प्राचार्य मारोती मिसाळ, आदरणीय गोविंदराव मचाले मामा व इतर मंडळी मुलाखतीस उपस्थित होती. इंग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र अनेक विषयांसाठीच्या मुलाखतीस उमेदवार हजर होते. प्रत्येक उमेदवार मुलाखत देण्यासाठी आत जाई व थोड्या वेळाने बाहेर येई. येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला काय काय प्रश्न विचारले हे ऐकण्याची उत्सुकता आम्हाला असे. संध्याकाळचे सहा वाजले तरी उमेदवार संपता संपत नव्हते. आजुबाजुला त्यावेळी खुप वस्ती नव्हती. कँटीन ही नव्हते. सकाळपासून सर्व उपाशी होते. भूक खूप लागलेली होती. तेवढ्यात महाविद्यालयाचे शिपाई कोकणे मामा व खोसे मामा एक मोठा बॉक्स घेऊन व्हरांड्यात आले. व त्यांनी सर्वांसाठी चहा नाश्त्याची सोय केली. संध्याकाळचे आठ वाजले, नऊ वाजले, दहा वाजले तेंव्हा कुठे मुलाखतीस माझा नंबर लागला. महाविद्यालयाची इमारत २ मजली होती. समोर पाण्यासाठी मोठा हौद होता. आजुबाजूला पत्रे व तट्टे लावून हॉलची व्यवस्था केली होती. मुलाखतीसाठी केबीनमध्ये पाय ठेवला. तेवढ्यात 'कोणता विषय?' काकूंचा दमदार पण शांत आवाज कानावर पडला.

'हिंदी' मी घाबरत उत्तरले

'नाव?'

'पार्वती भगवानराव देशमाने'

'शिक्षण?' काकूंने प्रश्न केला.

'एम.ए. हिंदी विद्यापीठातून सर्वतृतीय' मी उत्तर दिले.

'हिंदी विषयात कोणकोणत्या कवींचा अभ्यास केला ? कबीरदासाविषयी काही सांगा?' काकू म्हणाल्या मी भीत भीत सुरूवात केली खरी, परंतु कबीरदासजी माझे आवडते कवी असल्यामुळे प्रवाही भाषेतून कबीरदासांचे काही पदे मी सांगू लागले.

"गुरु गोविंद दोइु खडे काके लागू पाय
बालहारी गुरु आपणो जिन गोविंद दियो बताय"

मी न थांबता बोलत राहिले. मुळातच अध्यत्मिक आवड असणाऱ्या काकूंना कदाचित हे वक्तव्य बरे वाटले असावे. ठीक आहे, काकू म्हणाल्या. काकूंनी पुढे काहीही प्रश्न न विचारता या आता एवढच त्या म्हणाल्या व मला जायला सांगितले. बाहेर येवून मी अनुभवले की, खरोखरचं माझे हात पाय थंड झाले होते. व मला घामही फुटला होता. आदरणीय काकूंच्या भारदस्त व्यक्तिमत्वास पाहून भारावून मी गेले होते. सौ.के.एस.के. महाविद्यालयात अर्धवेळ अधिव्याख्याता म्हणून मला नोकरीसाठी आदेश देण्यात आला. त्यानंतर स्व. काकूंच्या छत्रछायेखाली पुन्हा कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालय व शेवटी कालिकादेवी वाणिज्य व वज्ञान व कला महाविद्यालयात प्राचार्य म्हणून सेवा करण्याची संधी मला सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या

प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर डॉ. भारतभूषण क्षीरसागर, आदरणीय आण्णासाहेब यांच्याकडून मिळाली.

एकूण माझ्या सेवेच्या कालावधीत सर्वात अविस्मरणीय कालावधी हा सौ.के.एस.के. महाविद्यालयाचाच आहे. वेगवेगळ्या पदावर मी पद्मभूषण वसंतदादा पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाटोदा, कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार येथे सेवा केली. पण के.एस.के. महाविद्यालयातील कित्येक प्रसंग आजही मनावर कोरले गेले आहेत. के.एस.के. महाविद्यालय हे पूर्वी नवगण महाविद्यालय या नावाने ओळखले जाई. १९७० साली या महाविद्यालयाची स्थापना संस्थेच्या संस्थापिका आदरणीय सौ. काकूंनी केली. महाविद्यालय सर्वप्रथम बोबडेश्वर गल्ली, धोंडिपुरा बीड या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी होते. त्यावेळी महाविद्यालयात डॉ. नागनाथ कोतापल्ले प्रा.खान, प्रा. खाडे, प्रा. भताने, प्रा. चौधरी, प्रा. जी.एम. कुलकर्णी, प्रा. सोनार, प्रा. गर्जे, प्रा. व्ही एम. कुलकर्णी, प्रा. तोष्णीवाल, प्रा. काजी, डॉ. माधुरी शहा, यांच्यासारखे तज्ञ व अभ्यासू प्राध्यापक होते. त्यानंतर महाविद्यालयास ही इमारत विद्यार्थी संख्येमुळे अपूरी पडू लागली. व महाविद्यालय अनिल जगताप यांच्या जालना रोडवरील मोठ्या वास्तुत स्थलांतरीत झाले. त्यानंतर काही कालावधीतच स्वतःच्या सुंदर अशा नव्या इमारतीत महाविद्यालयाचे स्थालंतर झाले. महाविद्यालयापर्यंत पोहचण्यासाठी कच्चा रस्ता होता. खुप चिखल होत असे, कधी कधी विना पायतान महाविद्यालयात जावे लागे.जिज्ञासू व ज्ञानपिपासू, हुशार विद्यार्थीवर्ग पाहून या अडचणी तेव्हा शुल्लक वाटत असत. तट्टया व पत्र्याचे हॉल. खाली अंथरलेला मुरूम. पाऊस सुरू झाला की, जोरात वाजण्याचा ताश्या वाद्याचा आनंद ऐकावयास मिळत असे व पाऊस पडून गेल्यावर जमिनीतील मुंग्या बाहेर पडत व पायाचा चावा घेत. या अडचणी असुनही विद्यादानाचा आनंद काही वेगळाच होता.

महाविद्यालयात विद्यार्जनाबरोबरच विद्यार्थ्यांना अनेक विचारवंत, थोर पुरूषांच्या व्याख्यानाची मेजवानी मिळत असे. प्रतिवर्षी विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन वाङ्मय मंडळाचे उद्घाटन, विज्ञान, वाणिज्य मंडळाचे उद्घाटन, स्नेहसंमेलन नियमितपणे आयोजित केली जात. याच कालावधीत महाविद्यालयात आदरणीय कै. सोनाजीराव क्षीरसागर वाद-विवाद स्पर्धा सुरू करण्यात आली. पूर्ण महाराष्ट्रातील नामांकित विद्यार्थी या स्पर्धेसाठी उपस्थित रहात असत. फिरती ढाल व रोख रक्कम प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात येत असे. या स्पर्धा दोन-दोन दिवस चालत असत. या स्पर्धेची वाट इतर महाविद्यालयातील विद्यार्थी वक्ते व प्राध्यापकही पहात असत. महाविद्यालयाचे वातावरण उत्साहाने भरून जाई. या वाद-विवाद स्पर्धेमुळे अनेक नामांकित वक्ते महाराष्ट्रास मिळाले. वामन केंद्रे, मकरंद अनासपुरे ही कलाकार मंडळीही सौ.के.एस.के. महाविद्यालयाचेच विद्यार्थी आहेत.

महाविद्यालयालयात प्रतिवर्षी होणारी स्नेहसंमेलने त्या परिसरातील नागरिकांसाठी व विद्यार्थ्यासाठी एक अपूर्व पर्वणीच आहे. स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन व समारोप प्रसंगी अनेक नामांकित वक्ते व कलाकारांचे मार्गदर्शन मिळत असे. थोर विचारवंत प्राचार्य ना.य. डोळे सर, मा. जनार्धन वाघमारे सर, आदरणीय प्राचार्य स्व. शिवाजीराव भोसले,ऱ्हदयनाथ मंगेशकर,थोर विचारंवत निर्मलकुमार फडकुले, प्रविण दवणे, दासू वैद्य, कवी सौमित्र, मंगेश पाडगांवकर, कीर्ती शिलेदार, जयमाला शेलार, सुप्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव, स्नेहल पाठक, अलका कुबल, शर्वरी जेमिनीस, सलील कुलकर्णी, संदिप खरे, प्रसाद ओक, पृथ्वीराज तौर, आदरणीय विद्या बाळ, या थोर व्यक्तींनी आपली उपस्थिती लावली. महाविद्यालयात वेगवेगळ्या विषयांच्या कार्यक्रमांची रेलचेल असे. विद्यार्थ्यांचे चर्चासत्रे, गेस्ट लेक्चर्स, सेमीनार प्रसंगानुसार आयोजित केले जात.

सौ.के.एस.के. महाविद्यालयाने अतिशय सक्षम नागरिक, कलावंत, प्राध्यापक, डॉक्टर्स, समाजातील सर्वस्तरातील सक्षम व्यक्ती घडवून समाजाला दिले.

'जागर जाणिवेचा' हा एक असाच ऱ्हदयस्पर्शी स्फुलिंग फुलवणारा उपक्रम महाविद्यालयात इ.स. २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात राबवण्यात आला. याप्रसंगी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सुप्रिया सुळेताई या होत्या. याप्रसंगी महिला व मुलींची भव्य रॅली काढण्यात आली. अपंग व कर्तृत्ववान मुली व महिलांचा सत्कार केला. महिला स्वातंत्र्य सैनिकांना या प्रसंगी निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या अनुभवाची शिदोरी आजतागायत आमच्यासोबत आहे.

महाविद्यालयास इ.स. १९७८ ते आजपर्यंत अनेक प्राचार्यांनी मोलाचे योगदान दिले. यामध्ये प्राचार्य मारोती मिसाळ सर शिस्तप्रिय प्राचार्य म्हणून ओळखले जात. मा. प्राचार्य एम.आर. बेग, प्राचार्य काजी यांचाही कालावधी विद्यार्थी घडवणारा होऊन गेला. पण महाविद्यालयाच्या विद्यमान प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर यांचा कालावधी म्हणजे विद्यालयाचा सुवर्णकाळच म्हणावा लागेल. शहरातील नामांकित व सर्वात जुने असलेले महाविद्यालय म्हणजे बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या बरोबरीने नव्हे, अधिक वरचढपणे हे महाविद्यालय कार्यरत आहे. असे म्हटले तर वावगे होणार नाही.

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आज शहरात अल्पावधीत नावारूपाला आले आहे. बीड जिल्ह्यातील नॅक समितीने A मिळवलेले हे पहिले महाविद्यालय आहे. हे मिनी विद्यापीठच आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्राचार्या सौ. दीपाताई क्षीरसागर या उच्च विद्याविभूषित प्राचार्या आहेत. त्या प्रा.सौ. सुहासिनी इर्लेकर या प्रसिद्ध कवयित्रीच्या सुकन्या आहेत. प्राचार्या डॉ. दीपाताईंनी इ.स. ३.१.१९९८ मध्ये महाविद्यालयाची सुत्रे हाती घेतली. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील परंपरागत विषयाबरोबर त्यांनी संगीत व नाट्यशास्त्र या विषयानांही विशेष प्रोत्साहन दिले व हे विभाग महाविद्यालयात सुरू केले.

डॉ. दीपाताई अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या जिल्हध्यक्षही आहेत. या माध्यमातूनही त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचीच नव्हे तर बीड शहरातील सुसंस्कृती कलाप्रेमी नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने दरवर्षी महोत्सव घेतले जातात. प्रौढांसाठी व मुलांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यामुळे आम्हा प्राध्यापकांनाच नव्हे तर शहरातील कलाप्रेमी व जेष्ठ नागरिकांसाठी सुवर्णसंधी व आविष्करणीय क्षण अनुभवायला मिळतात.

आज सौ.के.एस.के. महाविद्यालयात मराठी, हिंदी, इंग्रजी, गृहशास्त्र, भूगोल, संगीत, संगणकशास्त्र वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र,एम. कॉम. या विषयात P.G. चे शिक्षण विद्यार्थी घेत आहेत.

महाविद्यालयात हिंदी, गृहशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, वाणिज्य या विषयाचे रिसर्च सेंटर आहेत. मराठी व बॉटनी या विषयाचे प्रस्ताव रिसर्च सेंटरसाठी दाखल केले आहेत. या रिसर्च सेंटर मध्ये अनेक विद्यार्थी संशोधन कार्य करत आहेत. महाविद्यालयात एकूण १७०० विद्यार्थी ज्ञानार्जनाचे कार्य करत आहेत. वरिष्ठ महाविद्यालय व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची संख्या १५० च्या वर आहे. या सर्वांना घेऊन महाविद्यालयाच्या संवेदनशीन, अभ्यासू कवीमनाच्या आदरणीय प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर यशस्वी वाटचाल करत आहेत अशा माझ्या कर्मभूमी असणाऱ्या सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव वर्षाला माझ्या हार्दिक शुभेच्छा...

डॉ. पार्वती देशमाने

# ११. सुवर्ण महोत्सवी वर्षातील सौ.के.एस.के. महाविद्यालय

स्व.सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू यांचे मूळ गाव नवगण राजुरी, या गावच्या सिमेवर नऊ गणपतींचे वास्तव्य असून ते गावाचे रक्षण करतात असे परिसरातील नागरिक बोलतात. या गावातील हे देवस्थान जागृत देवस्थान समजले जाते. या देवस्थानावरील निष्ठेतून सौ.काकू यांनी नवगणाच्या नावाने 'नवगण शिक्षण संस्था' स्थापना केली.

ग्रामीण भागातील गरिबांच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सन १९७१ मध्ये बीड या ठिकाणी नवगण महाविद्यालय सुरू करण्यात आले. कालांतराने या महाविद्यालयाचे नामांतर करून सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असे करण्यात आले.

सौ.के.एस.के. महाविद्यालयाची सुरूवात होऊन आज ५० वर्षे झाली २०२१ हे वर्ष महाविद्यालयात सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाने आपल्या ५० वर्षांच्या वाटचालीत चौफेर प्रगती केली आहे. माजी मंत्री मा.जयदत्त आण्णा क्षीरसागर, नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर तसेच युवा नेते मा.डॉ.योगेशभैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वात व प्राचार्य मा.डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने सर्वांगिण प्रगती साधली आहे. हे महाविद्यालय मराठवाड्यातील नामांकित महाविद्यालयापैकी एक आहे.

मी या महाविद्यालयाचा एक घटक राहिलेलो आहे १९८५ पासून मी या महाविद्यालयात जीवशास्त्र विषयाचा कमवि प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. सन २००८ मध्ये संस्थेने मला उपप्राचार्य पदावर काम करण्याची संधी दिली. नियत वयोमानानुसार मी २०१८ मध्ये सेवानिवृत्त झालो. मी या महाविद्यालयात सलग ३३ वर्षे सेवा केलेली असल्यामुळे महाविद्यालयाने केलेल्या चौफेर प्रगतीचा मी प्रत्यदर्शी आहे.

आदरणीय प्राचार्य डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांच्या सक्षम व कुशल मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने भौतिक विकासाबरोबरच शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात नावलौकिक केला आहे. संगीत व नाट्यशास्त्र हे विषय महाविद्यालयात जाणीवपूर्वक सुरु केले. तसेच पदव्युत्तर शिक्षणाची सोय नसलेल्या विषयांचे पदव्युत्तर वर्ग सुरू केले. संशोधन प्रयोगशाळा उभारून संशोधन कार्याला चालना दिली.

एकेकाळी तट्टयाच्या भिंती व पत्र्याचे छत असलेल्या वर्ग खोल्यांच्या ठिकाणी भव्य इमारत उभी केली. सध्या IQAC चे कार्यालय असलेल्या एका खोलीत अंग चोरून असलेले ग्रंथालय आता स्वतंत्र तीन मजली इमारतीत स्थीर झाले आहे. पूर्वी सेमिनार हॉल म्हणून संबोधले जाणाऱ्या छोट्या दालनात व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, नाट्यशास्त्र संगीत इ. कार्यक्रम होत असत. स्नेहसंमेलन कार्यक्रम आयाताकार उंच ओट्यावर (स्टेज) मंडप टाकून व्हायचे. आता या सर्व कार्यक्रमासाठी प्रशस्त 'प्रेक्षकगृह' उभारण्यात आले आहे. बाहेरगावच्या विद्यार्थीनींसाठी महाविद्यालयाच्या परिसरात स्वतंत्र व सर्व सोई-सुविधांनीयुक्त असे चार मजली मुलींचे वसतीगृह बांधण्यात आले आहे. वर्ग खोल्यांमध्ये लाकडी फळा जाऊन तेथे डिजीटल बोर्ड आला आहे. खिडक्यांच्या लोखंडी पटांची जागा काचेच्या स्लायडींगने घेतली आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य माफक दरात उपलब्ध व्हावे म्हणून "विद्यार्थी ग्राहक भांडार" सुरू करण्यात आले आहे. क्वचित एखाद-दुसरा विद्यार्थी ज्या महाविद्यालयातून वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेशित व्हायचा त्याच महाविद्यालयातून आज दरवर्षी या ठिकाणी सरासरी १२-१५ विद्यार्थी या अभ्यासक्रमास प्रवेशित होताना दिसतात. सर्वच बाबी या ठिकाणी मांडणे संयुक्तिक होणार नाही परंतु ५० वर्षात महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा अंदाज यावा म्हणून वरील बाबींचा उल्लेख केला आहे.

वर्षानुवर्षे तेच कार्यक्रम राबवण्यापेक्षा काहीतरी नवीन, सृजनात्मक करण्याचा प्राचार्यांचा नेहमीच आग्रह असायचा त्यामुळे स्टाफमध्ये नाविन्याचा ध्यास आणि

कल्पकता दिसून येते.

शंभर-सव्वाशे विद्यार्थी संख्येने सुरु झालेल्या या महाविद्यालयात आज जवळपास चार-साडेचार हजार विद्यार्थी विविध शाखांमधून शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयाचा क्रीडा विभाग क्रियाशील असून विविध प्रकारांत महाविद्यालयाने राष्ट्रीय पातळीवर नैपूण्य सिद्ध केले आहे.

या महाविद्यालयातून शिक्षण घेवून बाहेर पडलेले विद्यार्थी विविध पदांवर काम करत आहेत. त्यापैकी काही डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक इ. पदांवर आज बीड शहरात कार्यरत असल्याचे दिसून येते.

आदरणीय प्राचार्य डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने सर्वांगिण प्रगती करत ५० व्या वर्षात पदार्पण केले आहे. महाविद्यालयाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो या मनोकामनेसह माझ्या हार्दिक शुभेच्छा.

प्रा. अनंत नखाते

बीड

# १२. आठवणींना उजाळा

मराठवाडा संत पंत आणि कलावंताची भूमी आहे. त्यातल्या त्यात 'कलाकारांचा बालेकिल्ला बीड जिल्हा' अशी

उद्घोषणा तरूण कलावंत करतात. त्याचं कारणही तसंच आहे. माझ्या पूर्वजांची जन्मभूमी बीड जिल्हा असली तरी कर्माने त्यांनी मराठवाड्यातील जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी येथे स्थायिकत्व स्वीकारले आहे. बीड जिल्ह्यात भारूड,किर्तन, कलापथक हे पारंपरिक पद्धतींनी प्रस्तुत होत असायचे पण या प्रयोगात्मक लोककलांना नाटयशास्त्र बैठकीत शुद्ध प्रशिक्षण देण्याचे काम सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर या महाविद्यालयाने केले आहे. सौ.के.एस.के. महाविद्यालयाने महाराष्ट्राच्या रंगभूमीला

भारतीय आणि जागतिक रंगभूमीला कलावंत दिले. त्यातील अग्रणी नाव पद्मश्री प्रा. वामन केंद्रे, डॉ. सुधीर निकम,सुहास शिरसाठ, राजानंद शिंदे, प्रियंका जाधव, निलम वाघमारे, महेंद्र खिल्लारे, लक्ष्मण सोनवणे, कुंदन जोगदंड आणि असे अनेक कलावंतही महाविद्यालयाची जमेची बाजू आहे. परंतु या महाविद्यालयाच्या सहवासात बीड जिल्ह्यातील जी कलावंत मंडळी आली. त्यात नावारूपाला आलेले आघाडीचे रंगभूमी, चित्रपट, दूरवाहिन्यांवरील अभिनेते मकरंद अनासपुरे, अरविंद जगताप, संदीप पाठक, संजय सुगावकर, डॉ. सतीश साळूंके, अण्णा लोळगे, महादेव सवाई, प्रविण वडमारे इत्यादी. तसा माझा बीडच्या सौ.के.एस.के. महावि-द्यालयाशी अगदी अलीकडच्या काळातील संबंध. २००३ साली सौ.के.एस.के. महाविद्यालयात तासिका तत्वावरील प्राध्यापकांना भरती प्रक्रिया सुरू होती. नुकताच मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठामधून नाट्यशास्त्राची पदव्युत्तर पदविका घेऊन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो होतो.

औरंगाबादला पथनाट्यच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य सुरु होते. त्यातच मला प्रेषित रूद्रवार यांच्या भ्रमणध्वनीवर संदेश आला. डॉ. संजय पाटील देवळाणकर यांचा त्यांनी माझ्यासाठी निरोप पाठविला होता. गणेश चंदनशिवे जिथे कुठे असतील त्यांनी आपल्या मूळ कागदपत्रासहित १४ नोव्हेबरला बीड येथे उपस्थित रहावे. प्रेषित रूद्रवार यांनी मला निरोप दिल्यानंतर माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. मी लगेच बीडला निघण्याची तयारी केली.

सौ.के.एस.के. महाविद्यालयात नॅक कमिटी येणार होती म्हणून सगळीकडे रंगरंगोटी आणि सुशोभिकरणाचे काम सुरू होते. नाट्यशास्त्राच्या तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मुलाखतीसाठी माझे अनेक सहकारी मित्र सुद्धा उपस्थित होते. एक-एकजण आतमध्ये जाऊन निवड समितीपुढे आपली मुलाखत देवून बाहेर येत होते. तसतशी माझी काळजाची धडधड वाढत होती. काय प्रश्न विचारतील आणि काय नाही? याबद्दल सूतरामही कल्पना नव्हती. आयुष्यात नोकरीसाठी दुसऱ्यांदा मी आज मुलाखत देणार होतो. एकदाचा माझा नंबर आला आणि मी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांच्या दालनात गेलो. प्रसन्न चेहरा सतत हसतमुख, बोलण्यातील ममता आणि वागण्यातील सहजता हे मला मुलाखती दरम्यान जाणवले विषयाच्या अनुषंगाने निवड समितीने मला अनेक प्रश्न विचारले आणि आम्ही निकालाची वाट पाहत बाहेर थांबलो. चार वाजता यादी लागली आणि माझी निवड झाल्याची बातमी कळली. मनामध्ये अनेक प्रश्न होते. आपण बीडमध्ये कसे राहणार ? आजुबाजुला लोकं कशी असणार ? आपल्याला इथे लोकांशी जुळवून घेता येईल का ? एक ना अनेक प्रश्न मनामध्ये घोंगावत असताना सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. संजय पाटील देवळाणकर माझ्याजवळ आले आणि मला म्हणाले, सर उद्या पासून तुम्ही महाविद्यालात रूजू व्हा. मी त्यांना माझी सर्व परिस्थिती सांगितली. मी राहणार कुठे ? माझ्याकडे तर पैसे नाहीत, मी खानावळ कुठे लावू ? त्यांनी स्मित हास्य करत बोलले. तुम्ही त्याची चिंता करू नका, तुमची सगळी व्यवस्था मी करतो. नाहीच कुठे जमलं तर, तुम्ही माझ्या सोबत राहा. मन गहिवरून आलं. जेव्हा माणसासाठी सगळी दारं बंद असतात. तेव्हा माणुसकीचं एक दार कुठूनतरी उघडतं यावर माझा आजही ठाम विश्वास आहे. मी त्यांच्या सोबत सरांच्या घरी गेलो. वहिनीसाहेब अतिशय मायाळु होत्या. कुणीतरी कुटूंबातीलच एक सदस्य आमच्याकडे आला या अविर्भावात त्यांनी माझं स्वागत केलं. कुठल्या जातीपातीचा लवलेश न ठेवता मी त्या परिवाराचा एक सदस्य झालो. दुसऱ्या दिवशी महाविद्यालयात रूजू होण्यासाठी डॉ.सौ. दीपाताईच्या केबिनमध्ये गेलो. ताईंनी मला महाविद्यालयाची शिस्त, तिथले नियम, अटी एखाद्या आईने आपल्या मुलाला समजून सांगाव्यात त्यापद्धतीने सांगितल्या.

नॅकची लगबग सुरू होती. मी सुद्धा विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक तालमीत सहभागी होतं स्वतःला झोकून देऊन प्रामाणिकपणे काम करत होतो. माझं सहज वावरणं भीत्ती फलकावर छायाचित्र प्रदर्शन करणं हे मॅडम कौतुकाने पाहत होत्या. एक चुणचुणीत, शरीर अंगकाठीने सडपातळ बांध्याचा मी सौ.के.एस.के. महाविद्यालयात आठच दिवसात प्रत्येकाच्या मनात घर केलं होतं. शिपाई पवार प्राध्यापक सहकारी मंडळी, प्राचार्य, उपप्राचार्य मला कधी तासिका तत्वावरचा आहे म्हणून समजत नव्हते. उपप्राचार्य जोगदंड सर आणि काही वरिष्ठ प्राध्यापक मंडळी त्यांच्या खर्चाने दर आषाढी कार्तिकेला मला पंढरपूरला घेऊन जात असत. पांडुरंगाच दर्शन झाल्यानंतर शाहीर ज्ञानोबा उत्पात यांच्या शाहिरी कवनाचा मनसोक्त आनंद माझ्या वरिष्ठांना माझ्यामुळे मिळायचा. त्यामुळे ती सगळीच मंडळी माझ्यावर खूप प्रेम करायची. सौ.के.एस.के. महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग रंगभूमीवर महाराष्ट्रभर आपल्या एकांकीच्या माध्यमातून दबदबा निर्माण करत होता. या महाविद्यालयाचा नावलौकिक पुरूषोत्तम बंडा आल्फा करंडक, पु.ल. देशपांडे एकांकिका महोत्सव सगळीकडे डॉ. सुधीर निकम लिखित एकांकिका 'धुमस' आणि 'उचल' यांनी केला होता. असाच एक प्रसंग तुळजापुरच्या राज्यस्तरीय एकांकिका महोत्सवात घडला. महाविद्यालयातर्फे रामनाथ चव्हाण लिखित 'तोलक' या दोन्ही एकांकिकांना नाव नोंदणी दिली. सुदैवाने किंवा दुर्दैवाने 'धुमस' या एकांकिकाला एकही पारितोषिक मिळाले नाही. तर 'तोलक' ही मी दिग्दर्शिका केलेली आणि अभिनय केलेली एकांकिका प्रथम श्रेणीत आली. सगळीकडे नावलौकिक मिळवलेल्या माझ्या विद्यार्थी कलावंत मित्रांना माझ्याबद्दल द्वेष निर्माण झाला. आणि मला त्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. दीपक नायर, लक्ष्मण बोरखेडे, जागृती वाघमारे हे माझे विद्यार्थी. गुरू शिष्य परंपरेनुसार कार्यरत मित्राच्या रोषाला सामोरे जात असताना विधानसभेच्या निवडणूक लागल्या. पाटील सरांवरती सांस्कृतिक प्रचाराची जबाबदारी होती.

त्यात आम्ही चौसाळा मतदार संघातील गावन्‌गाव पिंजून काढला. मा. शरदचंद्रजी पवार, ना. रामदासजी आठवले ना. लालूप्रसाद यादव, मा. अजितदादा पवार यांच्या मोठ मोठ्या सभांच्या अगोदर आम्ही प्रचारकी थाटाचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करू लागलो. त्याच दरम्यान बीड आणि सौ.के.एस.के. महाविद्यालयाचा महिमा सांगणारा छक्कड रूपी पोवाडा साकारला. माझ्या लिखाणातून बीडचे सांस्कृतिक वैभव मी श्रीमती केशरकाकू क्षीरसागर यांच्या समोर गाऊन दाखवलं. त्यांनी खुश होऊन आमच्या समूहाला वीस हजार रूपये बक्षीस दिले. त्यामुळे महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व बीड परिसरातील लोक मला ओळखायला लागले. बीडमध्ये मी खुप बरेवाईट दिवस काढले. पण माझे विद्यार्थी, मित्र, प्राध्यापकवर्ग आणि इतर सहकार्यांनी मला कधी डगमगू दिले नाही. डॉ. सुधीर निकम यांनी आपल्या खानावळी-मधून मी तिथे असेपर्यंत माझी भूक भागवली तर डॉ. देवळाणकरांनी मला मोठ्या भावाची उणीव भासू दिली नाही. आईसमान असणाऱ्या डॉ. दीपाताईंनी आईची उणीव भासू दिली नाही. २००३ ते २००५ पर्यंत मी सौ.के.एस.के. महाविद्यालयात कार्यरत होतो. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकॅडमीची जाहिरात आल्यानंतर स्वतः प्राचार्य दीपाताई क्षीरसागरांनी स्वतःचे पैसे देऊन मला मुलाखतीसाठी पाठवले. एखाद्या तासिका तत्त्वावरच्या प्राध्यापकांसाठी शिक्षण संस्थेच्या परिवाराने इतकं प्रेम देणे ही माझ्या मते महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात पहिलीच घटना असावी. आजही मी सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या परिवाराचा एक भाग आहे. बीडशी आजही माझी नाळ जोडलेली आहे. अशा सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त माझ्या व माझ्या चंदनशिवे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा !

प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे
विभाग प्रमुख, लोककला अकादमी
मुंबई विद्यापीठ


## १३. आत्मनिर्भर व आदर्श नागरिक घडवणारे ज्ञानकेंद्र : सौ.के.एस.के. महाविद्यालय

मी १९८५ ला माझ्या महाविद्यालयीन शिक्षणास सुरूवात केली, अर्थातच सौ.के.एस.के. महाविद्यालयातूनच. मी १९८७ ला १२ वी विज्ञानाची परीक्षा उत्तीर्ण झालो. माझ्या मनामध्ये उच्च शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा होती व त्या दृष्टीने मी मेडिकल किंवा इंजिनिअरींगला जाण्यासाठी खुप प्रयत्न केला परंतु मला जाता आले नाही. नंतर मी आपल्याच कॉलेजमधून बी.एस्सी. पूर्ण करण्याचा निर्धार केला व त्यानुसार मी नियोजन करत होतो. त्याचाच एक भाग मी बी.एस्सी. प्रथम वर्गात प्रवेश घेण्यासाठी महाविद्यालयात गेलो, तेव्हा वरिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण, उच्चशिक्षीत व अनुभवी प्राध्यापकवृंद आणि अतिशय कडक शिस्तप्रिय वातावरण मला पहावयास मिळाले हे पाहून मी भारावून गेलो. त्यावेळी महाविद्यालयाची इमारत लहानच होती. मी भीत-भीतच प्राचार्यांच्या कक्षात प्रवेश केला. त्यांना विनंती अर्ज केला की, मला बी.एस्सी. प्रथम वर्गाला प्रवेश हवा आहे. तेव्हा प्राचार्यांनी माझे सर्व कागदपत्रे पाहून मला सांगितले की तुम्हाला प्रवेश मिळणार नाही, कारण आमच्या महाविद्यालयातील सर्व प्रवेश क्षमता पूर्ण झाली आहे. हे ऐकल्यावर मी गर्भगळीतच झालो. मला काय करावे सुचत नव्हते मी खिन्न व उदास होवून तसाच रडत-रडत आदरणीय गुरू आणि सध्या संस्थेचे प्रशासक पद यशस्वीपणे सांभाळणारे प्रा.डॉ. राजुजी मचाले सरांच्या घरी जाऊन त्यांना सर्व हकिगत सांगितली. त्यांनी मला प्रेमाने जवळ घेतले व शांत केले. मला पाणी चहा व पोहे दिले आणि सांगितले नाष्टा करून घे, मी तुझ्या प्रवेशाबाबत प्राचार्यांना बोलतो.

मग ते स्वतः माझ्याबरोबर प्राचार्यांकडे आले व सरांना सांगून माझ्या बी.एस्सी. प्रथम वर्षाला प्रवेश निश्चित केला आणि माझा जीव भांड्यात पडला. मला मनस्वी आनंद झाला. खऱ्या अर्थाने माझ्या आत्मनिर्भर आदर्श व जबाबदार नागरिक होण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले मग मी मनामध्ये ठरवले की, आपणास ही संधी मिळालेली आहे त्या संधीचे सोनं करायचे, त्यासाठी आपणास खूप अभ्यास व मेहनत करून जीवनामध्ये एक आदर्श आत्मनिर्भर आणि जबाबदार नागरिक बनायचे आहे.

त्यावेळेचे शैक्षणिक वातावरण खुपच प्रेरणा देणारे होते. महाविद्यालयाचा परिसर पूर्ण क्षमतेने विद्यार्थी-विद्यार्थीनींनी गजबजलेला आसायचा. ग्रामीण भागातील मुले मोठ्या संख्येने शिक्षणासाठी शहरात येत असत व आपापले करियर घडवण्यासाठी प्रयत्न करत होते. आमच्या शैक्षणिक संकुलाच्या आधारवड असलेल्या व वंचित समुहांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्दात्त हेतूने या शैक्षणिक संकुलाची पायाभरणी केलेल्या व खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यात शैक्षणिक चळवळ उभी करून "ज्ञानगंगा घरोघरी" ही संकल्पना राबवणाऱ्या स्व. काकू होत्या. अर्थातच त्यांना आदरणीय गोविंदराव मचाले ऊर्फ सर्वांचे मचाले मामा यांची साथ होती. आज हे शैक्षणिक संकुल माजी मंत्री आदरणीय जयदत्त आण्णा क्षीरसागर, बीड नगरीचे नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या कुशल प्रेरणेने डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगती करत आहे. मी महाविद्यालयात शिकत असताना माझ्या सर्व गुरूजनांचे अर्थात काझी सर, खान सर, वाघमारे सर, शास्त्री सर, केंद्रे सर, चिडगोपकर सर, भताने सर, सोनार सर, नाईकवाडे सर, तसेच सर्वांचे मला मोलाचे मार्गदर्शन मिळत गेले. त्यामुळेच मी बी.एस्सी. तृतीय वर्षात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होवून पुढील शिक्षणासाठी मराठवाड्याचे शैक्षणिक केंद्र असलेले औरंगाबाद शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ एम.एस्सी. फिजिक्सला प्रवेश घेतला आणि विद्यापीठामध्ये एम.एस्सी. व्दितीय वर्षामध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो. महाविद्यालयीन जीवनात माझ्यावर झालेले संस्कार व गुरूजनांचे मोलाचे मार्गदर्शन व आशीर्वाद तसेच माझ्या मनामध्ये उच्च शिक्षणाचे आकर्षण या सर्व बाबींमुळे मी आज जीवनात यशस्वी झालो, ते केवळ सौ.के.एस.के. महाविद्यालयामुळेच. मी आज बीड शहरातील नामांकित महाविद्यालयापैकी एक असलेले मिल्लीया वरिष्ठ महाविद्यालयात उप-प्राचार्य आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. माझ्यासारखे असे असंख्य विद्यार्थी या महाविद्यालयाने घडवले आहेत व ते सर्वजण आत्मनिर्भर व जबाबदार नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडत आहेत. शेवटी मी एवढेच म्हणेल की,या महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती दिवसेंदिवस होत राहो व भविष्यात विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत राहो.

डॉ.हुसैनी स.शौकतुल्ला स.अजमतुल्ला
उपप्राचार्य तथा संशोधन मार्गदर्शक
मिल्लिया महाविद्यालय, बीड



# १४. नाट्यशास्त्राच्या कोपऱ्यातून...

सन २००४...!

संपूर्ण महाराष्ट्रात एकांकिका स्पर्धेच लोण पसरलेलं होतं... पण यात सगळ्यात मानाची स्पर्धा झाली होती ती म्हणजे अल्फा महाकरंडक...(आताचे झी मराठी त्यावेळी अल्फा मराठी होते...) स्पर्धेचे तिसरे वर्ष...पहिल्या वर्षी नाट्यशास्त्र विभागाने सर्व पारितोषिके घेऊन अंतिमला धडक मारलेली...पण दुसऱ्या वर्षी तिसरं पारितोषिक मिळाल्याने अंतिमला जाता आले नाही...ती धग मनात ठेऊन कामाला सुरूवात झाली... मागच्या दोन वर्षात डॉ. सुधीर निकम सरांनी लिहीलेल्या 'उचल' एकांकिकेचा दबदबा महाराष्ट्रातील सगळ्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत निर्माण झालेला होता...आता तिसऱ्या वर्षी बीडची कोणती एकांकिका अल्फा करंडक ला येणार याची उत्सुकता सगळ्यांनाच होती...आणि खास करून औरंगाबादच्या महाविद्यालयांना...कारण बीडचे ते आघाडीचे प्रतिस्पर्धी झालेले होते...बघता बघता तारीख आली...स्पर्धेची तयारी सुरू झाली...डॉ. संजय पाटील देवळाणकर सर (नाट्यशास्त्र विभागप्रमुख) आणि डॉ. सुधीर निकम यांच्यात एकांकिका वर चर्चा सुरू झाली...आणि झालं फायनल...यावर्षी विभागाकडून करायची ती एकांकिका 'धुमस'...डॉ. सुधीर निकम यांनी एकांकिकेचे वाचन केले आणि एकांकिकेत लीड कोण करणार यावर चर्चा सुरू झाली. मतमतांतरे झाली...हा एक्टर नको, तो नको...याला नाही जमणार, त्याला रोल नाही पेलणार...काय करायचं ? वेळ कमी राहीला होता...आणि विभागातून कुंदन जोगदंड नावाचा मित्र संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास माझ्या घरी आला...

ज्यावेळी उचल चा दबदबा सुरू होता त्यावेळी मी देखील माझ्या पाच सहा मित्रांना घेऊन स्पर्धा करत फिरत होतो...स्पर्धेत विभाग पण प्रतिस्पर्धी असायचा...पण एकांकिका करायची याच विचाराने आम्ही बेफाम झालेलो होतो...पाटील सर, निकम सर यांची चांगलीच ओळख होती. पण स्पर्धेच्या वेळी मी फार काही त्यांच्या जवळ जायचो नाही...स्पर्धा संपली की आम्ही परत एकत्र...मात्र एकदा तरी मी स्पर्धेत नाट्यशास्त्र विभागाला मागे टाकून सगळे पारितोषिक घेणार याच विचाराने मी काम करत राहिलो. कुंदन मला घरातून बाहेर घेऊन कॉलेज समोरील हॉटेलवर आला. आमचा तो अड्डाच होता...कुंदन ने मला विभागातील परिस्थिती सांगितली...मी एकांकिकेत काम करायला नकार दिला...नाही, हो, वाद-विवाद सुरू असताना डॉ. निकम सर आले आणि, "तुच रोल करणार" हे हक्काने सांगून निघून गेले...तालमिला सुरूवात झाली... माझी कास्टींग चुकीची आहे, हे डिपार्टमेंटच्या माजी प्राध्यापकाने ठणकावून सांगितले...मात्र त्याकडे मी दूर्लक्ष करत तालीम करत राहिलो...या दरम्यान आम्हाला कशाचीही कमतरता पडू नये म्हणून विशेष काळजी घेतली जात होती...बघता बघता स्पर्धेचा दिवस उजाडला...औरंगाबाद ला टिम आली...प्रयोग झाला...बक्षीस वितरणाला सुरूवात झाली...सगळी बक्षिसं धुमस एकांकिकेला मिळायला सुरूवात झाली आणि प्रेक्षागृहातून डॉ. सुधीर निकम सरांनी आरोळी ठोकली...कलाकारांचा बालेकिल्ला, बीड जिल्हा बीड जिल्हा...

सुरू झाली विभागातील कारकीर्द...मुंबई, औरंगाबाद, बार्शी, अकलूज, सोलापूर, हिंगोली, तूळजापुर, अहमदनगर अशा महाराष्ट्रातील एकांकिका स्पर्धेत धुमस, लिपण, एक एप्रिल या एकांकिकांनी धुमाकूळ घातला...के.एस.के. कॉलेजची एकांकिका म्हटलं की, नाट्यगृहाच्या बाहेर चर्चा होत असायची... "गेलं आपलं पहिलं बक्षीस..." २००४ ते २००८ ही पाच वर्षे भारावल्यासारखं काम करत होतो...तालमीला विभागाची कायम शिस्त असायची...ठरलेल्या वेळेला सगळे तालमीला हजर... आगदी लाईट, सेट, म्युझिक सहीत...चूक होणार नाही कायम दक्षता घेतली जायची...नाटकाच्या अनुषंगाने कसलीही रिक्वायरमेंट असो, पाटील सर ते पूर्ण करणार म्हणजे करणारच...एकदा विभागात नाटकाची तालीम सुरू होती...कॉलेजमधील काही मुलंमुली तालीम पाहायला विभागात आले. बरं तालमीला कमालीची शांतता असायची.. मुलामुलींची दबक्या आवाजात चर्चा सुरू झाली...त्यांना दोन तीन वेळा शांत रहा म्हणून सांगितले, मात्र त्यांची चर्चा सुरूच...काहीतरी झाले आणि एक मुलगी जोरात हसली...

आणि मी रागात शिव्या देऊन विभागाच्या बाहेर पडलो. ही गोष्ट ज्यावेळी पाटील सरांना कळाली आणि त्या दिवसापासून बाहेरची कोणतीही व्यक्ती विभागात तालमीला येणं बंद झालं...

मी विभागात नाटक करत होतो त्यावेळी कॉलेजच्या प्राचार्या होत्या डॉ. दीपाताई क्षीरसागर मॅडम...मुळचीच नाटकाची आवड असलेल्या मॅडमचे विशेष लक्ष विभागावर होते...विभागात काय सुरू आहे, काय नाही याची जातीने चौकशी त्या करत असत...एकदा कॉलेजमध्ये काय सुरू आहे याची पाहणी करण्यासाठी त्या निघाल्या...आमची तालीम सुरू होती...विभागाचा दरवाजा बंद होता...आमच्या तालमीचा आवाज बाहेरपर्यंत येत होता...त्यांचे पाय विभागाच्या जवळ थबकले...सोबतच्या स्टाफमधील एक-जण दरवाजा उघडायला समोर आला आणि मॅडमने त्यांना थांबवले...तालीम सुरू आहे...आता नको...नंतर प्रयोग पाहू...आणि असं बोलून त्या पुढे निघून गेल्या...आम्ही स्पर्धेला निघालो की कायम मॅडमचे फोन असायचे...व्यवस्थित जा...मुलांनी काही खाल्लय का ?...किती वाजता होणार आपला प्रयोग ?...सर्वांना शुभेच्छा...बरं दुसऱ्या दिवशी ट्रॉफी घेऊन कॉलेजमध्ये आल्यावर काल रात्री किती वाजता पोहचलात ? इतकी आस्थेवाईक चौकशी असायची त्यांची...

अहमदनगरची महापौर करंडक करून आम्ही पहाटे बीडला पोहचलो...नेहमीप्रमाणे पारितोषिक भेटलेलेच...५२ एकांकिकेतून विभागाची एकांकिका दुसरी आलेली...सुंदर नटराजाची मुर्ती स्मृतिचिन्ह म्हणून होती...पहाटे पोहचल्या-मुळे मी घरी येऊन झोपी गेलो आणि आईला सांगून ठेवले कोणाचाही फोन आला तरी मला उठवू नको...११ वाजेच्या दरम्यान सगळी टीम कॉलेजला पोहचली...स्मृतिचिन्ह घेऊन मॅडमच्या कॅबीनला जायचे होते...आणि नंतर सर्वांच्यासोबत फोटोशन होणार होते...मी आलेलो नाही हे पाहून पाटील सरांनी घरी फोन करायला सुरूवात केली...दोन तीन फोन येऊन गेल्यावर आई वैतागली...माझ्यावर रागावली...मी म्हणालो जाऊ दे...इकडे बराच वेळ झाला. कलाकार कॅबीनला येणार होते ते का आले नाही म्हणून कॅबीनमधून विचारणा करण्यात आली...शेवटी पाटील सर सर्व मुलांना घेऊन कॅबीनमध्ये आले. स्पर्धेचा वृत्तांत मॅडमला सांगण्यात आला...या चर्चेदरम्यान मॅडम वारंवार मुलांकडे पहात होत्या...शेवटी टीमसोबत फोटो काढायची वेळ आली... मॅडमनी विचारले महेंद्र कुठंय ?...पाटील सरांनी वेळ मारून नेली...मॅडम म्हणाल्या, नाटकाचा हिरोच नाही...तो आल्यावर फोटो काढूयात...दुसऱ्या दिवशी मी आल्यावर फोटो काढण्यात आले...

एकदा असंच झालं...उन्हाळ्याचे दिवस होते... महाविद्यालयाच्या परीक्षा संपलेल्या...तुळजापुरची भवानी करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची तारीख आलेली... ठरलं स्पर्धेत इंट्री करायची...एकांकिका होती योगेश सोमण लिखीत एक एप्रिल...पाटील सरांनी इंट्री पाठवून दिली आणि कामानिमित्ताने गावाकडे जायला निघाले...जाताना मी म्हटलं लेखकाच्या परवानगी पत्राचं काय करायचं ?... ते म्हणाले, संयोजकांनी लेखकाचे परवानगी पत्र विचारले तर मला फोन करा...मी बोलतो...तुम्ही तालमी करून स्पर्धा करून या...झालं सर गावी गेले...आमच्या तालमी सुरु झाल्या. प्रयोगाचा दिवस जवळ आला...शेवटच्या दिवशी विभागाची एकांकिका होती...एक दिवस अगोदरच कुंदन स्पर्धा पाहण्यासाठी तुळजापूरला गेला...तिथं मात्र वेगळचं घडलं...तिथं खुद्द लेखक योगेश सोमण यांची टीम एक एप्रिल एकांकिका घेऊन आलेले...त्यांना समजले की, बीडच्या नाट्यशास्त्र विभागाने लेखकाची परवानगी नसताना स्पर्धेत इंट्री टाकलीय...त्यांनी ऑब्जेक्शन घेतलं...वेळ रात्री आठ वाजेची...आमची तालीम सुरु होती...ती झाल्या वर आम्ही उद्या प्रयोगाला निघण्याची तयारी करणार होतो.. तालीम संपायला नऊ वाजले...कुंदनचे खूप सारे फोन येऊन गेलेले होते...त्याला फोन केला. त्यानं उद्या आपली एकांकिका होणार नाही हे सांगितलं कारण होतं, पाटील सरांनी लेखकाची परवानगी काढलेली नव्हती आणि आता त्यांचा फोन बंद येत होता...पाटील सरांचा प्रचंड राग आला...पण आता काही उपयोग नव्हता...कुंदन वारंवार फोन करत होता...कसलाच मार्ग निघत नव्हता...शेवटी कुंदन ने फोन वर सांगितले, आता एकच पर्याय प्राचार्य डॉ. दीपाताई मॅडम क्षीरसागर यांच्या घरी जाऊन सगळी परिस्थिती सांगने आणि त्यांना संयोजन समितीला फोन करायला लावणे...कुंदने सांगितलं खरं पण रात्री दहा वाजता मॅडमच्या घरी जाणार कसं ?...फुल टेंशन...काहीही झालं तरी एकांकिका मात्र करायची...काय करावं ?

शेवटी ठरलं मॅडमकडे जायचं...साडे दहा वाजले होते.. सगळी टीम विभागात होती. सामानाची उरलेली आवरा आवर करायला सांगून मी आणि लक्ष्मीकांत दोडके मॅडमकडे जायला निघालो...बंगल्याजवळ पोहचलो...मनात प्रचंड भीती होती...आता जाणार तोच कुंदनचा फोन आला... संयोजकांनी एकांकिकेसाठी परवानगी दिलेली होती...आनंदात वापस फिरलो...दुसऱ्या दिवशी स्पर्धेला जाऊन पहिलं पारितोषिक घेऊन आलो...ही गोष्ट मॅडमला माहित झाली का नाही, हे मला माहित नाही मात्र आठवली की हसायला येतं...

सौ.के.एस.के. नाट्यशास्त्र विभागातून खूप मूलं अभिनेता, दिग्दर्शक म्हणून आज मराठी, हिंदी फिल्म सिरियलमध्ये काम करताना दिसतात...सुहास सिरसाट, अशोक केंद्रे, बाबा केंद्रे, सोनी जाधव, प्रविण वडमारे, लक्ष्मीकांत दोडके, रणजीत वाघमारे, अशी किती तरी मोठी यादी सांगता येईल...या सगळ्यांना डिपार्टमेंटचा सहवास लाभलेला आहे...आजही भेट झाल्यावर नाट्यशास्त्र विभागाचा विषय हमखास निघतो...तासन्तास जुन्या आठवणींना उजाळा देत आम्ही सर्वजण उजाळा देत बसत असतो...

मी २००४ ते २००९ या पाच वर्षाच्या कालावधीत विभागात काम करत होतो...या पाच वर्षाच्या काळात विभागातून खूप साऱ्या एकांकिका स्पर्धा केल्या...खूप चांगले अनुभव आले...याच काळात मी मुंबईला स्ट्रगलसाठी गेलो...परंतु काही तांत्रिक कारणांमुळे परत आलो...नंतर वेळ मिळेल तसा विभागात येऊन बसायचो...मुलांच्या तालमी सुरूच असायच्या...पाटील सर अग्रहाने तालमीत बसवायचे...नवीन मुलांना मार्गदर्शन करायला सांगायचे... नंतर नंतर विभागात येणे बंद झाले...फक्त कधीतरी पाटील सरांची भेट व्हायला लागली...ते त्यांच्या कामात आम्ही आमच्या कामात...मात्र माझं सध्या काय सुरूय याची सगळी माहिती आजही पाटील सरांना आहेच...सरांना फोन आला कॉलेजला ५० वर्ष पूर्ण झाले आहेत...तुझ्या काही आठवणी लिहून दे...आणि हा सगळा प्रपंच मांडण्यात आला...जुन्या आठवणी ताज्या झाल्या... महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवासाठी आभाळभर शुभेच्छा...

महेंद्र खिल्लारे, बीड

## १५. सौ.के.एस.के. महाविद्यालयाने मला कवी, सामाजिक कार्यकर्ता व राजकीय नेता बनवले!

मी प्रा. ज्ञानेश्वर दशरथ राऊत 'शब्दप्रभू' ऊर्फ (अण्णासाहेब) के.एस.के. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी. या के.एस.के. महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत असताना मला खूप अनुभव मिळाले. तसा तर मी के.एस.के. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेत विद्यार्थी होतो. परंतु के.एस.के.महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील सर्व विभागाचा मी आवडता विद्यार्थी होतो. त्याबरोबरच एन.एस.एस. व एन.सी.सी. या विभागाशी माझी खूप जवळीकता होती. कला शाखेच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागात मला खूप मोठी संधी मिळाली. उर्दू, हिंदी व मराठी विभागानेही मला कधी परकं समजलं नाही. महाविद्यालयातील प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर, गुळवे मॅडम, शाकेर सर, गुट्टे सर, संजय पाटील देवळाणकर, दुष्यंता रामटेके मॅडम, अनिता शिंदे मॅडम, सय्यद मॅडम, लामतुरे सर, पोटे सर, शरद पवार सर,हमराज उईके सर, तळेकर सर, शंकर राऊत सर, प्रशांत पाटील सर, दोन्ही काळे सर, कांबळे सर व इतर या सर्वांनी मला सातत्याने खूप मार्गदर्शन व सहकार्य केले. के.एस.के. महाविद्यालयातील शिस्त, संस्कार व सेवाभाव या सर्व बाबींचे बाळकडू मला महाविद्यालयीन जीवनात मिळाले. त्याच जोरावर मी आज शिक्षण साहित्य, समाजकारण, राजकारण या क्षेत्रात खूप मोठे नाव करू शकलो. खऱ्या अर्थाने शिक्षण कशाला म्हणायचे हे मला के.एस.के. महाविद्यालयातून कळाले. महाविद्यालयातील विविध उपक्रमातून मला या सर्व बाबींचा अनुभव आणि त्याची प्रचिती मला आता येत आहे.

के.एस.के. महाविद्यालयासारखी महाविद्यालयं असणं आज खरी काळाची गरज आहे. कोरोनासारख्या महामारीच्या काळात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना या सर्व बाबींना वंचित रहावे लागते, ही फार मोठी शोकांतिका आहे. के.एस.के. महाविद्यालयाच्या गेटवरती लिहिलेलं come to learn, go to serve हे वाक्य मला आजही प्रेरणा देत आहे कारण के.एस.के. महाविद्यालयात शिकत असताना मी एन.एस.एस. राष्ट्रीय सेवा योजना या विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कार्य करत होतो. माझ्यातील

समाजसेवी वृत्ती ओळखून गुट्टे सरांनी व हमराज उईके सरांनी मला विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी दिली. यामुळेच आज मी सामाजिक, शिक्षण, राजकारण, आणि साहित्यक्षेत्रात चांगल्या पद्धतीने कार्य करत आहे. आज मी कवी, शायर, वात्रटिकाकार आहे. आम आदमी पार्टी या राजकीय पक्षात जिल्ह्यात संघटनमंत्री म्हणून संघटन बांधण्याचं काम करतो. स्वतः एक शिक्षण संस्था चालवतो. त्या माध्यमातून गरीब, अनाथ, बालकामगार, विधवा अपत्य आणि आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देण्याचे काम करतो.

माझ्या गावी आजही आठवतं महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या उर्दू कवी संमेलन व मुशायऱ्यात मी मोठ्या कवीला लाजवेल अशा कविता सादर केल्या होत्या. त्यावर स्वतः दीपाताई क्षीरसागर यांनी माझ्या पाठीवर थाप टाकली होती आणि सांगितलं होतं की, भविष्यात तू नक्कीच मोठा होशील, त्याची प्रचिती आज मला आली. आज माझा 'मित्र हो..!' हा काव्यसंग्रह सर्वश्रुत व प्रसिद्ध झाला आहे. माझ्या वात्रटिका वर्तमानपत्रामध्ये छापून येतात. असंख्य शाळा महाविद्यालयात माझ्या कवितेचे सादरीकरण करण्यासाठी मला निमंत्रणं मिळतात. त्याचबरोबर वेगवेगळया सामाजिक उपक्रमात जसे की, स्वच्छता शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे वेगवेगळे सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार वितरण कार्यक्रम, गरीब व गरजू लोकांना विविध वस्तुंचे वाटप इतर उपक्रम मी 'मातृभूमी' आदर्श सामाजिक प्रकल्पाच्या माध्यमातून राबवत असतो.

आम आदमी पार्टी या राजकीय पक्षाच्या माध्यमातून सामाजिक समस्यांवर मोर्चे, आंदोलने, करून मी सामाजिक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करतो. अशा पद्धतीने माझ्यातील सामाजिक कार्यकर्ता, राजकीय नेता, कवी, शायर व वक्ता मला शोधून देण्यात के.एस.के. महाविद्यालयाचा फार मोठा वाटा आहे. मला या महाविद्यालयाने जे दिलं ते जीवनभर विसरण्यासारखं नाही.पुन्हा एकदा प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व इतर सर्व कर्मचारीवर्ग व माझे सर्व मित्रमैत्रिणी यांचे मनस्वी आभार मानतो आणि भविष्यातही माझ्यावर तुम्हा सर्वांची कृपादृष्टी व शुभेच्छा असोत अशी अपेक्षा करतो आणि माझे मनोगत थांबवतो धन्यवाद...!

**प्रा. ज्ञानेश्वर (अण्णा) राऊत**

# १६. माझे महाविद्यालय

मी प्रा. शंकर रंगनाथ राऊत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फकाकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी व सध्या याच महाविद्यालया मध्ये गणित विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहे. या महाविद्यालयामध्ये मी १९९७ या वर्षी बी.एस्सी. साठी प्रवेश घेतला. हे महाविद्यालय निवडण्याचे कारण म्हणजे येथील निसर्गरम्य वातावरण होय. या महाविद्यालयामध्ये मी १९९७ ते २००० या काळात विद्यार्थी म्हणून पदवीचे शिक्षण घेत असताना मला खूप काही गोष्टी शिकायला मिळाल्या. तसा तर मी त्यावेळी उच्च शिक्षण घेण्यासाठी बीडमध्ये प्रथमच आलो होतो. सुरूवातीपासून मला गणित विषयाची आवड असल्यामुळे गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय घेऊन मी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. माझी परिस्थिती हलाखीची असल्यामुळे काहीतरी काम करून शिक्षण घेण्यासाठी मी येथे आलो होतो. या महाविद्यालयात ग्रामीण भागातून आलेले विद्यार्थी जास्त असल्यामुळे महाविद्यालय आपलसं वाटू लागलं.

बी.एस्सी.च्या तीन वर्षातील कार्यकाळात शिक्षण घेत असताना मला सर्व विषयातील ज्ञानी प्राध्यापकांचा सहवास लाभला. ज्यांच्यामुळे मी घडलो त्यामध्ये गणित विषयाचे प्रा. सोनार सर, प्रा. भताने सर, प्रा. ढवळे सर, भौतिकशास्त्र विषयाचे प्रा. चिडगोपकर सर, केंद्रे सर रयासनशास्त्र विषयाचे प्रा. तोष्णीवाल सर, धारासूरकर सर नाईकवाडे सर, यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर मी भाषाज्ञान घेणे सोडले नाही. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी शिकवलेल्या कविता, डॉ. हेमलता पाटील यांचे मराठीचे खडेबोल आजही आठवतात व खाडे सर यांचे इंग्रजीचे फोनोटिक्स महत्वाचेच वाटले.या महाविद्यालयात शिक्षण घेत असताना मला पुस्तकी ज्ञानाबरोबरच शिस्त, संस्कार, सेवाभाव या सर्व बाबींचे बाळकडू मला महाविद्यालयीन जीवनात मिळाले. महाविद्यालयातील विविध उपक्रमातून या सर्व बाबींचा अनुभव आणि त्याची प्रचिती मला आज येत आहे.

काम करून शिक्षण घेत असताना मी कधी कोणत्या विषयाचा तास, प्रात्यक्षिक करणे सोडले नाही. त्यामुळेच

मला बी.एस्सी.मधून सर्व द्वितीय येण्याचा मान मिळाला. त्यावेळी प्रत्येक वर्षी प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्याची परंपरा होती. म्हणूनच मला त्याकाळचे कुलगुरू डॉ. के.पी. सोनवणे यांच्या हस्ते १५ ऑगस्ट २००१ ला टायटनचे भिंतीवरील घड्याळ बक्षीस म्हणून मिळाले होते. आपुलकी जिव्हाळा देणारे प्राध्यापक मला या महाविद्यालयात मिळाले. २००० नंतर मी पुढील शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे घेतले. माझं भाग्य समजतो ज्या महाविद्यालयांमध्ये मी शिक्षण घेतले त्याच महाविद्यालयामध्ये गणित विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवा करण्याची संधी मला स्वर्गीय काकू, मा. अण्णा व संस्थेचे सचिव मा. डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी दिली. त्याबद्दल मी त्यांचा शतशः आभारी आहे. १३ नोव्हेंबर २००३ रोजी मी या महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून रूजू झालो. त्यामुळे माझी या महाविद्यालयाशी असलेली नाळ कधीच तुटली नाही. विद्यार्थी जीवनापासून ते आजपर्यंत मी या महाविद्यालयाची प्रगती पाहत आलो आहे.

आज आठवतं प्राचार्य डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर या त्यांच्या भाषणात नेहमी म्हणत असत.

*इवलेसे रोप लावियेले द्वारी ।*
*त्याचा वेलू गेला गगणावरी ।।*

आज आपण महाविद्यालयाने ती उंची गाठलेली आहे हे वास्तवात पाहतो आहोत. याचे सर्व श्रेय कार्यकुशल, उत्तम प्रशासक मार्गदर्शक, साहित्यिक असणाऱ्या माननीय प्राचार्य डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांना जाते. या महाविद्यालयाने विद्यार्थी जीवनात जे दिलं ते मी कधीच विसरणार नाही. या महाविद्यालयाने मला सहाय्यक प्राध्यापक म्हणून येथे काम करण्याची संधी दिली त्या संधीचं सोनं मी नक्कीच करेल याची खात्री देतो आणि थांबतो.

प्रा. शंकर राऊत

## १७.माझ्या आठवणीतील महाविद्यालय

खरं तर सुरूवात कुठून करू हेच कळत नाही. सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर या महाविद्यालयाची मी माजी विद्यार्थीनी आहे. सन २०१७ मध्ये मी या महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि तेथूनच माझ्या व्यक्तीमत्व जडणघडणीला सुरूवात झाली. भाषणशैली, वाद-विवाद, वर्क्तृत्व, रांगोळी इ. विविध गुणांचा विकास माझ्यामध्ये झाला. नेतृत्वगुण, सर्व गोष्टींचे प्रमाणशीर व्यवस्थापन इ. गोष्टी मला महाविद्यालयात असताना शिकता आल्या.

Microbiology माझा आवडता विषय. डॉ. सौ. रेखा गुळवे मॅडम, डॉ. शाकीर सर, लोंडे मॅडम यांनी या विषयामध्ये आमची रूची निर्माण केली. विषयाची आणि विद्यार्थ्यांची आवड निर्माण करण्याचं काम त्यांनी केलं. गुळवे मॅडम यांनी आम्हा विद्यार्थ्यांचं विश्वच बदलून टाकलं. मुलींना नेहमीच आत्मनिर्भर बनायला त्यांनी शिकवलं. International Conference मध्ये कसं बोलायचं, स्वतःचे विचार कसे मांडायचे याचं मार्गदर्शन त्यांनी आम्हाला केलं आणि म्हणूनच Microbiology Poster Competition मध्ये राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक आम्हाला मिळालं हा एक अविस्मरणीय क्षणच आहे.

महाविद्यालयामुळे माझ्या सर्वांगिण विकासाला चालना मिळाली. माझ्या व्यक्तीमत्वावर डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांचा फार मोठा प्रभाव आहे. प्राचार्या या नात्याने त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना सतत नवनवीन सोयी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्र, ग्रंथालय E-Books नवनवीन कल्पना मांडण्यात, प्रत्यक्षात उतरवण्याचं काम त्यांनी केलं. विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या ठिकाणाहून मान्यवर लोकांना बोलावलं. आमच्यासाठी Guest lecture ठेवले आणि त्याचा सखोल परिणाम आमच्या जीवनावर झाला.

आयुष्य कसं हसत जगावं, ज्ञान सर्वश्रेष्ठ,कोणत्याही संकटाला हसत कसं सामोरे जायचं आणि मराठी साहित्याचा आस्वाद घेणं हे आम्हाला डॉ.सौ. दीपाताई यांच्यामुळे जमलं. आम्हा विद्यार्थ्यांचं खूप मोठ भाग्य म्हणावं लागेल की, आदरणीय डॉ. दीपाताई क्षीरसागर यांचा सहवास आम्हाला लाभला आणि आयुष्याला मोठी दिशा मिळाली. मुलींसाठी खास मार्शल आर्टच प्रशिक्षण त्यांनी आयोजित केल आणि आज त्यामुळे जगाच्या पाठीवर कुठेही आम्ही खंबीरपणे प्रवास करू शकतो.

डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी Physics मधील

बारकावे आम्हाला शिकवले. शास्त्रीसरांनी नेहमीच प्रोत्साहन देण्याचं काम केलं. डॉ. म्हैसमाळकर मॅडम, अत्यंत हुशार, हजरजबाबी, सर्वगुणसंपन्न, मनमिळावू आणि Physics विषय अत्यंत रस घेवून शिकवणाऱ्या मॅडम आम्हाला मिळाल्या आणि त्यांच्या या व्यक्तीमत्वाचा माझ्यावर खरचं सखोल परिणाम झाला असं मी म्हणेन.

NSS मध्ये मी प्रवेश घेतला तेव्हा खाकरे सर, डॉ.सौ. अनिता शिंदे मॅडम यांनी आम्हाला मोलाचे मार्गदर्शन केलं. Microbiology Department चा रक्त तपासणी कॅम्प ही एक अविस्मरणीय गोष्ट आहे. महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षामध्ये आमची सहल आयोजित करण्यात आली होती. यावेळी सहलीमध्ये गायकवाड सर, डॉ. शेळके सर, तळेकर सर व उपस्थित सर्व शिक्षकवृंद यांनी मोलाची जबाबदारी पार पाडली. विद्यार्थ्यांचं जेवण,प्रवास सर्व गोष्टी सोयीच्या होतील याची काळजी त्यांनी घेतली. Botanical garden, zoology park research centre या स्थळांना भेटी देऊन त्यांनी आम्हाला संबंधीत विषयाबद्दल मार्गदर्शन केले. Microbiology Department ने आयोजित केलेली Civil Hospital ची भेट ही सुद्धा एक अविस्मरणीय गोष्ट आहे. आमचे zoology चे प्रा. डॉ. पाटील सर यांनी fishery science मध्ये विशेष आवड निर्माण केली. त्यामुळे खरंच seafood industry उभी करावी असं वाटायला लागलं. lecture ला वेळेवर येण्याचं नेहमीच त्यांनी मला आवाहन केले आणि वेळेचे महत्व त्यामुळे मला समजलं.

इंग्रजी विषयाचे प्रा.डॉ. शिंदे सर यांनी आम्हाला इंग्रजी विषय खूप सोपा करून शिकवला. तसेच जीवनाचे धडे सुद्धा त्यांनी आम्हाला दिले. खान सरांनी writing skill, grammer या गोष्टी खूप चांगल्या करून घेतल्या. English Pronounciati साठी वेगवेगळे Programs, online quidance English विभागाने आमच्यासाठी आयोजित केले. मराठीचे प्रा. कटारे सर यांनी आम्हाला वाचनासाठी प्रोत्साहन दिले आणि त्यामुळेच महाविद्यालयीन जीवनात कोसला, युगंधर, छावा, मृत्यूजंय इ. कादंबरी मी वाचून काढल्या. नाटक या विषयामध्ये आवड निर्माण करण्याचं काम पाटील सरांनी केलं. त्याच्यामुळेच मला विद्यापीठाच्या स्नेहसंमेलनामध्ये भाषण करण्याची संधी मिळाली. विविध मोठ्या वक्त्यांचे भाषण त्यावेळी ऐकायला भेटले. हे सुद्धा काही अविस्मरणीय क्षण होते. महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनामध्ये आमच्यासाठी विविध Games, गंमत-जंमत Projects, Poster किल्ले, रांगोळी या गोष्टी आयोजित केल्या होत्या हे क्षण अविस्मरणीय आहेत.

मला सतत मार्गदर्शन करणाऱ्या डॉ.सौ. अनिता वैद्य यांचा माझ्या जीवनात मोलाचा वाटा आहे. माउलगे सरांमुळे माझी Imagination Skill develop झाली. Chemistry मध्ये आवड निर्माण झाली. डॉ. पोटे सरांनी मानवी भूगोलाचे विशेष lecture आम्हाला दिले. त्यामुळे आज वीज, पाणी, रस्ते, पाटबंधारे, असे एक ना अनेक मानव उपयोगी साधनं कशी निर्माण करता येतील असा विचार मनामध्ये येतो. डॉ.सौ.अनिता शिंदे मॅडम यांनी मनसोक्त आयुष्य कसं जगायचं हे शिकवलं. चूकसुद्धा प्रेमाने कशी समजावून सांगायची याचे कौशल्य प्राचार्य मॅडमकडून शिकायला भेटलं. गृहशास्त्र विभागातील मॅडमनी पाककृतीतील बारकावे सांगितले आणि त्यामुळे आज शिक्षणासाठी बाहेर असताना स्वतः जेवण बनवून खाऊ शकते. महाविद्यालयातील माझ्या सर्व मित्र-मैत्रिणींचा सुद्धा माझा आयुष्यात महत्वाचा वाटा आहे.

एकंदरीत महाविद्यालयातील सर्वच शिक्षकवृंद कर्मचारी आजी-माजी विद्यार्थी, प्रमुख पाहुणे, सर्वांचा माझ्या जीवनात मोलाचा वाटा आहे. आज लेख लिहिण्यातून सर्व आठवणी पुन्हा आठवल्या आणि या आठवणींने मन प्रसन्न झाले शेवटी एवढंच म्हणावसं वाटतं की,

*बित गये वो कॉलेज के दिन जब हम रात रात assinments और projects बनाते थे किताबे तो Exams के एक रात पहले ही खुलती थी फिर syllabus पुछना Importtant charpters और फिर Imp. questions पर आके रूकते थे, Mark की तो कोई Tension ही नही रहती थी बस पास होना बनता था..*

*Presentation देते टाइम तो Class के सामने कितनी हालत खराब होती थी, टॉपिक के बारे मे समझाने से ज्यादा Standup Comedy लगती थी. Teachers की दिल से बहूत इज्जत करते थे इसलिये viva के time पर ज्यादा तर मौन व्रत होता था, Assigment भी अखिरी दिन Submit होता था, सव कुछ एक परिवार जैसा था फिर पता ही नहीं चला कब आखरी साल आ गया, वक्त कितना जल्दी निकल जाता है, लग रहा था अब जिम्मेदारियों का बोझ सरपर आने लगा जब अब कॉलेज के रास्ते से गुजरते है, तो सोचते है, आये थे अंजान बनकर, गये यहाँ से याद लेकर , जब देखते पन्ने पलटकर मजेदार था कॉलेज का सफर...*

मिनल क्षीरसागर

# १८. आयुष्याच्या पुस्तकातील अविस्मरणीय पान 'कॉलेज'

कॉलेज म्हणजे स्वछंदी हवा, मस्त जगणं, स्वप्न पाहणं थोडक्यात बोलायचं झालं तर, दिवस तुझे झुलायचे या गाण्याचा संपूर्ण सार आणि अर्थ हे महाविद्यालयातच आल्यावर समजले. महाविद्यालयीन आयुष्यात पहिलं पाऊल ठेवताना प्रत्येक वळण वेगळं असत, कधी अवघड तर कधी सोप्पं पण ते पार केल्यावर एक नवीन अनुभव आपलं स्वागत करत असतो. इथल्या प्रत्येक वळणावर नवनवीन भेटवस्तु रंगीबेरंगी कागदामध्ये गुंडाळून आपल्याला भेटत असतात, त्यामध्ये गुंडाळलेले असतात कधी वाईट अनुभव, कधी एक चांगली शिकवण, चांगले अनुभव तर कधी भेटतो शिक्षकांचा मोलाचा सल्ला आणि सोबत त्यांची शिकवण. या भेटवस्तू जपून ठेवल्या तर आयुष्याची शिदोरी मिळून जाते.

खरं तर दहावी नंतर अकरावी, बारावी हे दोन वर्ष शाळेतील दिवसांसारखे जातात. खरं महाविद्यालयीन जीवन तर त्यानंतर सुरू होतं, असं मला वाटतं. आणि त्याची सुरूवात झाली के.एस.के. कॉलेज म्हणजेच केशरबाई सोनाजीरव क्षीरसागर महाविद्यालय, बीड येथे. इथे प्रवेश घेतल्यानंतर थोडी भीती, थोडी उत्सुकता आणि बरीच स्वप्ने होती. इथल्या वातावरणात एकरूप होण्यास मदत मिळते ते इथल्या स्वच्छंद आणि मोकळया वातावरणामुळे या महाविद्यालयात प्रत्येक समारंभ, प्रत्येक कार्यक्रम, वेगवेगळया अनुभवी लोकांचे व्याख्यान हे नेहमी होतात. आणि त्यामुळे अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

अजुनही आठवतं एकदा कॉलेजमध्ये Army force मधील काही ऑफिसर आले होते. तुम्ही Idian Army मध्ये कसे जॉईन होऊ शकता किंवा त्यात करिअर कसे करू शकता यासाठी त्यांचे व्याख्यान होते. त्यावेळी त्यांचे अनुभव त्यांनी घेतलेली मेहनत ऐकून खूप काही शिकायला मिळाले. असे अनेक सेमिनार कॉलेजमध्ये होत असत आणि त्यात आम्ही आवर्जून सहभागी व्हायचो. ते अनुभव ती शिकवण आजही सोबत आहे.

महाविद्यालयातील एक महत्वाची बाब म्हणजे नियमितपणे घेणारे लेक्चर होत असत. त्याचबरोबर इथे प्रत्येक शिक्षकांना आम्हाला शालेय ज्ञानाबरोबर दिलेले त्यांचे अनुभव. जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन हा अमूल्य आहे. आजच्या आधुनिक जगात शिक्षकांची भूमिका विद्यार्थ्यांना शिकवण्याबरोबर त्यांना एक कुशल नागरिक बनवण्याचीही असतेच. समाजात जगताना हा सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, स्वतःचे कौशल्य विकसीत करणे या सगळया गोष्टी आम्ही या महाविद्यालयात शिकूनच बाहेर पडलो.

आपल्या आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर महाविद्यालयातील प्रत्येक अनुभव वेगवेगळया रूपात कामी येतोच. हे महाविद्यालय आणि इथले व्यासपीठ ही एक अशी वाट आहे, जी तुम्हाला प्रत्येक वळणावर योग्य दिशा दाखवेल. इथे होणाऱ्या वेगवेगळया स्पर्धा, कार्यक्रम, सेमिनार यामुळे स्वतःला पारखायला मदत मिळते. इथे येताना प्रत्येक जण काही स्वप्नं, काही अपेक्षा सोबत घेऊन येतात. इथे चढउतारही येतात पण महाविद्यालयात काही कोपरे असेही असतात जे सदैव तुम्हाला सावरतात. फक्त ते आपल्याला ओळखता आले पाहिजे. जसे इथले ग्रंथालय, शिक्षकांची शिकवण, त्यांचे विचार हे तुम्हाला जगण्याची कला शिकवतात. इथल्या प्रत्येक पुस्तकात, प्रत्येक पानावर, प्रत्येक वळणावर एक नवी चाहुल असते. इथे भेटलेले अनुभव, शिकवण हे शब्दात मांडणं आणि सांगणं संपूर्ण शक्य नाही पण याची शिदोरी घेऊनच आम्ही आजही आयुष्याची वाटचाल करत आहोत हे नक्की...

निशिगंधा शेटे
बीड

# १९. महाविद्यालयीन आठवणी

मी शैक्षणिक वर्ष २०१५-१८ या काळात B.Sc. साठी आपल्या महाविद्यालयात होतो. मी राहणार तसा बीडचाच. १२ वी झाल्यानंतर B.Sc. साठी सौ.के.एस.के. महाविद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा मनात एक भीती होती की, स्टाफ कसा असेल ? मला हे सर्व जमेल का ? नवीन मित्र कसे असतील ? पण ज्यावेळेस मी कॉलेजचा पहिला दिवस केला, तेव्हा मला जाणवलं की, सर्व Teaching आणि non-teaching staff किती co-operative nature चा आहे आणि मनातील भिती आता हळूहळू कमी झाली.

मला चांगलं आठवतं, तो माझा कॉलेजचा पहिला दिवस. माझा पहिला दिवस, पण कॉलेज चालू होऊन तो तिसरा दिवस. त्यादिवशी 8.10 am ला Microbiology च गुळवे मॅडमचा तास होता. मला वाटलं की, दोन तीन दिवस Class ला Absent असल्यामुळे त्या रागावतील पण मॅडमनी तसं न करता मला समजावून सांगितले की, कॉलेज करण्याचे फायदे काय आहेत, पुढे काय carrer apportunities आहेत. त्यामुळे मला एक नवीन ऊर्जा मिळाली की आपण पण हे करू शकतो. त्यानंतर त्या दिवशीचा दुसरा तास होता माऊलगे सरांचा. सरांची शिकवण्याची शैली ही फार वेगळी. विद्यार्थ्याला कसं जास्तीत जास्त ज्ञान मिळेल हा त्यांचा प्राथमिक हेतू नेहमी असायचा. वेळेवर येणे आणि वेळेत तास सोडणे, हा त्याचा प्राधान्यक्रम नेहमी असायचा. Chemistry department चे विभाग विभाग प्रमुख खाकरे सर तसेच गायकवाड सर यांची शिकवण्याची पद्धत पण खुप छान असायची. विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त फायदा कसा करता येईल आणि विद्यार्थ्याला नवीन माहिती कशी मिळेल याकडे त्यांचे लक्ष असायचे, आणि त्यानंतरचा तिसरा तास हा Zoology चा शेळके सरांचा. प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष असायचं. प्रत्येक concept विद्यार्थ्याला कशी समजेल यावर त्यांचा भर असायचा.

कॉलेजमध्ये Practicals ला फार महत्व असायचं. त्यातुन नवीन गोष्टी शिकायला मिळायच्या. नवीन तंत्रज्ञान अवगत व्हायचे आणि तो वेळ कसा निघून जायचा कळायचही नाही. कॉलेजमधल्या बऱ्याच आठवणी अशा आहेत की, त्या डोळ्यासमोर आजही प्रत्यक्ष आठवणीत आहेत. जसं की, कॉलेजचं स्नेहसंमेलन, कॉलेजची सहल, Science day ला केलेला उपक्रम, कँटीनमधला मित्र-मैत्रीणी सोबतचा चहा. कँटीनमध्ये चहा घेण्यासाठी आम्ही सर्व मित्र असायचो पण ज्यावेळेस पैसे देण्याची वेळ यायची त्यावेळेस कोणाला फोन यायचा, कोणाला Library मध्ये काम असायचं, तर कोणी नकळतपणे उठून जायचा, म्हणजे ती मज्जाच वेगळी असायची.

कॉलेजमध्ये प्रशस्त अशी Library होती त्यामध्ये विषयाची, अवांतर वाचनाची ग्रंथ आणि रोजचे दैनिक वर्तमानपत्र असायचे. एखादा तास off असला की, आम्ही तेथे जावून बसायचो. कॉलेजमध्ये Wi-Fi ची पण सुविधा असायची. पिण्यासाठी स्वच्छ पाणी, प्रशस्त असं क्रीडांगण आणि मस्त वाटेल असं Garden म्हणजे एवढया सुविधा होत्या की कॉलेजचा वेळ कधी संपायचा कळायचं नाही.

मुळात माझे विषय Zoology, Chemistry आणि Microbiology असल्यामुळे माझा संबंध या department शी जास्त होता Chimistry, department, zoology department, microbiology department या विषयाचे सर, मॅडम हे नेहमी विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मदत कशी करता येईल मग ती शैक्षणिक असो किंवा आर्थिक असो यासाठी ते नेहमी तत्पर असायचे.

विशेष म्हणजे आमच्या प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर या सर्व गोष्टीकडे स्वतः लक्ष देत असल्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांना कधी अडचण वाटली नाही. कुठलंही काम असो प्राचार्य मॅडमचा दरवाजा विद्यार्थ्यांसाठी नेहमी खुला असायचा. या सर्व गोष्टी घडत असताना कॉलेजचे तीन वर्ष कधी संपले ते आम्हाला जाणवलंच नाही. जीवनात पुढे जात असताना जुन्या गोष्टी नेहमी आपल्या स्मरणात असतात आणि त्याला कुठेतरी आपण Miss करत असतो. आजही आम्ही कॉलेजचे मित्र भेटतो तेव्हा कॉलेजच्या जुन्या आठवणीत रमून जातो. यापुढेही मी माझ्या जीवनात ज्या चांगल्या गोष्टी करेल किंवा चांगल्या गोष्टी घडतील त्यात कॉलेजचा नेहमीच मोठा वाटा असेल कारण त्या कॉलेजमुळेच मी आज एवढा चांगला घडलो आणि याबद्दल मी नेहमीच कॉलेजचा ऋणी राहील याबद्दल शंका नाही.

अतुल चव्हाण

## २०. माझ्या यशस्वी जडणघडणीचा पायाः के.एस.के.महाविद्यालय...

प्रथम वर्षाला (B.Sc.,comp. sci.) के.एस.के. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर ग्रामीण भागातून बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यामुळे शहरी वातावरणात रूजणं थोडसं कठीण होतं, परंतु कॉलेज सुरू झाल्यानंतर खेड्यातून येणाऱ्या मुलांना समजून घेणारे व वेळोवेळी अडीअडचणीस मदत करणारे व सतत प्रोत्साहन देणारे प्रा. क्षीरसागर सर, प्रा. राऊत सर व महेशमाळकर मॅडम या सर्वांनी कॉलेज जीवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी वेळापत्रकाव्यतिरिक्त आपला अनमोल वेळ देऊन सतत पुढे जाण्याची प्रेरणा दिली. बघता बघता के.एस.के. च्या शैक्षणिक वातावरणात मी कधी रमून गेले हे मला पण कळले नाही.

माझ्यातील हरहुन्नरीपणा,वक्तृत्वशैली, धाडसीपणा कॉलेजमधील मित्र-मैत्रिणीं, प्राध्यापकवृंद यांच्या नजरेतून आदराचे व प्रेमळ वागणे पाहून आमच्या आदरणीय प्राचार्या डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर मॅडम यांनी कॉलेजच्या विद्यार्थी संसद सचिव या पदी माझी निवड केली. कॉलेजमध्ये केलेल्या विविध कार्यक्रमाचे नियोजन, प्रासंगिक उपक्रम, यामध्ये सक्रीय सहभाग घेऊन माझ्यावर टाकलेला विश्वास मी सार्थ करून दाखविला.

माझ्या कॉलेज जीवनातील अविस्मरणीय प्रसंग म्हणजे कॉलेजच्या स्नेहसंमेलनाप्रसंगी मा. दीपाताई क्षीरसागर व इतर मान्यवर समवेत कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे सिनेकलावंत संदिप पाठक व मान्यवरांचा सत्कार करण्याचे भाग्य मला लाभले. सामाजिक कार्याचा जवळून परिचय झाल्यामुळे पदवी पूर्ण झाल्यनंतर मी बहूजन समाज महिला व बालकल्याण सेवाभावी संस्था नावाची सामाजिक संस्था स्थापन केली व आज मी त्या संस्थेची सचिव म्हणून महिला व बालकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते.तसेच हे सामाजिक कार्य करत करतच मी मागील सहा वर्षापासून ठाणे म.न.पा. येथे प्रसाविका या पदावर रूजू होऊन महिला व बालकांसाठी आरोग्य सेवा देत आहे.

आज मी माझ्या जीवनात एक यशस्वी व कर्तबगार स्त्री म्हणून सन्मानाने जगत आहे. ते माझ्यावर उल्लेखनीय संस्कार केलेल्या सर्व आदरणीय गुरूजनांमुळे. पुन्हा एकदा सर्वांच्या चरणी नतमस्तक होते व माझे छोटेसे अनुभवविश्व संपवते.

गितांजली आंधळे

## २१. के.एस.के. म्हणजे एक कुटूंबच

आज सौ.के.एस.के. महाविद्यालयास ५० वर्षे पूर्ण झाली. बघता बघता महाविद्यालयाने अर्धशतक पूर्ण केलं. मला अभिमान आहे की, मी या महाविद्यालयाची विद्यार्थीनी आहे. या नात्याने अनुभवलेले काही अविस्मरणीय अनुभव व्यक्त करते.

मी या महाविद्यालयात माझ्या आयुष्यातील पाच वर्षे शिक्षण घेतले आहे. या पाच वर्षामध्ये मला एक गोष्ट समजली ती म्हणजे हे महाविद्यालय एक कुटूंब आहे. जिथे गेल्यावर आपलेपणाची भावना येते. येथील प्राध्यापकवृंद तर नेहमी विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देतात.मी ११ वी मध्ये असताना मला कविता करण्याची आवड निर्माण झाली. ती म्हणजे या महाविद्यालयामध्ये असणारे प्रा. कटारे सर, माने सर, आणि घुमरे सर यांच्यामुळे, वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे आणि आयोजित केलेल्या कविसंमेलनामुळे. त्यांनी मी बी.एस्सी.ला असताना प्रा.डॉ. गुळवे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत गेले. महाविद्यालयामध्ये असणाऱ्या एनएसएसमुळे आपण समाजासाठी कसे उपयोगी पडू शकतो याचे धडे मिळत गेले.

महाविद्यालयीन जीवनाचे अनुभव सांगावे तेवढे कमीच आहेत. आपल्या महाविद्यालयाचे प्रभावी व्यक्तीमत्व असणाऱ्या प्राचार्या डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर यांच्या या मोठया कुटूंबाचा मी एक छोटासा भाग आहे, याचा मला आनंद आहे.

या महाविद्यालयाने मला शिक्षणासाठी खुप मदत केली. अशा या कुटूंबाचे करावे तेवढे कौतूक कमीच आहे. अशा महाविद्यालयाची मी विद्यार्थीनी आहे याचा मला खरोखर खूप अभिमान आहे. हे महाविद्यालय वर्षानुवर्षे असेच विद्यार्थ्यांचे जीवन घडवत राहो हीच सदिच्छा...

राजनंदिनी कसबे

# २२. माझे महाविद्यालयीन जीवन

महाविद्यालयाच्या स्थापनेस आज अर्धशतक पूर्ण झाले. या अर्धशतकपुर्तीचे औचित्य साधून या महाविद्यालयाची विद्यार्थीनी या नात्याने माझे महाविद्यालयीन अनुभव व या महाविद्यालयाचे माझ्यावरील ऋण व्यक्त करू इच्छिते.

मला या महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांपैकी केवळ तीन वर्षे अनुभवायला मिळाले. परंतु आजही जेव्हा जेव्हा मी या महाविद्यालयात पाऊल टाकते. व मी तेव्हा हे महाविद्यालय आजही माझेच आहे इथे अजुनही विद्यार्थी दशेत प्रवेशित असल्याचा मला भास होतो.

आदरणीय काकूंनी स्थापन केलेले हे महाविद्यालय शैक्षणिक दृष्टया सर्वगुणसंपन्न तर आहेच पण त्यासोबतच येथील प्राध्यापकवृंद विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर वेळोवेळी विशेष लक्ष देत असतात. जेंव्हा मी बारावी नंतर पदवी शिक्षणासाठी महाविद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा येथील रम्य वातावरण खूप पटकन आपलसं होवून गेलं, नवीन असल्याचा भास इथे कधी झालाच नाही. पुढे जस जसे वर्ग भरत गेले तसतसे शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली समज येत गेली व शिक्षणाचे महत्व अधिकच अधोरेखित होत गेले. प्रथम वर्षाच्या नंतर मला महाविद्यालयातील विविध सांस्कृतिक व शैक्षणिक विकासासाठी अनुरूप असलेल्या कार्यक्रमांविषयी कल्पना येत गेली, तसे माझे व या महाविद्यालयाचे नाते अधिकच घट्ट होत गेले.

प्रथम वर्षात असतांना शिंदे सर व खान सर यांनी इंग्लीश प्ले मध्ये काम करण्याची संधी दिली. त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. त्यानंतर मला कधीच व्यासपीठावर जाऊन व्यक्त होण्याची भिती वाटली नाही. तसेच विविध विभागांच्या एक दिवसीय भेट शिबीरांमध्ये सहभागी होण्याची संधी मला मिळाली. त्यानंतरही विविध विद्यार्थी हितोपयोगी कार्यक्रमांमध्ये मी सहभाग नोंदवला. हे सर्व केवळ महाविद्यालयाच्या महत्वकांक्षी प्राध्यापकवृंदामुळे शक्य झाले. तृतीय वर्षामध्ये असताना मला महिला प्रतिनिधी (Leadies Representative) म्हणून काम पाहण्याची संधी मिळाली. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांना जवळून काम करताना पाहण्याची संधी मिळाली. त्यांचे व्यक्तमत्व अत्यंत प्रभावी असून महाविद्यालयाच्या नावलौकिकाला त्या पुरेपूर हातभार लावतात. या महाविद्यालयाचे जेवढं कौतूक करावे तेवढे कमीच आहे. मला अशा महाविद्यालयाची विद्यार्थीनी असल्याचा अभिमान आहे. हे महाविद्यालय वर्षानुवर्षे असेच अबाधित व विद्यार्थ्यांच्या जीवनास आकार देत राहो हीच इच्छा व्यक्त करते.

• निमिता गवळी





१५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त हिंदी विभागांतर्गत प्रकाशित करण्यात येणाऱ्या भारतवाणी या भित्तपत्रकाचे प्रकाशन करताना सुप्रसिद्ध विधीज्ञ मा.विवेकानंद सानप समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर

हिंदी विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या काव्यवाचन स्पर्धेदरम्यान मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर समवेत, मंचावरील मान्यवर व विद्यार्थी






हिंदी विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या हिंदी दिन समारोह उपक्रमादरम्यान मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी मा.डॉ.देविदास इंगळे समवेत, मंचावरील मान्यवर व विद्यार्थी



इंग्रजी विभागामधील भाषा प्रयोगशाळेची पाहणी करताना संस्थेचे प्रशासक मा.डॉ.राजा मचाले, उपप्राचार्य मा.डॉ.आबासाहेब हांगे, विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी



इंग्रजी विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्पीच इव्हेंट उपक्रमादरम्यान मंचावर मा.प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, मा.प्रा.शिवाजी शिंदे, मा.डॉ.अन्सरउल्लाखान व उपस्थित विद्यार्थी



विविध भाषा वाङ्मय मंडळ उद्घाटनप्रसंगी इंग्रजी विभागाच्या भित्तपत्रकाचे प्रकाशन करताना प्रमुख अतिथी मा.डॉ.पृथ्वीराज तौर, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



शैक्षणिक वर्ष १९९७-९८ मधील गृहशास्त्र विभागाच्या विद्यार्थीनी समवेत प्राध्यापकवृंद




गृहशास्त्र विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी प्रदर्शनाची पाहणी करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर समवेत, प्राध्यापकवृंद




महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र जिल्हा बीड आणि महाविद्यालयातील गृहशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वयंरोजगार कार्यक्रम प्रशिक्षण शिबीराप्रसंगी मंचावर मा.प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



दि.२२ ते २८ ऑगस्ट २००७ दरम्यान महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या नि:शुल्क योग शिबीरामध्ये मार्गदर्शन करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर समवेत शिबीरार्थी



शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये महाविद्यालयांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबीरादरम्यान विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करताना डॉ.मोटे




शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये गृहशास्त्र व समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या बालकामगार एक सामाजिक समस्या या विषयावरील चर्चासत्राच्या समारोप सत्रामध्ये प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर यांचे स्वागत करताना मा.डॉ.नुजहत सुलताना



शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील स्नेहसंमेलनानिमित्त गृहशास्त्र विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पुष्परचना प्रदर्शनाची पाहणी करताना प्रमुख अतिथी मा.मोनिका बेदी समवेत प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व मा.डॉ.नुझहत सुलताना



शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये गृहशास्त्र विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पौष्टिक पाककृती स्पर्धेची पाहणी करताना कुटुंब रंगलय काव्यात या सुप्रसिद्ध कार्यक्रमाचे सादरकर्ते मा.विसुभाऊ बापट समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



गृहशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हॅन्डीक्राफ्ट वस्तूंच्या प्रदर्शनाला भेट देताना मा.डॉ.सारिका क्षीरसागर समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



गृहशास्त्र विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या भारतीय स्त्री समोरील आव्हाने व संधी या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी मंचावर मा.डॉ.स्मिता अवचार, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




गृहशास्त्र विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी प्रदर्शनातील सर्वोत्कृष्ठ रांगोळीसह रांगोळी काढणारी विद्यार्थीनी



संगीत विभागाच्या भागवत चव्हाण या विद्यार्थ्यास युवक महोत्सवात पखवाज वादनात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल त्याचे स्वागत करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर समवेत, इतर मान्यवर



जिल्हा क्रीडा महोत्सवामध्ये गायन, वादन आणि लोकगीत या कला प्रकारात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




संगीत महोत्सवातील सहभागी कलावंत विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महिला कक्ष व संगीत विभागातर्फे आयोजित करण्यात आलेला स्त्रीगीतांचा कार्यक्रम




शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनामध्ये प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना सुप्रसिद्ध सिने अभिनेते मा.प्रसाद ओक समवेत, मंचावरील मान्यवर



समाजशास्त्र विभागाच्या भारतातील लोकसंख्या एक सामाजिक समस्या या विषयावरील भित्तपत्रकाचे प्रकाशन करताना सुप्रसिद्ध मुलाखतकार मा.सुधीर गाडगीळ समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित बालकामगार एक सामाजिक समस्या या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे प्रास्ताविकपर भाषण करताना प्रा.जगन्नाथ घुटे समवेत, मंचावर डॉ.स्मिता अवचार, मा.श्री.एस.ए.कुंभारे व इतर मान्यवर

सामाजिकशास्त्र मंडळ व कर्मचारी कल्याण विभाग यांच्या वतीने मौजे घाटसावळी येथील वृद्धाश्रमास भेट व आर्थिक मदत






महाविद्यालयामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आलेले सुप्रसिद्ध पत्रकार मा.संजय आवटे यांच्या समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन शरीरसौष्ठव स्पर्धेतमध्ये महाविद्यालयाचा मुस्तजीब शेख हा विद्यार्थी विद्यापीठात द्वितीय आला. त्यानिमित्ताने त्याचा सत्कार करताना मान्यवर

शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या संघासोबत न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर व इतर मान्यरवर






महाविद्यालयातील क्रीडा विभागाकडून घेण्यात येणाऱ्या बॅडमिंटन समर कोचिंग कॅम्पची बॅच. समवेत प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर, उपप्राचार्य मा.डॉ.आबासाहेब हांगे, प्रशिक्षक मा.डॉ.भागचंद सानप व इतर मान्यवर

# २३. जीवनाला आकार देणारे महाविद्यालय...

सौ.के.एस.के. कॉलेजची स्थापना होऊन आज पन्नास वर्ष पूर्ण झाली. या कॉलेजची विद्यार्थीनी या नात्याने मी कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाचे अनुभव व कॉलेजचे माझ्यावरील असलेले ऋण व्यक्त करते.

आदरणीय काकूंनी जुन १९७१ मध्ये हे कॉलेज स्थापन केलं. त्यास आज सुमारे पन्नास वर्षे पूर्ण झाली. परंतु त्यापैकी मी पाच वर्षे या कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. इयत्ता ११ वी त असताना मी प्रथम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मला राहण्यासाठी सौ.के.एस.के. मुलींचे वसतीगृह मिळाले. के.एस.के. कॉलेज हे शैक्षणिकदृष्टया सर्वगुणसंपन्न असून बाहेरगावाहून येवून शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थीनींना वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे. वसतीगृहाच्या आमच्या शिंदे मॅडम या अगदी आईसारख्या मला लाभल्या. त्यांनी वेळोवेळी मला योग्य मार्गदर्शन केले.

११ वी आणि १२ वी नंतर मी पदवीदेखील के.एस.के. कॉलेजमध्येच पूर्ण केली. जसजसे दिवस जात होते तसतसे माझ्या ज्ञानात भर पडत गेली याचे सर्वाधिक श्रेय हे कॉलेजमधील प्राध्यापकवृंदाना जाते. कॉलेजमधील सर्वच प्राध्यापकवृंद हे अतिशय शिस्तप्रिय असून ते सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, मूल्यशिक्षण, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शिबीरे यास सहभाग घेण्यास वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात. विद्यार्थ्यांना वेळोवेळी प्रेरणा देत असतात.

के.एस.के. कॉलेजच्या अशा रम्य वातावरणामध्ये माझे कॉलेजशी असलेले नाते अधिकच घट्ट होत गेले. कॉलेजच्या प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावशाली असून त्या शिकवणी वर्गाकडे वैयक्तिक लक्ष घालतात. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्याचा अनुभव मला आजही आठवतो. मी पदवीच्या शेवटच्या वर्गांत असताना आदरणीय दीपाताई यांनी कॉलेजमधील सर्व मुलींसाठी marshal arts of association या ४५ दिवसांच्या शिबीराचे आयोजन केले होते.

आदरणीय दीपाताई क्षीरसागर यांनी आम्हाला शिबीराच्या माध्यमातून मार्गदर्शन केले की, आपण २१ व्या शतकात राहतो, त्यामुळे प्रत्येक मुलीला स्वतःच संरक्षण स्वतः करता यायला हवे, ४५ दिवसांमध्ये मला marshal arts अगदी व्यवस्थित येऊ लागलं. याचा मला खुप फायदा झाला. के.एस.के. कॉलेजमधून शिक्षण पूर्ण करून मला तीन वर्षे पूर्ण झाली. परंतु जेव्हा मी कॉलेजमध्ये जाते तेव्हा हे कॉलेज माझेच आहे असे मला वाटते. सौ.के.एस.के. कॉलेज हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी खुपच पूरक आहे. आणि मला खुप अभिमान वाटतो की, हे कॉलेज मला लाभले, इथले शिस्तप्रिय आणि दयाळू प्राध्यापकवृंद मला लाभले. यापुढेही सौ.के.एस.के. कॉलेजची ख्याती वर्षानुवर्षे वृद्धिंगत होवो हीच इच्छा...

हर्षदा भुंबे



# २४. एक अविस्मरणीय प्रवास.....

*आज मन पुन्हा त्या*
*महाविद्यालयात जाऊन आलं*
*सुना सुना एक एक क्लास*
*मन गहिवरून आलं,*
*ते दिवस जगायला*
*आता कुठं मिळतील*
*जगलेले दिवस मात्र*
*आठवणीत राहतील...*

शालेय जीवनापासून महाविद्यालयीन आयुष्यातील पदार्पण म्हणजे एक अर्थाने नव्या क्षितिजाचा शोध. नवीन वातावरण, नवीन शिक्षक, नवीन मित्र-मैत्रिणी आणि खुप उत्सुकता. महाविद्यालयीन जीवन म्हणजे आयुष्याला कलाटणी देणारा काळ.

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, बीड म्हणजेच सौ. के.एस.के. महाविद्यालय, बीड हे महाविद्यालय माझ्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्वाचा टप्पा आहे. या महाविद्यालयात मी माझे ११ वी ते एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. माझा बी.ए. ते एम.ए. साठी माझा आवडीचा विषय गृहविज्ञान हा होता. सन २००८-०९ मध्ये एम.ए. गृहविज्ञान पूर्ण केले. त्यावेळी आम्हाला डॉ. नुजहत सुलताना मॅडम, डॉ. माया खांदाट मॅडम, मंजू जाधव मॅडम, वाघूले मॅडम शिकवण्यासाठी होत्या. गृहविज्ञान हा विषय कला व विज्ञान यांचा योग्य संगम आहे. या विषयामध्ये विज्ञानासोबतच कलेला सुद्धा महत्वाचे स्थान दिले गेले आहे. ह्या विषयाचे शिक्षण घेऊन आपण नोकरी तर करू शकतो पण स्वतःचा लघुउद्योग पण सुरू करू शकतो. उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी गृहविज्ञान विषय उपयुक्त आहे.

सौ.के.एस.के. महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागामध्ये वेगवेगळे उपक्रम राबवले जात असत. यामध्ये औद्योगिक ठिकाणी भेट देणे, बालसुधारगृहाला भेट देणे, वृद्धाश्रमाला भेट देणे, पैठणी तयार करणाऱ्या केंद्राला भेट देणे, यामार्फत प्रत्यक्ष ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक वर्षी कला प्रदर्शन सादर करून विद्यार्थीनीच्या कला गुणांनादेखील प्रोत्साहन दिले जात आहे.

मी देखील एम.ए.ला असताना वेगवेगळया स्पर्धामध्ये भाग घेत असे. रांगोळी स्पर्धा, पेन्टींग स्पर्धा, पोस्टर स्पर्धा अशा अनेक स्पर्धामधून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव दिला जात असे. माझ्या कॉलेजच्या आठवणी खरच खुप आनंददायक आहेत. सन २००९ मध्ये माझे एम.ए. पूर्ण केले आणि सन २००१ पासून कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे कनिष्ठ प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहे. गृहविज्ञान या विषयामध्ये घेतलेले ज्ञान मला माझ्या स्वतःच्या आयुष्यामध्ये तर उपयोगी ठरलेच पण त्याचबरोबर अर्थार्जनासाठी म्हणजेच नोकरीसाठीही उपयोगी ठरले.

आपण ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेतले आहे त्या महाविद्यालयाला आज पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. याचा खरोखरच मला खुप आनंद होत आहे. तसेच मला खुप अभिमान वाटत आहे की, या महाविद्यालयाने यशस्वीरित्या पन्नासाव्या वर्षी पदार्पण केले आहे. हे यशस्वी पन्नास वर्ष होण्याकरिता महाविद्यालयाच्या आदर्श प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर मॅडम तसेच महाविद्यालयातील आदरणीय प्राध्यापक, ऑफिस स्टाफ व इतर कर्मचारी या सर्वांचीच मेहनत खुप महत्वाची आहे. आजपर्यंत या महाविद्यालयातून अनेक यशस्वी विद्यार्थी बाहेर पडले, बऱ्याच विद्यार्थ्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले. या सर्वांच्या मागे हे महाविद्यालयच आहे. विद्यार्थ्यांचा विकास करणारे हे महाविद्यालय असेच त्याचे शंभर वर्ष पूर्ण करो हीच शुभेच्छा.

ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून समजला जाणारा हा बीड जिल्हा व तेथील महाविद्यालय हे या कामगारांच्या मुलांना शिक्षण देणारे व त्यांचा विकास करणारे एक ज्ञानाचे मंदिरच आहे. बीड जिल्ह्याचा विकास होण्यासाठी या महाविद्यालयाचे श्रेय मोठ्या प्रमाणावर आहे. माझे हे महाविद्यालय दिवसेंदिवस अशीच प्रगती करो व मी अभिमानाने हे माझे महाविद्यालय आहे, असे सांगावे हीच सदिच्छा.

अरूणा नावेकर

# २५. माझे महाविद्यालय-जणू 'ज्ञानाचा सागरच सारा'

*"आठवणींचे पक्षी उतरतात मनी*
*गतकाळाची नक्षी खुलते पानोपानी"*

आदरणीय स्व.सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू यांच्या स्मृतीस अभिवादन करून सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील माझ्या आठवणी व्यक्त करत आहे.

या महाविद्यालयास स्थापन होऊन ५० वर्ष झाली त्यानिमित्ताने माझ्या मनातील गोड स्मृति जाग्या झाल्या. हे महाविद्यालय माझ्या शैक्षणिक प्रगतीचे केंद्रबिंदू आहे. सन १९९३ मध्ये मी या महाविद्यालयात पहिले पाऊल टाकले तेव्हा पूर्णपणे गोंधळून गेले होते. शाळेचे सुरक्षित जग मागे पडले असे वाटत होते. शंभर-सव्वासे विद्यार्थ्यांचा वर्ग आणि वर्गाची रचना एखाद्या ऑडिटोरिअमसारखी होती. समोर व्यासपीठ, व्यासपीठावर प्राध्यापकांसाठी डायस, मोठा फळा, हे सर्व पाहून मी भांबावून गेले होते. परंतु अगदी दोन चार दिवसातच महाविद्यालयाचा परिचय झाला,मैत्रिणी भेटल्या, गुरूजनांशी ओळख झाली व हे महाविद्यालय मला माझे वाटू लागले. मनातील भीती निघून गेली. पुढे या महाविद्यालयातून मी ११ वी ते बी.ए. पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले व आज याच संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा ता.जि. बीड येथे २0 वर्षापासून गृहशास्त्र विभागात कार्यरत असून याच महाविद्यालयातील माझ्या गृहशास्त्र विषयाच्या गुरू डॉ. नुजहत सुलताना मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनकार्य पूर्ण करत आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रवासात सर्वात जवळचे झाले ते गृहशास्त्र विभाग. या विभागातील डॉ. नुजहत मॅडम, डॉ. माया बाभूळगांवकर मॅडम यांनी दिलेल्या ज्ञानमुळेच आज मी माझ्या प्रपंचाला आर्थिक हातभार लावण्यास सक्षम बनले आहे.

गृहशास्त्र विषयाच्या महानतेबद्दल वर्णिले तेवढे कमी आहे. या विषयामध्ये घेतलेले ज्ञान, या विषयाचे अध्ययन करणारी स्त्री आयुष्यामध्ये कधीच मागे राहत नाही. हा विषय म्हणजे आर्थिक कुवत, कुटूंबाचा आकार आणि राहती जागा यांच्यामध्ये योग्य तो समन्वय साधून नीटनेटकेपणाने प्रपंच कसा करावा हे शिकविण्याचे शास्त्र आहे. या विषयाच्या अभ्यासाने व्यक्तीविकास कौटूंबिक स्वास्थ्य, समाज स्वास्थ्य आणि पर्यायाने राष्ट्रहितही साधले जाते.गृहशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. नुजहत मॅडम यांच्यामुळे अनेक नवनवीन पदार्थ शिकण्यास मिळाले डॉ. नुजहम मॅडम बद्दलच्या महाविद्यालयीन आठवणी सांगाव्या तेवढ्या कमी आहेत.

*शब्दांनी ज्ञान वाढणारे*
*जगण्यातून तत्वे शिकवणारे*
*समाजाला योग्य दिशा दाखवणारे*


असे नुजहत मॅडमचे कार्य आहे. या महाविद्यालयातुन अनेक यशस्वी विद्यार्थी बाहेर पडले आहेत. अनेक विद्यार्थी मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत. असे यशस्वी विद्यार्थी घडविण्यामध्ये महाविद्यालयाच्या आदर्श कर्तबगार सतत हसतमुख असणाऱ्या आदरणीय प्राचार्या डॉ.सौ. दीपाताई क्षीरसागर मॅडम यांचा सिंहाचा वाटा आहे. दीपा मॅडम बद्दल सांगावेसे वाटते-

*"अमृतासमान आहे आपले स्वरूप*
*त्यात सामावले विश्वस्वरूप*
*आपण आहात मांगल्यरूप*
*सर्वांचे बनले तुम्ही तीर्थस्वरूप"*

महाविद्यालयाच्या ५० व्या वर्धापन दिनाच्या आनंदोत्सवामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद नॉन टिचिंग स्टाफ सर्वांचा सहभाग आहे.

माझे महाविद्यालय दिवसेंदिवस महान व्हावे व मी अभिमानाने "हे माझे महाविद्यालय" असे सांगावे हीच सदिच्छा...!

सय्यद शाहीन शफी



# २६. एक जिवंत अनुभव

आजही मला तो दिवस आठवतो, जेव्हां मी सौ. के.एस.के. महाविद्यालयात बारावी विज्ञान पास होऊन प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला होता. मी ग्रामीण भागातील विद्यार्थी असल्यामुळे महाविद्यालयात नवीनच होतो. त्यामुळे कसेबसे वर्ग शोधत मी बी.ए. प्रथम वर्षाच्या इंग्रजी विषयाच्या पहिल्या क्लासला गेलो. आदरणीय डॉ. शिंदे सर शिकवत होते. त्यांचे लेक्चर केल्यानंतर येथे काहीतरी नवीन शिकायला मिळेल याची जाणीव झाली. बीए प्रथम वर्षाचे क्लास रेग्यूलर होत असत. त्यामुळे बारावी विज्ञान नंतर कला शाखेत येऊन सर्व काही समजत होते. प्रवेश प्रक्रिया संपली आणि नंतर महाविद्यालयाच्या वेगवेगळया उपक्रमांना सुरूवात झाली. उत्सुकतेपोटी व आवडीमुळे मी वाद विवाद स्पर्धा, संगीत कार्यक्रम, नाटक, राष्ट्रीय सेवा योजना आणि इंग्रजी व भूगोल विभागाच्या कार्यक्रमांना हजेरी लावत गेलो. ज्यामधून बऱ्याच नवीन संकल्पना शिकता आल्या यातच प्रथम वर्ष संपले, ज्याने मला चांगला श्रोता बनवले.

महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षामध्ये प्रत्येक lesson व poem नंतर आदरणीय डॉ. शिंदे सर विद्यार्थ्यांना पुढे बोलावून जे समजले ते इंग्रजीत सांगण्यासाठी प्रोत्साहन देत, त्यामुळे इंग्रजी बोलण्याची अडखळत का होईना सुरूवात झाली आणि मी मराठी माध्यमातून आलेला विद्यार्थी इंग्रजी बोलू लागलो. मला आँज एक घटना आठवते जिने माझे आयुष्य बदलले, महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने आदरणीय डॉ. दीपाताई क्षीरसागर मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात येत होती. व त्या निमित्ताने भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. तेव्हा मी आयुष्यात पहिल्यांदाच सावित्रीबाई फु ले यांचे स्त्री शिक्षणामध्ये असलेले योगदान या विषयावर भाषण करण्याचे ठरवले. मी भाषणासाठी उभा राहिलो आणि माझे भाषण सुरु केले, परंतु पहिल्या दोन वाक्यानंतर माझ्यापुढे बसलेल्या मुली हसल्या व मी आत्मविश्वास गमावल्यामुळे भाषण अर्धवट सोडले आणि खाली बसलो. परंतु यानंतर आदरणीय प्राचार्या डॉ. दीपाताई मॅडमनी माझे कौतूक केले आणि धीर न सोडता भाषण करण्यास सांगितले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे व दुसऱ्या दिवशी डॉ. शिंदे सरांनी वर्गात केलेल्या कौतुकामुळे मी पुढील प्रत्येक भाषण स्पर्धेत भाग घेत गेलो व माझा चांगला वक्ता होण्याचा प्रवास सुरू झाला.

**English भाषा विकासासाठी व स्पर्धा परीक्षेसाठी महाविद्यालयाचे विशेष योगदान :**

आज आम्ही जे काही झालो, त्याचे संपूर्ण श्रेय इंग्रजी विभागाने घेतलेल्या प्रयत्नांना आहे आदरणीय प्राचार्या मॅडम यांच्या आग्रहास्तव दुपारी Remedial Classes ची सुरुवात झाली. ज्यामध्ये मला चांगले इंग्रजी उच्चार, इंग्रजी ग्रामर बारकाईने शिकण्याची संधी मिळाली व इंग्रजी भाषेवर प्रभूत्व मिळवण्याचा मार्ग सापडला. आदरणीय डॉ. शिवाजी शिंदे सर यांनी शिकवलेल्या ग्रामर व इंग्रजी साहित्य याचा पाया भक्कम झाला. सरांच्या फक्त सतत इंग्रजी बोलण्यामुळे चांगले इंग्रजी ऐकण्याचा व बोलण्याचा नियम पाडल्यामुळे आम्ही विद्यार्थी आंमचे भविष्य घडवू शकलो.

बी. ए. तृतीय वर्षाचे इंग्रजी साहित्य वाचत असताना, शिकत असताना इंग्रजी ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे यांचा सराव झाला आणि आम्ही इंग्रजीचे उत्तम विद्यार्थी झालो.

**महाविद्यालयाचे ग्रंथालय :**

तेव्हा आम्हाला सर्व विषयाची मुबलक पुस्तके महाविद्यालयाने ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करून दिल्यामुळे आम्ही वाचत गेलो. आणि वाचाल तर वाचाल या म्हणीप्रमाणे समृद्ध होत गेलो. सरांनी वर्गात सांगितलेल्या इंग्रजी कादंबऱ्या, भूगोल, लोकप्रशासन या विषयाची मोठ्या प्रमाणात पुस्तके वाचली, ज्याची पुढील शिक्षणात मोठी मदत झाली. ग्रंथालयाचे कर्मचारी व महाविद्यालयाचे दूरदर्शी धोरण यामुळे मुबलक प्रमाणात वाचन झाले. व

माझा लेखक होण्याचा नकळत प्रवास सुरू झाला ज्याचे संपूर्ण श्रेय मी महाविद्यालयाच्या ग्रंथालयास देतो.

राष्ट्रीय सेवा योजना मधील वेगवेगळे कार्यक्रम, भूगोल प्रदर्शन यामुळे माझे सादरीकरण कौशल्य विकसित होत गेले ज्याची मला आज व्यवसायिक जीवनामध्ये मोठी मदत होते.

**लेखनकलेची सुरूवात :**

एकदा, 'नेताओं का देश विकास मे योगदान' या हिंदी विषयाच्या निबंध स्पर्धेत मी भाग घेतला व त्यामध्ये मला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. जे मी तेव्हाच्या बीड जिल्ह्याच्या आदरणीय पोलीस अधिक्षक देशपांडे साहेबांच्या व नगराध्यक्ष साहेबांच्या हस्ते मिळाले. या स्पर्धेने मी लिहू शकतो हा आत्मविश्वास मला दिला व मी लेखक होण्याचा मार्ग दाखवला.

महाविद्यालयाने आम्हा विद्यार्थ्यांसाठी त्या काळात नावाजलेले लोकप्रिय कलाकार, वक्ते, गायक यांचे कार्यक्रम आयोजित केले, ज्यामध्ये माझ्या आठवणीनुसार वैशाली सामंत, युक्ता मुखी, समाजसेवक पोपटराव पवार यांची व्याख्याने व प्रसिद्ध कवी अशोक नायगावकर यांना ऐकण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमांनी आम्हा विद्यार्थ्यांना घडवले.

बी.ए. तृतीय वर्षाच्या निकालानंतर उत्तम मार्क्स घेऊन आदरणीय डॉ. शिंदे सरांच्या मार्गदर्शनामुळे डॉक्टर बामु विद्यापीठाच्या इंग्रजी विभागामध्ये एम. ए. साठी प्रवेश घेतला. येथे आल्यानंतर संपूर्ण मराठवाडयासोबत भारताच्या बाहेरून आलेल्या इराक, इराण, आफ्रिका इ. देशांच्या विद्यार्थ्यासोबत शिकण्याची संधी मिळाली. तेव्हा खऱ्या अर्थाने सौ.के.एस.के. महाविद्यालयाची गुणवत्ता, प्रतिष्ठा, समजली. इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. वैशाली प्रधान, डॉ. मेहरूसाना पठाण, डॉ. सतीश देशपांडे, श्री. रणवीर सर यांनी आमचे सतत कौतूक केले व महाविद्यालयाने चांगले कार्य केल्याचे सांगितले. मला आश्चर्य वाटले जेव्हा औरंगाबाद शहरातील विद्यार्थ्यांपेक्षा आम्ही बी.ए. च्या वर्षामध्ये चांगलं शिकलो व स्पर्धेत टिकलो. याचे श्रेय महाविद्यालयाला जाते.

एम. ए. इंग्रजी व डी. एड. झाल्यानंतर मी औरंगाबाद येथे नामांकित कोचिंग क्लासेसमध्ये इंग्रजी विषय शिकवण्यास सुरूवात केली व हजारो विद्यार्थी घडवले. नंतर नवनीत फाऊंडेशन या नामांकित संस्थेमध्ये २०१९ सुमारे ५००० शिक्षकांना इंग्रजी विषयाचे प्रशिक्षण दिले. मी विद्यार्थ्यांना उत्तम ग्रामर समजण्यासाठी माझ्या अनुभवावर आधारित Up-to-date इंग्रजी ग्रामर चे पुस्तक लिहिले. ज्याच्या हजार प्रति बाजारात विकल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रभर माझे पुस्तक पोहोचले आहे. आज मी एका कनिष्ठ महाविद्यालयाचा औरंगाबाद येथे प्राचार्य आहे.

आज माझे अनेक वर्गमित्र वेगवेगळया क्षेत्रांमध्ये आहेत. त्यांचे सर्व श्रेय महाविद्यालयाने सुरू केलेल्या मोफत स्पर्धा परीक्षा केंद्राला जाते. कारण तेव्हा स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन आम्हाला वेळेत मिळाले व विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देऊ लागले. म्हणूनच मी म्हणतो तळागाळातील विद्यार्थ्यांना घडवणारे, त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे माझे महाविद्यालय एक जिवंत अनुभव आहे.

विकास ढगे

# २७. योग्यतेला दिशा मिळाली

मी प्रा.लेफ्टनंट डॉ. जे. डी. चव्हाण सौ.के.एस.के. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे. स्व. काकूंनी सुरु केलेल्या पोखरी येथील आश्रम शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर ११ वी च्या वर्गात प्रवेश घेतला, तेही स्व. काकूंचं महाविद्यालय आहे हे कळाल्यानंतर माझे ११ वी ते पी.जी.पर्यंत पूर्ण शिक्षण सौ. के.एस.के. महाविद्यालयात झाले. माझ्या यशात व विचारात या महाविद्यालयाचे अनमोल योगदान आहे.

तत्कालीन प्राचार्य बेग सर सेवानिवृत्त झाल्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी आदरणीय डॉ. दीपाताई क्षीरसागर प्राचार्या म्हणून रूजू झाल्या. ज्यांनी आयुष्यातील अंधाराला नाहीसं करण्यासाठी सकारात्मक उर्जा दिली. आम्ही यशस्वी झालो हे पाहिल्यावर, भेटल्यावर आजही आत्मिक आनंद व्यक्त करतात. बा विठ्ठलाला तुकाराम महाराज म्हणत तेच म्हणतो. हेची दान देगा देवा तुझा विसर न व्हावा...म्हणून या महाविद्यालयाचे अस्तित्व आमच्या आयुष्याच्या भोवती पिंगा घालते. आयुष्यातील प्रत्येक संकटाशी कसे लढायचे हे या महाविद्यालयातून शिकलो. खऱ्या जगाची ओळख करून देण्याचा मार्ग म्हणजेच आपल्या महाविद्यालयाचा क्रिडाविभाग, प्रा. राजेश क्षीरसागर, प्रा.यशवंत काळे, प्रा. हनुमंत गुळवे यांच्या परिचयाने महाविद्यालयीन शिक्षणाची सुरूवात झाली. चांगल्या वाईट दिवसातही आपल्या विचारांशी प्रामाणिक कसं रहायचं हे सरांनी शिकवले. सरांच्या मार्गदर्शनाने आमच्या ज्ञानाच्या कक्षा अधिकाधिक विस्तारत गेल्या आणि जीवनाची समृद्धीकडे वाटचाल सुरू झाली. याचे सर्व श्रेय महाविद्यालयाला जाते. उगवत्या सुर्याची किरणे नाविन्य, चैतन्य, आनंद घेऊन येतात हे ऐकले होते. परंतु ती किती वेगाने येतात ? याचा वेग काय असतो ? हे आपल्या महाविद्यालयातील भूगोल विभागाने शिकवले. या विभागाचे विभाग प्रमुख डॉ. मोहन नागनाथ गुळवे सर प्रा. राजपांगे सर प्रा. वनवे सर यांनी घेतलेल्या विविध उपक्रमातून मिळालेल्या सर्व बाबीतून माझं व्यक्तिमत्व कसे विकसित होत गेले, ते आज मी अनुभवतोय. भूगोल दिनानिमित्त मांडलेले प्रदर्शन पाहण्यासाठी आदरणीय डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी कुतुहलाने विचारलेले प्रश्न आणि त्यावर आम्ही सुचवलेले उपाय यामुळे केलेले कौतुक आजही प्रेरणादायी आहे. प्रा. आळे, प्रा. कांबळे, प्रा. साठे, प्रा. झोडगे,प्रा. घाडगे, प्रा. खाडे, प्रा. जाधव, प्रा.डॉ. रणखांब, प्रा.डॉ. देशमाने मॅडम, प्रा.डॉ. नायर सर,प्रा. जोगदंड, प्रा. हेमलता पाटील, प्रा. बंड, प्रा. चौधरी, प्रा. भालके यांचा मी विद्यार्थी आहे हे सांगताना गर्व वाटतो. याच गुरूजनांनी आयुष्याच्या वाटेवर साक्षात्कार दिल्यामुळे मी यशस्वी होऊ शकलो.

आजही सौ.के.एस.के. महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख प्रा. कॅप्टन बी.टी. पोटे सर एन.सी.सी. विभाग सांभाळत आहे. ज्यांच्या प्रेरणेतून भूगोल विषयाची गोडी लागली ते माझे चुलतभाऊ डॉ. ए.डी. चव्हाण, माझा विद्यार्थी प्रा. राजेश खटाणे यांना भूगोल विभागात जाऊन भेटल्यास स्वगृही परतल्यासारखे वाटते.

कठोर मेहनत करण्याची शिस्त मला या महाविद्यालयाने शिकवली. तत्कालीन माझ्यावर झालेल्या संस्कारामुळे मी विद्यापीठाचा उत्कृष्ठ कार्यक्रमाधिकारी पुरस्कार, वेगवेगळया सामाजिक संघटनेचे गुणवंत प्राध्यापक पुरस्कार इ. व यशस्वी शिस्तप्रिय, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून भूगोल विभागासोबत महाविद्यालयाचा एन.सी.सी. विभाग सांभाळत आहे. मला अभिमान आहे मी सौ. के.एस.के. महाविद्यालयात शिकून आज समाजोपयोगी बनू शकलो.

लेप्टनंट जे. डी. चव्हाण

# २८. महाविद्यालय नव्हे ! विद्यार्थी विकास केंद्र !!

जवळपास ३० वर्षांपूर्वी मी स्वतः के.एस.के. महाविद्यालयामध्ये विद्यापीठातील विद्यार्थी संसदेच्या निमित्ताने आलो होतो. त्यावेळेसचे महाविद्यालय आणि सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना बहरलेले महाविद्यालय यामध्ये अमुलाग्र बदल झालेला दिसून आला. अलीकडे गेल्या दहा-पंधरा वर्षामध्ये पत्रकार म्हणून ज्या-ज्यावेळी महाविद्यालयात जाण्याचा योग आला, त्या-त्या वेळी महाविद्यालयामध्ये नवीन उपक्रम राबवला जात होता. बीड तसे ग्रामीण भागाचा परिणाम असलेले शहर. आजुबाजूला मोठया प्रमाणात डोंगरी भाग आणि ग्रामीण भाग. या भागातून बीडमध्ये शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी, शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांची मुले शिक्षण घेण्यासाठी इतरत्र जावू नये, त्यांच्या कुटुंबावर शिक्षणाच्या खर्चाचा बोजा पडू नये आणि या भागातील विद्यार्थ्यांना इथेच सर्व काही मिळावे अशा उद्दात्त हेतूने स्व.माजी खासदार केशरकाकू क्षीरसागर यांनी शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. के.एस.के. महाविद्यालयाला आता ५० वर्षे पूर्ण होत आहेत. स्व. काकू आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी या महाविद्यालयाच्या रूपाने शिक्षणाचा पाया रचला आणि गेल्या २५ वर्षापासून महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धूरा सांभाळणाऱ्या डॉ. दीपा क्षीरसागर यांनी त्यावर कळस रचला, असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

निमित्त आहे के.एस.के. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे. विद्यार्थी म्हणून ज्यावेळी महाविद्यालयात आलो होतो, त्यावेळी असलेले महाविद्यालय आणि आता असलेले महाविद्यालय यामध्ये मोठा फरक पहायला मिळतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिकवताना, त्यांना घडवतांना प्राध्यापकांसमोर, महाविद्यालयाच्या प्रशासनासमोर आणि विशेषतः प्रशासनाचे प्रमुख म्हणून प्राचार्यासमोर येणाऱ्या अडचणी कमी नसतात. मोठ्या शहरात शाळा-महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना ऑप्शन नसते. विद्यार्थ्यांच्या परिस्थितीचा, त्याच्या कुटुंबाचा मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये विचार केला जात नाही. परंतु बीड शहरातील महाविद्यालयामध्ये हा सर्व विचार करावा लागतो आणि तो विचार के.एस.के.महाविद्यालयाने सातत्याने केलेला आहे. तो आजही केला जातो. हे मी स्वतः अनुभवलेले आहे. विद्यार्थ्यांना काय हवे, पुढची पिढी काय शिकणार आहे, स्पर्धात्मक युगात आपला विद्यार्थी टिकावा यासाठी सर्वच शिक्षण संस्था अथवा महाविद्यालये प्रयत्न करत असतात १९९० च्या दशकामध्ये मी ज्या सरस्वती भूवन शिक्षण संस्थेत शिक्षण घेत होतो, त्या शाळेतही हा विचार केला जात होता आणि त्याच समकक्ष कालावधीमध्ये बीडसारख्या ग्रामीण भागात असलेल्या के.एस.के. महाविद्यालयात देखील विद्यार्थ्यांच्या भावी विचारांचा, शिक्षणाचा विचारा केला जात होता हे आता स्पष्ट झाले आहे. कारण केवळ विद्यापीठाच्या पुस्तकातील शिक्षण देवून विद्यार्थी पदवी घेतील परंतु सार्वजनिक जीवन जगताना त्यांना सार्वभौमत्वाचे शिक्षण देणे आवश्यक आहे, हा विचार त्या-त्या पद्धतीने त्या-त्या काळात त्या-त्या आवश्यकतेनुसार स्व. काकूंनीही केला, तद्नंतर स्वतः अभियंता असलेले आणि शिक्षण संस्थेचे सर्वेसर्वा जयदत्त क्षीरसागरांनीही हा विचार केला. आजही महाविद्यालयाच्या आणि एकंदरीतच शिक्षण संस्थेच्या सर्वच महाविद्यालयात, विद्यालयामध्ये आवश्यक असलेले बदल करण्यामध्ये ते आग्रही असतात. व्यावसायिक शिक्षण देतानाच आपल्या भागातील विद्यार्थी इतर कुठल्याही क्षेत्रात मागे राहू नये, म्हणून कृषी, औद्योगिक, अन्नतंत्र, कला, वाणिज्य, विज्ञान, क्रीडा, औषधी, होमिओपॅथिक अशा अभ्यासक्रमांचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची उभारणी करून विद्यार्थ्यांना जे हवे ते देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. सौ.के.एस.के. महाविद्यालयामध्ये अलीकडे दहा-पंधरा वर्षामध्ये नाविन्यतेवर भर दिला जात आहे.

साहित्यिक मनाच्या संवेदनशील आणि ज्यांच्या कवितेमुळे मराठवाड्यात मराठी कविता बहरली, ज्यांच्या कवितांनी मराठवाड्यातील साहित्य क्षेत्राला नवा आयाम दिला अशा कवयित्री स्व. सुहासिनी इर्लेकरांच्या कन्या डॉ. दीपा क्षीरसागर यांनी ज्यावेळी महाविद्यालयाची सुत्रे हाती घेतली, तेंव्हापासून नाविन्यतेला सुरूवात झाली. यापूर्वीच्या प्राचार्यानींही मोठे योगदान दिलेले आहे. परंतु खऱ्या अर्थाने संस्थाचालक असलेल्या दीपाताईंनी जेव्हा प्राचार्यपदाची सुत्रे हाती घेतली तेंव्हा त्यांना महाविद्यालया मध्ये काय हवे आहे, काय नको आहे, हे पाहण्याचा अधिकार प्राप्त झाला. मराठवाड्यात नाट्य विभाग केवळ औरंगाबादेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठासह स्थानिक महाविद्यालयामध्येच होता.

आपल्या मातीतील कलाकारांना देखील त्यांचा कलाविष्कार दाखवण्याची संधी मिळाली आणि नवीन कलावंत तयार व्हावेत आणि बीडचे नाव उज्वल व्हावे या हेतूनेच स्वतः प्राचार्य डॉ. दीपाताईंनी पुढाकार घेवून महाविद्यालयात नाट्यशास्त्र आणि संगीत विभाग सुरू केले. या विभागातून शिक्षण घेवून गेलेले विद्यार्थी आज छोट्यामोठ्या पडद्यावर अधिराज्य गाजवत आहेत. काहीजण साहित्य क्षेत्रात नाव कमावून बसले आहेत. देशामध्ये अनेक क्षेत्रात बीडच्या के.एस.के. महाविद्यालयाचे विद्यार्थी आपली जबाबदारी

पार पाडत आहेत. बीडसारख्या शहरात असलेल्या के.एस.के. महाविद्यालयाला किती पुरस्कार मिळाले हे पहायचे असेल तर प्राचार्यांच्या कक्षामध्ये गेल्यावर खऱ्या अर्थाने महाविद्यालयाचे शैक्षणिक आणि विकासात्मक वैभव पहायला मिळते. केवळ शिक्षण घेवून विद्यार्थी बाहेर पडायला नको तर त्याचा सर्वांगिण विकास करून तो कुठल्याही क्षेत्रामध्ये पुढे जावा, समाजात वावरताना त्याला सामाजिक भान यावे, सार्वजनिक जबाबदारी यावी या दृष्टीनेदेखील महाविद्यालयातील विविध उपक्रमातून प्रयत्न केले जातात. मी पत्रकार म्हणून ज्या-ज्या वेळी महाविद्यालयात गेलो, त्यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर विद्यार्थ्यांना देखील महाविद्यालयाप्रति किती आपुलकी आणि आदर आहे हे मला नेहमीच जाणवले आहे. मराठी साहित्य संमेलन असेल, नाट्य संमेलन असेल, या उपक्रमातून केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर पालकांनाही विद्यालयातील शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या विकास केंद्राची अनुभूती देण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने सातत्याने केला आहे.

अंगणावरून घराची कळा... असे आपण नेहमी म्हणतो तसेच काही, मैदानावरून महाविद्यालय ओळखले जाते. के.एस.के. मध्ये विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना देखील मोठ्या प्रमाणावर वाव दिला जातो. त्याचबरोबर ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थीनींना शहरात इतरत्र राहण्याची अडचण निर्माण होवू नये म्हणून उभारले गेलेले मुलींचे वसतीगृह आणि शैक्षणिक अभ्यासक्रमांबरोबरच विद्यार्थ्यांना साहित्य वाचण्याची आवड निर्माण व्हावी, या वाचनातून सजग नागरिक तयार व्हावा, यासाठी भव्य असलेले ग्रंथालय हे तर महाविद्यालयाचे वैभवच म्हणावे लागेल. आगामी काळातही सुवर्ण महोत्सव साजरा करताना महाविद्यालयाने आपले विद्यार्थी राज्य लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये सर्वात पुढे कसे असतील यासाठी स्वतंत्र दालन उभे करावे अशी अपेक्षा व्यक्त केली तर नक्कीच पूर्ण होईल अशी आशा आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.दीपा क्षीरसागर या साहित्याने श्रीमंत आहेत, त्यामुळे त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थी देखील साहित्यिक आणि कवी मोठ्या प्रमाणात आहेत. नाट्य परिषदेच्या माध्यमातून केवळ विद्यार्थी घडवण्याचे काम महाविद्यालय करते असे नाही, तर शहर आणि परिसरातील नाट्यप्रेमी नागरिकांसाठी देखील महाविद्यालयाचे उपक्रम सातत्याने सुरू असतात. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि गुणवंतांची खाण निर्माण करण्यासाठी स्वतंत्र 'बीड पॅटर्न' कसा तयार होईल यासाठी आगामी काळात प्रयत्न व्हावेत एवढीच सुवर्णमहोत्सवी अपेक्षा.

*दिलीप खिस्ती*
बीड



शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये बॅडमिंटन क्रीड प्रकारात विद्यापीठीय पातळीवर विजयी ठरलेल्या संघासमवेत प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर, उपप्राचार्य मा.डॉ.आबासाहेब हांगे, डॉ.शिवानंद क्षीरसागर व इतर मान्यवर

भूगोल विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या भूगोल प्रदर्शनास भेट देताना सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री मा.शर्वरी जेमिनीस, समवेत न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर






भूगोल विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या भूगोल प्रदर्शनास भेट देताना मा.डॉ.सारिका क्षीरसागर समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



एन.सी.सी.च्या अंकुश बालाजी खराडे या विद्यार्थ्याची भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल अभिनंदन करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर समवेत इतर मान्यवर व एन.सी.सी. चा संघ



एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांना D.G., N.C.C. App ची माहिती देताना कॅप्टन मा.प्रा.बालासाहेब पोटे समवेत विद्यार्थी




विज्ञान मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत अवकाशातील तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन करताना मा.प्राध्यापक प्रकाश कोण्का समवेत, मंचावरील मान्यवर व प्रेक्षक




विज्ञान मंडळ व गणित विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय गणित दिवस कार्यक्रमाप्रसंगी उपप्राचार्य मा.डॉ.आबासाहेब हांगे, उपप्राचार्य मा.डॉ.शिवानंद क्षीरसागर व इतर मान्यवर

प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एक दिवशीय शैक्षणिक सहली दरम्यान अभ्यास पाहणी करताना विद्यार्थी. समवेत, विभाग प्रमुख मा.डॉ.अनिल शेळके





भौतिकशास्त्र विभागाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देताना न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर



भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 3D Printer Demo उपक्रमाप्रसंगी मंचावर मा.प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर

रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे माजी कुलगुरु मा.प्रा.आर.एस.माळी, समवेत, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ मा.डॉ.एन.पी.आरगडे, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर





रसायनशास्त्र विभागामार्फत शासकीय दूध संकलन केंद्र बीड येथे विद्यार्थ्यांनी भेट दिली. समवेत, प्रा.तोष्णीवाल प्रा.धारासूरकर, प्रा.नाईकवाडे व इतर मान्यवर




रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांच्या एक दिवशीय सहलीचे आयोजन एम.आय.डी.सी.बीड येथे करण्यात आले त्यावेळी समवेत, प्रशासक डॉ.राजा मचाले, प्रा.शिवलिंग लामतुरे, प्रा.सतीश माऊलगे, प्रा.सोनाजी गायकवाड व इतर मान्यवर

रसायनशास्त्र विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंमी मा.डॉ.एस.व्ही.पीलखाने, मा.डॉ.टी.के.चौंडेकर, मा.लिंबाजीराव झोडगे, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर







विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या एकदिवशीय शैक्षणिक सहलीदरम्यान पुणे येथील पिंपरी-चिंचवड विज्ञान केंद्रास भेट देताना विद्यार्थी समवेत, मा.डॉ.संतोष तळेकर, मा.डॉ.अनिल शेळके व मा.प्रा. सोनाजी गायकवाड व इतर मान्यवर



दि.२१ ते २३ जानेवारी २०१६ दरम्यान झालेल्या तीन दिवशीय राष्ट्रीय गणित चर्चासत्राचे उद्घाटन करताना मा.प्रो. राठोड, मा.प्रो.ज्ञानोबा धायगुडे, मा.प्रो.सोनटक्के, मा.डॉ.एम.डी.जहागीरदार, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर




दि.१ फेब्रुवारी २०१७ रोजी संपन्न झालेल्या १५ व्या विभागीय सेमीनार कॉम्पीटीशनच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर मा.प्रो. ज्ञानोबा धायगुडे, मा.प्रो.सोमय्या, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर, प्रास्ताविक करताना प्रा.शंकर राऊत व मंचावरील इतर मान्यवर



१५ ऑगस्ट २०२१ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य लक्षात घेऊन गणित विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना न.शि.संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर, विद्यार्थी व इतर मान्यवर

# २९. स्व. काकुंचा उद्देश सफल झाला...

## के.एस.के. केवळ महाविद्यालय नव्हे तर एक विद्यापीठच !

अतिशय दुर्गम जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्याची धूरा एका चौथी पास महिलेच्या हातामध्ये जाते आणि ती महिला उदात्त हेतू डोळयांसमोर ठेवून बीड जिल्ह्याची खऱ्या अर्थाने जडणघडण करते. विकास होत राहतो. गरज असते ती समाजाला दिशा देण्याची. आणि हेच काम बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारलेल्या एका महिलेने लिलया करून दाखवले. स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी नवगण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचे द्वार उघडले, आणि शेकडो पिढ्या प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले. ग्रामीण भागासाठी नवगण शिक्षण संस्था वरदान ठरली. हेच काम पुढे के.एस.के. महाविद्यालयाने पुर्णत्वास नेले. कारण या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणारा हा ग्रामीण विद्यार्थीच होता. आज या महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. लाखो विद्यार्थी घडवणाऱ्या या महाविद्यालयाला सलाम...! स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी १९७१ साली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवगण महाविद्यालयाची स्थापना केली. नवगण महाविद्यालय नेहमीच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपले वाटले. त्यांनी ते आपले समजले. यातूनच नवगण महाविद्यालय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांने नावारूपाला येवू लागले. शहरातील विद्यार्थ्यांसाठी बलभीम महाविद्यालय तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवगण महाविद्यालय हे ठरलेले होते. या महाविद्यालयात गेल्या ५० वर्षात कित्येक पिढ्या घडल्या गेल्या. लाखो विद्यार्थी या महाविद्यालयात आपले नशिब आजमावून मुख्य प्रवाहात मार्गस्थ झाले. कला, वाणिज्य, आणि विज्ञान या शाखेसह विविध कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दालने खऱ्या अर्थाने उपलब्ध झाली. ज्या उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मोठ्या शहराकडे जावे लागत होते, ते शिक्षण नवगण महाविद्यालयामध्ये मिळू लागले. या कॉलेजमधील प्राध्यापकांनी केलेली अपार मेहनत, अद्यावत प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरले. मेहनत करण्याची क्षमता असणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आकार देण्याचे काम या शिक्षण संकुलात झाले. कालावधी उलटत गेला तसा महाविद्यालयाने विकासाची कास धरली. सुरुवातीच्या काळात पत्र्याच्या शेडमध्ये भरणारे वर्ग अद्यावत इमारतीमध्ये सुरू झाले. हे महाविद्यालय इतर महाविद्यालयांशी स्पर्धा करू लागले. स्व. काकुंनी महाविद्यालयाच्या प्रगतीकडे जातीने लक्ष दिले. माझ्या भागातील विद्यार्थी येथे घडणार आहे, त्याच्या शिक्षणाशी तडजोड करणार नाही, जे शिक्षण त्या विद्यार्थ्यांना हवे आहे ते उपलब्ध करून देत काकूंनी ही संस्था तळ हातावरच्या फोडाप्रमाणे जपली, १९७१ साली शिक्षणाचा रचलेला पाया काळाच्या ओघात शिक्षणाचा वटवृक्ष झाला. लाखो विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा मंत्र गिरवला. पुढे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी या महाविद्यालयाला विस्तारले. डॉ. भारतभूषण क्षीरसागर, डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी कळस चढवला. नवगण महाविद्यालय म्हणजेच आजचे के.एस.के. महाविद्यालय होय. हे केवळ महाविद्यालय राहिले नाही तर खऱ्या अर्थाने एक विद्यापीठ झाले आहे. मुलभूत सुविधांपासून बौद्धिक भूक भागवणारी यंत्रणा महाविद्यालयामध्ये सज्ज झाली. आज या महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. ५० वर्षाचा दैदिप्यमान इतिहास नक्कीच अभिमानास्पद राहिला आहे.

*उदय जोशी*
बीड

# ३०. यशोगाथा

चाळीस वर्षांपूर्वीचा बीड जिल्ह्यातील शैक्षणिक विकास आणि आजचा शैक्षणिक क्षेत्रातील बीड जिल्हा याची तुलना केलीच तर आदर्श शिक्षण संस्था व नवगण शिक्षण संस्था यांच्या विस्तारीत कार्याने बीड जिल्ह्यात झालेला शैक्षणिक विकास दृष्टिक्षेपात येतो. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर यांनी त्या काळात जिल्ह्यातील शैक्षणिक गरज लक्षात घेऊन संस्थांचे जाळे विणण्याचा प्रयत्न केला. चाळीस वर्षापूर्वी नवगण राजुरी ग्रामपंचायतच्या सरपंच म्हणून त्यांनी राजकारणात प्रवेश केला आणि तेथून पुढे मागे वळून न पाहता जिल्हा परिषद, सहकार क्षेत्र, पंचायत समिती, मार्केट कमिटी, विकास बँक, आमदार आणि सलग तीन वेळा खासदारकी मिळवली. एक महिला दिल्लीच्या लोकसभेत जाऊन आपले कर्तृत्व साऱ्या देशाला दाखवू शकते ही धमक स्वर्गीय काकूंनी दाखवून दिली. बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणसाचा मुलगा उच्च विद्याविभूषित झाला पाहिजे या उदात्त हेतूने त्यांनी बीडमध्येच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात आपल्या संस्थेच्या माध्यमातून ठिकठिकाणी प्राथमिक शिक्षणापासून ते थेट पदवी शिक्षणापर्यंत सोय करून दिली. गामीण भागातील विद्यार्थ्यांना अल्प दरामध्ये उच्च शिक्षण मिळाले पाहिजे, हा स्वर्गीय काकूंचा मुख्य उद्देश होता. तसे पाहिले तर स्वर्गीय काकू यांचे कमी शिक्षण झालेले असले तरीही त्यांनी आपल्या कुटूंबातील प्रत्येकाला उच्च विद्याविभूषित सुसंस्कृत केले आहे. एक आदर्श गृहिणी, आदर्श माता, आदर्श पत्नी, आदर्श राजकारणी, आदर्श भगिनी, अशा सर्वच क्षेत्रात स्वर्गीय काकूंनी आपला नावलौकिक मिळवलेला आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे जेष्ठ सुपूत्र जयदत्त क्षीरसागर, नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर या संस्थेला बळकटी देऊन स्वर्गीय काकूंचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करताना दिसतात. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारसरणीशी स्वर्गीय काकू जोडल्या गेल्या होत्या. मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे, त्या स्वावलंबी झाल्या पाहिजेत अशी त्यांची धारण होती. त्यामुळे आपल्या संस्थेत मुलींसाठी त्यांनी स्वतंत्र शिक्षण व्यवस्था केलेली आहे. नवगण शिक्षण संस्था आणि आदर्श शिक्षण संस्था या दोन्ही संस्थांचे कार्य अत्यंत मोलाचे ठरू लागले आहेत. विविध विषयाचे शिक्षण देणारी ही संस्था बीड जिल्ह्यात नावारूपाला आली आहे. स्वर्गीय काकूंनी केलेले शैक्षणिक कार्य व्यापक आणि विशाल असे आहे. शिक्षण संस्थेची उभारणी केवळ शिक्षणच देण्यासाठी म्हणून नव्हे तर जीवन घडवण्यासाठी देखील आहे. आज हजारो कर्मचारी शिक्षण संस्थेत काम करत आहेत. त्यांना जगण्यासाठी एक नवी दृष्टी त्यांनी दिली आहे. समाजात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार अगदी खेड्यापाड्यापर्यंत त्यांनी पोहचवला हे त्यांचे कार्य त्यांच्या विद्येच्या निष्ठेमुळेच घडलेले आहे. आज जवळपास २०० च्या वर शाळा-महाविद्यालयांच्या शाखा असून त्याचा मोठा वटवृक्ष दिसतो आहे. कला, वाणिज्य महाविद्यालयाबरोबरच होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, मुलींसाठी डी.एड. कॉलेज आदि रूपाने या दोन्ही संस्थांनी शैक्षणिक वाटचाल यशस्वी करून दाखवली आहे. आज शैक्षणिक विकासात मराठवाड्यात बीड जिल्हा अग्रेसर आहे, या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून जवळपास चाळीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून शिक्षणाची दारे गोरगरिबांसाठी आणि गरजुंसाठी स्वर्गीय काकूंनी उघडे करून दिले आहे. बीड जिल्ह्यात ५५ माध्यमिक शाळा व दोन आश्रमशाळा याचबरोबर नवगण शिक्षण संस्था, आदर्श शिक्षण संस्था अंतर्गत चौसाळा, पाटोदा, तेलगांव, शिरूर आणि बीड या ठिकाणी महाविद्यालये स्थापन करण्यात आली असून अकरा कनिष्ठ महाविद्यालय आहेत. या सर्व शैक्षणिक क्रांतीमुळे स्वर्गीय काकूंची केवळ खासदार काकू म्हणूनच नव्हे तर शिक्षण महर्षी काकू म्हणूनही संपूर्ण देशाला ओळख झालेली आहे. गेल्या चाळीस वर्षात बीड जिल्ह्याची एक महिला राज्य आणि केंद्र सरकारच्या सभागृहात पोटतिडकीने बीड जिल्ह्याचे प्रश्न मांडून विकासासाठी पुढे आलेली आपण पाहिली आहे, त्यांनी लावलेले हे शिक्षणाचे रोपटे वटवृक्षाच्या स्वरूपात दिसत आहे.


*प्रशांत सुलाखे*

# ३१.बीडच्या सांस्कृतिक चळवळीचे केंद्रःके.एस.के. महाविद्यालय

गावातील महाविद्यालयाचे त्या गावच्या शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्वाचे असते. बीड शहराची ही गरज के.एस.के. महाविद्यालयाने सर्वार्थाने पूर्ण केली आहे. बीडला कलाकारांचा जिल्हा ही ओळख केवळ याच महाविद्यालयाने दिली आहे. अखिल भारतीय नाट्य परिषदेचे भव्यदिव्य नाट्यसंमेलन आयोजित करून ते यशस्वी करण्याची जबाबदारी के.एस.के. महाविद्यालयाने यशस्वीपणे घेतली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सोडले तर सर्वाधिक नाट्यकलावंत घडवणारे आणि नाट्य चळवळ सातत्याने सुरू ठेवणारे के.एस.के. हे एकमेव महाविद्यालय आहे. माझा अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने कॉलेजमध्ये जाण्याचा योग येतो, जेव्हा जातो तेव्हा कॉलेज विद्यार्थ्यांच्या उत्साहाने रसरसून गेलेले असते. कॉलेजची देखणी इमारत आणि विस्तीर्ण परिसर आपल्याला आकर्षून घेते. प्राचार्या डॉ. दीपाताई यांची आवर्जुन भेट होते, त्या स्वागतास सर्दव तत्पर असतात. आज या महाविद्यालयाला जे वर्तमान रूप आणि लौकिक लाभले आहे. त्याचे सर्वात आधी श्रेय जाते ते दीपाताईना. महाविद्यालयीन अभ्यासक्रम पूर्ण व्हावा यादृष्टीने त्या सतत कार्यरत असतात. परिणामी या महाविद्यालथाचा सर्वच शाखांचा निकाल हा अत्यंत चांगला असतो. या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी हे विविध क्षेत्रात आज उच्च पदांवर नावलौकिक मिळवून आहेत. असं एक क्षेत्र नाही की, तिथे के.एस.के. चा विद्यार्थी नाही. माझा जास्त संबंध येतो तो कॉलेजच्या नाट्यशास्त्र विभागाशी. इथे काही ना काही उपक्रम, प्रयोग चालू असतात. डॉ. संजय पाटील देवळाणकर यांच्यासारख्या निष्णात आणि उपक्रमशील विभागप्रमुखामुळे या विभागाने नाट्यक्षेत्रात बीडची ओळख निर्माण केली. या महाविद्यालयात ज्यांना प्रारंभी अध्यापनाची संधी मिळाली आणि नंतर जे इतर ठिकाणी गेले त्यांनी इथल्या अनुभवाच्या आणि प्रोत्साहनाच्या जोरावर मोठा लौकिक मिळवला आहे. मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांचा मराठी चित्रपट सृष्टीतदेखील दबदबा आहे. अर्थात यामागे त्यांना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन होते ते डॉ. दीपाताई क्षीरसागर यांचेच. याच नाट्यशास्त्र विभागाच्या वातावरण निर्मितीमुळे बीडला तत्कालीन पालकमंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर आणि नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी अत्याधुनिक असे यशवंतराव चव्हाण नाट्यगृह उभारले. अलीकडे तर महाविद्यालयात देखील भव्य ऑडिटोरियम उभारले असून येथे सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असते. यात जसे विद्यार्थ्यांना सामावून घेतले जाते, तसे बाहेरच्या कलावंतांनाही रंगमंच उपलब्ध करून दिला जातो. ललित कलांचे खऱ्या अर्थाने जतन आणि संवर्धन येथे केले जाते स्वतः डॉ. दीपाताईंचा सहभाग हा कलावंतांना प्रोत्साहित करीत असतो. स्व. सोनाजीराव क्षीरसागर आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचा परिक्षक म्हणून मी इथे दोन वेळा अनुभव घेतलाय. स्पर्धेसाठीचे दर्जेदार विषय आणि त्यात भाग घेणारी उच्च दर्जाची स्पर्धक मंडळी यांचे सुंदर सादरीकरण मी इथे अनुवले आहे. परीक्षकांना संपुर्ण मोकळीक देत निःष्पक्षपाती निकाल हे इथले वैशिष्ट्य ठरले आहे. परिणामी स्पर्धकांचा संख्यात्मक आणि गुणात्मक उत्साही सहभाग येथे दिसून येतो. प्रा.डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी महाविद्यालयात उपलब्ध करून घेतलेल्या सुविधांचा परिपूर्ण वापर विद्यार्थी तर करतातच पण याच सुविधा शक्य तेव्हा आणि आवश्यक तेव्हा बीडच्या अन्य कलावंतासाठी खुल्या करण्याचे औदार्य या महाविद्यालयाने दाखवले आहे. विशेष म्हणजे डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी त्यांच्या मातोश्रीने म्हणजेच ज्येष्ठ कवयित्री स्व. डॉ. सुहासिनीताई इर्लेकर यांनी लावलेल्या मराठी

नाट्यपरिषदेच्या बीड शाखेच्या वृक्षाचे रूपांतर वटवृक्षात केले आहे. आज दीपाताई या नाट्य परिषदेच्या प्रदेश कार्यकारिणीत महत्वाच्या पदावर सक्रियरित्या कार्यरत आहेत. नाट्य परिषद सदस्य म्हणून डॉ. संजय पाटील देवळाणकर देखील कार्य करतात. नाट्य परिषदेच्या विविध उपक्रमांची रेलचेल रंगमंच सतत झगमगता ठेवण्यात यशस्वी झाली आहे. याचे श्रेय अर्थात के.एस.के. महाविद्यालय आणि प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांचेच. या महाविद्यालयात संगीत विभाग देखील कार्यरत असून प्रारंभी येथे डॉ. लक्ष्मीकांत सहकारी यांच्यासारखे ज्येष्ठ गायक कलावंत अध्ययन करून गेले. सध्या ते गोव्यात कार्यरत आहेत. पण त्यांनी इथे विद्यार्थी घडवण्याच्या दृष्टीने छान वातावरण निर्मित केली होती. डॉ. सुरेखा रत्नपारखी या इथे आता कार्यरत आहे. संगीत विभागाच्या ॲक्टिव्हीटी अधिक वाढवाव्यात आणि जशी या महाविद्यालयाने बीडमध्ये नाट्य चळवळ रूजवली. विस्तारली, स्थिर केली तशी सांगितीक चळवळ देखील गतिमान करावी अशी माझी या क्षेत्रातील एक कार्यकर्ता म्हणून या महाविद्यालयाकडून आणि अर्थात डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्याकडून पूर्ण होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. हे महाविद्यालय उभारणारी नवगण शिक्षण संस्था स्व. केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांनी स्थापन केलीय. विचार करा पन्नास वर्षांपूर्वी असा विचार मनात आणून तो पूर्ण करण्यासाठी त्या मायमाऊलीला किती मेहनत घ्यावी लागली असेल. उगीच काकूंना लोकनेता नाही म्हटलं जात. दूरदृष्टी आणि ते पूर्ण करण्याची अफाट क्षमता काकूंमध्ये होती. दिल्लीत आणि मुंबईत त्या लोकप्रतिनिधी म्हणून केवळ मिरवल्या नाहीत तर आपल्या विधायक दृष्टीने त्यांनी प्रत्येक क्षण हा सर्वसामान्य आणि वंचित उपेक्षित समाजाच्या कल्याणसाठी व्यतीत केला. हे भले मोठे सुसज्ज महाविद्यालय उभारून त्यांनी गोरगरिबांच्या मुला-मुलींना शिक्षणाचे द्वार खुले करून दिले. यावर कळस चढवला तो जयदत्त आण्णा क्षीरसागर आणि डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी. संस्थेने आणि महाविद्यालयाने आज जे वटवृक्षाचे स्वरूप घेतले आहे त्याला या क्षीरसागर बंधुचे अथक परिश्रम आहेत. ज्यातून अर्थार्जन करता येईल असे शिक्षणक्रम न आणता ज्यात अधिकाधिक सर्वसामान्य विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतील असे शिक्षण या संस्थेने, महाविद्यालयाने उपलब्ध करून दिले आहे. आणि इथे कोणत्याही शिफारशीशिवाय प्रवेश मिळतो हे विशेष. आज या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रात नावलौकिक मिळवून महाविद्यालयाची कीर्ती अधिक द्विगुणीत केली आहे. इथे जे जे केले जाते ते दर्जेदारच, मी के.एस.के. महाविद्यालयात शिकलोय हे सांगताना म्हणून अनेकांना अभिमान वाटतो.

महेश वाघमारे, बीड



# ३२. 'आदर्श' महाविद्यालय !

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पन्नास वर्षापूर्वी नवगण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी के.एस.के. महाविद्यालयाची स्थापना केली. अवघ्या २१५ विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या या महाविद्यालयाने अनेक दशकातील उन्हाळे पावसाळे डोक्यावर घेऊन यशस्वी वाटचाल केली आहे. पन्नास वर्षापूर्वी लावलेलं एक छोटसं रोपटं आज एक विशाल आणि विस्तीर्ण वटवृक्ष म्हणून उभे आहे. या वटवृक्षाच्या ज्ञानरूपी छायेखाली अनेक पिढया संस्कारक्षम बनल्या आहेत. आज या वटवृक्षाची ज्ञान कक्षा एवढ्या मोठ्या प्रमाणावर विस्तारली गेली आहे की, नामांकित महाविद्यालय म्हणून ओळख निर्माण झाली आहे. शैक्षणिक क्रांतीचा हा सुवर्ण महोत्सव खरोखरच ५० वर्षाच्या खडतर संघर्षमय आणि जिद्दीच्या प्रवासाचा साक्षीदार म्हणावा लागेल.

नवगण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी गाव-खेड्यातील गोरगरिबांची मुले शिकली पाहिजेत या उदात्त हेतूने के.एस.के. कॉलेजची स्थापना १९७१ साली केली. त्यांच्या उदात्त हेतूमूळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची इच्छा बीडमध्येच पूर्ण झाली. महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुणे, मुंबई, लातूर अशा ठिकाणी जावे लागे, मात्र काकूंनी सर्वांच्याच शिक्षणाची सुविधा के.एस.के. मध्येच उपलब्ध केली. पन्नास वर्षाच्या कालावधीत अनेकदा संघर्ष करावा लागला, खडतर प्रवासातून मार्ग काढत पुढे यावे लागले, जिद्दीने प्रत्येक संकटावर मात केली. म्हणूनच या पन्नास वर्षात अनेक पिढ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्याचे भाग्य या महाविद्यालयाच्या माध्यमातून गुरूजनांना मिळाले, केवळ २१५ विद्यार्थी क्षमता असलेल्या महाविद्यालयाची सुरूवात केल्यानंतर कॉलेज कसे चालवायचे, व्यवस्थापन कशा पद्धतीने करायला हवे, मुली शहरात शिकायला येतील का, अपेक्षित संख्या होईल की नाही, असे अनेक प्रश्न पडणे सहाजिक होते. तशाही परिस्थिती किंतू परंतु न करता स्व. काकूंनी कॉलेज सुरू करायचे म्हणजे सुरू करायचेचं, हा निर्धार करत ते काम करूनच दाखवले. बीड शहरामध्ये कॉलेज नसताना काकूंनी ते सुरू केले. टिकवले, त्यातून हजारो विद्यार्थी घडविले आणि त्याला नावारूपाला आणले. यामध्येच स्व.काकूंचा संघर्ष दडलेला आहे. माझ्या गावातील, तालुक्यातील आणि जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी कोसो दूर जाण्याची गरज पडू नये म्हणून के.एस.के. महाविद्यालयाची स्थापना झाली. आज महाविद्यालय एका विशिष्ट उंचीवर नव्हे यशोशिखरावर पोहोचले आहे.आतापर्यंत हजारो शिक्षकांनी याच महाविद्यालयाच्या माध्यामातून लाखो मुला-मुलींना संस्काराचे धडे दिले. बहुशाखीय महाविद्यालय चालविताना प्रत्येक वेळी करावी लागणारी कसरत आणि त्यातूनही मार्ग काढत ते यशस्वी करून दाखवण्याची किमया महाविद्यालय व्यवस्थापनाकडे आहे. प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी स्व. काकूंचा शैक्षणिक विचारांचा वारसा आणि वसा जोपासत अखंडपणे कायम ठेवण्याचा केलेला निर्धार आजही महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा साक्षीदार ठरायला लागला आहे. प्रशासन चालवण्याची हातोटी, प्रचंड अभ्यास आणि वक्तृत्व कौशल्यावर असलेली मजबूत पकड यामुळे दीपाताईंनी अल्पावधीतच महाविद्यालयाला नॅकचा 'अ' दर्जा मिळवून दिला.जिल्ह्यातील एक नामांकित महाविद्यालय म्हणून के.एस.के. कॉलेजचा उल्लेख प्राधान्याने होतो. पन्नास वर्षाच्या कालावधीत या महाविद्यालयाच्या माध्यमातून शैक्षणिक क्रांती घडली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

चंदन पठाण

# ३३. विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशले...

## के.एस.के.मधील पंडित ऱ्हदयनाथ मंगेशकरांची संस्मरणीय मैफि ल

ज्ञानेश्वर माऊलींचे शब्द आणि पंडित ऱ्हदयनाथ यांची वाणी असा अप्रतिम योग के.एस.के. महाविद्यालयांमुळे आला २००४ मध्ये झालेला हा कार्यक्रम मला नुसता आठवत नाही तर माझ्यासाठी तो संस्मरणीय ठरला. त्यादिवशी कार्यक्रम आहे म्हणून कळाल्यानंतर मी लगेच गेलो पंडित ऱ्हदयनाथ मंगेशकर आणि सावरकर यांचे कौटूंबिक ऋणानुबंध होते सावरकरांच्या अनेक कवितांना ऱ्हदयनाथांनी चालबद्ध केलेल आहे. मंगेशकर कुटूंबासाठी सावरकर हा श्रद्धेचा आणि प्रेरणेचा विषय आहे.

सावरकरांचे गाणे आकाशवाणीवरून म्हणाले म्हणून ऱ्हदयनाथ मंगेशकरांची नोकरी गेली होती. त्यामुळे त्यांना भेटण्याची ओढ मला लागली होती. महाविद्यालयाच्या गेटमधून आतमध्ये जात असताना माऊलींचे शब्द ऱ्हदयनाथांच्या सुरावटीतुन परिसरात चैतन्य निर्माण करत होते विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशले.. अवघे चि जालें देह ब्रम्ह या अभंगाने परिसर भक्तिमय भारून गेला होता. माणुस आणि त्यांचे मन हा ज्ञानेश्वर माऊलींच्या चिंतनाचा विषय आहे. त्यांची माणसाबद्दलची आस्था, जीवनदृष्टी आणि जगण्याचे प्रयोजन हे सारे यातून स्पष्ट होते. व्यासपीठावर ऱ्हदयनाथ मंगेशकरांचा सोबत त्यांच्या कन्या राधा मंगेशकर या होत्या. ऱ्हदयनाथ फ ारसे मराठी चित्रपटांमध्ये रमले नाहीत परंतु जे काही मोजक्या मराठी चित्रपटांना त्यांनी संगीत दिलं त्यातील काही निवडक गाण्यांच्या आठवणी त्यांनी सांगितल्या, एका पंजानी गाण्यावर मराठी गाणे कसे बेतले आहे हे सांगत असताना "जांभुळ पिकल्या झाडाखाली" या गाण्याचे उदाहरण त्यांनी दिले. ऱ्हदयनाथांनी त्यांनी स्वरबद्ध केलेल्या अनेक सुरेल रचना सादर केल्या आणि रसिकांना मंत्रमुग्ध केले कार्यक्रम संपल्यानंतर प्रा.डॉ. दिपाताई क्षीरसागर यांच्या केबिनमध्ये ऱ्हदयनाथ यांना भेटलो प्राचार्यांनी परिचय करून दिला. सावरकर विषयांवर छोटासा संवाद झाला आणि मी धन्य झालो. के.एस.के. महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागामुळे अलिकडच्या काळात बीड करांना अनेक दिग्गज कलावंताची कला अनुभवायला मिळाली. नाट्यसंमेलन बीडला झाले तेव्हा या सर्व आयोजनात के.एस.के.ची टीम आघाडीवर होती. वेगवेगळया मंचावर विविध कार्यक्रम एकाच वेळी सादर केले गेले. हा ही अनुभव अगदी संस्मरणीय आहे.

के.एस.के. महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने प्रतिवर्षी नाट्यमहोत्सव होतो. बालनाट्य प्रशिक्षण.शिबीर होते, अनेकदा कार्यक्रमांना जाण्याचा योग आला. नाट्यशास्त्र विभागाने सादर केलेल्या 'उचल' 'धुमस' 'मनवा' या एकांकिकेने अनेक उच्चांक प्रस्थापित करत महाराष्ट्रातल्या विविध स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळविली. महाविद्यालयाने अनेक कलाकार घडवले संगीत आणि नाटक या दोन्ही कलांना प्रोत्साहन देण्याचे काम नेहमीच होत राहिले आहे. बीडच्या संस्कृतीत चळवळीमध्ये या विभागाचें भरीव योगदान आहे हे विसरून चालणार नाही नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय देवळाणकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाटक आणि संगीत क्षेत्रातील तरूण पिढी घडत आहे.

**डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर**
बीड

# ३४. काकूंची ज्ञानोत्री : नवगण एक अध्याय

गावाकडच्या पोरांना शहर कॉलेज याचे प्रचंड आकर्षण...२000 च्या साली तर अधिकच, शनिवारच्या चित्रपटात पाहिलेले कॉलेज जीवन आणि त्यातले सप्तरंग पाहून कधी ती एकदा दहावी निघते याची वाट पाहणारे आम्ही २00१ ला नाळवंडी ते बीड सिटीबसमध्ये बसलो हा संगमेश्वर विद्यालयामध्ये चौथ्या क्रमांकावर उत्तीर्ण होऊन ६७ टक्के घेऊन प्रमाणपत्र सौ. केशरकाकू क्षीरसागर महाविद्यालयात ११ वीत आलो के.एस.के. नावाने प्रचलित असलेल्या या महाविद्यालयात दाखल होताना पाठीवर जबाबदारीचे ओझे छातीवर शहरी दडपण, छातीच्या खाली पोटात भूक आणि डोळ्यात स्वप्न घेऊन आम्ही बीडमध्ये पहिले पाऊल टाकले, खेड्यातून आलो म्हणजे आर्ट, कला शाखेलाच आम्ही येणार, सरकारी दवाखान्यासमोर सिटी बस थांबायची आणि तिथून पायी आम्ही यायचो, मला आज ही आठवते गाडे सर नावाचे राज्यशास्त्र शिकवणारे प्राध्यापक, ४५ मिनिटाचा पहिला तास, कांबळे सर इतिहास आणि पाटील सर समाजशास्त्र, प्राचार्य होत्या डॉ. दिपाताई क्षीरसागर, दिपाताई म्हणजे अत्यंत शिस्तप्रिय त्या काकूंच्या सून आहेत म्हणून त्यांचा दरारा अधिक असावा असे वाटायचे, त्याकाळी हेरकर नावाचे उपप्राचार्य अगदी कडक शिस्तीचे, गावाच्या बाहेरचे जग पाहताना पहिले पाऊल नवगण नावाच्या संकुलात पडले, आयुष्य समजून घेताना भविष्य घडवत असताना संघर्षाचे क ख ग याच महाविद्यालयात शिकलो आज काळाच्या नावाने फिफ्टी साजरी करणारे हे ज्ञानसंकुल बीडच्या मातीचे ज्ञानपीठ, बहिणाबाई कुठल्या वर्गात गेल्या नाहीत मात्र त्यांनी लिहिलेली कविता पदवीधरांना अभ्यासाला असते, आमच्या संत परंपरेत केवळ भक्तीने साधलेली सिद्धता कमी नाही, म्हणूनच कि काय लोकनेत्या काकू आमच्या जिल्ह्याच्या सरस्वती आणि सावित्रा ठरतात, स्वतः चौथी पर्यंत शिक्षण घेतलेल्या या नियतीच्या लेकीने आपला मावळ उच्च विद्याविभूषित व्हावा म्हणून आदर्श आणि नवगण ही संकुले आपल्या सामाजिक दायित्वातून जन्माला घातली, त्याचे लालन पालन करून पुष्अ करून या संकुलातून सदृढ बालके ज्ञानवंत गुणवंत व यशवंत झाली. आजवर १० पिढ्या घडवण्याचे पुण्य ज्या सुंलाचे आहे त्या संकुलाचा मी विद्यार्थी होतो, हा माझा नियतीने केलेला गौरव आहे. मी अकरावीला असताना दिपाताई प्राचार्या, माझ्या गावच्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये प्रवचन देण्यासाठी त्या आलेल्या, ज्ञानोबाच्या पसायउान वर त्यांनी दिलेले विवेचन आणि प्रबोधन आजही माझ्या स्मृतीच्या पटलावर शाश्वत जिवंत आहे. माझ्या प्राचार्या म्हणून त्या वेळी किती हुरळून गेलो, पसायदानावर बोलेलेल्या महाराज माझ्या प्राचार्या हे सांगताना मी अगदी आनंदित झालेलो, संत व संस्कृती विचार घेऊन दिपताईने केवळ परीक्षेत सिद्ध होणारी पिढी नाही घडवली तर संस्कारांची वेल म्हणून नवगण या रोपट्याच्या वटवृक्ष उभा करण्यात मोठी भूमिका दिलेली आहे.

आदर्श अशा संकुलाने गुणवान खोप दिली आहे आम्हाला हे कायम अभिमानाने सांगावे लागेल, काकूंनी बीजारोपण केलेला हा वटवृक्ष येणाऱ्या अनेक पिढ्यांना अखंड अभंग ज्ञानछाया देईल यावर कुठली शंका नाही.

भागवत तावरे



# ३५. महाविद्यालयीन जीवन

सन २०१३-१४ ला बारावी पास होऊन बीड जिल्ह्याचे नामांकित महाविद्यालय सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी.एस्सी. प्रथम वर्षात प्रवेश घेतला. अतिशय सुसज्ज महाविद्यालय मला पहिल्यांदाच पहायला मिळत होते. अत्याधुनिक सुविधा पहायला मिळत होत्या आणि हे माझ्यासाठी नवीनच होते. याआधी मी कुठेही शहरी भागात फि रलेला नव्हतो. एकंदरीत शहरी वातावरणाची मला भिती वाटत असायची, परंतु महाविद्यालयात जास्त ग्रामीण भागातील विद्यार्थी घडताना दिसत होते, ही माझ्यासाठी कौतुकाची बाब होती. जेव्हा महाविद्यालयात जायला लागलो, त्यावेळी लक्षात आले की, तिथे सर्वांना समान वागणूक आहे. खरं तर महाविद्यालय म्हटले की, नवीन जीवनाला कलाटणी देणारे एक कुटूंबच म्हणावे लागेल. पुन्हा त्यात जर अतिशय सुंदर पद्धतीने विद्यार्थी घडवणारे मार्गदर्शक जर असतील तर सोने पे सुहागा म्हणावा लागेल. आणि तसे महाविद्यालय म्हणजे सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बीड.

कॉलेज शिस्तप्रिय, अनुभवी प्राध्यापक, विशेषतः कॉलेजच्या प्राचार्या आदरणीय डॉ. दीपाताई क्षीरसागर ह्या अतिशय संयमी हसतमुख, संवेदनशील, उपक्रमशिल आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेला आत्मविश्वास अप्रतिमच. त्या सर्वांना समान संधी व समान वागणूक देतात. ना कुठली इर्षा ना कुणाचा द्वेष. फक्त प्रेमच हे आमच्या लाडक्या प्राचार्यांचे विशेष.

या महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय, तसेच असा नाट्यशास्त्र विभाग आहे. त्यात सर्वांना संधी दिली जाते. आणि विविध कलाकार या विभागातून घडलेले आहेत. या विषयाला अनुसरून आदरणीय प्राचार्य डॉ. दीपाताई यांनी हिवाळी, उन्हाळी नाट्य शिबीरं राबवत आहेत. त्यात ज्याच्याकडे जी कला आहे ती प्रसिद्ध करण्याची संधी त्या देतात.

विशेषतः महाविद्यलयात ना जाती ना पाती न धर्म ना वर्ण या पलिकडची भूमिका म्हणजे धर्मनिरपेक्षता. आदरणीय प्राचार्य ह्या गोष्टीची विशेष काळजी घेतात. म्हणून हे महाविद्यालय शिक्षण, व सांस्कृतिक कलेच्या बाबतीत अव्वल आहे. प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी महाविद्यालयमध्ये ज्या गोष्टी निर्माण केल्या त्या नक्कीच कौतुकास्पद आहेत. मुलींसाठी समानतेची वागणूक दिली जाते. तसेच मुलींना सक्षम करण्यासाठी वेगवेगळ्या कार्यशाळेचे प्रशिक्षण शिबीरेही या महाविद्यालयात राबविली जातात.

या महाविद्यालयामध्ये मी विज्ञान शाखेचा विद्यार्थी म्हणून शिक्षण घेतले. त्यात भौतिकशास्त्र या विषयामध्ये आम्हाला रस होता. आणि आमच्या विभागाचे प्रमुख डॉ. शिवानंद क्षीरसागर डॉ. प्रज्ञा महेशमाळकर मॅडम यांच्या सानिध्यात खुप काही शिकायला मिळाले. डॉ. प्रज्ञा मॅडम अतशय शांत आणि संयमी आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांना न रागावता समजून सांगण्याची त्यांची पद्धत अफलातून आहे. मॅडम विषयी बोलताना शब्द कमी पडतात कारण तीन वर्षात त्यांनी प्राध्यापक म्हणून जी भूमिका घेतली आणि विद्यार्थ्यांना आपलेसे करून घेतले, नियमित प्रॅक्टीकल, दररोजचे सातत्य आणि संयमता ही मॅडम कडून शिकावे लागते.

या महाविद्यालयात अतिशय सुंदर असा एन.एस.एस. विभाग असून यामध्ये विद्यार्थी कसे घडतात याचे सुंदर दर्शन घडते. राष्ट्रीय सेवा योजना विभाग यालाच म्हणतात आणि प्राचार्य मॅडम स्वतः एक सामाजिक कार्यकर्त्या असून, त्यांनी जे विद्यार्थी घडवले आज ते वेगवेगळया क्षेत्रात कार्यरत आहेत.

नितीन गायकवाड

# ३६. मोबाईल आणि माणूस

भारत माझा देश आहे, असे आपण नेहमी म्हणत असतो. परंतु या भारत देशाची आणि या देशाच्या इतिहासाची जाणीव कोणाला आहे का ? या देशाचा हा संघर्षवादी असा इतिहास आहे, अनेक क्रांतिविरांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन तसेच, महापुरूषांनी आपलं हित न पाहता या देशातील जुन्या रूढी, परंपरा जाती-भेद असे अनेक आजार मुळापासून नष्ट करण्यासाठी या महापुरूषांनी संघर्ष केला. मनुष्याला माणूसकीची जाणीव करून दिली, शिक्षणाचा प्रसार केला. परंतु आज कोणालाही या महान वीरांच्या संघर्षाची जाणीव राहिलेली नाही. शालेय शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत इतिहास हा विषय शिकवला जातो, परंतु काय या इतिहासाची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली जाते का ? नाही. असे माझे मत आहे, कारण इतिहासाची जाणीव विद्यार्थ्यांना झाली असती, तर इतिहास विषय बोर वाटला नसता. आज प्रत्येक विद्यार्थी हा इतिहास विषय शिकवताना लक्ष देईलच असं होत नाही, त्याला इतिहासाची जाणीवच करून दिली जात नाही, तर त्याला आपला भारत देश आणि या देशाचा इतिहास समजवणार कसा ? आज भारत देशाचे लोक डॉक्टर झाले, अभिनेता, अभिनेत्री झाले, मंत्री झाले, शिक्षक-शिक्षिका झाले, कोणामुळे असे त्यांना विचारले असता, ते मोठ्या मानाने म्हणतात, माझ्या आई-वडिलांमुळे, देवांमुळे, किंवा माझ्या मेहनतीमुळे परंतु त्यांना हेच माहित नाही की, छत्रपती शिवाजी महाराज, महान शिक्षक सानेगुरूजी, फुले, शाहू, आंबेडकर तसेच माता जिजाऊ, माता सावित्रीबाई, माता रमाबाई, आदि महान लोकांनी शिक्षणांसाठी आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष केला नसता तर आपण शिकू शकलो असतो काय ? उंच मानाने या जगात जगू शकलो असतो काय, या देशात शिक्षणाचा प्रसार झाला असता का ? या सर्व गोष्टीचा कोणी विचार देखील नाही करत.

मोबाईल फोनचा जन्म झाला, आणि जगात मोठी संपर्कक्रांती झाली. भारतात तर बघता-बघता गरीबश्रीमंत, मालक, कामगार, स्त्रीपुरूष सर्वांच्याच कानाला मोबाईल लागला. कारण त्याचा उपयोगच तसा होता. पण या उपयुक्त मोबाईलचा दुरूपयोगही सुरू झाला. सार्वजनिक ठिकाणी मोठमोठया आवाजात त्यावरून बोलणे, अश्लिल एसएमएस पाठविणे, वाहने चालविताना अपघात होण्याची तमा न बाळगता त्याचा वापर करणे, त्यामुळे मोबाईल जितका उपयुक्त ठरला, तितकाच उपद्रवीही ठरला. तेव्हा मोबाईल कसा वापरावा, त्यावर कसे बोलावे, याबद्दल तुम्हाला काय वाटतं ? मोबाईलमुळे जगात क्रांती झाली हे खरंय, तसं बघितलं तर मोबाईल वरदान ठरावा. कुठेही कधीही आपल्याला आपला माणसांना मित्रपरिवारांना आणिबाणीच्या वेळी महत्वाच्या कामासाठी मोबाईलमुळे संपर्क साधता येतो, आता मोबाईल सर्व माणसातील महत्वाची वस्तू ठरत आहे. एकविसाव्या शतकात वावरत असताना असे एक माध्यम निर्माण झाले आहे की, ज्यामुळे माणूस एकमेकांच्या संपर्कात राहू शकतो. ते माध्यम म्हणजे मोबाईल. तो पुर्वीच्या काळात एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी पत्राचा उपयोग केला जायचा, पण या आजच्या काळात मोबाईल व अन्य माध्यमांमुळे, आपण लगेच संपर्क साधू शकतो. तसेच मोबाईल मध्ये फक्त संपर्कच नाही तर त्यामध्येही एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी आणखी माध्यमे निर्माण करण्यात आले आहेत. उदा. व्हाट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम, इ. मोबाईल आपल्यातील प्रत्येकासाठी दररोजची गरज बनली आहे. परंतु अनेकदा असा विचार येतो की, मोबाईल नसल्यास आपले जीवन कसे होईल. मोबाईलमुळे आपले जीवन सोपे झाले आहे तसेच आपण कुठल्याही प्रकारची माहिती कधी पण मिळवू शकतो व कधीही कोणालाही कॉन्टॅक्ट करू शकतो. थोडक्यात मोबाईल माणसांची मुलभूत गरज बनत चालला आहे.

कविता गोले

## ३७. माझ्या आठवणीतील के.एस.के.कॉलेज

मी मूळचा पेंडगाव ता.जि. बीड येथील रहिवाशी असून अत्यंत गरीबीत व हालाखीच्या परिस्थितीमधून संघर्ष करत स्वतःचे अस्तित्व निर्माण केले आहे. यामध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयाचा मोलाचा वाटा आहे. माझा जन्म १.६.१९६१ रोजी आई सौ. नानीबाई व सोपानराव जाधव यांच्या पोटी झाला. माझे ७ वी पर्यंतचे शिक्षण पेंडगाव जि.प. शाळेत झाले. नंतर पुढे ८ वी व ९ वी पर्यंतचे शिक्षण स्व. काकूंनी स्थापन केलेल्या कामखेडा हायस्कूल कामखेडा येथे झाले. आमचे चुलते कै. सुदामराव जाधव हे कन्नडला कॉलेजमध्ये प्राध्यापक असल्यामुळे मला जि.प. शाळा कन्नड जि. औरंगाबाद येथे १० वी साठी नेण्यात आले. तिथे मी ६९% मार्कस् घेवून १० वी उत्तीर्ण झालो. परंतु काकांचे लग्न झाले अन् आम्ही पुन्हा ११ वी साठी बीडला आलो.

परिस्थिती बिकट होती. तरीही शिक्षणाची वाट धरली. पण शिकावे कोठे व कसे हा प्रश्न होताच. गरीबांसाठी व त्यांच्या पाल्यांसाठी स्व. काकूंनी स्वतःला वाहून घेतले होते. त्यावेळेस नवगण कॉलेज पत्र्याच्या शेडमध्ये व अर्धवट बांधकामामध्ये सुरू झाले होते. मी सन १९७७ ला ११ वी च्या वर्गात प्रवेश घेतला. स्व. प्रा. बेग सर हे माझे काका सुदामराव जाधव यांच्या ओळखीचे होते. त्यामुळे जरा भिती कमी झाली पुढे मोठ्या विद्यापीठाची ओळख झाली. इंग्रजीचे खान सर,झुलॉजीचे काझी सर, रसायनशास्त्राचे तोष्णीवाल व धारासूरकर, भौतिकशास्त्र चिडगोपकर व केंद्रे सर हे होते. खान सरांचे एक वाक्य आजही आठवते... काझी सरांनी त्या दिवशी सर्वांना काही प्रश्न विचारले व ज्यांनी कॉपी करून मार्क्स मिळवले असतील त्यांना पुढे अभ्यासाला लागा असा धमकीवजा संदेश दिला. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे हसून स्वागत केले. दिवसभर प्रॅक्टीकल व कॉलेज असा दिनक्रम पुढे सुरू झाला. श्रीमंत विद्यार्थी कॉलेजनंतर घरी जात असत पण माझ्यासारखे गरीब विद्यार्थी ७५ पैसे प्रति तास या दराने दररोज ७ तास कमवा व शिका या योजनेत काम करत असत. दर महिन्याला आमचे पेमेंट होत असे,व आम्हाला आर्थिक हातभार लागत असे. अशाप्रकारे कमवा व शिका या योजनेतून शिक्षण घेवून मी १९८२ साली नवगण कॉलेजमध्ये बँकेची परीक्षा दिली,परीक्षेस १००० विद्यार्थी बसले होते त्यापैकी आम्ही तीनच विद्यार्थी पास झालो व मी १९८३ मध्ये नोकरीस लागलो. पुढे २०१३ साली बँकेचे विलीनीकरण झाले व सध्या मी मॅनेजर या पदावरून निवृत्त होवून निवृत्तीचे जीवन जगत आहे. मजूर ते मॅनेजर असा आजपर्यंतचा माझा प्रवास झाला. पुढे मॅनेजर ते मिनिस्टर असे उर्वरित स्वप्न उराशी बाळगून मी वाटचाल करत आहे. काकूंचे आशीर्वाद व माझ्या आई-वडिलांची पुण्याई व गजानन महाराजांच्या कृपेने तेपण पूर्ण होईल अशी मी खात्री बाळगून आहे. पुढे बँकेत लागल्यावर १९८७ साली बँकेच्या एका धरणे आंदोलनासाठी प्रथम दिल्लीला जाण्याचा योग आला होता. तेथे पण काकूंच्याच घरी आम्ही थांबलो होतो. तेव्हा काकूंनी अगदी चांगले जेवण देवून ३ दिवस आम्हाला आश्रय दिला होता. एकदा रात्री गप्पा मारत असताना काकू त्यांच्या फाटलेल्या साडीच्या पदराला स्वतः शिवत बसल्या होत्या. तेव्हा एक खासदारसुद्धा किती चिकाटीने संसार करते याचा अनुभव मी प्रत्यक्ष घेतला. त्या एक दिवस अगोदर बीडला निघताना त्यांचे स्विय सहायक श्री कानडे यांना माझी काळजी घेण्याचे सांगण्यास विसरल्या नाहीत. याचे मला कौतूक वाटते. पुढे माझे राजकीय गुरू श्री जयदत्तजी क्षीरसागर साहेब यांच्याशी माझा संबंध आला व एक विश्वासू साथी व खंबीर नेतृत्व व जेष्ठ मित्र व मार्गदर्शक या नात्याने ने माझ्याशी नेहमी वागले यातच मला समाधान आहे. योग्यवेळी मला राजकीय संधी देणे ही भावना त्यांच्या ऱ्हदयी आहे. याची मला मनोमन जाणीव आहे. त्याकाळचे माझे नवगण कॉलेज मधील वर्गमित्र व आताचे जेष्ठ नागरिक डॉ. मुकूंद पैठणकर व राजू मचाले व मी साहित्यिक गप्पा मारत असत. राजू मचाले माझी थट्टा मस्करी करत असत. असे ते दिवस होते. माझे ११ वी चे शिक्षण के.एस.के. कॉलेजला पूर्ण झाले. पुढे मी व मुकूंद पैठणकर यांनी १२ वीला बलभीम कॉलेजला प्रवेश घेतला व माझे पुढचे शिक्षण तेथेच झाले. आत कॉलेजची स्वतःची भव्य इमारत आहे सर्व परिसर चांगल्याप्रकारे नटलेला आहे. जयदत्त आण्णा व डॉ. भारतभूषण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी कॉलेजची चांगल्याप्रकारे प्रगती केली आहे. त्याबद्दल अभिमान वाटतो. याप्रसंगी माझ्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...

अंबादास जाधव

# ३८. भरभरून देणारे के.एस.के. महाविद्यालय...

माझ्या कॉलेजमधला पहिला दिवस मला अजुनही आठवतो. मी बी.ए.ला ॲडमिशन घ्यायला म्हणून गेले होते. मला कोणते विषय निवडायचे आहेत ते मी आधीच ठरवून ठेवले होते. परंतु मला नेमका हवा तो विषय म्हणजे राज्यशास्त्र हा विषय घेता आला नाही. तरीही त्यादिवशी तिथे माझी पहिल्यांदाच पोटे सर, पवार सर, शिंदे मॅडम, शेख सर, शिंदे सर, भेटले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी माझे विषय निवडले आणि पुढच्या वाटचाली करता पहिले पाऊल टाकले.

त्यानंतरचा माझा कॉलेजमधला प्रत्येक दिवस मला काहीनकाही नवीन शिकवून गेला. मी बी.ए.ला प्रवेश घेताना इंग्रजी, भूगोल, मराठी आणि लोकप्रशासन हे विषय निवडले होते. मला इंग्रजी हा विषय शेख सर व शिंदे सर यांनी शिकवला. तसेच भूगोल हा विषय पोटे सर, आवंढाळ मॅडम, जाधव मॅडम, यांनी तर लोकप्रशासन हा विषय पवार सर व शेडगे सर यांनी आणि मराठी हा विषय कटारे सर यांनी शिकवला. प्रत्येक विषयाची जशी स्पेशालिटी असते तसेच तो विषय शिकवणाऱ्या या शिक्षकांचीपण असते.

माझ्या आयुष्यात या शिक्षकांचा खूप मोलाचा वाटा आहे. या कॉलेजमधली माझी ४ वर्षे ही मला आयुष्यभर पुरणारी शिदोरी देवून गेली. पोटे सरांनी फक्त भूगोलच शिकवलं असे नाही, तर त्यांचं प्रत्येक वाक्य हे विद्यार्थ्यांचं आयुष्य घडवणारे होते. सर मुलांना एवढे पोटतिडकीने शिक्षणाचे महत्व सांगायचे की, कोणताही मुलगा सरांच्या तासाला गैरहजर राहत नसे. पोटे सरांनी आम्हाला बी.ए. केल्यानंतर पुढे कोणते मार्ग निवडता येतील याचे नेहमीच मार्गदर्शन केलं. तसेच त्यांनी विविध मार्गांनी सुधारित शेती कशी करायची याबद्दलही नेहमीच सांगितले. मराठी विषयाच्या कटारे सरांनी धडे आणि कविता शिकवताना नेहमीच मला निबंध लेखनात मदत केली तसेच माझी निबंध तपासून त्यात दुरूस्त्या सुचवल्या.

शिंदे मॅडमविषयी बोलावे तेवढे कमी आहे. मी त्यांची विद्यार्थी नसूनही त्यांनी मला वेळोवेळी इतिहास विषयात आलेल्या अडचणी सोडवण्यात मदत केली. त्यांनी नेहमीच आम्हा मुलांना आईची माया दिली. तसेच इंग्लिश विषयाचे खान सर यांनी नेहमीच आमच्यात एक शिक्षक आणि विद्यार्थ्याचे नाते न लावता मित्रत्वाचे नाते निर्माण केले. मला आठवते सरांनी एकदा आम्हाला 'द गाईड' हा धडा शिकवताना तो आणखी व्यवस्थित समजावा म्हणून आम्हाला 'द गाईड' या सिनेमाची सी.डी. दिली होती. लोकप्रशासनाच्या पवार सर आणि शेंडगे सर यांनी फक्त डिग्री पुरते न शिकवता या विषयाचा पुढील जीवनात कसा जास्तीत जास्त उपयोग होईल याप्रकारे शिकवले.

यानंतर मला इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे आपले त्यावेळेसचे ग्रंथपाल श्री. खाडे सर यांचा. त्यांनी मला लायब्ररीतून पुस्तके घेताना कधीच अडवले नाही. उलट मला कितीही पुस्तके लागली तरी कधीच नाही म्हणाले नाहीत याचा खूप मोठा फायदा मला एमपीएससीच्या परीक्षा देताना झाला. आणि त्याचबरोबर याठिकाणी मला हे सांगायला खूप आवडेल की, मी बी.ए.च्या तिन्ही वर्षाच्या उत्कृष्ट वाचक स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवला.

सगळयात शेवटी मला माझ्या कॉलेजमधल्या गॅदरींगची आठवण येते. कॉलेजमध्ये नेहमीच काही ना काही कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले जायचे. मात्र त्यातही गॅदरींगच्या वेळी आम्ही खूप धमाल करायचो. तसेच आमची भूगोल विषयात एकदा स्टडी टूर कपिलधारला गेली होती त्यावेळची आठवण मनात कायम राहील.

जाता जाता डॉ. दीपाताई क्षीरसागर यांची आठवण काढल्याशिवाय माझे हे मनोगत संपणार नाही. त्यांचे व्यक्तिमत्व एवढे भारदस्त आहे की, त्यांचा प्रभाव सहज कुणाही व्यक्तीवर पडतो. मी कॉलेजमध्ये असताना मला नेहमी त्यांच्यासारखे व्हावे असे वाटायचे. के.एस.के. कॉलेजबद्दल कितीही लिहिले तरीही ते कमीच पडणार आहे. परंतु कॉलेजबद्दलची प्रत्येकाची भावना शब्दात व्यक्त करता येणार नाही. तरीही मी इथे माझा छोटासा प्रयत्न केला आहे, परंतु या कॉलेजमध्ये घालवलेला प्रत्येक क्षण आम्हा विद्यार्थ्यांच्या मनात कायम ताजा राहील नेहमीच...

रजनी बडे

(राज्य कर सहायक, पुणे)

# ३१. प्रगतीच्या प्रवासातील टप्पा म्हणजे के.एस.के. कॉलेज

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बीड, म्हणजेच के.एस.के. महाविद्यालय बीड, हे महाविद्यालय माझ्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्वाचा टप्पा आहे. या महाविद्यालयात मी ११ वी ते एम. ए. चे शिक्षण पूर्ण केले. शैक्षणिक वर्ष २०१० ते ११ मध्ये मी माझे एम. ए. गृहविज्ञान, हे या महाविद्यालयात पूर्ण केले. त्यावेळी आम्हाला प्रा.डॉ. नुजहत सुलताना मॅडम, प्रा. माया खांदाट मॅडम, प्रा. जाधव मॅडम, प्रा. वाघुले मॅडम, प्रा. शेख मुबीना मॅडम शिकवण्यासाठी होत्या. गृहविज्ञान हा विषय कला व विज्ञान यांचा योग्य संगम आहे. या विषयामध्ये विज्ञानासोबतच कलेला सुद्धा महत्वाचे स्थान दिले गेले आहे. एक परिपूर्ण व्यक्ती तयार करण्यासाठी गृहविज्ञान हाविषय मोलाची जबाबदारी सांभाळतो. या विषयाचे शिक्षण घेऊन आपण नोकरी तर करू पण स्वतःचा लघुउद्योग सुरू करू शकतो. उद्योजकतेला
प्रोत्साहन देण्यासाठी गृहविज्ञान विषय अभ्यासाने उपयुक्त आहे.

सौ. के.एस.के. महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागामध्ये वेगवेगळे उपक्रम सत राबवले जात असत. यामध्ये औद्योगिक ठिकाणी भेट, बालसुधार केंदाला, मूकबधीर विद्यालयास भेट, एड्सग्रस्त व्यक्तींच्य वसतीगृाला भेट, पैठणी साड्याच्या मिलला भेट,ऐतिहासिक स्थळांना भेट,इ. ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक वर्षी कला प्रदर्शन सादर करून विद्यार्थीनींच्या कलागुणांना देखील प्रोत्साहन दिले जात असे, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, पेंटिंग स्पर्धा, अशा अनेक स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जात असे, मला देखील मी एम.ए.ला असताना पाककला, वीणकाम, भित्तीपत्रक स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. २०११ च्या स्नेहसंमेलनाच्या प्रमुख अतिथी प्रसिद्ध अभिनेत्री शर्वरी जमेनिस यांच्या हस्ते पारितोषिक स्विकारताना मला खूप आनंद झाला. माझ्या जीवनातील तो एक अविस्मरणीय क्षण आहे. त्या ठिकाणी खरंच खूप आनंददायक आहेत. मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून एम.ए. गृहविज्ञान विषयामध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. आज मी जिल्हा उद्योग केंद्र, बीड येथे कार्यक्रम समन्वयक म्हणून काम करीत आहे.

आपण ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेतले त्या महाविद्यालयाला आज पन्नास वर्षे होत आहेत. याचा खरोखरच खूप आनंद होत आहे. हे यशस्वी वर्ष होण्याकरिता महाविद्यालयाच्या आदर्श प्राचार्य सौ. डॉ. दीपाताई क्षीरसागर मॅडम तसेच महाविद्यालयातील आदरणीय प्राध्यापक, ऑफिस
स्टाफ व इतर कर्मचारी या सर्वांचीच मेहनत खूप महत्वाची आहे. आजपर्यंत या महाविद्यालयातून अनेक यशस्वी विद्यार्थी बोर पडले, बऱ्याच विद्यार्थ्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले, या सर्वांच्या मागे हे महाविद्यालयच आहे. विद्यार्थ्यांचा विकास करणारे हे महाविद्यालय असेच त्याचे शंभर वर्ष पुर्ण करोत हीच शुभेच्छा !

ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून समजला जाणारा हा बीड जिल्हा व तेथील हे महाविद्यालय हे या कामगारांच्या मुलांना शिक्षण देणारे व त्यांना विकसित करणारे एक ज्ञानाचे मंदिरच आहे. बीड जिल्हा विकसित करण्यासाठी या महाविद्यालयाचे श्रेय मोठ्या प्रमाणावर आहे माझे हे महाविद्यालय दिवसेंदिवस असेच खूप मोठे व्हावे व मी अभिमानाने 'हे माझं महाविद्यालय' असं सांगावं हीच सदिच्छा !

मयूरा जाधव

# ४०. डॉ. दीपाताई भारतभूषण क्षीरसागर सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या आयडीयल प्राचार्या

१९९७ मध्ये आदरणीय प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांनी सौ.के.एस.के.महाविद्यालयाचा पदभार सांभाळला. सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदमय वातावरण निर्माण झाले. लगेच दुसऱ्या दिवशी जयदत्त आण्णांनी कॉलेजच्या प्राध्यापकांची, प्राचार्याबरोबर मिटींग घेतली व तुम्हाला कोणते नवीन विषय आणायचे त्या विषयाचे Proposal पाठवा मी सहकार्य करण्यास तयार आहे. असे मार्गदर्शन आम्हा प्राध्यापकांना केले.पुढे आमच्या प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी Proposal पाठवून Drama, Music, Computer Science, Crop Science, Geography आणि M.Sc. Microbiology हे विषय महाविद्यालयात सुरू केले आणि विद्यापीठाची या विषयाला मान्यता मिळाली. पुढे भव्य असे Sports Hall बांधले व मुलींसाठी वसतीगृह, विज्ञान शाखेच्या प्रयोगशाळा Botanical Gardan, Canteen, Reading Hall भव्य Library, Home Science Lab, व तसेच Sport वर लक्ष केंद्रित केले.

आमच्या महाविद्यालयात सर्व Department शैक्षणिक साहित्यासह उपलब्ध आहेत. ज्यामुळे विज्ञान शाखा, कला शाखा किंवा वाणिज्य शाखांमधील विद्यार्थी विद्यापीठातच नव्हे तर आंतर विद्यापीठामध्ये चमकले व बक्षिसास पात्र झाले. ते फक्त आमच्या आयडीएल प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागरांमुळेच. मागे कधीतरी स्व. काकूंच्या मार्गदर्शनाखाली एक स्वतंत्र मिटींग प्राचार्यांनी बोलावलेली आठवते. सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी त्या मिटींगला उपस्थित होते. तेव्हा काकू म्हणाल्या होत्या, जसा लातूर पॅटर्न आहे तसा तुम्ही नवगण पॅटर्न सुरू करा. पुढे काकूंच्या आदेशानुसार आमच्या प्राचार्यांनी नवगण पॅटर्न सुरू केले.

प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी कला शाखा,विज्ञान शाखा व वाणिज्य शाखेमधील विषयांवर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे नाटक, संगीत, गृहशास्त्र, क्रीडा, एनसीसी, भूगोल विषयात महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यापीठातच नव्हे तर Other University मध्ये चमकले.

आमच्या प्राचार्यांनी काकू व आदरणीय जयदत्त आण्णासाहेब व डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचे मार्गदर्शन घेऊन विज्ञान ११ वी १२ वी वर्गावर आपले लक्ष केंदित केले. व नवगण पॅटर्न कसा राबवायचा हे सांगितले.

हुशार विद्यार्थ्यांची तुकडी वेगळी करणे त्यावर लक्ष केंद्रित करणे, परीक्षा घेणे, पालकाची घरी जावून भेट घेणे, विद्यार्थ्यांची माहिती कळवणे, प्रात्यक्षिक घेणे, विद्यार्थ्यांची प्री कोचिंग घेणे, सहल काढणे, सीईटीची तयारी करून घेणे, प्रत्येक रविवारी सीईटीची परीक्षा घेणे, मार्कस् सांगणे, मार्क लिस्ट प्राचार्यांना दाखविणे, मुलींची Seprate Division करणे, गरीब विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांचे Extra तासिका घेणे, Result तयार करणे, प्राचार्य व काकूंना Marklist दाखवणे प्रत्येक वर्षी पालक मेळावा घेणे या नियमांचा त्यात समावेश होता. महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळावा नियमितपणे होत असे. मेळाव्यास ५०० ते १००० पालक उपस्थित राहायचे. काकू मेळाव्यास उपस्थित असायच्या. त्यांचं मार्गदर्शनपर भाषण होत असे. काकू म्हणायच्या, हे सर्व मुलंमुली माझ्या आहेत. हे शिकून चांगल्या पदावर जातील कॉलेजचे नाव मोठं करतील

याचा मला गर्व आहे.

आदरणीय प्राचार्या पालक मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांना भाषणांमध्ये नेहमी सांगत असत, शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. खूप ज्ञानी व्हा, अभ्यास करा, डॉक्टर, इंजिनियर, ऑफिसर बना, आयपीएस किंवा आयएएस बना, कॉलेजचे आणि देशाचे नाव उज्वल करा.


शिक्षण म्हणजे All Round well Development. ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो. आज विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा त्रिवेणी संगम होतो. ज्यामुळे एकमेकांचे म्हणने ऐकून घेता येते व विद्यार्थ्यांचा विकास होतो व कॉलेजचं नाव प्रत्येक स्तरावर सूर्यासारखे चमकत आहे.

आमच्या प्राचार्या नेहमी म्हणत असत, जसं पेराल, तसं उगवेल, जर गहू पेरले तर गहू येतील, काटेरी रोपटं लावलं तर काटे येतील, याचा प्रत्यय पुढे येत गेला. CET मध्ये सुद्धा आमचे विद्यार्थी खूप चांगल्या गुणांनी विशेष प्राविण्यासह पास झाले. ज्यामुळे ते आज Doctor, Engineer किंवा मोठे Officer म्हणून आपल्या देशातच नव्हे तर बाहेरच्या देशामध्येही कार्यरत आहेत.

डॉ.दीपाताईंनी सौ.के.एस.कै.चा पदभार सांभाळला तेव्हापासून विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा केंद्रबिंदू माणून शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपली एक वेगळीच छाप किंवा ठसा निर्माण केला. आम्ही महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी चांगले काम केले तर त्यांना शाबासकी देणे, त्यांच्याकडून काम करून घेणे, चुकलं तर समजावून सांगणे, वेळोवेळी Ph.D. किंवा MPSC मध्ये पास झाले तर त्यांच्या सत्कार करणे, काकूंच्या म्हणण्याप्रमाणे महाविद्यालयाचा कारभार चालू ठेवला. अशा प्रकारे डॉ. दीपताई प्रशासन चालवतांना दिसतात.

शेवटी मी एवढेच सांगेल की, मेहनती, कष्टाळू, सगळयांना Corifidance मध्ये घेऊन काम करणाऱ्या, विद्यार्थ्यांना शिस्त लागावी म्हणून शिस्तपालन कमिटी तयार करून Disciplen वर लक्ष केंद्रित करणाऱ्या आमच्या आदरणीय आयडीएल डॉ. दीपाताई भारतभूषण क्षीरसागर आहेत. यांनी आजवर सर्वांना Corifidance मध्ये घेवून शैक्षणिक, साहित्यिक, राजकीय क्षेत्रामध्ये एक मोठे शिखर गाठले आहे. याचा मला आनंद वाटतो. मीही काम केले परंतु असा दयाळू, मायाळू प्राचार्य मी बघितला नाही. माझे तकदीर चांगले होते म्हणून मला त्यांचा कारभार पाहण्याचे भाग्य लाभले. शेवटी एवढेच सांगेल की, त्यांनी काकूंचा वारसा पुढे समर्थपणे चालु ठेवला.

शेख ए. ए.
कामखेडा



# ४१. माझ्या आयुष्याला आकार देणारे सौ.के.एस.के. महाविद्यालय

बीड शहराच्या मुख्य ठिकाणी के.एस.के. महाविद्यालय त्या काळातदेखील मोठ्या दिमाखात उभं होत. आम्ही ठरवलं की, याच कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा. १९९७ मध्ये मी काकूंचे कॉलेज हे नाव खूपदा ऐकलं होतं वडील क्लार्क व त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी शिकणारी चार बहिण-भाऊ असलेल्या एका सामान्य कुटूंबियातील मी मुलगी. किशोरावस्थेत पदार्पणासोबतच वेध लागले होते नवीन प्रवेशाचे. त्याकाळात व आजही प्रत्येकाच्या तोंडात घराघरात क्षीरसागर घराणं वसलेलं होतं. त्याकाळात माझे वडील श्री सय्यद अहेमद म्हणाले "आपल्याला काकूंच्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा आहे." आणि आण्णांच्या मार्गदर्शनातंच राहायचं आहे." आणि आम्ही काकूंच्या महाविद्यालयात म्हणजेच के.एस.के. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. १९९७ मध्ये तेथील प्राचार्य बेग सर होते.

किशोरावस्था ही एक अशी अवस्था असते, तेव्हा आयुष्याच्या गाडीला वेग भरपूर असतो. ब्रेक अजिबात नसतात, कुठे जायचे आहे मार्ग माहित नसतात. ध्येय निश्चित...नसते. अशा या गाडीला ब्रेक लावत ध्येयापर्यंत योग्य वेगाने व योग्य मार्गाने नेणाऱ्या शिक्षक वर्गाची प्रत्येक व्यक्तीला गरज असते. ती गरज मला माझ्या गुरूवर्याकडून के.एस.के. महाविद्यालयारूपी ज्ञान मंदिरातून प्राप्त झाली. म्हणतात ना,

**अपूर्णला पूर्ण करणारा आणि तत्वातून मूल्य फुलवणारा शिक्षक असतो**

तसे माझे प्रेरणास्थान माझे मार्गदर्शक व माझ्या जीवनाचे प्रकाशस्तंभ माझे के.एस.के. महाविद्यालयातील गुरू होते. आणि आजपण त्यांची प्रेरणा मला वेळोवेळी मिळते. इंग्लिश विषयाचे प्रा. झाडे सर यांच्यामुळे मी स्टेजवर उभा राहण्याचे धाडस शिकले. वक्तृत्व स्पर्धेत माझा प्रथम क्रमांक आला. सिनेअभिनेता रमेश भाटकर यांच्या हस्ते मला पारितोषिक भेटले. झाडे सरांनी जणू आयुष्यभर शिकण्यासाठीच धाडस निर्माण करून दिले. माझ्या आयुष्यातील तो क्षण महत्वाचा क्षण राहिला.

माझ्या आवडीचे विषय गृहशास्त्र, समाजशास्त्र हे होते माझ्या गुरूवर्य प्राध्यापिका सौ. जाधव मॅडम, डॉ. नुजहत सुलताना मॅडम आणि डॉ. खांदाट मॅडम होत्या. तसेच समाजशास्त्राचे पाटील सर माझे प्रेरणास्थान होते. आणि नेहमीच राहतील. गृहशास्त्र विषय घेत असताना डॉ. जाधव मॅडममुळे मी हा विषय घेतला. गृहशास्त्र विषयाच्या बाबतीत अनेक गैरसमज त्याकाळीदेखील होते.

फक्त मुलींसाठी तो विषय असतो मुलांनी तो घेऊ नये, स्वयंपाक आपल्याला येत नाही का ? मग तो का शिकायचा ? असाही समज त्याकाळी होता. परंतु आज फक्त याच गृहशास्त्र विषयाच्या अभ्यासामुळे मी कालिकादेवी वरिष्ठ महाविद्यालय शिरूर का. येथे २००५ पासून गृहशास्त्र या विषयासाठी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे पदवीचे शिक्षण मिल्लिया महाविद्यालय येथून पूर्ण केले. प्राध्यापिका जाधव मॅडम, डॉ. नुजहत मॅडम व खांदाट मॅडम यांनी मला एम.ए. गृहशास्त्र घेण्यासाठी प्रेरित केले.

माझ्या गुरूवर्य जाधव मॅडम, नुजहत मॅडम आणि खांदाट मॅडम या माझ्यासाठी **हिऱ्याप्रमाणे पैलू पाडतो तो गुरू, जीवन जगण्याचा योग्य मार्ग दाखवतो तो गुरू, गुरु जीवनाला खरा आनंद शोधायला शिकवतो तो गुरू, आव्हानावर मात करायचा आत्मविश्वास मिळून देतो तो गुरू अशा आहेत.**

**एक शिक्षक किताबी ज्ञान देता है । एक आपको समझाता है । एक कार्य करके दिखाता है । और आपको रास्ता दिखा कर आपको उसपर चलने के लिए छोड देता है, अपना स्वतंत्र व्यक्तीत्व बना सके यह अंतिम गुणवाला** शिक्षक सदैव आप के भितर प्रेरणा के रूप मे रहता है । जो हर परिस्थितीयों मे आपको संभालता है । आपको प्रोत्साहित करता है । अगदी याप्रमाणे आजपर्यंत मला माझ्या गुरुवर्यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले आहे.

आतादेखील पोटतिडकीने प्रत्येक विषयात मार्गदर्शन करून माझ्या पाठीशी खंबीरपणे ते उभे आहेत. काकू-नाना, आण्णांचा व माझ्या गुरूजनांचा आशीर्वाद सदैव असाच माझ्या पाठीशी असावा अशी प्रार्थना अल्लाहला करते. हम अपने जीवन के लिये माता पिताके ऋणी होते है । लेकिन एक अच्छे व्यक्तित्व के लिये हम एक शिक्षक के ऋणी होते है ।

सय्यद अफरोज अहेमद

# ४२. सहल


आम्ही बी.ए.ला असताना सौ.के.एस.के. कॉलेजमध्ये भूगोल विभाग म्हणजे राजमुकूटातील कोहिनूर हिरा होता. या विभागानं आपलं वेगळेपण जीवापाड जपलं होतं. आदरणीय मोहन गुळवे सर या विभागाचे प्रमुख होते. प्रा. राजपांगे सर, प्रा. फाळके सर, प्रा. चव्हाण सर, प्रा. देशमाने सर आम्हाला शिकवायला असायचे. बी.ए. प्रथम वर्षाला असतांना गुळवे सर, राजपांगे सर,प्रा. देशमुख सर, चव्हाण सर असत. मी दहावीला असतांना भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिकेत प्रथम सत्रात घटना व घटक यांचा संबंध स्पष्ट करण्याऐवजी चक्क जोड्या लावल्या होत्या. पुढे बारावीला व्यवसाय अभ्यासक्रमाला म्हणजे एमसीव्हीसीला प्रवेश घेतला होता. त्यामुळे भूगोल या विषयाचा कसलाच गंध नव्हता . १२ वी पास झालो, अन् बी.ए.ला प्रवेश घेतांना अगोदर ऐच्छिक इंग्रजी बदलून मराठी बदलून हिंदी विषय घेतला व सोबतीला समाजशास्त्र व भूगोल हे विषय घेतले.

सुरुवातीला भूगोल विषयातील नकाशावाचन, प्रमाण घेणे, नकाशा काढणे काहीच जमत नसे, वाटायचं उगाच हा विषय घेतला. चव्हाण सर प्रमाण घेऊन नकाशा काढायला सांगायचे. मला काही जमत नसायचं. माझ्या आत्याचा मुलगा गोकुळ छान नकाशे काढायचा. एकदा असंच देशमुख सर वर्गात शिकवत होते. त्यांना उगाच फालतू प्रश्न विचारून भंडावून सोडले. वैतागून त्यांनी माझे आडनांव विचारले. मी येडे असं म्हटल्यावर ते म्हणाले, माझ्या गावाशेजारचा आहेस, मी गप्प बसलो.

असंच द्वितीय वर्ष संपलं. तृतीय वर्षात आम्हाला प्रा. गुळवे सर, प्रा. फाळके सर, अन् प्रा. राजपांगे सर शिकवत होते. गुळवे सरांचं शिकवणं म्हणजे त्यांच्या मुखातून निघालेलं प्रत्येक वाक्य प्रमाण वाक्य असायचं. राजपांगे सर शिकवत असतं पण शिकवताना मामाच्या उंटाच्या अन् इतर बऱ्याच गोष्टी सांगत असत. मध्येच रूमाल काढून नाक ओढायची त्यांना सवय होती. प्रा. फाळके सर अन् त्यांचा भाचा गणेश आजबे एकाच रूममध्ये राहत असत. गण्या माझा चांगला मित्र होता. आजही चांगलाच आहे. फाळके सर घरी अभ्यास करून शिकवत असत. पण एकदा त्यांच्या गाडीने गती पकडली की थांबायचं नाव घेत नसे. हळूच गण्या म्हणतं असे "आज मामांनी खूप अभ्यास केलाय !" मी मध्येच उठायचो अन् १९५७ ला भारतात लोहपोलादाचे उत्पादन किती झाले होते असा प्रश्न विचारून त्यांची गाडी स्टेशनवर थांबवत असे. फाळके सर रागावयाचे. मित्र म्हणतं, "सर येड्या शहाण्याच्या वाड्यात रहात आहे. तरी अजून शहाणा झाला नाही" मी शिवाजी नगरला बाबाराव शहाणे यांच्या वाड्यात रहात असे. त्यामुळे येड्या शहाण्याच्या घरी राहतो याच्यावर सगळ्या कॉलेजमध्ये माझी टर उडवली जात असे.

आमच्या वर्गात सगळी पोरं बिलार होती. पण भूगोल विभागात आली की आदर्शवादी बनत असत. सुधीर सोनवे, वसंत मातकर, विजय खेडकर, संतोष सानप, लक्ष्मण मामा, सुभाष डांबे, गोवर्धन, गणेश आजबे, गायकवाड दत्ता, बबन घोडके, आंधळे, हांगे, गात, घोरमारे, दराडे, बडे, शहादेव डोंगर, हनुमंत घायाळ, रमेश कोटूळे, सतीश घुले, अतुल गायकवाड, राजू केदार, नरवडे, सुनील दहिफळे, बाबू जाधव, तोगे, सुर्वे, शरद वीर, कावळे असे अनेकजण होतो. मुलींमध्ये खिंडकर, कांबळे, अर्चना सिरसाट व कोंडेवार, पारवे यांच्यासह अनेक मुली होत्या. आमच्या वर्गात सर्वांत जास्त शायनिंग मारणारा म्हणजे सुधीर सोनवणे असायचा.

सुधीर,विजय,बबन,सुभाष,वसंत,गणेश अन मी आमचा जरा जीवाभावाचा दोस्ताना असायचा ! तृतीय वर्षात भूगोल विभागाची सहल निघत असे, जवळपास सर्वच मुलं सहलीला तयार झाली होती. सर्वांनी आपापल्या परीने पैशाची जुळवाजुळव केली होती.आम्ही सर्वजण आनंदी होतो. पण ऐनवेळी माझ्या आनंदावर विरजण पडले. माझा मित्र गणेश आजबे याचे ॲडमिशन चौसाळा कॉलेजमध्ये होते. या कारणास्तव प्रा. राजपांगे सरांनी




गेवराई येथील बालग्राम अनाथालयाला भेट देऊन त्यांच्यात रमलेले प्रा. हनुमान खेत्री

महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या माजी विद्यार्थी मेळावा उद्घाटनप्रसंगी मंचावर पोलीस निरीक्षक मा.अविनाश आघाव, क्रीडा अधिकारी मा.अरविंद विद्यागर, मा.सुहासिनी देशमुख, प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर






महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या माजी विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित माजी विद्यार्थी



बलभीम महाविद्यालयाकडून
आयोजित करण्यात आलेल्या
सायन्स टॅलेंट सर्च परीक्षेत आमच्या
महाविद्यालयातील विद्यार्थीनी
अमृता कुडके हीने प्रथम क्रमांक
मिळवला. त्यानिमित्त तिचा बक्षिस
देऊन सत्कार करताना बलभीम
महाविद्यालयाचे प्राचार्य
मा.डॉ.वसंत सानप
व इतर मान्यवर



रसायनशास्त्र विभागांतर्गत
आयोजित स्कुल कॉलेज
इंटरॲक्शन उपक्रमादरम्यान
शालेय विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक
करुन दाखवताना प्राध्यापक
सोनाजी गायकवाड



राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांतर्गत
आयोजित माझी वसुंधरा संवर्धन
अभियान उपक्रमांतर्गत वृक्षारोपण
करताना युवा नेते मा.अंकित प्रभु
समवेत, प्राचार्य मा.डॉ.दीपा
क्षीरसागर व इतर मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या SRD/NRD कॅम्प दरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बंकटस्वामी महाविद्यालयाचे कॅप्टन डॉ.चव्हाण समवेत, जिल्हा समन्वयक डॉ.पंडीत खाकरे व इतर मान्यवर

रसायनशास्त्र विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेची पाहणी करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व इतर मान्यवर





राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या Fit India Freedom Run उपक्रमादरम्यान शपथ घेताना कार्यक्रमाधिकारी डॉ.पंडीत खाकरे व इतर पदाधिकारी




सय्यद सनान सय्यद लाल या विद्यार्थ्याचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नंदूरबार येथे वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी (एम.बी.बी.एस.) प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्राचार्य मा.डॉ.दीपा क्षीरसागर व अन्य पदाधिकारी

मागील तीन दशकातील नाट्यशास्त्र विभागाची नेत्रदिपक कामगिरी

-------------

# ४१. माझ्या आयुष्याला आकार देणारे सौ.के.एस.के. महाविद्यालय

बीड शहराच्या मुख्य ठिकाणी के.एस.के. महाविद्यालय त्या काळातदेखील मोठ्या दिमाखात उभं होत. आम्ही ठरवलं की, याच कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा. १९९७ मध्ये मी काकूंचे कॉलेज हे नाव खूपदा ऐकलं होतं वडील क्लार्क व त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी शिकणारी चार बहिण-भाऊ असलेल्या एका सामान्य कुटूंबियातील मी मुलगी. किशोरावस्थेत पदार्पणासोबतच वेध लागले होते नवीन प्रवेशाचे. त्याकाळात व आजही प्रत्येकाच्या तोंडात घराघरात क्षीरसागर घराणं वसलेलं होतं. त्याकाळात माझे वडील श्री सय्यद अहेमद म्हणाले "आपल्याला काकूंच्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा आहे." आणि आण्णांच्या मार्गदर्शनातंच राहायचं आहे." आणि आम्ही काकूंच्या महाविद्यालयात म्हणजेच के.एस.के. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. १९९७ मध्ये तेथील प्राचार्य बेग सर होते.

किशोरावस्था ही एक अशी अवस्था असते, तेव्हा आयुष्याच्या गाडीला वेग भरपूर असतो. ब्रेक अजिबात नसतात, कुठे जायचे आहे मार्ग माहित नसतात. ध्येय निश्चित...नसते. अशा या गाडीला ब्रेक लावत ध्येयापर्यंत योग्य वेगाने व योग्य मार्गाने नेणाऱ्या शिक्षक वर्गाची प्रत्येक व्यक्तीला गरज असते. ती गरज मला माझ्या गुरूवर्याकडून के.एस.के. महाविद्यालयारूपी ज्ञान मंदिरातून प्राप्त झाली. म्हणतात ना,

**अपूर्णला पूर्ण करणारा आणि तत्वातून मूल्य फुलवणारा शिक्षक असतो**

तसे माझे प्रेरणास्थान माझे मार्गदर्शक. व माझ्या जीवनाचे प्रकाशस्तंभ माझे के.एस.के. महाविद्यालयातील गुरू होते. आणि आजपण त्यांची प्रेरणा मला वेळोवेळी मिळते. इंग्लिश विषयाचे प्रा. झाडे सर यांच्यामुळे मी स्टेजवर उभा राहण्याचे धाडस शिकले. वक्तृत्व स्पर्धेत माझा प्रथम क्रमांक आला. सिनेअभिनेता रमेश भाटकर यांच्या हस्ते मला पारितोषिक भेटले. झाडे सरांनी जणू आयुष्यभर शिकण्यासाठीच धाडस निर्माण करून दिले. माझ्या आयुष्यातील तो क्षण महत्वाचा क्षण राहिला.

माझ्या आवडीचे विषय गृहशास्त्र, समाजशास्त्र हे होते माझ्या गुरूवर्य प्राध्यापिका सौ. जाधव मॅडम, डॉ. नुजहत सुलताना मॅडम आणि डॉ. खांदाट मॅडम होत्या. तसेच समाजशास्त्राचे पाटील सर माझे प्रेरणास्थान होते. आणि नेहमीच राहतील. गृहशास्त्र विषय घेत असताना डॉ. जाधव मॅडममुळे मी हा विषय घेतला. गृहशास्त्र विषयाच्या बाबतीत अनेक गैरसमज त्याकाळीदेखील होते.

फक्त मुलींसाठी तो विषय असतो मुलांनी तो घेऊ नये, स्वयंपाक आपल्याला येत नाही का ? मग तो का शिकायचा ? असाही समज त्याकाळी होता. परंतु आज फक्त याच गृहशास्त्र विषयाच्या अभ्यासामुळे मी कालिकादेवी वरिष्ठ महाविद्यालय शिरूर का. येथे २००५ पासून गृहशास्त्र या विषयासाठी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे पदवीचे शिक्षण मिल्लिया महाविद्यालय येथून पूर्ण केले. प्राध्यापिका जाधव मॅडम, डॉ. नुजहत मॅडम व खांदाट मॅडम यांनी मला एम.ए. गृहशास्त्र घेण्यासाठी प्रेरित केले.

माझ्या गुरूवर्य जाधव मॅडम, नुजहत मॅडम आणि खांदाट मॅडम या माझ्यासाठी **हिऱ्याप्रमाणे पैलू पाडतो तो गुरू, जीवन जगण्याचा योग्य मार्ग दाखवतो तो गुरू, गुरू जीवनाला खरा आनंद शोधायला शिकवतो तो गुरू, आव्हानावर मात करायचा आत्मविश्वास मिळून देतो तो गुरू अशा आहेत.**

**एक शिक्षक किताबी ज्ञान देता है । एक आपको समझाता है । एक कार्य करके दिखाता है । और आपको रास्ता दिखा कर आपको उसपर चलने के लिए छोड देता है, अपना स्वतंत्र व्यक्तीत्व बना सके यह अंतिम गुणवाला** शिक्षक सदैव आप के भितर प्रेरणा के रूप मे रहता है । जो हर परिस्थितीयों मे आपको संभालता है । आपको प्रोत्साहित करता है । अगदी याप्रमाणे आजपर्यंत मला माझ्या गुरुवर्यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले आहे.

आतादेखील पोटतिडकीने प्रत्येक विषयात मार्गदर्शन करून माझ्या पाठीशी खंबीरपणे ते उभे आहेत. काकू-नाना, आण्णांचा व माझ्या गुरूजनांचा आशीर्वाद सदैव असाच माझ्या पाठीशी असावा अशी प्रार्थना अल्लाहला करते. हम अपने जीवन के लिये माता पिताके ऋणी होते है । लेकिन एक अच्छे व्यक्तित्व के लिये हम एक शिक्षक के ऋणी होते है ।

सय्यद अफरोज अहेमद

# ४२. सहल

आम्ही बी.ए.ला असताना सौ.के.एस.के. कॉलेजमध्ये भूगोल विभाग म्हणजे राजमुकूटातील कोहिनूर हिरा होता. या विभागानं आपलं वेगळेपण जीवापाड जपलं होतं. आदरणीय मोहन गुळवे सर या विभागाचे प्रमुख होते. प्रा. राजपांगे सर, प्रा. फाळके सर, प्रा. चव्हाण सर, प्रा. देशमाने सर आम्हाला शिकवायला असायचे. बी.ए. प्रथम वर्षाला असतांना गुळवे सर, राजपांगे सर,प्रा. देशमुख सर, चव्हाण सर असत. मी दहावीला असतांना भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिकेत प्रथम सत्रात घटना व घटक यांचा संबंध स्पष्ट करण्याऐवजी चक्क जोड्या लावल्या होत्या. पुढे बारावीला व्यवसाय अभ्यासक्रमाला म्हणजे एमसीव्हीसीला प्रवेश घेतला होता. त्यामुळे भूगोल या विषयाचा कसलाच गंध नव्हता . १२ वी पास झालो, अन् बी.ए.ला प्रवेश घेतांना अगोदर ऐच्छिक इंग्रजी बदलून मराठी बदलून हिंदी विषय घेतला व सोबतीला समाजशास्त्र व भूगोल हे विषय घेतले.

सुरूवातीला भूगोल विषयातील नकाशावाचन, प्रमाण घेणे, नकाशा काढणे काहीच जमत नसे, वाटायचं उगाच हा विषय घेतला. चव्हाण सर प्रमाण घेऊन नकाशा काढायला सांगायचे. मला काही जमत नसायचं. माझ्या आत्याचा मुलगा गोकुळ छान नकाशे काढायचा. एकदा असंच देशमुख सर वर्गात शिकवत होते. त्यांना उगाच फालतू प्रश्न विचारून भंडावून सोडले. वैतागून त्यांनी माझे आडनांव विचारले. मी येडे असं म्हटल्यावर ते म्हणाले, माझ्या गावाशेजारचा आहेस, मी गप्प बसलो.

असंच द्वितीय वर्ष संपलं. तृतीय वर्षात आम्हाला प्रा. गुळवे सर, प्रा. फाळके सर, अन् प्रा. राजपांगे सर शिकवत होते. गुळवे सरांचं शिकवणं म्हणजे त्यांच्या मुखातून निघालेलं प्रत्येक वाक्य प्रमाण वाक्य असायचं. राजपांगे सर शिकवत असतं पण शिकवताना मामाच्या उंटाच्या अन् इतर बऱ्याच गोष्टी सांगत असत. मध्येच रूमाल काढून नाक ओढायची त्यांना सवय होती. प्रा. फाळके सर अन् त्यांचा भाचा गणेश आजबे एकाच रूममध्ये राहत असत. गण्या माझा चांगला मित्र होता. आजही चांगलाच आहे. फाळके सर घरी अभ्यास करून शिकवत असत. पण एकदा त्यांच्या गाडीने गती पकडली की थांबायचं नाव घेत नसे. हळूच गण्या म्हणतं असे "आज मामांनी खूप अभ्यास केलाय !" मी मध्येच उठायचो अन् १९५७ ला भारतात लोहपोलादाचे उत्पादन किती झाले होते असा प्रश्न विचारून त्यांची गाडी स्टेशनवर थांबवत असे. फाळके सर रागावयाचे. मित्र म्हणतं, "सर येड्या शहाण्याच्या वाड्यात रहात आहे. तरी अजून शहाणा झाला नाही" मी शिवाजी नगरला बाबाराव शहाणे यांच्या वाड्यात रहात असे. त्यामुळे येड्या शहाण्याच्या घरी राहतो याच्यावर सगळ्या कॉलेजमध्ये माझी टर उडवली जात असे.

आमच्या वर्गात सगळी पोरं बिलार होती. पण भूगोल विभागात आली की आदर्शवादी बनत असत. सुधीर सोनवे, वसंत मातकर, विजय खेडकर, संतोष सानप, लक्ष्मण मामा, सुभाष डांबे, गोवर्धन, गणेश आजबे, गायकवाड दत्ता, बबन घोडके, आंधळे, हांगे, गात, घोरमारे, दराडे, बडे, शहादेव डोंगर, हनुमंत घायाळ, रमेश कोटूळे, सतीश घुले, अतुल गायकवाड, राजू केदार, नरवडे, सुनील दहिफळे, बाबू जाधव, तोगे, सुर्वे, शरद वीर, कावळे असे अनेकजण होतो. मुलींमध्ये खिंडकर, कांबळे, अर्चना सिरसाट व कोंडेवार, पारवे यांच्यासह अनेक मुली होत्या. आमच्या वर्गात सर्वांत जास्त शायनिंग मारणारा म्हणजे सुधीर सोनवणे असायचा.

सुधीर,विजय,बबन,सुभाष,वसंत,गणेश अन मी आमचा जरा जीवाभावाचा दोस्ताना असायचा ! तृतीय वर्षात भूगोल विभागाची सहल निघत असे, जवळपास सर्वच मुलं सहलीला तयार झाली होती. सर्वांनी आपापल्या परीने पैशाची जुळवाजुळव केली होती.आम्ही सर्वजण आनंदी होतो. पण ऐनवेळी माझ्या आनंदावर विरजण पडले. माझा मित्र गणेश आजबे याचे ॲडमिशन चौसाळा कॉलेजमध्ये होते. या कारणास्तव प्रा. राजपांगे सरांनी

त्याच्या नावाला विरोध केला. मग मी माझ्या सगळया मित्रमंडळीला फितवलं व्हतं, आम्ही मित्र म्हणालो, "गण्या तू बॅग भरून ठेव, बाकी काळजी करू नकोस" अखेर सहल जाण्याचा दिवस उजाडला अन् रोहिणी ट्रॅव्हल्स कॉलेजच्या दारात येऊन थांबली. राजपांगे सर काही तयार होत नव्हते अन् मी पण माघार घ्यायला काही तयार नव्हतो. गण्या नसंल तर मला पण यायचं नाही असं मी सांगून टाकलं. गाडीत राजपांगे सरांनी त्याची सुटकेस आणून ठेवली होती, ती मी गुपचूप ट्रॅव्हल्सच्या डीक्कीत ठेवली. सर सुटकेस कुठंय म्हणून माझ्याकडं संशयाने बघायचे पण मी मात्र चेहऱ्यावर कसलाच भाव न दाखवता गप्प बसून होतो. हो, नाही म्हणत राजपांगे सर गण्याला घ्यायला तयार झाले अन् राजपांगे सरांची सुटकेस मी काढून दिली.

गाडी सुरू झाली पण गण्याला बसायला जागा नव्हती. त्याला मी माझी जागा दिली अन् मी केबीनमध्ये जाऊन बसलो. गाडी शहराच्या बाहेर निघाली अन् गाडीत टी.व्ही. सुरू होऊन बेटा पिक्चर सुरू झाला. तिकडं धक्धक् गाणं सुरू झालं अन् हिकडं मी माझं रडगाणं सुरु केलं. मी म्हणालो "मी पण पैसे दिले आहेत, मला पण जागा पाहिजे." प्रा. गुळवे सर म्हणाले, "येड्या आतापर्यंत मित्रांसाठी काही करायला तयार होतास अन् आता मित्राला घेतलं की, लागला कुरकूर करायला" तेवढ्यात आंधळे म्हणाला "आर येड्या ये आपणं ॲडजेस्ट करून बसू" मग मला जागा मिळाली अन् आमची सहल मजेत सुरू झाली.

रात्रभर प्रवास करून आम्ही सकाळी वज्रेश्वरी येथे पोहोचलो. तेथील गरम पाण्याच्या कुंडात आम्ही स्नान केले. मस्त मज्रा केली. तोपर्यंत राजपांगे सरांचा माझ्यावरचा राग मवाळ झाला होता . पोरांनी आणलेल्या कॅमेऱ्यात रोल टाकून फोटो काढायला सुरूवात केली होती. माझ्याकडं कॅमेरा नव्हता त्यामुळे कुणाच्याही कॅमेऱ्यापुढे जाऊन उभा राहत असे. सगळे म्हणत, "आर येड्याचाबी काढा रं फोटो"

तेथून आम्ही मुंबई शहरात आलो. बरेच जण पहिल्यांदा मुंबई दर्शन करत व्हते. तिथल्या उंच इमारती, गाड्या बघून आम्ही अचंबित झालो. आम्ही सर्वजण संध्याकाळी जुहू बीचवर गेलो. तिथलं वातावरण बघून सर्वचजण बावचळून गेल्यासारखं करायला लागले. मस्त मज्रा केली. तिथल्या घोडागाडीत काही मुलं बसली तर काहीजण घोड्यावर बसले. तिथल्या लोकांनी आमची फसवणूक केली. संध्याकाळी थोडी खरेदी करून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. बरीच मुलं खेड्यातील होती त्यामुळे पैसे वाचवण्यासाठी मुक्काम न करता गाडीतच आराम करायचे ठरले.

नंतर आम्ही बरेच ठिकाणं पहात गणपतीपुळे येथे आलो. तिथला विस्तृत समुद्र पाहून आमच्या आनंदाला भरती आली. आमच्यातला गावाकडं विहीरीत पोहणारा किडा जागा झाला. मी अन् फाळके सर जरा जास्त समोर पोहत गेल्यावर मध्ये गेल्यावर सर म्हणाले, येडे चल आपण पुढे जाऊ, आमच्या अंगात फुरफुरी आली. काठावर वार्गतील मुली आमच्याकडे बघून हात हालवीत होत्या. मला तर मग पोहायला भलताच चेव आला. मी अन् सर पोहत पोहत खूप लांबवर आलो होतो. काठावरील लोक आम्हाला एकदम बारीक दिसत होते. काठावरील काही लोकं हातानं इशारा करताना दिसले पण त्याचा अर्थ न कळता आम्ही दोघे पुढेच निघालो होतो. दूरवर मध्ये गेल्यावर समुद्र शांत वाटत होता अन् पाणी हलकं वाटत होतं. तेवढ्यात सर म्हणाले "येडे समुद्रात अनेक मोठमोठे प्राणी असतात" माझी तर पाचावर धारण बसली. विहिरीत जशी आपण बुडी घेतो तसं मी बुडी घेऊन आजूबाजुला बघायचो. शेवटी सर म्हणाले, "येडे चल आता परत फि रू" अन आम्ही दोघेजण परत निघालो. आम्हाला बघून वसंत मातकरला चेव आला अन तो आमच्या दिशेने पोहत निघाला. आम्ही जवळपास एक ते दीड किलोमीटर अंतरावर पोहत मध्ये गेलो होतो. किनाऱ्यावर तिथले गार्ड आमची वाट बघत होते.

आमच्यावर ते धावले पण फाळके सर हे सर आहेत हे समजल्यावर मला सोडून ते त्यांनाच बोलू लागले. तोपर्यंत मी तेथून हळूच काढता पाय घेतला. **गाडीत सर्वजण आमच्या पोहण्याची चर्चा करत होते. मी उगाच फुशारकी मारू लागलो.**

मिथून आम्ही प्रतापगडाच्या दिशेने निघालो होतो. वाटेत गाणी अन् धिंगामस्ती चालू होती. आमचा मित्र विजय खेडकर, वरून गोगलगाय अन् पोटात पाय असलेला. पण वाटेतच त्याला बुळकांडी लागली होती. त्यामुळे बिचारा गपगुमान बसून असायचा. वाटेत गाडीत गाण्याच्या भेंड्या चालू होत्या. अन् मी जरा आचरट गाणं गायलं. तोपर्यंत माझ्या गावंढाळपणावर एका वर्गमैत्रिणीने टिप्पणी केली. मग मी तिच्यावर डूक धरला. अन् तिच्यावर टिप्पण्या करायला सुरूवात केली. आमची गाडी जय गडावर आली. तिथे फक्त सुकलेल्या माशांचा वास येऊ लागला, तरी तिथे फोटो काढण्याचा मोह आमच्या दराडे मित्राला आवरला नाही. तो तिथे फोटो काढत असताना त्याचा रोल संपला अन् त्याने रोल बाहेर काढला. रोल उलगडून मला म्हणाला, "येड्या याच्यात फोटु कसे दिसनात रं ?" मी म्हणालो, "नुसता फ्लॅश मारतो का काय तुझा कॅमेरा ?" तो रोल उलगडत होता हे बघून लांबूनच बडे ओरडत आला "आर ये दुष्मना रोल का उलगडतो ?" दराडे अन् बडे यांनी दोघांत कॅमेरा आणलेला होता. तोपर्यंत दराडेनं सगळा रोल उलगडला होता. बडे नुसता डोक्याला हात लावून बसला होता, कारण वर्गमैत्रिणीसोबत त्यानं मुंबईला फोटो काढले होते अन् आता ते सगळे खराब झाले होते. तेवढ्यात तो दराडेला म्हणाला "येडगळा डेव्हलपिंग केल्याशिवाय फोटो दिसत नसतेत" सगळे जण त्याला हसत होते.

आमची गाडी प्रतापगडावर आली अन आम्ही मस्त घोषणा देत गड चढलो. छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा पाहून आमच्यात वीरश्री संचारली होती. आम्ही गडावर ताक प्यायला घेतले अन् आमचा मित्र वसंत मातकर गायब दिसला. आम्ही बघीतलं तर तो वर्गमैत्रिणी सोबत मावळत्या सूर्याचं दर्शन घेत होता.

गाडीत बसल्यावर मी माझ्या मित्रावर अन् त्या वर्गमैत्रिणीवर गाणं म्हणायला सुरूवात केली! आती क्या खंडाला या गाण्याचे विडंबन करून त्यांच्यावर गाणी म्हणायला सुरूवात केली. शेवटी ज्या वर्गमैत्रिणीने माझ्या गावंढाळपणावर टिप्पणी केली होती, तिनं माझी मापी मागितली न आमच्या वादावर पडदा पडला.

नंतर आम्ही संध्याकाळी महाबळेश्वर येथे आलो. गाडीतच मुक्काम केला अन् सकाळी अनेक पॉईंट बघून खूप मज्जा केली. भूक लागली होती. अन् खिशातील पैसे संपत आले होते. आम्ही बरेच मित्र झुणका भाकर केंद्रावर गेलो. तिथं नाव सांगावं लागत असे. मी माझं नाव सांगितलं अन् झुणका भाकरवाल्याने आक्षेप घेता म्हणाला "नाव पंजाब अन् आडनाव येडे असलेल्या व्यक्ती मी आजपर्यंत बघितलेली नाही, खोटं नाव सांगू नकोस. तुला झुंणका भाकरी मिळणार नाही." मी माझ्याजवळ असलेलं कॉलेजचं ओळखपत्र दाखवलं अन् तो मोठ्यानं हासायला लागला.

नंतर आम्ही पाचगणीच्या पठारावर आलो. तिथे सर्वांनी धमाल केली. गुळवे सरांनी हे पठार जगातली दुसऱ्या नंबरचे ऊंच पठार आहे अशी माहिती सांगितली. नंतर आम्ही वाई मार्गे जेजुरीच्या खंडोबाचे दर्शन घेतले. कुलदैवतांचे दर्शन घेऊन मन प्रसन्न झाले, अन् आमच्या परतीच्या वाटेला लागलो.

आजही वाटतं परत ते दिवस यावेत, जुने मित्र भेटावेत, दंगामस्ती करावी, म्हणावं वाटतंय...

*"ये दौलत भी ले लो,*
*ये शोहरत भी ले लो*
*भले छिन लो मुझसे*
*मेरी जवानी*
*मगर मुझको लौटा दो*
*बचपन का सावन*
*वो कागज की कस्ती*
*वो बारीश का पानी"*

प्रा. पंजाबराव येडे

## ४३. आजचे के.एस.के.महाविद्यालय

एक आजी विद्यार्थी म्हणून कॉलेजचे अनुभव सांगताना मला अत्यंत आनंद होत आहे. सर्वप्रथम मी सौ.के.एस.के. महाविद्यालय, बीड येथे २०१७ साली अकरावी कला या वर्गासाठी प्रवेश घेतला. आज मला या महाविद्यालयात प्रवेश घेऊन ५ वर्ष पूर्ण होत आहेत. या ५ वर्षात महाविद्यालयात मला खूप काही शिकायला मिळाले. महाविद्यालयीन जीवन हे काही लोकांसाठी मौज, मजा, मस्ती म्हणजे जीवनाचा पुरेपूर आनंद घेणे यासाठी असते. आणि काहींना कठोर परिश्रम, करियर, एक उज्वल भविष्य बनविण्यासाठी संधी असते. जिथे आपण आपापली स्वप्नं साकार करत असतो. ते जीवन म्हणजे महाविद्यालयीन जीवन होय.

सौ. के. एस. के. महाविद्यालय म्हटले तर सर्वप्रथम लक्षात येते ती गोष्ट म्हणजे स्व. नाना व काकूंच्या प्रयत्नामुळे आज भव्य, दिव्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची संधी मिळत आहे. नाना, काकूंच्या प्रयत्नांनी हजारो विद्यार्थी येथे ज्ञानार्जन करत आहेत. आणि कित्येकजण मोठमोठ्या पदावर आपले वर्चस्व गाजवत आहेत.

आता माझे जर अनुभव सांगायचे म्हटले तर. महाविद्यालयातील रम्य असे वातावरण, भव्य अशी इमारत त्यातील परिसर, हॉस्टेल, गार्डन, लायब्ररी, कँटीन, लॅब वेगवेगळे डिपार्टमेंट असं बरचसं काही महाविद्यालयात आहे. महाविद्यालयात उज्वल भविष्यासाठी विद्यार्थी अनेक प्रकारचे ज्ञानार्जन करू शकतात.

महाविद्यालयातील प्रा.डॉ. दीपाताई क्षीरसागर आता दीपा मॅमबद्दल सांगायचं ठरलं तर, सर्वांना हेवा वाटणारं ते एक व्यक्तिमत्व आहे. आजच्या मुलींनी आदर्श घ्यावा असं त्यांचं अस्तित्व आहे. जे अनेकांना प्रोत्साहित करतं आणि महत्वाचं म्हणजे त्यांना अनेक कलांमध्ये असणारी त्यांची रूची. त्यातीलच एक कला, जी संगीत म्हणून ओळखली जाते. त्यामुळे या महाविद्यालयात मी प्रवेश घेतला आणि ती कला, शिक्षण, ती विद्या म्हणजे संगीत. आवड असली की निवड करता येते तसंच काहीसं इथे घडलेलं दिसतं.

मी विद्यार्थी म्हणून सौ.के.एस.के. महाविद्यालयात बी.ए. तृतीय वर्षामध्ये शिक्षण घेत आहे. मला लहानपणापासून संगीताची आवड असल्याने मी या संगीत विषय असणाऱ्या सौ.के.एस.के. महाविद्यालयाची निवड केली आणि इथे प्रवेश घेतला. तसं तर महाविद्यालयात अनेक विभाग आहेत, त्यातील सर्व शिक्षक खूप काही अनुभव, त्यांच्या सोबतच्या आठवणी देवून जातात. विद्यार्थ्यांना प्रयत्नशील बनवण्याचे लक्ष प्रत्येक शिक्षकाचे असते. प्रत्येकाच्या सहवासातून काहीतरी नवीन शिकायला मिळते. महाविद्यालयात अनेक विभाग आहेत. पण मला आनंद, उल्हास, शांती मिळते ते संगीत विभागात. माझे जास्त जुळले ते संगीत विभागाशी. संगीत विभागाच्या प्राध्यापक असणाऱ्या डॉ. जोशी मॅम, ज्या संगीतातील कुठलाही असा विषय नसेल, जो त्यांना माहित नाही. प्रतिभावंत असणाऱ्या संगीतातील आगळंवेगळं व्यक्तिमत्व जे शांतही तितकचं आणि अनुभवीही तितकच. तर मॅमकडून खुप काही शिकायला मिळतं. त्यांचा सहवास, त्यांचा स्वभाव, त्यांची कर्तव्यदक्षता, नियमबद्ध अशा अनेक बाजुंनी परिपूर्ण असणाऱ्या शास्त्रीयच नाही तर सुगम संगीत, अनेक वेगवेगळे गीतप्रकार अशा अनेक बाजुंनी परिपूर्ण असणाऱ्या जोशी मॅमची असणारी शिकवण, त्यांच्यातील मला आवडणारी गोष्ट म्हणजे कला कोणतीही असो तुम्हाला त्यातून नवनवीन काय शिकता येईल हे त्यांनी विद्यार्थ्यांना नेहमी सांगितले.

याच विभागात असणारे दुसरे व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. जमदाडे सर. यांच्याकडूनही मला काही शिकायला नेहमी मिळतात. थोड्या वेळात गाण्यातून लोकांना प्रभावीत कसं करता येईल ही कला जी त्याची प्रतिभा दाखवते. लोकसंगीत, कव्वाली, गझल, अशा वेगवेगळया प्रकारचे अनेक गीतं त्यांच्याकडून शिकायला मिळतात.आणि त्यातीलच असणारं तिसरं व्यक्तिमत्व म्हणजे थोरात सर. जे विद्यार्थ्यांना निरागसपणे बागेतल्या फुलासारखं प्रत्येकाला जपणं, प्रत्येकाला आपलं स्मित हास्य देवून नेहमी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणारे शिक्षक जे आपल्या हार्मोनियम, गायन, वादनातून प्रभावीपणे दिसून येणारं त्यांचं व्यक्तिमत्व लोभस आहे. स्व. काकूंच्या प्रयत्नांनी सुरु झालेले हे महाविद्यालय आजघडीला प्राचार्य दीपाताई क्षीरसागर यांच्या नेतृत्वात मोठ्या दिमाखात वाटचाल करत आहे.

सिद्धेश्वरी कोकाटे

# ४४. माझं कॉलेज, माझ्या आठवणी

कॉलेज म्हटलं की, सगळयांनाच आपापले कॉलेजचे दिवस आठवतात. प्रत्येकाच्या वेगवेगळ्या आठवणी असतात. त्या आठवणी, ते दिवस आपण कधीच विसरू शकत नाही. मनाच्या कोपऱ्यात त्या आपण कायम जतन करून ठेवलेल्या असतात. हे दिवस म्हणजे आपल्या आयुष्यातली सोनेरी क्षण असतात. जो मन भरुन जगला तोच खरा नशिबवान. कारण ते दिवस, ते क्षण पुन्हाः पुन्हाः येत नसतात. म्हणून College Life हे मनभरून जगलं पाहिजे. खरं तर कोणी मित्र मैत्रिणी भेटल्यावरच त्या आठवणी ताज्या होतात. तासन्तास त्यावर गप्पा रंगतात. आपण त्या भूतकाळात जातो. तेवढ्या पुरता तो संवाद होतो आणि संपतोही. पण मला वाटतं या आठवणी आपण मनात साठवून ठेवतो तशा त्या कागदावर उतरवल्या तर अजून ताज्या राहतील. पण हो, तसं होत नाही. आपण ते करत नाहीत. पण जर कोणी तुम्हाला सांगितलं की, तुमच्या कॉलेजच्या आठवणी तुमचे कॉलेजचे अनुभव लिहा. तर नक्कीच आपल्याला ते आवडेल ना ? मला सुद्धा असंच सांगण्यात आलं.

मी प्रियंका जाधव या महाविद्यालयाची विद्यार्थीनी मी २००१-२००५ अशी पाच वर्षे सौ.के.एस.के. कॉलेजला शिकायला होते. कला शाखेतून मी माझे पदवीचे शिक्षण पूर्ण केले. अकरावी ते थर्ड इयर या पाच वर्षात मी खूप काही शिकले. याच कॉलेजला ॲडमिशन घेण्याची काही कारणे होती, ती म्हणजे माझ्या दोघी भगिनी याच कॉलेजला शिकायला होत्या. हे कॉलेज माझ्या घराच्या अगदी जवळ होतं. या कॉलेजचं त्याही वेळेस खूप नाव होतं आणि मुख्य म्हणजे इथे नाट्यशास्त्र हा विषय होता. शिवाय PCC चा Deploma होता. तो इतर कोणत्याही महाविद्यालयात नव्हता. मुळातच मी फार शांत, कमी बोलणारी, खाली मान घालून चालणारी, घाबरट अशा स्वभावाची होते. Stage Dareing, self confidence मला कधीच नव्हता. या कॉलेजमध्ये Drama ला ॲडमिशन घेतल्यानंतर माझा कायापालट झाला.

वर म्हटल्याप्रमाणे मला Acting मध्ये फारसा रस नव्हता. पण हळूहळू मला यामध्ये रस येऊ लागला. हळूहळू माझी भिती कमी झाली. न बोलणारी प्रियंका आता बोलू लागली. self confidence वाढला. चालण्यातला, बोलण्यातला, वागण्यातला confidence वाढला. Department ला येण्याची ओढ वाढत गेली. माझा जास्तीत जास्त वेळ इथेच जाऊ लागला. नाटक, प्रॅक्टीस,नाट्यमहोत्सव, राज्य नाट्यस्पर्धा, एकांकिका स्पर्धा असं काही ना काही वर्षभर चालु असायचं. मुलींची संख्या खूप कमी असायची. आणि काही मुली ॲडमिशन घेऊनही Department ला येत नसत. आणि म्हणून जवळपास सर्वच नाटकांमध्ये मी असायची. अर्थातच मला यातून आनंद मिळायचा कारण मला आता हे काम प्रचंड आवडायला लागलं. आता मला अख्खं कॉलेज ओळखायला लागलं होतं. ते केवळ आणि केवळ Drama Department मुळे Department तर माझं घरचं होऊन गेलं होतं. सकाळी गेले की, रात्रीच घरी परतायचं. खूप आठवणी आहेत तिथल्या. नाटकांच्या तालमी, कधी कॉलेजचा नाट्यमहोत्सव तर कधी युवक महोत्सव, कधी एकांकिका स्पर्धा तर कधी राज्य नाट्य स्पर्धा या शिवाय कॉलेजचं स्नेहसंमेलन/गॅदरींग कुठल्या ना कुठल्या निमित्ताने काही ना काही Activity सतत चालू असायची. आणि माझा वेळ वर्षभर इथेच जायचा.

जिथे Drama Department चा उल्लेख येतो तिथे विभागाचे प्रमुख, आमचे गुरूवर्य आदरणीय

प्रा.डॉ. संजय पाटील देवळाणकर यांचादेखील उल्लेख होणे अनिवार्य आहेच. सरांबद्दल सांगायचे झाले, तर सर अतिशय शिस्तप्रिय होते. नाटकाच्या तालमीला उशीर झालेला त्यांना अजिबात चालत नसे. सकाळी ९ वा. तालीम असेल तर ९ वाजताच यावे लागे. १. मिनिट सुद्धा उशीर झालेला त्यांना चालायचा नाही. कामाच्या वेळी टाईमपास केलेला त्यांना आवडायचा नाही. सर फार चिडायचे. ते एकदा का चिडले की, मग काही खरं नसायचं, त्यांच्या हातात काठी असायची काठीपेक्षा त्यांचीच आम्हाला जास्त भिती वाटायची. मग आम्ही निमूटपणे रिहर्सल करायचो.

आणखी एक गोष्ट मला इथे सरांबद्दल आवर्जुन सांगाविशी वाटते, ती म्हणजे बऱ्याचदा युवक महोत्सव, नाट्य महोत्सव, गॅदरींग, राज्य नाट्य स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, असं काही असलं की, अशावेळी रात्री उशिरापर्यंत प्रॅक्टीस चालायची. त्यावेळी रात्रीचे ९,१० वाजणे म्हणजे खुप उशिर समजला जायचा. आम्हाला रात्री उशीर झाला म्हणजे सर घरी सोडवण्यासाठी सोबत यायचे किंवा विश्वासू मुलगा सोबत पाठवायचे.

सरांच्या पाठोपाठ अजून काही महत्वाच्या नावांचा इथे उल्लेख करणं गरजेचं आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे आज सरांमुळे नाट्यशास्त्र विभाग आहे. तसेच याला हातभार लावणाराही महत्वाचा प्राध्यापक वर्ग आहे. त्यांचा उल्लेख इथे करणे माझ्या दृष्टीने खूप महत्वाचे आहे. ते म्हणजे प्रा.डॉ. गणेश चंदनशिवे, लोककला अकादमी मुंबई विद्यापीठ, डॉ. सुधीर निकम, आणि प्रा.दिलीप शिराळे सर ही आज मोठी नावे आहेत. त्यांच्या नावांमध्येच त्यांची ओळख आहे. इथे मी त्यांची वेगळी ओळख सांगणे योग्य नाही. मी खूप भाग्यवान आहे मला या सगळयांच्या हाताखाली शिकायला मिळाले. त्यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या नाटकांमध्ये मला काम करण्याची संधी मिळाली. या सर्वांचा सहवास मला लाभला. अभिनयाचे धडे यांच्याकडून मिळाले. अजून एका नावाचा उल्लेख करणे महत्वाचे आहे. ते म्हणजे शाहीर विलास सोनवणे सर. ते खरे तर गेवराईचे पण युवक महोत्सव असला की, सर डिपार्टमेंटलाच असायचे. लोकनाट्य आणि लावणी ही त्यांची स्पेशल आहे. सर लावणी लिहायचे. एका युवक महोत्सवात सरांनी माझी लावणी बसवली होती. सुकुमार बाई, गुलाबाच्या फुला असे त्या लावणीचे बोल होते.

नाटकाच्या स्पर्धेत मला नेहमी उत्कृष्ट अभिनेत्रीचं प्राईज असायचं. मग ती अल्फा करंडक स्पर्धा असो, की पु.ल. देशपांडे एकांकिका स्पर्धा असो किंवा आणखी कोणतीही स्पर्धा असो, मी तिथे माझे 100% द्यायची. आमच्या प्रत्येक एकांकिकेला सुद्धा पहिलच पारितोषिक असायचं. के.एस.के.कॉलेज म्हटलं की, सगळेच टरकायचे. कॉलेज पोतं भरून बक्षीसं घेऊन जाणार हे माहित असायचं. कारण आमचा नेहमीच तेवढा तगडा Performance असायचा. लाईटस्, नेपथ्य, म्युझिक, डायरेक्शन पासून सगळीच बक्षीसं आमच्या एकांकिकेला असायची. स्पर्धा करून आलो की, मग काय पेपरला बातम्या, अभिनंदनाचा वर्षाव व्हायचा. युवक महोत्सवात तर आणखी मजा यायची.

मी आज मुंबईत मराठी आणि हिंदी अशा दोन्ही इंडस्ट्रीमध्ये काम करत आहे. तशी मी फार उशिरा काम करायला सुरुवात केली. पण माझ्या कलेमुळे आज मी इथे टिकून आहे. खूप काँपीटीशन आहे या क्षेत्रात, पण तुमच्यात जर टॅलेंट असेल तर तुम्ही कधीच मागे राहु शकत नाहीत. खरं तर आज मी जी आहे ती केवळ माझ्या या सर्व गुरूंमुळे आणि माझ्या डिपार्टमेंटमुळे. मी ॲक्टींगशिवाय माझी कल्पनाच करू शकत नाही. जर मी इथे नसते तर कुठेच नसते. मी या कॉलेजात ॲडमिशन

घेतले नसते आणि ड्रामा डिपार्टमेंटला आले नसते तर मी एक साधारण हाऊस वाईफ राहिले असते. माझ्यात काय आहे, याची जाणीव मला ड्रामाला आल्यावर झाली. आज मी ॲक्टर बनले ते केवळ याचमुळे.

या कॉलेजच्या प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर मॅडम एका कवयित्रीची मुलगी आणि राजकारणी घरातील सून आहेत. मॅडमबद्दल मी खरंच काय लिहू, खुप मोठं व्यक्तिमत्वMulti Talented Personality असलेल्या अशा आमच्या प्राचार्या शांत, गोड स्वभावाच्या आहेत. प्रत्येक गोष्टीच नॉलेज असणाऱ्या दीपाताई कवयित्री सुहासिनी इर्लेकरांच्या कन्या आहेत त्यामुळे त्यांना साहित्याची जाण आणि सखोल अभ्यास आहे. दीपा मॅडमनी संत ज्ञानेश्वर आणि संत मिराबाई यांच्या मधुर भक्तीपर काव्यांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर डॉक्टरेट पदवी प्राप्त केली आहे. त्या संगीत विशारदही आहेत. साहित्य अणि कला क्षेत्रात त्या नेहमीच सक्रिय असतात. मॅडमबद्दल लिहावं तेवढ कमीच आहे मी त्यांच्याबद्दल लिहिणं किंवा बोलणं लहान तोंडी मोठा घास ठरेल.खरं तर त्या माझ्या आदर्श व्यक्ती आहेत. मी ५ वर्षे कॉलेजला होते तोपर्यंत मी त्यांना बघितलयं आणि मला नेहमी वाटायचं की, मी त्यांच्यासारख बनावं, एक स्त्री अख्ख कॉलेज चालवतं, एका स्त्रीने प्राचार्य म्हणून एवढं मोठं कॉलेज सांभाळणं ही फार मोठी गोष्ट आहे. बीड जिल्हा माझ्या काळातच एवढा मागासलेला होता की, तिथे मुलींना किंवा स्त्रियांना कसल्याच बाबतीत वाव नव्हता. शिक्षणाच्या किंवा कलेच्या बाबतीत किंवा स्त्री स्वातंत्र्याच्या बाबतीत प्रचंड मागासलेपणा होता. मॉडर्न विचार तर सोडाच मॉडर्न कपडे घालणं देखील त्यांच्या दृष्टीने वाईट होते आणि याच बीडमध्ये एका मोठ्या महाविद्यालयाच्या मॅडम प्राचार्य आहेत. याचा खरंच खूप अभिमान वाटतो. मॅडमना मी नेहमी हसतमुख बघितलं आहे. त्यांच्याकडे बघितलं की, प्रसन्न वाटायचं एक वेगळीच एनर्जी मिळायची, कोणावर न रागावता, कोणावर न चिडता त्यांचा एक वेगळाच दबदबा असायचा. आदरयुक्त भिती असायची. प्राचार्य या पदाचा त्यांना कधीही गर्व नव्हता.

मला आजही खूप अभिमान वाटतो की, मी या कॉलेजची या डिपार्टमेंटची विद्यार्थीनी आहे. मला माझे गुरू चांगले मिळाले. आज मी जी आहे ती या सर्वांमुळेच. कारण मी ॲक्टर झाले नसते. तर कुणीच नसते. मला या शिक्षकांनी घडवलं, त्यांची मी कायम ऋणी राहील.

प्रियंका जाधव



# ४५. स्नेहिल आदर्शो का प्रेरक-सौ.के.एस.के. महाविद्यालय,बीड

सौ.के.एस.के. महाविद्यालय, बीड स्नेहिल आदर्शो को समेटे हुए एक ऐसा शिक्षण संस्थान हैं जहां प्रत्येक सामान्य परिवार का युवा शिक्षा की अमृत कलश को पा सकता हैं, जिसके मन में शिक्षा प्राप्ति की चाहत प्रगाढ हो । मैं सामान्य परिवार से और एक स्त्री होने के कारण शिक्षा के लिये कोई विशेष प्रयास की जरूरत नहीं यह तय रहता है, पर जिंदगी के तरह मेरी भी शिक्षा का सफर हिचकोले खाते हुए चलता रहा ।

मेरी और मेरे भाइयों के शिक्षा का भार मेरे जीजाजी के ऊपर था । जीजाजी की नोकरी के कारण तबादले होते रहते इन तबादलों की बदौलत में बीड नगरी से जुड गयी । जब मैंने सबसे पहले अपने कदम बीड शहर में रखें तो मेरे ऍडमिशन के लिए भाग-दौड हुई । शासन के नियमों के अनुसार महाविद्यालय की १३% सीटें रिजर्व रहती परंतु हम तीनों थे । दो लोगों का ही ऍडमिशन बीड के बलभीम महाविद्यालय में हो सका, मेरे लिए कहाँ गया कि लडकी की पढाई इतनी जरूरी नहीं । इस प्रकार मेरा ऍडमिशन सौ.के.एस.के. महाविद्यालय बीड में हो गया । मुझे तो इस बात की खुशी थी कि मेरी शिक्षा जारी थी । जैसे जैसे मैं कॉलेज से जुडती गयी वैसे मेरा कोई रिश्ता हो । एक स्नेहिल सा रिश्ता महाविद्यालय तथा अध्यापक, प्राधानाचार्य से जूड गया ।.

मेरा कॉलेज का पहला दिन जो मेरे लिए खास रहा । महाविद्यालय के खुले मैदान में एक ओजस्वी व्यकित्मत्व की धनी बैठी थी, उनके बारे में मैं अपरिचित थी, जिनको देखकर कोई भी प्रभावित हो जाए । जो बीड महिलाओं का राजकीय नेतृत्व था । उनके माथे की बडी बिंदी किसी को भी आकर्षित करती थी, एक प्रशासनिक रोब उनके आँखो से झलकता है । उनको देखकर कोई भी उनके प्रति आकर्षित हो जाता है । मैं भी उनके प्रति आकर्षित होती गयी, उनके व्यक्तित्व का प्रभाव मुझ पर बहुत अधिक रहा । आज भी मेरे मन-मस्तिष्क पर उनका प्रभाव हैं, क्यों कि युवा जीवन के उन उत्साहवर्धक पलों को एक नया वैचारिक भावात्मक मोड देने के लिए सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर जी का व्यक्तित्व और उनकी शिक्षण संस्था का योगदान काफी महत्वपूर्ण रहा है ।

जिस प्रकार सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर जी का व्यक्तित्व मेरे लिए खास रहा, उसी प्रकार प्रधानाचार्य डॉ. दीपा क्षीरसागर जी का भी, क्योंकि एक सफल प्रधानाचार्या जो महाविद्यालय काही नहीं बीड नगर की एक शैक्षिक, राजनीतिक, साहित्यिक एवं सांस्कृतिक चेहरा है । जिनको मैंने अपने महाविद्यालयीन जीवन में देखा था उसी प्रकार आज भी उन्होंने अपना व्यक्तित्व एवं सौंदर्य जैसे रोक रखा हैं । 'दिने दिने नवम' उनका सौंदर्य और भी अधिक ऊर्जावान और आकर्षित करता है । वे केवल दैदीप्यमान सौंदर्य की ही धनी नहीं है, बल्कि वे बुद्धीमती, प्रशासनिक, साहित्यिक सहृदयी व्यक्तित्व भी है । जिनको मैं आज भी उसी प्रकार पाती हूँ जैसा उन दिनों देखा और जाना था । मुझे याद है और मेरी सहेलिया उनको देखने के लिए हमारा विषय मराठी नहीं होते हुए भी हम मराठी के क्लास में बैठती थी ।

पदवी के नाम मेरा प्रमुख विषय हिंदी था । उस समय आदरणीय गुरुजी डॉ. देशमाने जी तथा डॉ. रणखांब सरजी हिंदी के अध्यापक थे, उनका पढा हुआ मैं बहुत मनोयोग से सुनती थी । यह मुझे आज भी विशेष रूप से याद है । जिनके प्रभुत्त्व स्वरूप मेरी पसंद की भाषा को मैंने रोजगार की भाषा के रूप में चुनने का निर्णय लिया । इसलिए आज मैं मराठवाडा के प्रतिष्ठित महाविद्यालय बलभीम महाविद्यालय,बीड में सन्मान से अध्यापन का कार्य कर रही हूँ ।

मैं धन्यवाद ज्ञापन करना चाहती हु, प्रधानाचार्य डॉ. दीपा क्षीरसागरजी का जिन्होंने मुझे अपने बीते दिनों का सफर करने, उन स्मृतियों को ताजा करने का तथा अपनी भावनाओं के अभिव्यक्ति का मौका दिया ।

डॉ. ललिता राठोड







पारितोषिक वितरण
श्री








वार्षिक स्नेहसंमेलन


U.G.C. SPONSORED
COORDINATION CHEMISTRY


उद्घाटक
विष्णुपंत धुतेकर व कै.हमीदमियाँ पटेल रंगमंच
पंकजकुमार
मा.श्री.डॉ.सुहास बावचे
ते ११ फेब्रुवारी २००९, दररोज सायं.
स्थळ : के.
















संयुक्त विद्यमाने आयोजित








वार्षिक स्नेह संमेलन २००१-०२


प्रसंगी


ज्येष्ठ अभिनेत्री
प्रमुख अतिथी
मोहन जोशी











## ४७. College Days

College life is known as one of the most memorable years of one's life. It is entirely different from school life. College life exposes us to new experiences and things that we were not familiar earlier. It is a time to get serious about your career and study thoroughly for a bright future. Every individual enjoys the college life and always wishes to relive that time once it is over. In school life we learn everything in a protected envirnment but college life exposes us to a new environment where we have to learn new things and face new challenges by ourselves.

When I got admission to K.S.K. College. I was impatiently waiting for the first day to attend the college and alao really afraid as all the people were new to me.I have completed my graduation from there.

***As graduation is an exciting time***
***Its both an ending and a beginning***
***its warm memories of the past***
***and big dreams for the future.***

I love my college a lot because it posses all the qualities of an ideal college. The education we get here goes beyond curiculm.It strikes a perfect balance between curriculum of extra curriculum activities. It's not just the acadamic excellence that count. Efforts are taken to evolve students into disciplined, honest, compassionate and above all an ideal human being.There are many different teachers in my college. Students have different criteria when choosing their favourite. Some of them prefer those who don't ask difficult questions. Some students like it when theachers don't bother them at all and just read their lect. As for me the most important criteria for my favourite teacher is devotion to the subject he teaches. If you succed to meet such teacher in your acadamic career you are really lucky. I consider my self to be a happy person on I had such teachers. Kshirsagar sir, Maheshmalkar madam taught physics. and it was really interesting to attend their classes and listen to their lectures.

Every year college organises annual function and varios competitions which help us in our future. I participated in drawing and Rangoli competitions. and got prizes too.It is firm belief that education is the best way to enlighten young minds and it can only be imparted in a good environment having proper thinking.

***My college has all what it takes***
***Nothing like confidence***
***and self trust at once***
***this is the simple chance***
***where you can prove the mental substance.***
***No doubt, English is a universal language***
***but if you can manage in the local language***
***that gives a double-edged advantage.***
***This depends on an individual how to***
***manage.***
***Whether you are clad in lavish attire***
***or in the simple dress wore***
***it leaves a perfect impression***
***and that gives lasting impersonification***
***the college experience is unique***
***where you learn the basic.*** (Hasmukh Mehta)

**- Miss. Sushma Bapurao Pawar**

# कविता

## १. प्रिय केशरकाकू....

प्रकाशाने झळकत आहे
ज्योत ही ज्ञानाची....
शुन्यातुन विश्व निर्माण करण्याची
जिद्द होती काकूंची....

गडद रात्रीनंतर पहाट आहे
उज्वल भविष्याची....
अथांग प्रयत्नांची
कविता आहे ही काकूंची....

रणांगनाची रणभूमी आहे
प्रत्येक विषयाची....
ज्वलंत मशाल संयमाची
तटस्थ होती काकूंची....

चराचरांत सामावली आहे
गंगा ही ज्ञानाची....
गाथा जीवनाची
स्मृती ही केशर काकूंची....

सिद्धेश्वरी कोकाटे



## २. प्राचार्य दीपा मॅम

अनेक कलांची जोपासना
त्यांचा रूबाबच खूप महान
अनेकांचा अभिमान
दिव्य आहे त्यांचे ज्ञान

अशा आहेत आमच्या
प्राचार्य दीपा मॅम....
लख्ख असे चमकावे चांदणे
हा त्यांचा सन्मान

अनेकांचा अभिमान
दिव्य आहे त्यांचे ज्ञान
अशा आहेत आमच्या
प्राचार्य दिपा मॅम....

जगणं त्यांचं लहानमोठयांशी
प्रत्येकाशी समान
अनेकांचा अभिमान
दिव्य आहे त्यांचे ज्ञान

अशा आहेत आमच्या
प्राचार्य दीपा मॅम....

सिद्धेश्वरी कोकाटे

## ३. या म्हणावं तुफानांना...

या म्हणावं तुफानांना
चिरेबंदी किल्ला आहे
पाडू नकात भिंती -
प्रेमाचा सल्ला आहे...

मभारताफ्चं भूषण
दत्त म्हणून जय !
बंधुप्रेम दरवळे
मोगऱ्याची सय....

कधी ना मोडे-तुटे
विश्वासाची नाळ
ना दुभंगवू शकला
झंजावती काळ....

यश-अपयश पचवले
झुंजले-लढले जोडी
वादळातल्या तुफानात
किनाऱ्याला होडी....

चक्रव्यूह भेदताना
लढवैय्या म्हणा;
आण्णांचं बळं वाढवी
अध्यक्षीय बाणा....

काडाडू देत वीजा
षडयंत्राचे भय नाही
कोलमडून पडणारं
कमजोर वय नाही....

या म्हणावं तुफानांना
चिरेबंदी किल्ला आहे
पाडू नकात भिंती -
प्रेमाचा सल्ला आहे....

अनिलकुमार होळकर

## ४. ओढ....

ओढ तुझ्या सहवासाची...
तुला भेटल्यावर अजून वाढते
काय आहे हे सांग ना...
मला असे का होतं राहते,
समोर असलीस जर तू कधी
वेळ जणू थांबून जातो
असाच हा वेळ थांबावा म्हणून
मी वेळेशी भांडून जातो,
होताच स्पर्श तुझ्या आठवणींचा
श्वास माझा बहरून जातो
तुझ्या आठवणींचा तो क्षण
ऱ्हदयाचे ठोके वाढवून जातो,
सुगंध दरवळतो प्रीतीचा
आपल्या त्या क्षणांमध्ये
हळुवार स्पर्श हा प्रेमाचा
दरवळतो दोघांच्या मनांमध्ये,
कुठवर ही वाट जाते
तिथवर साथ म्हणून हवी आहे
माझ्या आयुष्यातल्या प्रत्येक प्रश्नाला
तु उत्तर म्हणून हवी आहे,
खरंच ही ओढ तुझ्या सहवासाची...
तु भेटल्यावर अजून वाढते
काय आहे हे सांग ना...
मला असे का होत राहते,

कविता गोले

## ५. आयुष्याच्या वाटेवर

तु हवं ते बोलून गेली...
ऱ्हदयाचा ठोका चुकवून गेली...
कसला तुझा हा गोड खोटेपणा...
उगाच बघताच तुझ्याकडे...
मी हळूच बघताच तुझ्याकडे...
कशी सये गोड हसून गेली...
समजुनही तु, माझ्या नजरेची भाषा...
का ? अशी टाळुन गेली...
हसायचे सोंगही ओठांवर आणता
येत नाही...
डोळयांत आसवांना ठेवून गेली...



कविता गोले

## ६. वेदना

पाळता येत नाही...
किंवा टाळता येत नाही...
काही केल्या,
सांभाळता येत नाही...

फेकता येत नाही...
किंवा विकता येत नाही...
तिच्या-समवेत जगूनही,
जगता मात्र येत नाही...



पल्लवी आमटे

## ७. आयुष्य

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून आम्ही,
एकमेकांत दिसत नाही.
हरवला तो आपापसांतला,
जिव्हाळयाचा संवाद,
एकमेकांस दोष देऊन,
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही,
ऱ्हदयाचे पाऊल कधी,
ऱ्हदयाकडे वळत नाही,
इतकं जगून झालं पण,
जगायला वेळ नाही,
जगतो आहोत कशासाठी,
काहीच कसला मेळ नाही,
क्षण एक येईल असा,
घेऊन जाईल हा श्वास,
अर्ध्यावरच थांबलेला,
असेल जीवन प्रवास,
अजुनही वेळ आहे,
थोडं तरी जगून घ्या,
सुंदर अशा जगण्याला,
डोळे भरून बघून घ्या,

अंजली गायकवाड

## ८. मैत्रीण

एक तरी मैत्रीण अशी हवी
जरी न बघता पुढे गेलो तरी
मागून आवाज देणारी
आपल्यासाठी हसणारी

वेळ आलीच तर अश्रुही पुसणारी
स्वतःच्या घासातला घास
आठवणींने काढून ठेवणारी
वेळप्रसंगी आपल्या वेड्या मित्राची

वेड्या मित्राची
समजूत काढणारी
वाकडं पाऊल पडताना मात्र
मुस्काटात मारणारी

यशाच्या शिखरावर
आपली पाठ थोपटणारी
सगळयांच्या घोळक्यात
आपणास शोधणारी

आपल्या आठवणीनं
आपण नसताना व्याकुळ होणारी
खरंच ! अशी एक तरी जीवाभावाची
ममैत्रीणफ हवी जी आपणास मित्र
म्हणवणारी

यश दुनघव



## ९. साथ

होता अंधःकार सर्वत्र,
वाट एकटीच होती...

चालताना एकटेच,
साथ कुणाचीच नव्हती...

अशात तुझे येणे झाले...
शुभ्र सहवास तुझा,

मन चांदण्यात न्हाले...
अन सोबत तुझ्या,
जीवन सुंदर झाले...

– राहूल अंभूरे

## १०. मी

नागमोडी आयुष्याच्या,
असंख्य वळणावरती वळलेला मी,

सहजतेच्या शोधार्थ,
वळणावरून पळलेला मी,

फिरूनी येतो आहे वळणावरतीच...
आणि,

अगणितश्या वळणांनीच,
पुन्हा छळलेला मी...

कोमल वीर

## १४. नारी

नारी तु सबला आहेस अबला नाहीस
घराची तु लक्ष्मी आहेस, पायाखालची धुळ नाही
तुझ्यामुळेच निर्माण होते प्रत्येक पिढी
संपवून टाक तु, प्रत्येक कर्मठ रूढी
जे पुरूष करतात छळ तुझा
तेही जन्म घेतात नारीच्याच पोटी
किती सोसशील छळ, नारी तु पुरूषांचे
पडदे जरा उघड त्या पुरूषांच्या मनाचे
घाबरू नकोस आता तु या जगाला
स्वतःचच्ं अस्तित्व निर्माण करायला शिक
छळ करणाऱ्याला शिक्षा द्यायला शिक
सति होऊन घाबरून जगण्यापेक्षा
कालि होऊन लढनं शिक
शेवटी इच्छा माझी एवढी
प्रत्येक नारी पण असते सावित्री
शिकू द्या तिला पण तरच
तर वाढेल आपली संस्कृती...

गीता चव्हाण

## १५. नवीन वर्षाचे गीत

सरत्या वर्षाला निरोप देऊया ।
नव्या वर्षाचे स्वागत करूया ।।धृ।।
जुन्या आठवणी विसरून नव्या आठवणी निर्माण करूया,
जुन्या नात्यातुन नवी नाती बनवूया,
जुन्या विचार संग्रहातून नवे विचार भक्कम करूया,
एका आठवणीने, एका नात्याने, एका विचाराने,
सरत्या वर्षाला निरोप देऊया
नव्या वर्षाचे स्वागत करूया ।।१।।
सरत्या वर्षापेक्षा नव्या वर्षात दिलदार मनाने वागूया,
मदतीचा हात सतत चालु ठेवुया,
सरत्या वर्षापेक्षा ह्या वर्षात पाण्याची बचत जास्त करूया,
सरत्या वर्षापेक्षा मैत्रीच्या हा अखंड धागा आणखी वाढवूया,
सरत्या वर्षाला निरोप देऊया,
नव्या वर्षाचे स्वागत करूया ।।२।।
प्रत्येक सण उत्सव हा एकत्रित येऊन दरवर्षीप्रमाणे साजरे करूया,
प्रत्येक व्यक्तीला दरवर्षी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य देऊया,
त्यांचे दुःख दूर करून सर्वांना सुखी करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे
साथीदार बनवूया,
सरत्या वर्षाला निरोप देऊया,
नव्या वर्षाचे स्वागत करूया ।।३।।

जगमित्र

## १६. तू कोण ठरवणारा

तू कोण ठरवणारा
तु फक्त पाहत राहा ।।धृ।।
कोण शकूनी कोण अपशकूनी
ज्यांचे त्यांना ठाऊक असते
तू कोण ठरवणारा
तु फक्त पाहत राहा ।।१।।
त्याचे नशीब त्यांच्याजवळ
आपण या विश्वाचे घटक
या चक्रातुन सतत फिरणार
तू एक खेळणी आहे
तू कोण ठरवणारा
तु फक्त पाहत राहा ।।२।।

अनंत विश्वामध्ये जन्मलेला
एका या क्षणासाठीचा तू, एक कण ।
पण तुला वाटते तूच सर्व काही
हा तुझा भ्रम आहे, बाकी काही नाही ।
तू कोण ठरवणारा
तु फक्त पाहत राहा ।।३।।
या जगात कोणी कोणाचे नाही
कोणीच कायमचे सोबती नाही ।
वेळेचा दुरूपयोग करत बसू नको
तू कोण ठरवणारा
तु फक्त पाहत राहा ।।४।।

जगमित्र

# Senior Teaching Staff

| Sr. No. | Name | Designation | Subject | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1) | Dr. Kshirsagar Deepa Bharatbhushan | Principal & HOD | Marathi | M.A.Ph.D. |
| 2) | Dr. Kshirsagar Shivanand Vishwanath | Vice Principal & Assosicate Prof.HOD | Physics | M.Sc.Ph.D |
| 3) | Dr. Maulage Satish Bapurao | Assosicate Prof.& PG Director | Chemistry | M.Sc.NET/SET,Ph.D. |
| 4) | Dr. Mrs. Nuzhat Sultana Badiuddin | Professor | Hom.Sci. | M.Sc.Ph.D. |
| 5) | Dr. Mrs. Khandat Maya Sanjyrao | Professor & HOD | Hom. Sci. | M.Sc.Ph.D. |
| 6) | Dr. Mrs. Gulve Rekha Mohan | Professor & HOD | Microbiology | M.Sc.Ph.D. |
| 7) | Dr. Kale Udhav Maruti | Professor & HOD | Phy. Edu. | BPED.MPED,Ph.D. |
| 8) | Dr. Wadhe Ramanth Rangnath | Professor | Marathi | M.A.Ph.D. |
| 9) | Dr. Rathod Abasahed Haribhau | Professor & HOD | Hindi | M.A.SET/NET Ph.D. |
| 10) | Dr. Patil Sanjay Sudhakarrao | Professor & HOD | Dramatics | B.A.M.Drama Ph.D. |
| 11) | Dr. Patil Prashant Venkatrao | Professor | Zoology | M.Sc.Ph.D. |
| 12) | Mr. Pote Balasaheb Tukaram | Assistant Prof.&HOD | Geography | M.A.SET |
| 13) | Mr. Pawar Sharad Suryakant | Associate Prof.& HOD | Pub. Adm. | M.A.SET |
| 14) | Dr.Mrs. Ramteke Dushyanta Devidas | Associate Prof. | Dramatics | M.A.Drama,NET,PH.D. |
| 15) | Dr. Sirsat Premchand Bhimrao | Associate Prof. | Zoology | M.Sc.Ph.D. |
| 16) | Dr. Mrs. Joshi Surekha Murlidharrao | Associate Prof.& HOD | Music | M.A.,NET,Ph.D. |
| 17) | Dr. Talekar Santosh Mahadeorao | Associate Prof.& HOD | Botany | M.Sc.Ph.D. |
| 18) | Mr. Shaikh Mohmad Gaus Ibrahim | Lib.Associate Prof. | Librarian | M. Lib.SET |
| 19) | Dr. Smt. Jodand Sandhya Khushalrao | Assistant Prof. | Botany | M.Sc.Ph.D. |
| 20) | Dr. Choudhari Vinayak Mahadu | Assistant Prof.& HOD | Economics | M.A.Ph.D. |
| 21) | Dr. Chavan Asaram Deepaji | Assistant Prof. | Geography | M.A.M.Phil.Ph.D. |
| 22) | Dr. Shelke Anil Namdeorao | Assistant Prof.& HOD | Zoology | M.Sc.Ph.D. |
| 23) | Dr. Khakre Pandit Ramchandra | Assistant Prof.& HOD | Chrmistry | M.Sc.Ph.D. |
| 24) | Dr. Gutte Sudhakar Laxman | Assistant Prof. | Microbiology | M.Sc.Ph.D. |

# Senior Teaching Staff

| Sr. No. | Name | Designation | Subject | Qualification |
|---|---|---|---|---|
| 25) | Dr. Shinde Shivaji Namdevrao | Assistant Prof. | English | M.A.Ph.D. |
| 26) | Dr. Sanap Bhagchand Marotirao | Physical Director | Phy. Dir. | BPED,MPED,Ph.D. |
| 27) | Mr. Raut Shankar Rangnath | Assistant Prof.& HOD | Mathematics | M.Sc.M.Phil. |
| 28) | Mr. Shrimangale Gajanan Wamanrao | Assistant Prof. | Mathematics | M.Sc.M.Phil.Ph.D. |
| 29) | Dr. Tonde Shrimant Raosaheb | Assistant Prof.& HOD | English | M.A.Ph.D. |
| 30) | Mr. Katare Balasaheb Vishnu | Assistant Prof. | Marathi | M.A.M.Phil.NET |
| 31) | Dr.Mrs.Maheshmalkar Pradnya Ramdasrao | Assistant Prof. | Physics | M.Sc.Ph.D. |
| 32) | Dr. Jadhav Siddharth Shankarrao | Assistant Prof.& HOD | Commerce | M.Com.Ph.D. |
| 33) | Dr. Mrs. Shinde Anita Venkatrao | Assistant Prof.& HOD | History | M.A.M.Phil,NET,Ph.D. |
| 34) | Mr. Gaykwad Sonajirao Vishwanath | Assistant Prof. | Chemistry | M.Sc.,NET |
| 35) | Dr. Jamdhade Deepak Dagdu | Assistant Prof. | Music | M.A.NET |
| 36) | Mr. Khetri Hanuman Rambhau | Assistant Prof. | Sociology | M.A.M.Phil.SET/NET |
| 37) | Dr. Shete Nagesh Panchakshri | Assistant Prof. | Commerce | M.Com.Ph.D. |
| 38) | Dr. Kale Navnath Punjarao | Assistant Prof. | Hindi | M.A.Ph.D. |
| 39) | Dr. Bondge Sanjay Gajanan | Assistant Prof. | Economics | M.Sc.Ph.D.. |

# Junior Teaching Staff

| Sr. No. | Name | Designation | Qualification |
|---|---|---|---|
| 1) | Mr. Syed Lal Syed Nazir (Vice Prin.) | Jr. Teacher Mathematics | M.Sc., B.Ed. |
| 2) | Mr. Malode Sunil Shridharrao | Jr. Teacher Physics | M.Sc., B.Ed. |
| 3) | Mr. Kolekar Jalindar Uttamrao (Sup.) | Jr. Teacher Biology | M.Sc., B.Ed. |
| 4) | Dr. Kakade Narayan Ramkrishan | Jr. Teacher Chemistry | M.Sc., B.Ed.Ph.D. |
| 5) | Mr. Patil Satendra Devidasrao | Jr. Teacher Sociology | M.Sc., B.Ed. |
| 6) | Mrs. Jadhav Manju Balwantrao | Jr. Teacher Hom.Sci. | M.A., B.Ed. |
| 7) | Mr. Morale Rajesh Madhavrao | Jr. Teacher Geography | M.Sc., B.Ed. |
| 8) | Mr. Jagtap Umakant Shivram | Jr. Teacher Chemistry | M.A., B.Ed. |
| 9) | Mr. Shinde Ravindra Raosaheb | Jr. Teacher Hindi | M.Com.B.Ed. |
| 10) | Mr. Netke Dattatray Eknath | Jr. Teacher Comm. | M.Sc., B.Ed. |
| 11) | Mr. Sarpate Dayanand Ambadasrao | Jr. Teacher Chemistry | M.Sc., B.Ed. |
| 12) | Mr. Sonwane Rahul Bhimrao | Jr. Teacher Chemistry | M.Sc., B.Ed. |
| 13) | Mr. Salunke Pradip Annarao | Jr. Teacher Physics | M.Sc., B.Ed. |
| 14) | Mrs. Vaidya Anita Vivekrao | Jr. Teacher Sanskrit | M.Sc., B.Ed. |
| 15) | Dr. Maske Sanjay Ramkrishan | Jr. Teacher Botaby | M.Sc., B.Ed. |
| 16) | Mr. Gaikawad Vinodkumar Kamlakar | Jr. Teacher Mathematics | M.Sc., B.Ed. |
| 17) | Mrs. Mule Sharayu Madhukar | Jr. Teacher Physics | M.Sc., B.Ed. |
| 18) | Mr. Nisargandh Milind Damodhar | Jr. Teacher Chemistry | M.Sc., B.Ed. |
| 19) | Mr. Khutale Asaram Devichand | Jr. Teacher Biology | M.Sc., B.Ed. |
| 20) | Mr. Mandve Prakash Balasaheb | Jr. Teacher Biology | M.Sc., B.Ed. |
| 21) | Mrs. Siddique Kaniz Fatema Shahabuddin | Jr. Teacher Biology | M.Sc., B.Ed. |
| 22) | Mr. Raut Shivaji Shankarrao | Jr. Teacher Physics | M.Sc., B.Ed. |
| 23) | Mrs. Radkar Jyoti Balasaheb | Jr. Teacher Biology | M.Sc., B.Ed. |
| 24) | Mr. Ghumare Amol Ashok | Jr. Teacher Marathi | M.A., B.Ed. |
| 25) | Mr. Gonde Givind Dadarao | Jr. Teacher Physics | M.Sc., B.Ed. |
| 26) | Mr. Yedke Suresh Ganpatrao | Jr. Teacher English | M.A., B.Ed. |
| 27) | Mr. Thokal Ashok Satish | Jr. Teacher English | M.A., B.Ed. |
| 28) | Mr. Bhagat Kishor Narayan | Jr. Teacher Chemistry | M.Sc., B.Ed. |
| 29) | Mr. Jadhav Anil Dinkarrao | Jr. Teacher Physics | M.Sc., B.Ed. |

# M.C.V.C.

| Sr. No. | Name | Designation | Qualification |
|---|---|---|---|
| 1) | Mr. Kale Sanjay Gorakhnath | Full Time Teacher | M.Com.,B.Ed. |
| 2) | Mrs. Nagure Jayshree Vaijinath | Full Time Teacher | M.Sc.B.Ed. |
| 3) | Mrs. Mahure Megha Pandurang | Full Time Director | B.Sc.B.Ed. |
| 4) | Mr. Vanjare Vasant Sopanrao | Full Time Director | M.Com. B.Ed. |
| 5) | Mr. Syed Mukhi Musamiya | Jr. Clerk | B.A. |
| 6) | Mr. Irmale Navnath Muktaji | Hamal | 4th Std. |

# Non Teaching Staff

| Sr. No. | Name | Designation | Qualification |
|---|---|---|---|
| 1) | Dr. Deshmane Vishwambhar Trimbakrao | Office Supdit. | M.Com,MPED, BPEDPh.D.JDC&A |
| 2) | Mr. Shete Parmeshwar Rameshwar | Steno | M.A. |
| 3) | Mr. Pawar Chandrakant Rambhau | Head Clerk | B.A |
| 4) | Mr. Khade Laxman Dadarao | Lib. Clerk | B.A.B.Lib. |
| 5) | Mr. Mule Subrao Yadavrao | Lib. Clerk | B.A. |
| 6) | Smt. Deshmukh Hemlata Babasaheb | Jr. Clerk | B.A. |
| 7) | Mr. Raut Jayram Radhakisan | Jr. Clerk | B.A. |
| 8) | Mr. Jadhav Rajendra Tatyaram | Jr. Clerk | B.A. |
| 9) | Mr. Pawar Latusingh Balaji | Lab. Assistant | H.S.C |
| 10) | Mr. Korde Ashok Babasaheb | Lab. Assistant | B.A.BPED |
| 11) | Mr. Bhasmare Pandurang Ginyandeo | Lab. Assistant | B.A. |
| 12) | Mr. Pawar Bapu Sitaram | Lab. Assistant | H.S.C. |
| 13) | Mr. Lagad Lahu Sarjerao | Lab. Assistant | B.A. |
| 14) | Mr. Sangale Sachin Ramrao | Lab. Assistant | H.S.C. |
| 15) | Mr. Sonnar Laxman Annarao | Lab. Assistant | M.A.B. Lib. |
| 16) | Mr. Choure Balaji Chandra | Lab. Assistant | S.S.C |
| 17) | Mr. Deshmane Malikarjun Ramrao | Lab. Attendant | H.S.C. |
| 18) | Mr. Maindad Anil Dattu | Lab. Attendant | M.A. |
| 19) | Mr. Gange Anurath Hanwat | Lab. Attendant | S.S.C. |
| 20) | Mr. Kanade Balaji Yogiraj | Lab. Attendant | B.A. |

# Non Teaching Staff

| Sr. No. | Name | Designation | Qualification |
|---|---|---|---|
| 21) | Mr. Ghorad Shrikrishna Vithal | Lab. Attendant | S.S.C. |
| 22) | Mr. Jagtap Devidas Shrirang | Lab. Attendant | S.S.C. |
| 23) | Mr. Khose Mahadeo Ramdas | Lab. Attendant | H.S.C. |
| 24) | Mr. Dake Dilip Prabhakar | Lab. Attendant | S.S.C. |
| 25) | Mr. Jadhav Sambhaji Saidu | Lab. Attendant | B.A. |
| 26) | Mr. Gaikwad Ashok Yallepa | Lab. Attendant | M.A. |
| 27) | Mr. Yadav Gorakh Bharath | Lab. Attendant | H.S.C. |
| 28) | Mr. Raut Kashinath Bhagwat | Lab. Attendant | H.S.C. |
| 29) | Mr. Dhongade Vishal Vithal | Lab. Attendant | H.S |
| 30) | Mr. Vyawhare Santosh Bhamandal | Lab. Assistant | H.S.C |
| 31) | Mr. Ghuge Laxman Uttam | Lab. Assistant | H.S.C |
| 32) | Mr. Gavane Sharad Maharudra | Lab. Assistant | B.A. |
| 33) | Mr. Shinde Shrikant Subhash | Lab. Attendant | M.A. |
| 34) | Mr. Jagtap Tatya Mohan | Lab. Attendant | S.S.C. |
| 35) | Mr.Ausarmal Sachin Asaram | Lab. Attendant | M.A. |
| 36) | Mr. Sawai Balu Dhondiram | Lab. Attendant | S.S.C. |
| 37) | Mr. Chavan Baliram Rajesaheb | Peon | 7th Std. |
| 38) | Mrs. Naikwade Parvati Rambhau | Peon | 7th Std. |
| 39) | Mr. Jadhav Bharath Sakharam | Peon | H.S.C |
| 40) | Mr. Katkhade Navnath Bajirao | Peon | B.A. |

# *Internal Quality Assurance Cell (2021-2022)*

| | | |
|---|---|---|
| 1) | **Dr. Deepa Kshirsagar -** Principal | Chair person |
| 2) | **Dr. A. S. Hange -** Vice - Principal | Administrative Official |
| 3) | **Dr. S. V. Kshirsagar** Vice - Principal | **Co-ordinator** |
| | **Teacher Representative** | |
| 1) | Dr. Mrs. R. M. Gulve | Member |
| 2) | Dr. S. S.Jadhav | Member |
| 3) | Dr. S. B. Maulage | Member |
| 4) | Dr. S. N. Shinde | Member |
| 5) | Dr. Mrs. S. K. Jogdand | Member |
| 6) | Dr.Mrs. Nuzhat S. B. | Member |
| 7) | Mr. S. V. Gayakwad | Member |
| | **External Experts** | |
| 1) | Shri. B. D. Gore | Member-Industry |
| 2) | Adv. D. S. Doifode | Member-Community |
| 3) | Dr. S. S. Hussaini | Alumni representative |
| 4) | Dr. Raosaheb Hange | Alumni representative |

नवगण शिक्षण संस्था राजुरी न. संचलित

# सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

## ।। कार्यकारी मंडळ ।।

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विलास राजाराम बडगे | अध्यक्ष |
| २) | श्री. विजय दगडू पवार | उपाध्यक्ष |
| ३) | डॉ. भारतभूषण सो. क्षीरसागर | चिटणीस |
| ४) | श्री. दिनेश जगन्नाथ परदेशी | सहचिटणीस |
| ५) | सौ. पुष्पाताई श्रीधर पांगारकर | खजिनदार |
| ६) | श्री. राजेंद्र भगवान पवार | सभासद |
| ७) | श्रीमती लक्ष्मीबाई बाबुराव मस्के | सभासद |
| ८) | सौ. प्रभावती प्रभाकर जोशी | सभासद |
| ९) | श्री. सय्यद जमील स. खैरूद्दीन | सभासद |

## ।। स्थानिक कार्यकारी मंडळ ।।

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विलास राजाराम बडगे | अध्यक्ष |
| २) | डॉ. भारतभूषण सो. क्षीरसागर | सदस्य |
| ३) | प्रा.डॉ. डी. बी. क्षीरसागर | सचिव |
| ४) | डॉ. जी. के. मेखे | सदस्य |
| ५) | डॉ. एस. डी. नाईकवाडे | सदस्य |
| ६) | श्री. के. पी. कासट | सदस्य |
| ७) | डॉ. ए. एस. हांगे | सदस्य |

# बायडिंग बाजु




GUEST HOUSE
SEMINAR HALL
LIBRARY
प्रकाशक –
प्राचार्य, सौ.के.एस.के.उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.